पवित्र शास्त्राचा परिचय

संकलन – क्रॉसी उर्टेकर

अनुक्रमणिका

प्रकरण	विषय	पृष्ठ क्रमांक
१	पवित्र शास्त्राची ओळख	6
२	पवित्र शास्त्र तुम्हाला कसे प्राप्त झाले?	9
३	पवित्र शास्त्राचा अभ्यास कसा करावा	13
	भाग पहिला	
४	जुन्या करारातील पुस्तके - उत्पत्ती	२२
५	निर्गम	25
६	लेवीय	28
७	गणना	33
८	अनुवाद	36
९	यहोशवा	39
१०	शास्ते	43
११	रूथ	46
१२	१ले व २रे शमुवेल	49
१३	१ले व २रे राजे	52
१४	१ला व २रा इतिहास	56
१५	एज्रा	59
१६	नहेम्या	62

१७	एस्तेर	65
१८	ईयोब	68
१९	स्तोत्रसंहिता	73
२०	नीतिसूत्रे	76
२१	उपदेशक	79
२२	गीतरत्न	82
२३	यशया	84
२४	यिर्मया	88
२५	विलापगीत	92
२६	यहेज्केल	93
२७	दानीएल	95
२८	होशेय	97
२९	योएल	99
३०	आमोस	101
३१	ओबद्या	103
३२	योना	105
३३	मीखा	107
३४	नहूम	110
३५	हबक्कूक	112
३६	सफन्या	114
३७	हाग्गय	115
३८	जखऱ्या	118
३९	मलाखी	122

भाग दुसरा

१	जुना करार ते नवा करार – मधला काळ	127
२	शुभवर्तमानांची प्रस्तावना	130
३	चारही शुभवर्तमानांचा सुसंगत अभ्यास	132
४	मत्तयकृत शुभवर्तमान	136
५	मार्ककृत शुभवर्तमान	139
६	लूककृत शुभवर्तमान	142
७	योहानकृत शुभवर्तमान	145
८	प्रेषितांची कृत्ये	149
९	रोमकरांस पत्र	151
१०	करिंथकरांस पहिले पत्र	155
११	करिंथकरांस दुसरे पत्र	159
१२	गलतीकरांस पत्र	160
१३	इफिसकरांस पत्र	165
१४	फिलिपैकरांस पत्र	168
१५	कलसैकरांस पत्र	171
१६	थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र	174
१७	थेस्सलनीकाकरांस दुसरे पत्र	177
१८	तीमथ्याला पहिले पत्र	179
१९	तीमथ्याला दुसरे पत्र	182
२०	तीताला पत्र	185
२१	फिलेमोनाला पत्र	187

२२	इब्री लोकांस पत्र	189
२३	याकोबाचे पत्र	193
२४	पेत्राचे १ले पत्र	196
२५	पेत्राचे २रे पत्र	201
२६	योहानाचे १ले पत्र	206
२७	योहानाचे २रे पत्र	208
२८	योहानाचे ३रे पत्र	210
२९	यहूदाचे पत्र	211
३०	प्रकटीकरण	214

प्रकरण १ पवित्र शास्त्राची ओळख

पवित्र शास्त्राला "देवाचे वचन" असे संबोधले आहे. जरी ते लिहिण्यासाठी मानवांचा साधन म्हणून देवाने उपयोग करून घेतला असला तरी त्याचा लेखक देव स्वत: आहे.
त्याचे दोन भाग आहेत; जुना करार आणि नवा करार. जुन्या कराराची ३९ पुस्तके व नव्या कराराची २७ पुस्तके मिळून एकूण ६६ पुस्तकांचा तो ग्रंथसंग्रह आहे. त्यात ११८९ अध्याय व ३११७३ वचने आहेत. जुना करार व नवा करार यांच्या दरम्यान ४०० वर्षांचा खंड आहे. त्यात देवाने अजिबात संपर्क साधला नाही म्हणून त्याला काळा काळ म्हणतात. जुना करार युगारंभापूर्वीच्या काळापासून कालरेषेची सुरुवात करून महत्त्वाच्या ऐतिहासिक नोंदी देतो. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या येशूजन्माच्या वार्तेने ४०० वर्षांची स्तब्धता भंग पावते. तसेच येशूच्या जन्माची नवा करार नोंद देतो व तेव्हापासून इसवी सन सुरू होते, हा ऐतिहासिक कळस आहे. शिवाय नव्या कराराचा समारोप सार्वकालिक राज्याने होतो. जुना करार मुख्यत: इस्राएलांचा इतिहास व तारणाऱ्याची भाकिते याविषयी आहे. तर नवा करार ख्रिस्ताचे व्यक्तित्व आणि मंडळीच्या स्थापनेविषयी आहे. त्यातील पहिली चार शुभवर्तमाने देवमानव येशूख्रिस्ताचा इतिहास निरनिराळ्या दृष्टिकोनातून मांडतात. प्रेषितांची कृत्ये तारणाऱ्या पुनरुत्थित ख्रिस्ताचे स्वर्गारोहण, पवित्र आत्म्याचे आगमन, मंडळीचा जन्म व यरुशलेम, यहूदा, शोमरोन आणि रोमन साम्राज्यात मंडळीचे कार्य कसे झाले याचा ठळक वृत्तांत देते. २१ पत्रे येशू ख्रिस्ताचे कार्य, मनुष्याच्या जीवनावर त्याचा परिणाम व तो येईपर्यंत द्यावयाच्या साक्षीविषयी आहेत. प्रकटीकरण सध्याच्या मंडळीच्या युगाचे चित्र रेखाटते. ख्रिस्ताचे द्वितीयागमन होऊन या भूतलावर तो आपले राज्य स्थापील, देवहीनांचा न्याय करील, आणि विश्वासी जनांचे गौरव करून आशीर्वाद देईल याचे विवेचन करते. तसेच प्रभूचे १००० वर्षांचे राज्यवैभव राज्य व अखेरचा न्याय आणि सार्वकालिक राज्य याविषयी सांगते. पवित्र शास्त्र समजण्यासाठी निर्मितीपासूनचा इतिहास जाणून घेणे व मुख्य विषयावर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे.

बायबलचा प्रमुख विषय

देव आपल्या गौरवार्थ मानवाची निर्मिती करतो. त्यातील एक समूह निवडून त्याला आपल्या सार्वकालिक राज्याची प्रजा बनवतो. यासाठी की त्यांनी त्याची स्तुती आराधना आदर सन्मान व सेवा करावी; आणि त्यांच्याद्वारे देवाने आपले ज्ञान, सामर्थ्य, दया, कृपा व गौरव ही प्रदर्शित करावी. पण मानवाचे पतन झाले, त्यामुळे निवडलेल्यांना एकत्र करण्यासाठी देव त्यांच्यासाठी मुक्तीची योजना सिद्ध करतो. या मुक्तीची युगारंभापूर्वी पासून युगाच्या अंतापर्यंतची योजना बायबल सांगते.
देव एकच आहे. पवित्र शास्त्रातील निर्माणकर्ता हा एकच खरा देव आहे. त्याच्या कृपेची एकच योजना आहे. त्या योजनेत तो स्वत: पुढाकार घेतो, अंमलबजावणी करतो व ती योजना युगारंभापूर्वीपासून तर गौरवीकरणापर्यंत कार्यरत ठेवतो

जुन्या व नव्या करारात पुढील पाच मुद्द्यांवर जोर दिला आहे. पवित्र शास्त्र वाचताना या विषयांच्या दिशेने मनन करावे. जुन्या करारात दिलेली सत्ये नव्या करारात अधिक स्पष्ट केली आहेत.

(I) देवाचा स्वभाव व गुणवैशिष्ट्ये: देवाने खालीलप्रमाणे आपले प्रकटीकरण केले आहे.

- निर्मितीतून: जुन्या करारात मानवाला आपल्या प्रतिमेचे घडवून तर नव्या करारात येशू ख्रिस्ताला देवमानव म्हणून पाठवून. तो खुद्द देवाचे प्रतिरूप होता.
- देवदुतांद्वारे
- चिन्हे अद्भुते व चमत्कारांद्वारे
- दृष्टांतांद्वारे
- देव जुन्या करारात वाणीने, संदेष्टे व इतरांद्वारे बोलला; नव्या करारात प्रेषितांद्वारे व संदेष्ट्यांद्वारे
- जुन्या व नव्या करारातील लिखित वचनांद्वारे

(II) अवज्ञा व पापांबद्दल न्याय

यात पापाची शोकगाथा व देवाच्या पावित्र्याचा दर्जा समजतो. पवित्र शास्त्राचे ११८९ अध्याय आहेत, पण त्यातील उत्पत्तीचे *पहिले दोन अध्याय* व प्रकटीकरणातील *शेवटचे दोन अध्याय* असे एकूण फक्त चार अध्याय पापरहित जीवन रेखाटतात. उरलेले सर्व अध्याय पतनाची शोकगाथा सांगतात. संपूर्ण जुना करार पाप करून देवाच्या आज्ञा मोडल्याच्या नोंदी देतो.
नवा करार पापाचे स्वरूप अधिक स्पष्ट करतो. येशूचे उपदेश, शिक्षण व पश्चात्तापास केलेल्या पाचरणाच्या नोंदी देतो. पण यहूदी पुढारी, इस्राएल राष्ट्र, पिलात, रोम आणि उरलेले संपूर्ण जग तारणाऱ्या ख्रिस्ताला नाकारतात. सत्य झिडकारल्यामुळे स्वत:वर दंड ओढवून घेतात. पापाचा जोर युगसमाप्तीस येशूचे न्यायासाठी पुनरागमन होईपर्यंत दिसतो. जुन्या करारापेक्षा पाप तेव्हा अधिक बोकाळलेले दिसते. कारण नव्या करारातील सत्यांचा प्रकाश लाभूनही तारणाऱ्या येशूला धिक्कारण्याच्या पापाचा त्यात समावेश आहे.

(III) देवाच्या दर्जानुसार विश्वासाने आज्ञापालन केल्याबद्दल आशीर्वाद

देवावर विश्वास ठेवणाऱ्यांना मिळणाऱ्या प्रतिफळाविषयी वचन सतत बोलते. संपूर्ण जुना करार हेच दर्शवतो की पापांसाठी पश्चात्ताप करून देवावर विश्वास ठेवला व त्याच्या वचनांचे आज्ञापालन केल्यास आशीर्वाद मिळतो. देवाचा दर्जा, त्याची नैतिक मूल्ये व विधिनियम त्यात वरचेवर प्रकट केले आहेत. देवाचा दर्जा राखण्याची असमर्थता मानव समजतात, पाप ओळखतात, स्वधार्मिकतेने देवाला संतुष्ट करू शकत नसल्याचे मान्य करतात व कृपेची याचना करतात तेव्हा त्यांच्यावर तारणाची दया होऊन त्यांना सार्वकालिक आशीर्वाद प्राप्त होतात हे जुना करार निदर्शनास आणून देतो. नव्या करारातही पश्चात्ताप करणाऱ्यांस देव पापापासून मुक्ती देतो, त्यांच्यावर आशीर्वादांचा वर्षाव करतो, हे दाखवले आहे. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या उपदेशामुळे पश्चात्ताप करणारे लोक तेथे दिसतात. पुढे येशूच्या उपदेशामुळे पश्चात्ताप केलेले लोक दिसतात. मग प्रेषितांच्या संदेशामुळे सुवार्ता स्वीकारणारे लोक आढळतात. पुढील

काळातील संपूर्ण इतिहासांत हेच निदर्शनास येते की जे कोणी हा विश्वास धरतील त्यांना या जगात व भावी जगातही आशीर्वाद प्राप्त होतात.

(IV) तारणारा प्रभू येशू, तारणासाठी त्याने केलेले बलिदान, त्या तारणाऱ्याची मानवाला असलेली गरज व त्यामुळे झालेले त्याचे बदलीचे मरण

हा तर संपूर्ण पवित्र शास्त्राचा गाभाच आहे. जुना करार येशूविषयी भविष्ये देतो तर नवा करार त्याच्या पहिल्या व दुसऱ्या आगमनाच्या नोंदी देतो. देवाची दया व कृपा झाल्याशिवाय आशीर्वाद प्राप्त होणार नाहीत. त्यासाठी देवाच्या न्यायापुढे पापांची भरपाई व्हायला हवी. पाप्याच्या बदली कोणीतरी निर्दोष रक्त सांडले पाहिजे. ही निष्कलंकता व पावित्र्य असणारी गुणवत्ताधारक एकच व्यक्ती आहे, ती म्हणजे येशू ख्रिस्त. त्याच्या बलिदानावर विश्वास ठेवणाऱ्यांना देव नीतिमान ठरवतो. देवानेच प्रायश्चित्ताच्या या बदलीच्या मरणासाठी येशूची युगारंभापूर्वीच निवड केली होती.
जुना करार बदलीच्या मरणाची गरज निदर्शनास आणून देतो. अर्पणे, विधी, संस्कार कायमचे पाप दूर करू शकत नाहीत हे दाखवतो. तसेच त्यातील विधी व अर्पणे येशूकडे इशारा करतात.
नवा करार प्रायश्चित्ताचे बदलीचे मरण येशूमध्ये पूर्ण झाल्याचे स्पष्ट करतो. आपले तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे होते याचे विवेचन करतो.

(V) येणारे राज्य व गौरव आणि सध्या या जगात विश्वासणाऱ्यांमधील त्याचे राज्य

मशीहा या जगावर राज्य करील असे जुना करार सतत सांगतो. त्याचा संबंध इस्राएलांचे तारण, विदेश्यांचा तारण, या पृथ्वीचे नवीकरण, तिची शापातून मुक्तता, देवाच्या लोकांचे शारीरिक पुनरुत्थान याच्याशी आहे. तर नवा करार सांगतो की ही पृथ्वी संपूर्ण लयास जाऊन नवे आकाश व नवी पृथ्वी उदयास येईल. तेव्हा विश्वासी जनांना सार्वकालिक अवस्था प्राप्त होईल आणि देवहीनांना अग्निसरोवराची सार्वकालिक शिक्षा मिळेल तर विश्वासी जनांवर येशू ख्रिस्त सदासर्वकाळ राज्य करील.

वरील पाच सत्यांवर पवित्र शास्त्र का शिकवते?

ह्या सत्यांद्वारे तुम्हाला पुढील प्रश्नांची उत्तरे मिळतील. देवाने तुमच्यासाठी काय योजना केली आहे? त्याने तुम्हाला का निर्माण केले? तुम्ही कोण होता? ख्रिस्तामध्ये तुम्ही कोण झाला आहात? सार्वकालिक गौरवासाठी त्याने तुमच्याकरता काय सिद्ध केले आहे? हे तुम्हाला स्पष्ट होईल.

प्रकरण २

पवित्र शास्त्र तुम्हाला कसे प्राप्त झाले?

"देवाचे वचन" या संबोधनास ते पात्र आहे का? ते देवाचेच शुद्ध व सत्य वचन आहे का? या संदर्भातील कूटप्रश्नांची उत्तरे पवित्रशास्त्र स्वत:च देते. ४० लेखकांनी वेगवेगळ्या काळात ते लिहिले. ते राजे, मेंढपाळ, कोळी, ज्ञानी, कवी, लेखक, संदेष्टे अशा विविध स्तरातले होते. ख्रि. पू. १४०५ ते इ.स.९५ पर्यंतच्या सुमारे १५०० वर्षांच्या कालावधीत हे लिहिले गेले आहे. ते आजवर सुमारे २००० वर्षे उलटली तरी जसेच्या तसे आहे. हजारांहून अधिक भाषांमध्ये त्याची भाषांतरे झाली आहेत आणि कोट्यावधी प्रती छापून वितरित झाल्या आहेत. त्यातील लेखनामध्ये सुसूत्रता आहे. अजिबात विसंगती नाही. त्यावरून देवच लेखक व सूत्रधार आहे अशी पुष्टी मिळते.

पवित्र शास्त्राचे दावे

केवळ जुना कराराच २००० हून अधिक वेळा पवित्र शास्त्र हे देवाचे वचन असल्याचा दावा करतो व लिहिलेले शब्द देवापासून आहेत असा दावा करतो. आरंभी उत्पत्ती १:३ मध्ये देव बोलतो तर शेवटचे पुस्तक मलाखी ४:३,४ मध्येही देव बोलतो. तर नव्या करारात "देवाचे वचन" हा शब्दप्रयोग ४० वेळा आला आहे. जुन्या कराराची नव्या कराराशी बरोबरी केली आहे (मार्क ७:१३). येशूने या देवाच्या वचनाचीच घोषणा केली (लूक ५:१). प्रेषितांनी त्यातीलच संदेश दिला (प्रे कृ ४:३१; ६:२). शोमरोन्यांनी हेच वचन स्वीकारले (प्रे कृ ८:१४). पेत्राने याच वचनातून संदेश दिला (प्रे कृ ११:१). पौलाने तिन्ही सुवार्ता फेऱ्यांमध्ये हेच वचन शिकवले (प्रे कृ १३:५, ७; १६:३२; १७:१३; १९:१०). करिंथकरांना याच वचनातून शिकवण्याचा इशारा दिला आहे (२ करिंथ २:१७; ४:२). आपल्या संदेशाचा उगम याच वचनातून असल्याचे पौल सांगतो (कलसै १:२५; १थेस्सल २:१३). स्तोत्र १९; ११९; नीति. ३०: ५-६ ही देवाच्या वचनांविषयी अत्यंत प्रभावी विधाने करतात. संपूर्ण मानवी इतिहासात इतर धर्मांनी केलेल्या बोधांच्या तुलनेत देवाच्या वचनातील बोध अद्भुत आहे. पवित्र शास्त्राला "पवित्र" संबोधले आहे (रोम १:१२; २ तीमथ्य ३:१५). ते ईश्वरप्रेरित असल्याने त्यात प्रचंड आध्यात्मिक पूर्णता आहे. ते बोध करते, सुधारणा करते, दोष दाखवते, नीतिशिक्षण देते व ते शिकवले जावे असा दावा करते (२ तीमथ्य ३:१६,१७; २ पेत्र १:३,४, यशया ५५:११). ते अचूक व सत्य आहे (स्तोत्र ११९:१४०). ते देवाने दिल्यामुळे विश्वसनीय व सत्य आहे (२ पेत्र १:२०,२१).
संपूर्ण पवित्र शास्त्रात देव ही व्यक्ती व वचन यांत इतका घनिष्ट परस्परसंबंध दाखवला आहे की जे सत्य देवाच्या गुणविशेषांचे आहे, ते सर्व वचनांविषयीही सत्य आहे असे आढळते. देव पवित्र, सत्य, निर्दोष, विश्वसनीय आहे तर त्याचे वचनही असेच आहे. देव बोलतो म्हणजे वचन बोलते व वचन बोलते म्हणजे देव बोलतो.

प्रकाशन प्रक्रिया

अ) प्रकटीकरण: म्हणजे वचनातील आशय व विषय मानवाला कळविण्यात देवाने स्वत: पुढाकार घेतला (इब्री १:१; १ करिंथ २:६-१६).

ब) ईश्वरी प्रेरणा: सर्व ६६ पुस्तके दैवी प्रेरणेने झालेले प्रकटीकरण आहे (२ तीम ३:१६). २ पेत्र २:२०-२१ नुसार ते सर्व मानवी चुकांपासून राखले आहे. देवाच्या प्रेरणेने म्हणजेच देवाच्या आत्म्याच्या नियंत्रणाखाली देवाचे विचार मानवाने आपापल्या भाषाशैलीत अचूक लिहून काढले (अनुवाद १८:१८,मत्तय १:२२; जखऱ्या ७:१२).

क) अधिकृत ग्रंथसंहिता: ४० लेखकांनी १५०० वर्षांच्या कालावधीत हे लिखाण पूर्ण केले. देव हळूहळू त्याच्या प्रेरणेने प्रकटीकरण उलगडत गेला. या ग्रंथसंहितेची अधिकृतता दर्शवण्यास तीन निकष लावले गेले.

(I) लेखक मान्यताप्राप्त संदेष्टा किंवा प्रेषित असावा, किंवा त्यांच्याशी निगडित असावा. उदा. मार्क, लूक, याकोब, यहूदा, इब्री लोकांस पत्राचा लेखक.

(II) ते लिखाण त्यापूर्वीच्या लिखाणाशी सुसंगत असावे.

(III) ते ईश्वरप्रेरित लिखाण आहे याबाबत सर्वसाधारण मंडळीचे मतैक्य असावे.

मंडळीच्या इतिहासात यासाठी मंडळीच्या धर्मसभांच्या अनेक बैठकी नंतर झाल्या व या ग्रंथसंहितेवर सांगोपांग उहापोह झाला. त्यांनी आचारसंहितेवर मतदान घेतले नाही, तर देवाने यापूर्वी जे लिहिले आहे त्याच्याशी ते लिखाण सुसंगत आहे का याविषयी मत घेतले.

जुन्या कराराविषयी म्हणाल तर येशू ख्रिस्त येईपर्यंत यहूदी समाजाने संपूर्ण जुना करार लिखित स्वरूपात स्वीकारला होता. मलाखीचे पुस्तक ख्रिस्तपूर्व ४३० मध्ये लिहून पूर्ण झाले होते. एवढेच नव्हे तर ख्रिस्ताच्या काळापर्यंत संपूर्ण जुना करार वापरात होता. त्यात ईश्वरी प्रेरणेने न लिहिलेल्या लबाड व बनावट लिखाण ॲपॉक्रिफाचा मुळीच समावेश नव्हता. ते मलाखीनंतर लिहून ख्रि. पू. २०० ते ख्रि. पू. १५० मध्ये जुन्या कराराच्या सेप्टुआजिन्ट संबोधलेल्या ग्रीक भाषांतराला जोडण्यात आले . हल्ली काही भाषांतरांमध्ये त्याचा समावेश केलेला आढळतो. पण नव्या कराराच्या एकाही लेखकाने किंवा येशूने तेव्हा व आतापर्यंत जुन्या कराराच्या ग्रंथसंहितेत त्याचा किंवा त्यातील एकाही परिच्छेदाचा समावेश करण्यास मान्यता दिली नाही (लूक २४:२७,४४).

नव्या कराराच्या ग्रंथसंहितेलाही हेच तीन निकष लावण्यात आले. पहिल्या मंडळीने प्रेषितांच्या हयातीतच ही २७ पुस्तके मान्य केली. संपूर्ण सार्वत्रिक मंडळीने इ.स.३५० ते ४०० पर्यंत ही ६६ पुस्तके देवाचे ईश्वरप्रेरित लिखाण म्हणून स्वीकारली.

पवित्र शास्त्राचे जतन

आपल्या हाती येईपर्यंत आजवर हे ६६ पुस्तकांचे लिखाण जसेच्या तसे राखले गेल्याचे आपण पाहतो. सैतान आजवर ते नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे (यिर्मया ३६:२३), व वचनाचा विपर्यास करत आहे (उत्पत्ती ३:४; मत्तय ४:६,७). देवाच्या शत्रूंचे हे काम चालूच राहील. पण देव स्वत: हमी देतो की, "गवत सुकते फूल कोमेजते पण आमच्या देवाचे वचन सर्वकाळ टिकते" (यशया ४०:८;१ पेत्र १:२५). यावरून कोणतेही ईश्वरप्रेरित लेखन हरवणार नाही (मत्तय ५:१८; लूक १६:१७).

हस्तांतर होत ते पुढे सोपवण्यात आले

जगभर भाषांतर होत राहिले व ते इतरांकडे सोपवण्यात आले. तरीही त्यात चूक राहिली नाही हे कसे? जसजसा

ख्रिस्ती विश्वासाचा प्रसार होत गेला तसतसे ते निरनिराळ्या भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याची गरज वाढत गेली. जुना करार हिब्रू भाषेत असून काही भाग अरेमिक भाषेत आहे. नवा करार ग्रीक भाषेत आहे त्यामुळे इतर भाषांमध्ये भाषांतर करावेच लागले. दुसऱ्या भाषेत भाषांतर करताना शब्दमर्यादा येत असल्याने भाषांतरात चूक होणे शक्य आहे. किंवा मुद्रणकला येण्यापूर्वी पुन्हा त्या हस्तलिखितांच्या प्रती करताना देखील चूक होण्याची शक्यता आहे. पण मूळ हस्तलिखितांच्या व नंतर केलेल्या प्रतींमध्ये पडताळून पाहिल्यावर ९९.९९ टक्के अचूकता आढळली ही तर मोठी अद्भुत गोष्ट आहे. नव्या कराराचेही तसेच आहे. देवाने स्वत: त्याच्या कायम टिकणाऱ्या वचनांचे जतन केले आहे. जॉन विक्लिफने १३३० ते १३८४ मध्ये प्रथम पवित्र शास्त्राच्या इंग्लिशमधील भाषांतरांचे पहिले हस्तलिखित तयार केले. मुद्रणकलेचा शोध लागल्यावर १५२६ मध्ये नवा करार छापण्यात आला. विल्यम टिंडेलने १५३५ मध्ये संपूर्ण पवित्र शास्त्र इंग्लिशमध्ये छापले. १६११ मध्ये किंग जेम्स व्हर्शन छापण्यात आले. त्यानंतर शेकडोंनी भाषांतरे होऊ लागली.

पवित्र शास्त्राच्या लिखाणात आणखी भर पडणार आहे का?

अनुवाद ४:२; १२:३२ व नीति.३:६ नुसार त्यातून काही कमी करायचे नाही की भर घालायची नाही. पवित्र शास्त्राच्या समारोपात प्रकटी २२:१८,१९ मध्ये देव स्वत: कडक शब्दांत इशारा देतो की असे काही करणाऱ्यांवर या पुस्तकातील पीडा येतील आणि जीवनाच्या झाडातून व पवित्र नगरातून देव त्याला काढून टाकील. यावरून लक्षात येते की:

१. युगारंभापूर्वीचा काळ ते निर्मितीमध्ये काही काळ स्तब्धता आहे तशी प्रकटीकरणानंतर स्तब्धता दिसते.
२. मलाखीनंतर जुना करार संपल्यावर ४०० वर्षांची स्तब्धता आहे तशी प्रकटीकरणानंतर स्तब्धता दिसते. त्यावरून नव्या कराराची आचारसंहिता बंद झाल्याचे सूचित होते.
३. त्यानंतर देवाने अधिकृत संदेष्टे किंवा प्रेषित ईश्वरी प्रेरणेने लिखाण करावयास पाठवले नाहीत व देवाच्या वचनात भर घातली नाही.
४. सर्वात शेवटी प्रकटीकरणाचे पुस्तक लिहिण्यात आले व त्याचा समारोप प्रकटी २२:१८,१९च्या इशाऱ्याने करून देवाने ग्रंथसंहिता बंद केली.
५. पहिल्या मंडळीचा विश्वास होता की सर्वात शेवटी लिहिलेल्या प्रकटीकरणाच्या पुस्तकाने देवाच्या ईश्वरप्रेरित लिखाणाचा शेवट झाला आहे. आपलाही हाच विश्वास असावा की ६७ व्या पुस्तकाची यात भर पडणार नाही.

पवित्र शास्त्र कसे आहे?

ह्या पुस्तकात देवाचे अंत:करण, मानवाची अवस्था, तारणाचा मार्ग, पाप्यांचा नाश व विश्वासी जनांचा आनंद या विषयांचा समावेश आहे. त्यातील सिद्धांत पवित्र आहेत. त्यातील तत्त्वज्ञान बंधनकारक आहे. त्यातील इतिहास अचूक आहे. त्यातील निर्णय न बदलणारे आहेत. ज्ञानी होण्यासाठी ते वाचा. विश्वास ठेवून तारण पावा. त्याप्रमाणे आचरण करून पवित्र व्हा.

त्यात तुम्हाला मार्गदर्शनासाठी प्रकाश, आधार देण्यासाठी अन्न आहे. ते तुमचे सांत्वन करून तुम्हाला आनंदित ठेवते. ते यात्रेकरूसाठी नकाशा, वैमानिकासाठी होकायंत्र, सैनिकासाठी तलवार आहे. ख्रिस्ती व्यक्तीचे ते चारित्र्य आहे. त्यात स्वर्गाचे द्वार उघडते तर नरकाच्या दाराचे दर्शन घडवते.

ख्रिस्त हा त्याचा भव्य विषय आहे. तो आपला कित्ता आहे. देवाचे गौरव हा त्याचा शेवट आहे. आपल्या स्मरणात ते आपण ठासून भरवावे. आपल्या अंत:करणावर त्याला राज्य करू द्यावे व पावलांसाठी त्यातून मार्गदर्शन घ्यावे.

ते सावकाश, वारंवार, प्रार्थनापूर्वक वाचा. ते माझी संपत्ती व माझ्या आत्म्याचे आरोग्य असून ती सौख्याची नदी आहे. याच जीवनासाठी तुम्हाला ते दिले आहे. न्यायसमयी ते उघडेल व सर्वकाळाकरता ते स्थापले जाईल. त्यात सर्वोच्च जबाबदारी दिली आहे. अधिक परिश्रम करणाऱ्याला ते प्रतिफळ देईल, तर त्यातील आशय हसण्यावारी नेणाऱ्याला दोषी ठरवील. म्हणून त्यासाठी आपण अखंड देवाचे आभार मानावेत. कारण ते प्राप्त झाल्यावर मानवाचे म्हणून नव्हे तर देवाचे म्हणून आपण ते स्वीकारतो. विश्वास ठेवणाऱ्यामध्ये हे देवाचे वचन प्रभावी कार्य करते.

प्रकरण ३

पवित्र शास्त्राचा अभ्यास कसा करावा

तरुण आपला वर्तनक्रम कशाने शुद्ध राखील? देवाच्या वचनाप्रमाणे सावधान राहाण्याने (स्तोत्र ११९:९).

(अ) पवित्र शास्त्राचा अभ्यास करणे का महत्त्वाचे आहे?

१. कारण त्यात देवाचे मन व इच्छा व्यक्त केली आहे (२ तीमथ्य ३:१६,१७). ख्रिस्ताचा सेवक म्हणून पूर्ण दैवी अधिकाराचे ते तुमचे साधन आहे.
२. संपूर्ण बायबल विश्वसनीय आहे (स्तोत्र १९:७). ते आत्म्याचे तारण करते व भोळ्यांना समंजस करते.
३. बायबलचा प्रत्येक शास्त्रभाग अचूक आहे (नीति. ३०:५,६).
४. ते परिपूर्ण आहे (प्रकटी. २२:१८,१९).
५. ते अंतिम व अधिकृत आहे (स्तोत्र ११९:८९).
६. तुमच्या सर्व गरजांना ते पुरे पडेल असे आहे (२ तीमथ्य ३:१६,१७).
७. ते आपली अभिवचने पूर्ण करते; म्हणजे त्यात देव जे बोलतो तसे तो करतोच (यशया ५५:११).
८. ते तुमच्या तारणाची खात्री देते (योहान ५:२४; ८:४७; २०:३१).

(ब) बायबलच्या अभ्यासामुळे माझा काय फायदा होणार?

रोज हजारो हजार पुस्तके छापली जातात. शलमोन बरोबर म्हणतो की, "बोध घे … ग्रंथरचनेला काही अंत नाही." आज पुस्तकांचा अमाप साठा व संगणकावरील मदत उपलब्ध असली तरी ख्रिस्ती व्यक्तीला रोजच्या वाटचालीत सामर्थ्य व शक्ती पुरवण्याचे दैवी साधन बायबल हेच कायम राहाते. हे वचन पुढील अभिवचने देते.

१. बायबल सत्याचा उगम आहे (योहान १७:१७).
२. बायबलमधील वचनांचे पालन करणाऱ्यांस ते आशीर्वादाचा उगम आहे (लूक ११:२८).
३. बायबल विजयाचा उगम आहे (इफिस ६:१७).
४. बायबल वृद्धीचा उगम आहे (१ पेत्र २:२).
५. बायबल शक्ती सामर्थ्याचा उगम आहे (रोम १:१६).
६. बायबल मार्गदर्शनाचा उगम आहे (स्तोत्र ११९:१०५).

(क) माझा बायबलला काय प्रतिसाद असावा?

जर बायबल इतके महत्त्वाचे आहे आणि त्याचे एवढे फायदे आहेत तर माझे प्रतिसाद खालीलप्रमाणे असावेत:

१. त्यावर विश्वास ठेवा (योहान ६:६८,६९).
२. त्याचा आदर सन्मान करा (ईयोब २३:१२).
३. त्यावर प्रेम करा (स्तोत्र १९:९७).

४. त्याचे पालन करा (१योहान २:५).
५. ते सांभाळून जतन करा (१तीमथ्य ६:२०).
६. त्यासाठी लढा द्या (यहूदा ३).
७. त्यातून संदेश व शिकवण द्या (२ तीमथ्य ४:२).
८. एका पिढीने दुसऱ्या पिढीला जबाबदारीने शिकवा (शास्ते २:८,१०; १पेत्र २:१,२; नीति २:४).
९. त्याचा अभ्यास करा (एज्रा ७:१०; लूक ८:१५; याकोब १:२१). आपल्या संपूर्ण घराण्याला देवाच्या मार्गात आणायला आपल्याला पाचारण केले आहे (उत्पत्ती १८:१९).
१०. त्यातील इशारे गांभीर्याने घ्या (होशेय ४:६; मत्तय ७:२४-२८.).
११. बिरूयाच्या मंडळीप्रमाणे संदेशांची सत्यता वचनातून पडताळून पाहा (प्रे कृ १७:११; २ तीमथ्य ४:२-५).

(ड) बायबलचा अभ्यास कोण करू शकतो?

प्रत्येक व्यक्ती बायबलचा विद्यार्थी होऊ शकत नाही. तुम्हाला आशीर्वाद प्राप्त व्हावा म्हणून खालील गुणवत्ता तुमच्यामध्ये आहेत का पडताळून पाहा .

१. ख्रिस्तावरील विश्वासाने तुम्हाला तारण प्राप्त झाले आहे का (१ करिंथ २:१४-१६)?
हा प्रश्न महत्त्वाचा आहे. जर तुम्ही ख्रिस्ताला आपला वैयक्तिक तारणारा म्हणून व जीवनाचा प्रभू होण्यासाठी आमंत्रण दिले नसेल तर सैतानाने तुमचे मन देवाच्या वचनासंबंधी अंध केलेले असते (२ करिंथ ४:४).
जर ख्रिस्ताची तुम्हाला गरज वाटत आहे तर लागलीच वाचन थांबवा आणि आपल्या शब्दांत पापांची क्षमा मागून त्यापासून देवाकडे वळा. कारण “तुमचे तारण कृपेनेच विश्वासाच्या द्वारे झाले आहे ते तुमच्या हातून झाले नाही तर ते देवाचे दान आहे. कोणी आढ्यता बाळगू नये म्हणून कर्मे केल्याने हे झाले नाही" (इफिस २:८,९).
२. तुम्हाला देवाच्या वचनाची भूक आहे का (१पेत्र २:२)? शिकण्याची वृत्ती आहे का (मत्तय १८:२,३; तीत ३:९)?
३. उत्कंठेने तुम्ही देवाच्या वचनाचा शोध घेत आहात का (प्रे कृ १७:११)?
४. तुम्हाला पवित्र होण्याची उत्कंठा आहे का (पेत्र १:१४-१६)?
५. तुम्ही आत्म्याने भरला आहात का (कलसै ३:१६)?
६. तुम्हाला वचनांचे पालन करण्याची इच्छा आहे का (स्तोत्र ११९:१००,१०५; याकोब २:२०-२२)?
७. नित्य नेमाने अभ्यास करण्याची शिस्त लावून घेण्याची तुमची इच्छा आहे का (१तीम ४:१३)?

पवित्र शास्त्राचा अभ्यास करण्याच्या मूलभूत पायऱ्या

अभ्यासाच्या अगदी सोप्या पाच पायऱ्या आहेत.

पहिली पायरी : वाचन

निवडलेल्या शास्त्रभागाचा मुख्य विषय किंवा सत्य लक्षात येईपर्यंत ती वचने अनेकदा वाचा (यशया २८:९,१०). तुम्हाला प्रथम वाचनाचे आयोजन करावे लागेल. मी खाली एक आयोजन देत आहे. जुना करार एक वर्षात संपूर्ण

वाचून काढा. वाचत असता जे तुम्हाला लागलीच आठवले पाहिजे असे वाटते ती सत्ये समासात नोंद करा. जे तुम्हाला समजले नाही त्याची वहीत नोंद करा. बहुधा पुढे वाचन होत असता बऱ्याच प्रश्नांची उत्तरे तुम्हाला सापडतात. तर काही उत्तरांसाठी तुम्ही इतर पुस्तके व भाष्यग्रंथाचा वापर करू शकता.
नवा करार वाचण्यासाठी निराळी योजना आखा. एकच पुस्तक महिनाभर पुन्हा पुन्हा वाचा. त्यामुळे वचने तुमच्या लक्षात येतील व शब्दकोशाचा वापर करायची फारशी गरज वाटणार नाही. ही पद्धत तुम्हाला बरी वाटली तर १ले योहान या पुस्तकाने सुरुवात करा. रोज एका बैठकीत ते महिनाभर वाचा. महिना अखेरीस त्यात काय आहे हे तुमच्या चांगलेच लक्षात आले असेल. मग प्रत्येक अध्यायाचा विषय वहीत लिहा. त्यामुळे रोज तो अध्याय वाचताना तो विषय पाहून अध्यायाचा आशय तुमच्या लक्षात येईल. तुमच्या मनात त्या पुस्तकाचा दृष्टिकोन विकसित होऊ लागेल. नव्या करारातील मोठी पुस्तके वाचताना त्याचे तुमच्या सोयीने भाग पाडा व एकेक भाग एकेका महिन्याला वाचा. उदा. योहानाच्या २१ अध्याय आहेत. त्याचे ७ -७ अध्याय असे तीन भाग पाडा. तीन महिन्यांत तुमचे तीन भाग वाचून संपतील. प्रत्येक अध्यायातील आशय तुमच्या लक्षात राहील. बदल म्हणून एक मोठे पुस्तक मग लहान पुस्तक अशी निवड करा. तीन वर्षात तुम्ही नवा करार वाचून संपवाल आणि तुमच्या तो व्यवस्थित लक्षात आला असेल.

दुसरी पायरी : अर्थ लावणे

प्रे कृ. ८:३० मध्ये फिलिप्प त्या षंढाला विचारतो, “आपण जे वाचत आहा ते आपणांस समजते काय?" हेच वाक्य असे होईल, “बायबल येथे जे सांगत आहे त्याचा अर्थ काय?" शास्त्रभाग वाचला की लगेच लागूकरणाकडे जायचे नाही. त्या शास्त्रभागाचा अर्थ नीट समजून घेतल्याशिवाय लागूकरण अचूक होणार नाही.
वचन वाचताना नेहमी अगदी साधा सोपा प्रश्न प्रथम विचारायचा, “याचा अर्थ काय?" या प्रश्नाच्या उत्तरांसाठी अर्थ लावण्याची पायरी महत्त्वाची ठरते. म्हणजे वाचकाला “बायबलच बायबलचा अर्थ" सांगते. पवित्र आत्म्याला तुमचा शिक्षक होऊ द्या (१ योहान २:२७). आणि त्याने अधिकृत केलेल्या वचनांचा संदर्भवचने, तुलनात्मक शास्त्रभाग, शब्दस्थलदर्शक कोश, आराखडा यांचा वापर करून शोध घ्या. ज्यांचा अर्थ शोधणे अवघड जाते, त्यासाठी देवाच्या तज्ज्ञ विद्वान पाळकांची मदत घ्या.

काय टाळावे

१. योग्य अर्थाचे आकलन झाल्याशिवाय निष्कर्ष काढू नये. म्हणजे तुम्हाला जे हवे तेच बायबल सांगत आहे असे सांगू नये. तर ते लिहिण्यात आले तेव्हा देवाला जे म्हणायचे होते तेच त्याला आताही सांगू दे.
२. वरवर अर्थ काढू नये. पुष्कळदा लोक म्हणतात, “मला वाटतं या वचनाचा अर्थ ----". बायबलचा अर्थ लावताना भाषा, संस्कृती, भूगोल व इतिहास या चार गोष्टींची सांगड घालावी लागते (खाली दिले आहे).
३. शास्त्रभागाचा आध्यात्मिक अर्थ लावू नका. सरळ आहे तसा शब्दशः, व्याकरण लक्षात घेऊन, जसा कोणत्याही एखाद्या साहित्याचा अर्थ समजून घेताना आपण अर्थ लावतो तसाच शास्त्रभागाचा अभ्यास करावा.

ही सांगड कशी घालायची?

कित्येक शतकांपूर्वी बायबलची पुस्तके लिहिण्यात आली. तेव्हा देव सुसंवाद साधताना काय म्हणत होता ते आज समजून घेण्यासाठी भाषेतील अंतर, सांस्कृतिक अंतर, ऐतिहासिक अंतर व भौगोलिक अंतर अशा अनेक गोष्टींची सांगड घालून समतोल राखावा लागेल. त्यामुळे योग्य अर्थ लावायला वेळ व शिस्तबद्ध परिश्रमांची गरज आहे.

१. भाषा: बायबल मुळात ग्रीक, हिब्रू व अरेमिक भाषेत लिहिले आहे. बहुधा एखाद्या शब्दांचा किंवा वाक्यप्रयोगाचा अर्थ जाणून घेण्यासाठी मूळ भाषेतील अर्थ समजून घेऊन वचनांचा अचूक अर्थ लावण्याची पद्धत गुरुकिल्ली ठरेल.

२. संस्कृती: सांस्कृतिक अंतर फसवे असू शकते. काही लोक बायबल मधील अवघड आज्ञांचा अर्थ लावण्यासाठी सांस्कृतिक फरकांचा वापर करतात. प्रथम वचनाकडे ज्या संस्कृतींत ते लिहिण्यात आले त्या काळातील दृष्टिकोनातून पाहायला हवे हे समजून घ्यावे. पहिल्या शतकातील यहूदी संस्कृती लक्षात घेतल्याशिवाय शुभवर्तमान समजून घेणे कठीण आहे. प्रे. कृत्ये व पत्रांचा अभ्यास ग्रीक व रोमन संस्कृतीच्या प्रकाशात करावा लागेल.

३. भूगोल: भौगोलिक अंतरही भरून काढणेही गरजे आहे. बायबलमधील भूगोल बायबल जिवंत करते. बायबलचे नकाशाचे पुस्तक संदर्भासाठी मोलाचे साधन ठरेल; त्यामुळे पवित्र भूमीचा भूगोल व्यापक रीतीने तुमच्या लक्षात येईल.

४. इतिहास: ऐतिहासिक अंतरही भरून काढणे गरजेचे आहे. इतर बहुसंख्य जागतिक धर्मग्रंथांच्या तुलनेत बायबलच प्रत्यक्ष ऐतिहासिक व्यक्ती व घटनांच्या नोंदी देते. बायबलचा इतिहास समजून घेतल्याने ते लोक व त्या घटना योग्य ऐतिहासिक दृष्टिकोनातून चपखल बसवता येतात. त्यासाठी उत्तम बायबल शब्दकोश किंवा विश्वकोश मूलभूत ऐतिहासिक अभ्यासासाठी उपयोगी पडतील.

अर्थ समजून घेण्याची तत्त्वे

१. साहित्यिक तत्त्व: वचनाचा सरळ सरळ, अनौपचारिकपणे ओघवता अर्थ समजून घ्यायला हवा. बायबलमध्ये भरपूर अलंकार व सांकेतिक भाषेचा वापर केला आहे. शाब्दिक अर्थ व्यक्त करणे हा यामागचा हेतू होता. सामान्यपणे बायबल शब्दश: अर्थाने बोलते, आणि आपल्याशी तसेच बोलण्याची त्याला मुभा द्या.

२. ऐतिहासिक तत्त्व: याचा अर्थ आपण वचनाचा ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेऊन अर्थ लावतो. तो शास्त्रभाग प्रथम ज्या लोकांसाठी लिहिला त्यांच्यासाठी त्याचा काय अर्थ होता हा प्रश्न आपण स्वत: ला विचारायचा. अशा प्रकारे वचनाचा मूळ उद्देश समजून घेताना आपण योग्य संदर्भ विकसित करू शकतो.

३. व्याकरणाचे तत्त्व: यासाठी प्रत्येक वचनाची मूळ भाषेतील व्याकरणाच्या दृष्टीने रचना समजून घेणे गरजेचे आहे. सर्वनामे कोणाच्या संदर्भात आहेत? प्रमुख क्रियापदाचा काळ कोणता आहे? असे साधे प्रश्न तुम्ही विचारले तर लागलीच वचनांचा अर्थ स्पष्ट होत जातो.

४. बायबलचे सुसंगतीचे तत्त्व: याचा अर्थ बायबलमधील वचनांमध्ये विसंगती नाही. जर आपण वचनांचा लावलेला अर्थ इतर वचनातील सत्यांशी विसंगत असेल तर आपण लावलेला अर्थ चुकीचा आहे असे समजावे. वचनाचा संपूर्ण अर्थ समजण्यासाठी वचनांची परस्परांशी तुलना केली पाहिजे.

तिसरी पायरी : मूल्यमापन करणे

तुम्ही वाचन केले. "बायबल काय सांगत आहे?" असा प्रश्न विचारला. मग अर्थ शोधताना प्रश्न केला, "बायबल काय अर्थ सांगत आहे?" आता तुम्ही वचनाचा योग्य अर्थ लावला का याची खात्री करून घेण्यासाठी इतरांचे मत घ्यायचे आहे. लक्षात ठेवा, बायबल कदापि स्वत:शी विसंगत असू शकत नाही. बायबलची प्रस्तावना, भाष्यग्रंथ, पार्श्वभूमीची पुस्तके वाचा. देवाने या लेखकांना दिलेले ज्ञान वाचण्याने तुमचे विचार विस्तारतील. सचोटीने शोध घेत राहा. तुम्हाला सापडलेल्या सत्यामुळे वर्षानुवर्षे जे मत तुम्ही अंगीकारत आला ते बदलण्याची किंमत भरून द्यायला तयार असा किंवा तुमची जीवनशैली बदला.

चौथी पायरी : लागूकरण

पुढचा प्रश्न आहे, "देवाच्या या सत्याचा माझ्यावर घाला होऊन माझ्या जीवनात कोणता बदल व्हायला हवा?" वचनाचा अभ्यास करूनही त्याला स्वत:च्या जिवात्म्यावर खोल प्रहार करू न देणे म्हणजे मेजवानी तयार करूनही तिचा आस्वाद न घेण्यासारखे आहे. स्वत:ला शेवटचा प्रश्न करा, "या शास्त्रभागातील दैवी सत्ये व सिद्धांत माझ्या मनोवृत्तीला व कृतीला कसे लागू होतात?" येशू म्हणतो, "जर ह्या गोष्टी तुम्हांला समजतात तर त्या केल्याने तुम्ही धन्य आहा" (योहान १३:१७).

बायबल वाचणे, त्याचा योग्य अर्थ लावणे व बायबलला जे म्हणायचे आहे ते समजले की अभ्यास संपला असे नसते. तर तुमचे अंतिम उद्दिष्ट हे हवे की त्याला तुमच्याशी बोलू द्या व आत्मिक वाढीस तुम्हाला सामर्थ्य देऊ द्या. त्याकरताच वैयक्तिक लागूकरणाची गरज असते. जोवर आपण स्वत:ला हा प्रश्न विचारत नाही की, "माझ्या जीवनासाठी याचा काय अर्थ आहे आणि व्यवहारात मी ते कसे लागू करू?" तोवर बायबलचा अभ्यास पूर्ण झाला असे म्हणता येणार नाही. आपण जे वाचले व अर्थ काढला, जे सिद्धांत किंवा सत्ये समजली त्यातून आपण जे ज्ञान घेतले ते आपल्या व्यवहारात वैयक्तिक जीवनात लागू करायचे. त्यात काही आज्ञा असेल तर ती पाळायची. काही अभिवचन असेल तर ते आपलेसे करून त्यावर दावा करायचा. जर काही इशारा दिला असेल तर गांभीर्याने त्याची दखल घ्यायची. शेवटची पायरी ही की : आपण वचनाच्या अधीन होतो आणि त्याला आपल्या जीवनाचे रूपांतर करण्याची मुभा देतो. ही पायरी जर तुम्ही चुकवली तर तुम्ही आपल्या शास्त्राभ्यासाचा कदापि आनंद घेऊ शकणार नाही व बायबल तुमचे जीवन कदापिही बदलू शकणार नाही.

पाचवा पायरी : परस्परसंबंध लावणे

या पायरीत तुमच्या शास्त्रभागातून तुम्ही जो सिद्धांत शिकला त्याची सांगड बायबलमधील विस्तृत सिद्धांतांच्या चित्राशी संबंधित असणाऱ्या इतर वचनांशी घालता. नेहमी हे लक्षात घ्यावी बायबल हे ६६ पुस्तकांचे मिळून बनलेले एकच पुस्तक आहे. आणि त्यात बहुत सिद्धांत व तत्त्वे विविध प्रकारे, विविध परिस्थितीत परत परत शिकवलेली

आहेत. त्यांचा परस्परसंबंध लावून, इतर संदर्भांशी त्यांची सांगड घालून ज्या सिद्धांतावर आपल्या जीवनाची रचना केल्याने तो भक्कम पाया रचला जातो.

मग पुढे काय?

स्तोत्र १:१,२ नुसार केवळ बायबल वाचणे पुरेसे नाही तर आपण त्यावर मनन करायला हवे. खऱ्या अर्थाने आपण आपल्या मेंदूला वचनाने स्नान घालून शुद्ध करतो. म्हणून यहोशवा १:८ नुसार आपण वचन आपल्या ध्यानी, मनी, मुखी साठवू या व त्यातील आशीर्वाद अनुभवू या.

यातून पाण्याचा झरा वाहतो
पापाचा दाह शमवतो.
सत्याची वृद्धी करणारे झाड आहे येथे
सत्यात आम्हाला चालवते.
मानवी कल्पना पडतात तेव्हा
यात आहे न्यायदाता संघर्ष संपवायला.
यात आहे मान्ना जीवनभर चारायला,
मरणासही अशक्य त्यावर हल्ला करायला.
मोलवान तारणाची येते वार्ता
येथेच आमच्या कानावर.
येथे आमच्या विश्वासाचा गढ,
तसेच बचावाची ढाल.
होऊ नका त्या वराहासारखे
टाकले मोती ज्यापुढे,
तरी डबक्यात अन् दलदलीत,
मजा घेते लोळूनच घाणीत.
काही झाले तरी, नका वाचू हे पुस्तक
तीक्ष्ण नजरेशिवाय.
इच्छिल्याशिवाय नका ते वाचू
समजण्यास देवाची कृपा.
देता यावे उत्तम फळ आदराने,
यास्तव वाचा मोठ्या विश्वासाने.
तुमच्या पापांच्या विनाशास
पडेल यातील ज्ञानाचा प्रभाव.
आनंदी राहाल आयुष्यी सदा
घडो काहीही या जीवनात.

होय, मरणाने देव बोलावील जोवर
दुप्पट आनंदी राहाल तोवर.

काही प्रचलित शब्दांचे अर्थ

१. कृपा: अपात्र असतानाही मौल्यवान गोष्ट फुकट मिळणे.

२. प्रेषित: देवाने निवडून पाठवलेला.

३. पवित्र: पापविरहित, वेगळा केलेला.

४. शांती: प्रतिकूल परिस्थितीत सर्व संकट, क्लेश, गोंधळ चालू असतानाही मन निवांत असणे. जगाची शांतीची व्याख्या वेगळी आहे. त्यांच्या मते दु:ख, आजार, संकटे, क्लेश नसणे म्हणजे शांती.

५. न्यायीकरण: नीतिमान ठरले जाणे, म्हणजे न्यायाधीश पिता ख्रिस्तावरील विश्वासामुळे पापकबुली करून पश्चात्ताप करून त्याच्याकडे वळलेल्या व्यक्तीला निर्दोष असल्याचे जाहीर करतो. त्याच्या खाती पाप न मांडता ही व्यक्ती पवित्र आहे असे मांडतो.

६. पवित्रीकरण: रोज आत्मपरीक्षण करत सवयीच्या पापावर विजय मिळवत ख्रिस्ताच्या स्वभावाचे होत राहणे.

७. गौरव: देवाचे शकायना गौरव, देवाचे तेज, देवाचे गुण, देवाचा स्वभाव, देवाचे चारित्र्य.

८. क्षमा: अपराध, पाप, दोष, पातके अजिबात न आठवणे, पूर्ण विसरणे.

९. चमत्कार: विज्ञानाचा नियम बाजूला ठेवून घडलेली गोष्ट.

१०. संदेष्टा: देवाचा निरोप लोकांना उलगडून सांगणारा व लोकांच्या समस्या देवासमोर मांडणारा.

११. सैतान: लबाड, ठकवणारा, फसवणारा देवाच्या लोकांवर दोषारोप करणारा.

१२. धार्मिकता/नीतिमत्व: देवाचा आत्मा तारलेल्या व्यक्तीच्या आत्म्याचा ताबा घेतो तेव्हा देवाचे जे उत्तम ते त्याच्या विवेकभावात येते. बऱ्या वाईटातून तो योग्य निवड करू शकतो व जे त्याच्या विचारात ते त्याच्या कृतीत येते. त्यामुळे त्याचे विचार व कृती यात तफावत राहात नाही.

१३. पाप: नेम चुकणे, मर्यादा/रेषा ओलांडणे, आज्ञा मोडणे, कर्तव्यात चुकणे.

१४. आराधना: देव माझ्यासाठी कसा आहे हे त्याचे गुण त्याला सांगणे.

१५. प्रीती: देव करतो तसे त्यागाचे प्रेम. ही भावना नव्हे तर कृती आहे.

१६. प्रार्थना: देवाशी मन मोकळे करून बोलणे.

१७ . विश्वास: देवाचे खरे मानणे, त्याच्यावर अवलंबून राहाणे व त्याचा आधार घेणे.

भाग पहिला

प्रकरण ४

जुन्या करारातील पुस्तके - उत्पत्ती

प्रस्तावना

जुन्या करारातील ३९ पुस्तकांची विभागणी अशी आहे:

१. नियमशास्त्र: म्हणजे पहिली पाच पुस्तके. यालाच "मोशेची पुस्तके" किंवा "पंचक" असेही म्हणतात. ती आहेत उत्पत्ती ते अनुवाद.
२. इतिहासाची बारा पुस्तके: यहोशवा ते एस्तेर
३. काव्याची पाच पुस्तके: ईयोब ते गीतरत्न
४. प्रमुख संदेष्ट्यांची पाच पुस्तके: यशया ते विलापगीत
५. कनिष्ठ संदेष्ट्यांची बारा पुस्तके: होशेय ते मलाखी

नियमशास्त्र (पंचक/मोशेची पुस्तके) : या पाच पुस्तकात क्रमश: एक सलगता आढळते.

उत्पत्ती

या पुस्तकाचे आरंभीचे "प्रारंभी देवाने ------ केली" (उत्पत्ती १:१). हे शब्द देव सदासर्वकाळ किंवा युगारंभापूर्वी पासूनच अस्तित्वात असल्याचे सूचित करतात. निर्मितीची निश्चित तारीख दिलेली नाही. तरीही ती लक्षावधी वर्षांपूर्वी नव्हे तर तर काही हजार वर्षांपूर्वी निर्मिली आहे असे सूचित होते. उत्पत्ती ११ मध्ये अब्राहाम ख्रि. पू. २१६५ ते ख्रि. पू. १९९० मध्ये असल्याचे कालरेषेवरून आपल्या लक्षात येते. तेथपासून ख्रि. पू. १८०४ मध्ये मिसरात योसेफाचा मृत्यू होईपर्यंतच्या सुमारे ३०० वर्षांचा इतिहास या पुस्तकात दिला आहे. पुन्हा ख्रि.पू. १५२५ मधील मोशेच्या जन्मापर्यंत ३०० वर्षांचा खंड दिसतो.

शीर्षक

ग्रीक भाषेतील मूळ शब्दांचा अर्थ “मूळारंभ," “प्रारंभ" असा आहे तर हिब्रू भाषेतील मूळ शब्दाचा अर्थ “सुरुवात", “उत्पत्ती" असा आहे. पंचकातील ही पाचही पुस्तके संपूर्ण पवित्र शास्त्राची प्रस्तावना देतात. उत्पत्ती ३:१५ मध्ये सुरू होणारी तारणाची कथा प्रकटी २१:२२ मध्येच पूर्ण होते. अखेर तेथे आपण विश्वासी जनांच्या सार्वकालिक राज्याचे गौरवी चित्र पाहातो.

लेखक व काळ

संपूर्ण पंचकाचा लेखक मोशे असून तो इस्राएलांना उद्देशून लिहीत आहे. पण (१) लेखक कोठेच आपले नाव देत नाही. (२) उत्पत्तीतील घटना मोशेच्या जन्माच्या ३०० वर्षे आधीच घडून गेल्या आहेत. परंतु जुन्या करारातील निर्गम १७:१४; गणना ३३:२; मलाखी ४:४ वरून आणि नव्या करारातील रोम १०:१९; योहान ५:४६; २ करिंथ ३:१५ वरून मोशेच या पुस्तकांचा लेखक असल्याची वचन खात्री देते. त्याची शैक्षणिक पार्श्वभूमीही वचनच सांगते (प्रे

कृ.७:२२). त्यामुळे मोशेच या पुस्तकांचा लेखक आहे याला कोणाचाही आक्षेप नाही. मिसरातून निर्गमन झाल्यानंतर ख्रि. पू. १४०५ मध्ये मोशेचा मृत्यू होण्यापूर्वी ख्रि. पू. १४४५ मध्ये हा ग्रंथ लिहिण्यात आला. मोशेची माहिती करून घेण्यासाठी निर्गम १-६ अध्याय वाचा.

पार्श्वभूमी

उत्पत्तीची पार्श्वभूमी युगारंभापूर्वीची आहे. देवाने आपल्या इच्छेने व दैवी शब्दाने कृती करून संपूर्ण निर्मिती साकार केली. तिची व्यवस्था लावून ती सुशोभित केली. आपल्या श्वासाच्या फुंकराने मातीच्या गोळयातून त्याने आदामाला आपल्या प्रतिमेचे घडले. मानवजात देवाच्या निर्मितीचा मुकुटमणी आहे. मानवाने देवाच्या सहभागितेचा आनंद घ्यायचा होता व त्यांच्याद्वारे देवाला आपल्या नावाचे गौरव करून घ्यायचे होते.

उत्पत्तीच्या आरंभीच्या घटना मेसोपोटेमियात घडल्याचे स्पष्ट दिसते. पण नेमका काळ मात्र सांगता येत नाही. इस्राएलांनी हा इतिहास यार्देन नदी ओलांडून वचनदत्त देशात प्रवेश करण्यापूर्वी ख्रि. पू. १४०५ मध्ये ऐकला. उत्पत्तीला तीन भौगोलिक पार्श्वभूमी आहेत.

अ. मेसोपोटेमिया: अध्याय १-११; काळ : निर्मिती ते ख्रि. पू. २०९०.

ब. वचनदत्त देश: अध्याय १२-३६; काळ: ख्रि. पू २०९० ते ख्रि. पू. १८९७

क. मिसर: अध्याय ३७-५०; काळ: ख्रि. पू. १८९७-१८०४.

उत्पत्तीचे पुस्तक बायबलमधील सर्व पुस्तकांपेक्षा अधिक काळखंडाचा वृत्तांत देते.

इतिहास व ईश्वरविज्ञानाचा विषय

लेखकाने देवाचे अस्तित्व, कार्य किंवा व्यक्तिमत्वाचे समर्थन करण्याचा प्रयत्न केलेला नाही. तर उलट इस्राएलांचा देव त्यांच्या सभोवतालच्या दैवतांहून स्वत:ला वेगळे दर्शवतो. देवबाप, देवपुत्र, देव पवित्र आत्मा, मानव, पाप, मुक्ती, करार, अभिवचन, सैतान व देवदूत, राज्य, प्रकटीकरण, इस्राएल, न्याय व आशीर्वाद हे ईश्वरविज्ञानाचे मूलभूत विषय स्पष्ट केले आहेत.

उत्पत्ती अध्याय १-११ मध्ये युगारंभापूर्वीचा इतिहास म्हणजे विश्वाची उत्पत्ती म्हणजेच कालरेषेची सुरुवात, अवकाश आणि अनेक प्राथमिक मानवी अनुभव म्हणजे विवाह, पतन, पाप, मुक्ती, न्याय आणि राष्ट्रे यांचा प्रारंभ आहे.

उत्पत्ती अध्याय १२-५० मध्ये मूळ पुरुषांचा इतिहास आहे. इस्राएल वंश कसा उदयास आला ते सांगितले आहे. त्यांचा पूर्वज एबर मध्ये त्यांच्या वंशाचा मूळ धागा सापडतो. पुढे त्यावरूनच इब्री हा शब्द आला (उत्पत्ती १०:२४,२५). अधिक बारकाईने पाहू गेल्यास त्याचेही मूळ नोहाचा पुत्र शेम याच्यामध्ये सापडते. (त्यांना शिमी लोक असे संबोधले आहे, उत्पत्ती १०:२१.)

यामुळे देवाच्या लोकांना आपल्या पूर्वजांची माहिती तर झालीच, शिवाय आपले कूळ, वंश, घराण्याचा मूळ इतिहास, त्यांचे रीतीरिवाज, रूढीपरंपरा, भाषा, भिन्न संस्कृती यांचे ज्ञान झाले. विशेषत: पाप व मरणाचे मूलभूत अनुभव समजले. आता इस्राएल लोक कनानात प्रवेश करण्यास सज्ज झाले होते. तेथील कनानी रहिवाश्यांना ते त्यांच्या घरादारातून हाकलून लावणार होते. कारण ती भूमी तर पूर्वी देवाच्या लोकांचीच होती. म्हणून या शत्रूंची पार्श्वभूमी,

त्यांच्याशी लढण्याचे मूळ कारण त्यांना समजणे आवश्यक होते. हत्त्या करण्याच्या अनैतिकतेविषयी पुढे निर्गम, लेवीय, गणना व अनुवादात जे जाहीरपणे लिहिले होते त्या संदर्भात यहूदी राष्ट्राला पूर्वीच्या जगाचे त्यांच्या संदर्भातील वेचक इतिहासाचे ज्ञान झाले. त्यांच्या पार्श्वभूमीनुसार इस्राएलांच्या असलेल्या भूमीचे उदघाटन करून त्यात यहोशवाच्या नेतृत्वाखाली ते नव्याने वसाहत सुरू करणार होते कारण ती भूमी मुळात त्यांच्या पूर्वजांची होती. उत्पत्ती १२:१-३ मध्ये देवाने अब्राहामामध्ये आपल्या अभिवचनांची स्थापना केली. उत्पत्ती १-११ मधील जगातील लोकांवरून एका लहान इस्राएल राष्ट्रावर आपले लक्ष केंद्रित केले. या इस्राएल राष्ट्राद्वारेच देव आपली तारणाची योजना अंमलात आणणार होता. इस्राएल राष्ट्राने विदेशी राष्ट्रांना प्रकाश होणे हेच त्यांचे मिशन कार्य होते (यशया ४२:६). देवाने अब्राहामाला भूमी, संतान (बीज) व आशीर्वाद याविषयी अभिवचन दिले. हे तीनपदरी अभिवचन अब्राहामाशी केलेल्या कराराचे मूळ होते (उत्पत्ती १५:१-२०). उरलेले संपूर्ण पवित्र शास्त्र या अभिवचनांची पूर्तता झाल्याचा वृत्तांत देते.

उत्पत्ती १-११ अध्याय मानवाने स्वेच्छेने अवज्ञा करूनही देवाने विपुल कृपेचा प्रतिसाद दिल्याचे निदर्शनास आणून देतात. त्यावरून देवाचे गुणविशेष व कार्य ही दिसून येतात. मानवाने मात्र अधर्माने अधिकच बंडखोरी केल्याचे दिसते. जितके पाप वाढले तितकी देवाने विपुल कृपा केली (रोम ५:२०).
उत्पत्तीचे पुस्तक प्रकटीकरण या शेवटच्या पुस्तकाशी विलक्षण सांगड घालते. प्रकटीकरणातील समस्यांचे मूळ उत्पत्ती ३ मधील शापांचा परिणाम असल्याचे लेखक योहान दाखवून देतो. तसेच मानवाच्या पतनामुळे आलेल्या शापातून देव त्याच्या संपूर्ण निर्मितीची मुक्तता करताना दिसतो (प्रकटी २२:१-१४). तेथे पुन्हा विश्वासी जन एदेनात, देवाच्या सार्वकालिक नंदनवनात जीवनी झाडाचे फळ खाताना दिसतात.
या पुस्तकात देव नसत्यातून पृथ्वीची दैवी प्रकारे निर्मिती करताना आपण पाहातो. त्यात विश्वास व क्रियाशीलतेचे धडे मिळतात. पतन, जागतिक जलप्रलय आणि राष्ट्रांची पांगापांग या तीन महान घटना हे पुस्तक सांगते. त्या पार्श्वभूमीवर आपण जगाचा इतिहास समजू शकतो. देवाची मुक्तीची योजना व आशीर्वादांवर अब्राहामापासून प्रकाश टाकला आहे. या पुस्तकातील चालीरीती आधुनिक जागाहून वेगळया असल्याचे लक्षात घ्यावे. प्रत्येक चालीरीतीकडे निकटचा मागचा पुढचा संबंध घेऊन पाहावे.

रूपरेषा

(I) पूर्वकाळचा इतिहास: उत्पत्ती १-११. यात चार प्रमुख घटना येतात.

अ. निर्मिती: अध्याय १, २

ब. पतन: अध्याय ३ ते ५

क. जलप्रलय : अध्याय ६ ते ९

ड. पांगापांग: अध्याय १०, ११

(II) मूळ पुरुषांचा इतिहास: अध्याय १२ ते ५०

अ. अब्राहाम: अध्याय १२:१ ते २५:८

ब. इसहाक: अध्याय २१:१ ते ३५:२९

क. याकोब: अध्याय २५:२१ ते ५०:१४

ड योसेफ: अध्याय ३०:२२ ते ५०:२६.

प्रकरण ५

निर्गम

प्रस्तावना व काळ

"याकोबाबरोबर ------- त्यांची नावे ही" (निर्गम १:१), या शब्दांनी या पुस्तकाची सुरुवात होते. उत्पत्तीच्या पुस्तकात ४६ व्या अध्यायात याकोब संपूर्ण परिवारासह योसेफासोबत मिसरात राहायला गेल्याची नोंद आहे. हे पुस्तक इस्राएलांची मिसरातून सुटका झाल्याची नोंद देते. या पुस्तकाचा शेवट दर्शवतो की अरण्यवासात त्यांच्यासोबत राहून त्यांना मार्गदर्शन करणारा मेघस्तंभ त्यांनी नव्याने बांधलेल्या निवासमंडपात उतरून येतो. ऐतिहासिक घटनेची वास्तवता या पुस्तकात दिली आहे. निर्गम २४:४ नुसार मोशेने देवाचा बोध ऐकून हे पुस्तक लिहिले. त्यात अमालेक्यांशी झालेले युद्ध, दहा आज्ञा, कराराचे पुस्तक (२०:१-२३; ३३, ३४:४, २७-२९), त्यांचा प्रवास व नियम त्याने लिहिले आहेत. वयाच्या ८० व्या वर्षी तो नेतृत्व सुरू करतो ते १२० व्या वर्षी संपते. त्यात ४० वर्षांची वाटचाल यात आहे. निर्गमनानंतर मृत्युपूर्वी त्याने हे पुस्तक लिहिले. मवाबातील नबो पर्वतावर त्याचा अंत झाला. निर्गमन ख्रि.पू. १४४५ मध्ये झाल्याने लिखाण ख्रि.पू.१५ व्या शतकात झाले असे म्हणतात. वचनानुसार योसेफाचे ख्रि. पू. १८७५ मध्ये गुलाम म्हणून आगमन झाले. तेथून निर्गमनापर्यंत ४३० वर्षांचा मिसरातील दास्याचा काळ होता (१२:४०). योसेफ मिसऱ्यांच्या १२ व्या राजाच्या कारकीर्दीत होता, तर मोशे व इस्राएल राष्ट्राचे गुलामीतील वास्तव्य १८ व्या राजाच्या कारकीर्दीत होते. सुमारे ख्रि. पू. १७३० ते १५७० चा हा काळ इस्राएलांसाठी कठीण होता.

पार्श्वभूमी

इस्राएलांच्या निर्गमनाच्यावेळी मिसर आर्थिक व राजकीयदृष्ट्या फार बलशाली होते. धनुष्यबाण, घोडे व रथांनी लढाई करण्यात निपुण होते. तेव्हाच्या फारोला "प्राचीन मिसराचा नेपोलियन” म्हणतात. त्यांचा विस्तार प्रचंड झाला होता. मोशेचा जन्म ख्रि. पू. १५२५ मध्ये होऊन तो ख्रि. पू. १४४५ मध्ये ८० वर्षांचा होता. तो मिसरी विद्यांमध्ये पारंगत, तसेच भाषण व कृतीत पराक्रमी होता. ४०व्या वर्षी स्वबळावर तो नेतृत्व हाती घेऊ लागला म्हणून देवाने त्याला मिद्यानात अरण्यवासात पाठवले (प्रे कृ ७:२२-३०). पुढील ४० वर्षे मिसरातील शिकवण व मिद्यानातील अरण्यवासातून इस्राएलांवर नेतृत्व करण्यास घडवले व वापरले (प्रे कृ ७:३६). १२० वर्षांचा झाल्यावर तो मरण पावला (अनुवाद ३४:१-६).

गणना २०:१-३ मधील घटनेमुळे देवाने त्याला वचनदत्त देशात नेले नाही. उत्पत्ती १५:१३ मधील भविष्यानुसार नियोजित वेळी त्यांचे मिसरातून निर्गमन झाले व उत्पत्ती १२:१-३,७ नुसार त्यांचे मोठे राष्ट्र होण्याचे अभिवचनही पूर्ण झाले. मोशेने दुरून वचनदत्त देश पाहिला पण कित्येक शतकांनंतर येशूच्या रूपांतराच्या वेळी डोंगरावर शिष्यांना मोशे दिसला (मत्तय १७:३).

उद्दिष्ट

याकोबवंशाची वाढ आणि वचनदत्त देशात त्यांची स्थापना.

सीनाय डोंगरावर देवाने त्यांना ईश्वरप्रधान राज्यपद्धत लावून दिली. देवाच्या लोकांनी नियमबद्ध व्यवस्थेत राहणे गरजेचे होते. देवाने आपल्या सार्वभौमतेने, वैभवाने, चांगुलपणाने, पावित्र्याने स्वत:चे प्रकटीकरण करून, कृपेचा व दयेचा सागर असलेला प्रभू म्हणून, स्वर्ग व पृथ्वीचा एकच देव म्हणून त्यांना बोध व मार्गदर्शन केले (अध्याय

३,६,३३,३४). नंतरचे प्रसंग पवित्र शास्त्राच्या प्रकटीकरणाचा विषय आहेत (स्तोत्र १०५:२५-४५; १०६:६-२७; प्रे कृ. ७:१७-४४; १करिंथ १०:१-३; इब्री ९:१-६; ११:२३-२९).

काही आव्हाने

मिसरावरील दहा पीडांमुळे झालेली नासधूस, अत्यंत श्रेष्ठ दर्जाच्या सैन्याचा तांबड्या समुद्रातील नाश हा मिसऱ्यांसाठी दारुण पराभव व अपमानकारक असल्याने त्यांनी त्यांच्या बखरींमध्ये या घटनांच्या नोंदी ठेवल्या नाहीत म्हणून त्यांची सत्यता नाकारण्याचे कारण नाही. पुराणसंशोधन विभागाच्या पुराव्यांमुळे इब्री लोकांचा बंदीवास, पीडा, निर्गमन तांबड्या समुद्राचे दुभंगणे अशा सर्व घटनांची सत्यता शाबूत होते. निवासमंडप, अर्पणे, आराधनापद्धत यांचा नव्या करारात मशीहाचे आगमन व मुक्तीचे कार्य याच्याशी जो संबंध लावला आहे तेवढाच संबंध लावणे उचित आहे.

आशय

या ग्रंथांचा आशय 'खंडणी' हा आहे.

इस्राएलांची खंडणी रक्ताने झाली. देवाने खंडून घेतल्यावर आता देवाशी संबंध कसा ठेवायचा हे त्यांनी शिकायचे होते. म्हणजे उपासना, सहभागिता, सेवा यांची योग्य कल्पना येण्यासाठी त्यांना आज्ञानियम देण्यात आले. निवासमंडपाद्वारे देवाकडे जाण्याचा मार्ग शिकवण्यात आला. नियमशास्त्र त्यांना पूर्ण पाळता येणार नव्हते म्हणून यज्ञ, याजक व अर्पणे नेमून दिली. प्रभू येशू ख्रिस्त जो वधलेला कोकरा, त्याच्या रक्ताच्या द्वारे पापी मनुष्ये त्याच्या रक्ताच्या द्वारे सैतानाच्या दासपणातून देव कसे खंडून घेणार याचे ऐतिहासिक चित्र येथे रेखाटले आहे. निर्गमात बऱ्याच उपमा व रूपके आढळतात. मोशे - पुढारी व संदेष्टा, अहरोन – याजक, वल्हांडण सण (रक्ताने खंडणी), प्रभू येशूचे वल्हांडणातील रक्तसिंचन, तांबडा समुद्र पार करणे, अग्निस्तंभ व मेघस्तंभाद्वारे वाट दाखवली जाणे, मान्ना - येशू म्हटलेली स्वर्गातून उतरलेली जीवनी भाकर, खडक म्हटलेला ख्रिस्त, निवासमंडप - देवाजवळ जाण्याचा मार्ग; याविषयी नवा करार जसे बोलतो व जसे शिकवतो तसेच आपण तेवढ्याच प्रमाणात अभ्यासावे.

लक्षात घ्यावे ते असे की:

मोशेला १-४० वयापर्यंत - मी कोणी मोठा आहे असे वाटले.
४१-८० वयापर्यंत - मी कोणी नाही याची तीव्र जाणीव झाली.
८१-१२० वयापर्यंत - देवाने त्याला मोठा केले.

रूपरेषा

(I) मिसरातील इस्राएल: (१:१-१२:३६)

अ. लोकसंख्या विस्फोट व फारोची मोहीम (अध्याय १)
ब. सोडवणूक करणाऱ्याची परिपक्वता (२:१-४:३१)
क. फारोसमोर येणे (५:१-११:३०)
ड. निर्गमनाच्या वेळी तयारी (अध्याय१२)

(II) सीनाय मार्गावरील इस्राएल: (१२:३७-१८:२७)

अ. चिंता, भीती व तांबडा समुद्र ओलांडणे (१२:३७-१५:२१)

ब. सीनायकडे प्रवास व कुरकुर आणि इथ्रोची भेट (१५:२२-१८:२७)

(III) इस्राएलांच्या सीनायपाशी छावण्या: (१९:१-४०:३८)

अ. देवाने दिलेले नियम (१९:१-२४:१८)

ब. निवासमंडपाचे वर्णन (२५:१-३१:१८)

क. देवाची भ्रष्ट आराधना व देवाचे सान्निध्य नक्की (३३:१-३४:३५)

ड. निवासमंडपाचे बांधणी (३५:१-४०३८)

प्रकरण ६

लेवीय

प्रस्तावना

या पुस्तकाचे आरंभीचे शब्द आहेत, "परमेश्वराने मोशेला हाक मारून म्हटले" (१:१).
निवासमंडपातील देवाच्या सान्निध्याच्या मेघातून देव मोशेशी संवाद साधायला पाचारण करतो. इस्राएलांनी पवित्र देवाच्या सान्निध्यात कसे यावे याविषयीचे विधिनियम देव त्याला लिखित स्वरूपात देतो. लेवीय या शब्दाचा अर्थ "देव हाक मारून बोलला."
या पुस्तकात लेव्यांच्या नव्या जबाबदाऱ्या सांगितल्या आहेत. त्यांनी लोकांना चालवायचे होते व लोकांना पवित्र जीवन कसे जगावे ते शिकवायचे होते. मिसरातून बाहेर पडल्यावर एक वर्षाने निवासमंडप बांधला गेला.

१. यापूर्वी देव आराधनेच्या स्थानी वसत नव्हता.
२. आता निवासमंडप हे आराधनेचे स्थान तयार झाले होते.
३. आता देवाने नियमित यज्ञ व सण लावून दिले.
४. निवासमंडपासाठी देवाने कामगार, मुख्य याजक व याजकगण नेमले.

या पुस्तकात लोक आराधनेची पद्धत शिकतात. इस्राएलांना "याजकगण व पवित्र राष्ट्र" असे संबोधले आहे. यापूर्वी ते विश्वासवीरांच्या जीवनावरून शिकत होते. मूर्तिपूजक मिसरातील मूर्तींच्या समागमात राहून त्यांची आराधना बिघडली होती. देव मिसरी पद्धतीची किंवा सभोवतालच्या राष्ट्रांची आराधना पद्धत खपवून घेणार नव्हता. त्यांच्या नैतिकतेच्या कल्पना सहन करणार नव्हता. याजकांनी देवाच्या सूचनेप्रमाणे योग्यच आराधना करायची होती. आपल्या राजवाड्यात - निवासमंडपात वस्ती करून इस्राएलांच्या राजाने वास्तव्य केले होते. आपले नियम देऊन आपण करारबद्ध देव असल्याचे जाहीर करून टाकले होते. लोक सीनायच्या पायथ्याशीच आहेत.

मुख्य विषय

देवाचा पवित्र स्वभाव, इस्राएलांच्या पावित्र्याविषयी देवाची इच्छा, देवाचे पावित्र्य, मानवाचे पापीष्टपण, अर्पणे, देवाचे त्याच्या पवित्र स्थानातील सान्निध्य हे या पुस्तकाचे प्रमुख विषय आहेत. अगदी स्पष्टपणे अधिकारवाणीने वैयक्तिक पावित्र्य राखण्यासाठी हे पुस्तक आर्जव करते (११:४४,४५; १९:२; २०:७,२७; १पेत्र १:१४-१६).
विधिसंस्कार पाळून विश्वासाचे जीवन इस्राएलांनी कसे जगावे हे सांगत असता देवाच्या पावित्र्यावर प्रकाश टाकला आहे. १२५ प्रसंग उदाहरणादाखल देत १७-२७ अध्यायात मानवजातीने शुद्धता राखण्यासाठी बोध केला आहे. पावित्र्यासाठी उद्युक्त करताना "मी परमेश्वर आहे" "मी पवित्र आहे" ही दोन विधाने ५० पेक्षा जास्त वेळा वापरली आहेत. २६वा अध्याय विशेष महत्त्वाचा आहे. मोशेशी केलेला करार तेथे आढळतो. नव्या राष्ट्राने वचनांचे पालन केले किंवा आज्ञाभंग केला तर होणारे परिणाम त्यात दिले आहेत. इस्राएलांच्या इतिहासांत पुढे हे घडेल असे धरूनच हे सारे सांगितले आहे. बाबेलचा बंदीवास व तेथून परतण्याशी ते संबंधित आहे. मोशेनंतर ९०० वर्षांनी तो इतिहास घडला. इस्राएलांच्या आध्यात्मिक वर्तनाचे परिणाम मशीहाचे शांतीने राज्य येईपर्यंत राहणार आहेत (जखऱ्या १४:११). त्यांचे शाप लेवीय २६ व अनुवाद २८ मध्ये नमूद केले आहेत.

पाच अर्पणे

ही चिन्हादाखल असून या विधींमधून मनुष्याने आपले देवावरील प्रेम व विश्वास व्यक्त करावा ही अपेक्षा आहे. अंत:करण भग्न व अनुतापयुक्त नसेल तर देव त्या विधीने संतुष्ट होणार नव्हता (आमोस ५:२१-२७). यज्ञार्पण **भस्म करण्याच्या कृतीतून** आराधक पापापासून शुद्ध होऊ इच्छितो असे सूचित होत होते. त्याचा सुगंध देवाला स्तुतीचा यज्ञ म्हणून अर्पिला जात होता. देवाचे नैतिक व आत्मिक नियम पाळण्यात व वचनाचा आदर राखण्यात अचूकता राखण्यास तपशीलवार नियम दिले आहेत.

लागूकरण

विश्वासीयांनी मंडळी या नात्याने आज या विधिसंस्कारांकडे कसे पाहावे? नवा करार हे सर्व विधिसंस्कार रद्द करतो (प्रे कृ १०:१-१६; कलसै २:१६,१७). लेव्यांचे याजकत्व (१पेत्र २:९, प्रकटी१:६; ५:१०; २०:६), परमपवित्र स्थान (मत्तय२७:५१), हे रद्द करून नवा करार प्रस्थापित केला जातो (मत्तय २६:२८; २ करिंथ ३:१६-१८; इब्री ७-१०अध्याय).

जुन्या करारातील विधिसंस्कारांचा अभ्यास करताना त्यांचे आध्यात्मिक महत्त्व पाहून त्यामागील देवाचे पावित्र्य व गुणविशेष लक्षात घ्यावेत. शुद्धीकरणाच्या नियमांत देव आपले अंतर्मन खुले करतो व कोणत्या आध्यात्मिक नियमात त्याचे मूळ आहे ते दर्शवतो. ते त्या काळासाठी असून त्यांचे मूळ देवाच्या स्वभावात आहे. देवाचा स्वभाव तर आजही कायम आहे. प्रे कृ २ मधील पेंटेकॉस्टच्या दिवसापासून मंडळी देवाच्या नियंत्रणाखाली आहे (इब्री ७-१०अध्याय). लागूकरण करणाऱ्याने हे पुस्तक नव्या करारातूनही पडताळून पहावे. नियमशास्त्राचे नियम व निवासमंडपाविषयी ख्रिस्त व नव्या कराराची सत्ये मोलाचे धडे शिकवतात. येशूच्या मुक्ती कार्याची ते सावली आहेत (इब्री १०:१). येशू नव्या करारात ज्या रूपकांचा वापर करतो त्यांचाच मात्र रूपकात्मक अभ्यास करावा. (उदा. १करिंथ ५:७ ख्रिस्त आपला वल्हांडणाचा कोकरा.) पाप, अपराध व बदलीचे मरण आणि प्रायश्चित्त याविषयी हे पुस्तक सर्वाधिक स्पष्टीकरण देते. नवा करार त्यावर विवेचन करतो. हे यज्ञयाग ख्रिस्ताच्या एकदाच पूर्ण झालेल्या बदलीच्या मरणाच्या अर्पणाकडे इशारा करतात (इब्री ९:११-२२). लेवीयचे १-१६ अध्याय देवाशी वैयक्तिक संपर्क कसा साधावा ते सांगतात. तर १७-२७ अध्याय आज्ञापालनाची वाटचाल करून आध्यात्मिक जीवनाने देवाला कसे संतोषवावे ते सांगतात.

रूपरेषा

(I) यज्ञविषयक रूपरेषा

अ. सामान्य जनतेसाठी नियम: १-५ अध्याय; होमार्पण, अन्नार्पण, शांत्यर्पण, पापार्पण, दोषार्पण

ब. याजकांसाठी प्रत्येक यज्ञाबाबत नियम: अध्याय ६:८-७:३८; वरील पाचही अर्पणांसाठी स्वतंत्र नियम

(II) याजकत्वाचा आरंभ: अध्याय ८:१-१०:२०; अहरोन व त्याच्या मुलांच्या अभिषेक (अध्याय ८); पहिला यज्ञ (अध्याय ९); नादाब व अबीहू बहिष्कृत (अध्याय १०).

(III) अशुद्धतेविषयी लिखित नियम: अध्याय ११:१-१६:३४; अशुद्ध प्राणी (अध्याय ११); बालक जन्म (अध्याय १२); रोगांमुळे (अध्याय १३-१५); निवासमंडप शुद्ध ठेवणे (अध्याय १६).

(IV) व्यावहारिक शुद्धता राखणे: अध्याय १७:१-२७:३४; यज्ञ व अन्न (अध्याय १७); लैंगिक वर्तन (अध्याय १८); शेजारधर्म (अध्याय १९); कबरेविषयी (अध्याय २०); याजकांसाठी सूचना (अध्याय २१,२२). धार्मिक सण (अध्याय २३); निवासमंडप (अध्याय २४:१-९); उपहास, निंदा (अध्याय २४:१०-२३); शब्बाथ दिवस, शब्बाथ वर्ष (अध्याय २५); नियमशास्त्र पालन, शाप व आशीर्वाद (अध्याय २६); नवस व दाने (अध्याय २७).

अधिक माहितीसाठी:

(१) शब्बाथ दिवस

हा उपासनेचा दिवस होता. निर्मितीबद्दल, गुलामगिरीतून सोडवल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी, आत्मपरीक्षण व पश्चात्ताप करण्यासाठी, नियमशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी व विसाव्यासाठी हा ७ वा दिवस लावून दिला होता.
शब्बाथाविषयी येशूचा दृष्टिकोन: शब्बाथ हा मानवाच्या हितासाठी आहे. मानवी नियमांपेक्षा माणूस व त्याच्या गरजांना महत्त्व आहे. तो स्वत: त्या दिवशी उपासनेला जात असे.
आपला शब्बाथ कोणता? पहिली मंडळी त्याला **प्रभुवार** किंवा प्रभूचा दिवस संबोधत असे. प्रभू येशूचे पुनरुत्थान हा सर्व श्रेष्ठ दिवस दिवस म्हणून स्वर्गारोहणापूर्वीपासूनच प्रभूने मुक्रर केला. आपण मंडळीत जे काही करतो ते प्रभूने स्वत: पुनरुत्थानदिनी केले. दर्शने दिली म्हणजे भेट दिली. प्रभुभोजन विधीप्रमाणे भोजन केले. सहभागिता झाली, वचनाचा उलगडा केला. सुवार्तेची घोषणा करण्याची आज्ञा दिली. मंडळी तोच आठवड्याचा पहिला दिवस शब्बाथवार म्हणून पाळू लागली व शनिवारी शब्बाथ पाळणे बंद झाले.

(२) शब्बाथ वर्ष

त्यांच्या कॅलेंडरप्रमाणे दर ७ व्या वर्षी पेरणी करायची नव्हती. ६व्या वर्षांच्या उपजावर ७व्या व ८ व्या वर्षाचे पीक हाती येईपर्यंत उपजीविका करायची व भूमीला विसावा द्यायचा होता. देवाचा पुरवठा अनुभवायचा होता.

(३) योबेल वर्ष: ७ व्या शब्बाथानंतरचे म्हणजे ७ गुणिले ७ = ४९ नंतरचे ५० वे वर्ष. यावर्षी दास स्वतंत्र करायचे, दारिद्र्यामुळे कोणी वतन गहाण टाकले असेल तर त्यांचे वतन त्यांना परत करायचे. ४९ व्या वर्षी पेरणी करायची नव्हती. पुन्हा ५० व्या वर्षी पेरणी करायची नव्हती. म्हणजे ४८व्या वर्षाचे पीक ५० व्या वर्षाच्या पिकाचा उपज येइपर्यंत खायचे होते. भूमिला विसावा देऊन देवाचा पुरवठा अनुभवायचा होता.

इस्राएलांचे सण: देवाने पाच सण लावून दिले होते.

१. वल्हांडण सण - निसान महिना - १४ तारीख, मार्च - एप्रिल
बेखमीर भाकरीचा सण - निसान महिना - १५ ते २१ तारखेपर्यंत, मार्च-एप्रिल
हंगामाचा सण - निसान - १६ तारीख, मार्च - एप्रिल

२. पेंटेकॉस्टचा सण - सिवान ६ तारीख, मे - जून

३. तुताऱ्यांचा सण – तिश्री १,२ तारीख, सप्टेंबर - ऑक्टोबर
४. प्रायश्चित्ताचा सण- तिश्री १० तारीख, सप्टेंबर - ऑक्टोबर
५. मंडपाचा सण- तिश्री - १५-२२ तारखेस; सप्टेंबर – ऑक्टोबर

दोन सणांची भर:

(१) पुरीम सण: एस्तेर राणीच्या काळात हामानाच्या कष्टातून वाचल्याबद्दल सुरू झालेला सण एस्तेर अध्याय ९,१०

(२) दीपांचा सण: मलाखी ते मत्तयच्या मधल्या काळात देवाने भेट घेणे बंद केले होते तेव्हा मक्काबी या क्रांतीकारकांनी यहूद्यांचे संघटन केले व मशीहाची वाट पाहाण्याचे दर्शक म्हणून किसलेव महिन्याचे आठ दिवस पाळण्याची प्रथा सुरू केली.

जुन्या कराराचे यज्ञ व ख्रिस्ताचे यज्ञ यात तुलना

लेवीय		इब्री लोकांस पत्र
१. जुना करार तात्पुरता	इब्री ७:२२; ८:६,१३; १०:२०	१. नवा करार कायमचा
२. अभिवचने प्रचारातून गेली	इब्री ८:६-१३	२. उत्तम अभिवचने प्राप्त
३. सावली आहे	इब्री ८:५; ९:२३,२४; १०:१	३. सत्य व वास्तव आहेत
४. अहरोनाचे वारशाने याजक (अनेक)	इब्री ६:१९ ते ७:२५	४. मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे एकच याजक
५. पापी व्यक्तीचे याजकपण	इब्री ७:२६,२७ ९:७	५. पापविरहित येशूचे याजकत्व
६. मृत्यूमुळे मर्यादित याजकत्व	इब्री ७:१६,१७,२३,२४	६. सार्वकालिक याजकत्व
७. रोज यज्ञयाग	इब्री ७:२७,९:१२,२५,२६; १०:९-१२	७. कायमसाठी एकदाच यज्ञ केला
८. पशुयज्ञ	इब्री ९:११-१५; २६;१०:४-१०; १९	८. देवपुत्राचा यज्ञ
९. यज्ञयाग चालूच	इब्री १०:११-१४; १८	९. यज्ञयागांची गरजच नाही
१०. वर्षातून एकदा प्रायश्चित्ताचा यज्ञ	इब्री ७:२५,९:१२,१५;१०:१-४,१२	१०. सर्वकाळासाठी देव संतुष्ट

येशूने केलेली सणांची पूर्तता

सण	**ख्रिस्ताने केलेली पूर्तता**
वल्हांडण सण	ख्रिस्ताचे मरण (१करिंथ ५:७)
बेखमीर भाकरीचा सण	ख्रिस्ताचे निर्दोष निष्पापत्व (१करिंथ ५:८)
हंगामाचा सण- प्रथमफळ	ख्रिस्ताचे पुनरुत्थान (१करिंथ १५:२३)
पेंटेकॉस्टचा सण	ख्रिस्ताच्या आत्म्याचा वर्षाव (प्रे कृ १:५,२:४)

तुताऱ्यांचा सण	ख्रिस्ताचे इस्राएलांना एकवटणे (मत्तय २४:३१)
प्रायश्चित्ताचा सण	ख्रिस्ताचे बदलीचे मरण (रोम ११:२६)
मंडपाचा सण	ख्रिस्ताशी संयुक्त व विसावा (जखऱ्या १४:१६-१९)

प्रकरण ७

गणना

प्रस्तावना

येथे पुन्हा देव मोशेला संपर्कासाठी निवासमंडपात पाचारण करीत आहे; पण इस्राएलांच्या शत्रूंशी लढण्याकरता तयारी करण्यास शिरगणतीसाठी पाचारण करीत आहे. हिब्रू बायबलमध्ये या पुस्तकाचे "अरण्यवास" हे शीर्षक सार्थ वाटते. देवावरील अविश्वासामुळे इस्राएल लोकांना आपल्या शत्रूंवर चढाई करायला नको आहे. त्यांच्या या बंडखोरीमुळे त्यांना ४० वर्षांचा अरण्यवास घडतो. अखेर इस्राएल राष्ट्र मवाबाच्या पठारावर स्थिरावते.

शीर्षक

१-४ व **२६** व्या अध्यायात शिरगणती दिल्यामुळे हे शीर्षक पडले. १:१ नुसार हा इस्राएलाचा अरण्यवासातील ३९ वर्षांचा इतिहास आहे. या काळात त्यांना प्राप्त झालेले देवाचे वचन नमूद केले आहे.

लेखक व काळ

मोशेच याही पुस्तकाचा लेखक असल्याचे वचन पुरावे देते. यहोशवा ८:३; २ राजे १४:६; नहेम्या ८:१; मार्क १२:२६; योहान ७:१९ विशेषत: गणना ३३:२; ३६:१३ स्पष्ट दावा करतात. २०:१ पासून अखेरपर्यंतच्या घटना निर्गमनानंतर ४०व्या वर्षी घडलेल्या आहेत. यार्देनेच्या अलीकडे यरीहोत प्रवेश करण्यापूर्वी पर्यंतच्या नोंदी दिल्या आहेत.

त्यानंतर कनान जिंकण्याचा वृत्तांत सुरू होतो (३६:१३). अनुवादाचे पुस्तक ४०व्या वर्षाच्या ११व्या महिन्यात लिहिले आहे. १:१-१४:४५ चा इतिहास ख्रि. पू १४४५ मधला असून २०:१ पासूनचा वृत्तांत ख्रि पू १४०६ - ख्रि पू १४०५ पासूनचा आहे. मधील सर्व वर्षे देवाविरुद्ध बंडखोरी केल्याबद्दल अरण्यात भटकण्यात वाया गेली.

"अरण्य " हा शब्द वाळवंटासंदर्भात वापरला आहे. पाऊस नसल्याने लागवड होऊ न शकलेला हा प्रांत. येथे देवाने इस्राएलांशी मोशेद्वारे करार केला (निर्गम: अध्याय१९-२४).

गणना११-१२:१६ पर्यंत त्यांचा सीनाय ते कादेश बर्ण्यापर्यंतचा प्रवास दिला आहे. त्यातील पुढील घटना मवाबात घडतात. इस्राएलांच्या दोन पिढ्या आपण येथे स्पष्ट पाहतो. निर्गमात मिसरातून निघालेली पिढी गणना १४ पर्यंत आहे. तेथे कनानात प्रवेश करण्यास यहोशवा व कालेब सोडून १० हेरांनी नकार दिल्याने देवाविरुद्ध बंडाळी माजली. १५-२५ अध्यायांपर्यंत दोन्ही पिढ्यांची एकत्र वाटचाल आहे. दुसरी पिढी प्रौढ बनेपर्यंत यहोशवा व कालेब सोडल्यास पहिली पिढी अरण्यातील वाटचालीत पूर्णपणे मरून नष्ट झाली. दुसऱ्या पिढीचे कथानक २६ व्या अध्यायापासून सुरू होते.

गणनामधील तीन ईश्वरी तत्त्वे

I. देवाने मोशेद्वारे इस्राएलांनी संवाद साधला. त्यामुळे मोशेच्या शब्दांना दैवी अधिकार होता. लोकांचा आज्ञापालनाचा व अवज्ञेचा प्रतिसाद आपण येथे तीन प्रकारे पाहातो. (१)अध्याय १-१० मध्ये आज्ञापालन (२) अध्याय ११-१५ मध्ये अवज्ञा (३) अध्याय २६-३६ मध्ये नव्याने आज्ञापालन.

II. देव न्याय करणारा आहे. इस्राएलांच्या पापामुळे देव क्रोधविष्ट झाल्याचे आपण वेळोवेळी या पुस्तकात पाहातो (१:१; १०,३३; १२:९; १४:१८; २५:३४; ३२:१०,१३,१४).

III. अब्राहामाला अभिवचन दिल्याप्रमाणे देव वचनदत्त देश देण्यात विश्वासू असल्याचे वारंवार आढळते (१५:२; २६:४२-५६; २७:१२; ३३:-५६; ३४:१-२९).

अधिक माहितीसाठी:

१. पहिल्या पाच पुस्तकांच्या संचाला "तोरा" म्हटले आहे. वाचकांस या आधीची तीन पुस्तके माहीत असल्याचे गृहीत धरले आहे.

२. शिरगणती, वंशावळी, नियम, ऐतिहासिक कथानके, भाकिते, प्रवासाची यादी यात सापडते. सिनाय ते मवाबाच्या पठारापर्यंतचा इतिहास येथे सापडतो.

३. लढवय्या पुरुषांची शिरगणती लक्षात घेता सुमारे २५ लाख लोक एका वेळी अरण्यात भटकत होते असे दिसते. एवढा मोठा जमाव अरण्यात तग धरून राहाणे ही दैवी गोष्ट वाटते. देवाने ४० वर्षे आपल्या सामर्थ्याने काळजीपूर्वक त्यांचा सांभाळ व जतन केले (अनुवाद ८:१-५). एवढ्या मोठ्या राष्ट्राचे नेतृत्व स्वत: देवाने केले.

४. बलामाला सातत्याने खोटा संदेष्टा लेखले आहे.(२ पेत्र २:१५,१६; यहूदा ११) अशा लबाड माणसाच्या जिभेचा ताबा घेऊन देवाने त्याच्याकडून सत्य वदवून घेतले ही महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी (२२:२-२४:२५).

तिहेरी संदेश: खंडून घेतलेल्यांनी सेवा करावी.
(अ) उत्पत्तीत पतन (ब) निर्गमात खंडणी (क) लेवीयात उपासना (क) गणनेत सेवा. आपल्या वैयक्तिक जीवनातही क्रमाने या सर्व गोष्टी असाव्यात.

इस्राएलांचा प्रवास

(१) रामसेस ते सिनाय (२) सिनाय ते कादेश, परत पहिल्या जागी (३) कादेश ते मवाब

कालावधी

I. सीनायजवळ २० दिवस; (अध्याय १-१०).

II. सीनाय ते कादेश ३७ वर्षे ११ महिने; अपयशाचे जीवन (अध्याय ११-२०).

III. मवाबात ९ महिने १० दिवस (अध्याय २१-३६).

रूपरेषा

I. इस्राएलच्या पहिल्या पिढीचा अरण्यातील अनुभव

(अ) देवाचे आज्ञापालन: निवासमंडपाभोवतीचे व्यवस्थापन (१:१-६:२७); निवासमंडपाच्या सेवेचे शिक्षण: ७:१-१०:३६

(ब) देवाची आज्ञा मोडणे: प्रवासात कुरकुर (११:१-१२:१६). कादेशात इस्राएलांची व नेत्यांची बंडखोरी व त्याचे परिणाम (१३:१-२०:२९).

(क) नव्याने प्रवासात कुरकुरी (२१:१-२२:१).

(ड) बलामाद्वारे इस्राएलांना आशीर्वाद (२२:२-२५:२५).

(ई) इस्राएलांची अखेरचा बंडखोरी (२५:१-१८).

(II) इस्राएलांच्या दुसऱ्या पिढीचा मवाबातील अनुभव: नव्याने देवाचे आज्ञापालन

(अ) परमेश्वराच्या युद्धाची तयारी (२६:१-३२:४२).

(ब) अरण्यप्रवासाचे अवलोकन (३३:१-४९).

(क) देव विजय देण्यासंबंधी गृहीत (३३:५० – ३६:१३)

प्रकरण ८

अनुवाद

प्रस्तावना

होरेबपासून सेईर डोंगरांमागील कादेश बर्ण्या ११ दिवसांच्या वाटेवर आहे (१:२). तरीही बंडखोरीमुळे वचनदत्त देशात जाण्यास त्यांना ४० वर्षे लागली. आता पुन्हा तेथे आल्यावर वचनदत्त देशात प्रवेश करण्यासाठी लोकांची तयारी करण्यास मवाबाच्या पठारावर मोशेने अनुवादाच्या पुस्तकातील उपदेश केला आहे. "अनुवाद" या मूळ ग्रीक शब्दाचा अर्थ "दुसरा नियम" असा आहे. नव्याने सुंता झालेल्या इस्राएलांस तो पुन्हा सर्व नियम सांगत आहे व त्यांच्या लागूकरणावर भर देत आहे. देवाने आतापर्यंत आपली कामे, इस्राएलांचा इतिहास, मानवाच्या मुक्तीची योजना व त्यातील इस्राएलांची भूमिका देवाने प्रकट केली आहे. मोशेने मृत्युपूर्वी हे पुस्तक ख्रि पू १४०५ मध्ये लिहिले. देवाच्या आज्ञा पाळून, भय बाळगून, त्याच्या मार्गांनी चालून, त्यावर जिवेभावे प्रेम करून, आज्ञा पाळून सेवा केली तर बरकत व आशीर्वाद प्राप्त होतील हे दाखवले आहे. पंचकाची पाच पुस्तके हा संपूर्ण पवित्र शास्त्राचा पाया आहे.

पंचकाविषयी काही

जुन्या व नव्या करारात पंचकातील संदर्भ घेतले आहेत**.** इस्राएलांसाठी ती पहिली ईश्वरप्रेरित रचना होती. यावर त्यांनी मनन करायचे होते (यहोशवा१:८), ते मुलांना शिकवायचे होते (अनु ६:४-८), आणि त्याचे सामूहिक वाचन करायचे होते (नहेम्या ८:१). वचनदत्त देशात जाण्यापूर्वी मोशेनेही वचनाचे सामूहिक वाचन करण्याची प्रक्रिया लावून दिली होती. यासाठी की वचन मानवाच्या अंत:करणात शिरून त्यांचे देवाशी योग्य संबंध जडून त्यांचे आचरण बदलून जावे (अनुवाद ३१:१२). या आज्ञांतील परस्परसंबंध महत्त्वाचा आहे.

(१) लोकांकडून देवाच्या काय अपेक्षा व त्याचे म्हणणे समजण्यास लोकांना एकत्र करायचे.

(२) देवाविषयी अचूक ज्ञान करून घेण्याचे व त्याचे भय धरण्याचे शिक्षण द्यायचे.

(३) आज्ञापालन व सत्कृत्यांची प्रेरणा घेण्यास व देवाचे भय धरण्याचे याजकांनी शिक्षण द्यायचे (मलाखी २:४-७).

पालकांनी घरात मुलांना शिक्षण द्यायचे (अनुवाद ६:४). इस्राएलांच्या डोळयांपुढे असलेली मूर्तिपूजक मिसऱ्यांची जीवनशैली व मेसोपोटेमियाची त्यांची मूर्तिपूजक ऐतिहासिक पार्श्वभूमी यामुळे असलेले त्यांचे जगिक ज्ञान गोंधळाचे होते. जगाची निर्मिती व त्यांची आतापर्यंतची वाटचाल कशी झाली, ते राष्ट्र म्हणून कसे अस्तित्वात आले याविषयी त्यांच्या मनात गोंधळ होता. उत्पत्ती १-११ अध्यायांमुळे निर्मिती मानवी परिश्रम, पाप, विवाह, खून, मरण, बहुपत्नीत्व, न्याय, बहुभाषा व संस्कृतींचे इस्राएलांना ज्ञान झाले. हे ११ अध्याय संपूर्ण जगाविषयीचा दृष्टिकोन स्पष्ट करतात. त्यामुळे बायबल म्हणून कित्येक वर्षे नियमशास्त्राचे स्थान कायम टिकले. उत्पत्तीचे पुढचे अध्याय इस्राएल लोक कोण आहेत, देवाची त्यांच्याविषयीची योजना काय आहे ते सांगतात. देवावर अवलंबून राहून धीराने वाट पाहण्याचे महत्त्व शिकवतात. निर्गम व लेवीय देवाशी योग्य नाते संबंध ठेवायला शिकवतात. निर्गमात त्यांची देवाशी भेट होते व ते वचनदत्त देशात जाईपर्यंत देव त्यांच्याबरोबर राहातो. लेवीयच्या पुस्तकात देवाची भक्ती करण्याचे व जीवन जगताना प्रत्येक बाबतीत पावित्र्य व शुद्धता राखण्याचे मार्गदर्शन केले आहे. तर गणना व अनुवादात वचनदत्त देशात प्रवेश करण्याची पूर्वतयारी वर्णिली आहे. पंचकाचे सार हेच आहे की देव अब्राहामाला दिलेले वचन पूर्ण करतो.

अनुवादाचे सूत्रवचन ७:१२-१३; १०:१२,१३ आहे.

पार्श्वभूमी
यार्देनपाशी मुक्काम ठोकून एक महिना तेथे तळ दिला होता. अनुवाद १:१; ३४:८; गणना ३६:१३. चाळीस वर्षांचा काळ संपुष्टात येत होता तेव्हा हे लिहिले. मोशेच्या जीवनातील शेवटच्या सप्ताहावर हे पुस्तक प्रकाश टाकते. त्यात विशेष अशा घटना नसून संभाषण अधिक प्रमाणात दिले आहे. ते दैवी प्रकटीकरण आहे.

घटना: १. नियमशास्त्र पुस्तक स्वरूपात लिहून यहोशवा पुढारी होणे.
२. नबो पर्वतावरून मोशेने कनान देश पाहणे.
३. मोशेचा मृत्यू

कोणाला उद्देशून?
यहोशवा व कालेब सोडल्यास ४० ते ६० वयोगटातील दुसऱ्या पिढीला मोशे नव्याने देवाचे नियम सांगत आहे. ४०च्या खालचे सगळे अरण्यात जन्मले होते. ते आता ४० वर्षांचे झाले होते आणि यहोशवाच्या नेतृत्वाखाली कनान देशाचा कबजा घेणार होते.

सिद्धांत व ऐतिहासिक पार्श्वभूमी
यातील कायदेकानू याजकांपेक्षा लोकांवर केंद्रित आहेत. इस्राएलांचा भूतकाळाचा इतिहास देऊन या दुसऱ्या पिढीला मोशे बोध करून देवाचे भय धरायला शिकवत आहे. तो त्यांना खालील आठवणी करून देतो:

१. होरेबातील देवाविरुद्धचे बंड (९:७-१०; ११).
२. कादेशातील बंड व त्याचे भयानक परिणाम सांगितले आहेत (अध्याय १०).
३. देवाने शत्रुंवर विजय दिल्याची आठवण देतो (२:२४-३:११; २९:२,७,८).
४. अब्राहाम, इसहाक व याकोबाशी झालेल्या कराराप्रमाणे ते वचनदत्त देश घेत आहेत याची त्यांना आठवण करून देत आहे (उत्पत्ती१५:१८-२१;२६:३-५; ३५:३-१२; अनुवाद १:८; ९:१०; २९:१३; ३४:४)
५. मोशे केवळ मागे नव्हे तर पुढेही पाहातो व अवज्ञा केल्यास ते कसे विखरतील व मग तो करार कसा पूर्ण होईल ते सांगतो (४:२५-३१; २९:२२-३०:१०; ३१:२८-२९). हे पुस्तक देवाच्या स्वभावगुणांवर प्रकाश पाडते. स्तोत्रे व यशया यातून ४० हून अधिक संदर्भ घेतले आहेत.

देवाविषयीचे प्रकटीकरण:
१. देव एकच आहे (४:३९;६:४). २. देव प्रेमळ आहे (७:१३.) ३. देव ईर्ष्यावान आहे (४:२४). ४. देव दयाळू आहे (४:३१). ५. देव विश्वासू आहे (७:९). ६. देव पापामुळे क्रोधविष्ट होतो (६:१५). ७. याच देवाने इस्राएलांस पाचारण केले. म्हणून "तुमचा देव परमेश्वर" हे शब्द २५० वेळा आले आहेत.

इस्राएलांनी काय करायचे?

१. आज्ञापालन (२८:२). २. भय धरणे (१०:१२). ३. प्रीती करणे (१०:१२). ४. सेवा (१०:१२,१३).

परिणाम

आज्ञापालनामुळे त्यांना आशीर्वाद प्राप्त होणार (२८:१-१४). देवाच्या गुणांच्या आधारावर आपण पावित्र्याचा पाठपुरावा करू शकतो. तो जसा पवित्र आहे तसे त्याच्या लोकांनी पवित्र व्हायचे आहे (७:६-११; ८:६,११,१८; १०:१२,१६,१७; ११:१३; १४:३,४; १४:१-२).

विशेष काही

(१) जो करार पहिल्या पिढीशी केला तोच नव्या पिढीशी मुक्रर केला. तरी ही पिढीही बहकणार असल्याचे व नवा करार केला जाणार असल्याचे मोशेने गृहीत धरले होते (अध्याय २९,३०).

(२) मोशे १२० वर्षांचा असल्याने तो नव्या नेत्याची ओळख करून देतो.

(३) मानव कितीही चुकला तरी देवाची प्रीती व कृपा कमी होत नाही हे वारंवार आढळते. इस्राएलांना खंडून घेतल्याने त्यांनी आज्ञापालनाचे जीवन जगणे बंधनकारक होते.

(४) बलीएलाचे पुत्र म्हणजे अधम पुत्र (१३:१३); झाडावर टांगून मारलेला (२१:२२); झुडपातील प्रकटीकरण; ख्रिस्त संदेष्टा (१८:१५-१९)

(५) या पुस्तकात नवीन गोष्टी, नवीन पिढी, नवीन देश, नवीन जीवन, नवीन कामे, नवीन पुढारी यांच्याविषयी सांगितले आहे.

(६) १-११ ऐतिहासिक अध्याय;१२-२६; नियमशास्त्र: २७-३४; भविष्यवचने व मोशेचा मृत्यू अशी नोंद आहे.

रूपरेषा

(I) मोशेचे पहिले ऐतिहासिक भाषण (१:१-४:४३).

(II) मोशेचे दुसरे भाषण ४:४४-२८:६८. देवाशी मूलभूत संबंध: देवाला संपूर्ण समर्पण, इतर दैवतांपासून निराळे होणे; देवाला विसरल्यास इशारा; इस्राएलांच्या पूर्वीच्या बंडखोरीची आठवण; देवावर प्रेम करून त्याच्या इच्छेनुसार आज्ञापालन करण्याचा बोध.

(III) नवीन भूमीवर काय करावे याविषयी सूचना (१२:१-२६:१९). आराधनेविषयी सूचना, सामाजिक शिस्त पाळण्याविषयी सूचना, इतर बाबतीत आज्ञापालन, भूमीचे प्रथमफळ व दशांशाविषयी शिक्षण, आज्ञापालनाविषयी ठाम शिक्षण, करारातील आशीर्वाद व शाप .

(IV) मोशेचे तिसरे भाषण (२९:१-३०:२०).

(V) समारोपातील घटना (३१:१-३४:१२). नेतृत्त्वाबद्दल, नियमशास्त्राचे भावी वाचन, मोशेचे गीत, मोशेच्या जीवनातील अखेरच्या घटना: त्याचे आशीर्वाद व मृत्यू

प्रकरण

बारा ऐतिहासिक पुस्तके
यहोशवा
पहिले ऐतिहासिक पुस्तक

प्रस्तावना

यहोशवा या नावाचा अर्थ "देव तारण आहे किंवा देव तारण करतो" असा आहे. बारा ऐतिहासिक पुस्तकातील हे पहिले पुस्तक आहे. मोशेनंतर बनलेल्या यहोशवा या पुढाऱ्याच्या नावाचे हे पुस्तक आहे. त्याच्या नावाचा अर्थ ख्रिस्ताकडे इशारा करतो. यहोशवाच्या काळातही देव स्वत: त्यांच्यामध्ये उपस्थित राहून त्यांच्यासाठी लढला व त्यांना मुक्ती दिली (५:१४-६:१२; १०:४२; २३:३-५; प्रे कृ ७:४५).

लेखक

यातील घटनांचा प्रत्यक्ष साक्षी यहोशवा या पुस्तकाचा लेखक आहे. यहोशवाच्या मृत्यूचा वृत्तांत त्याच्या सोबत्याने म्हणजे एलिएजर किंवा फिनहासाने लिहून पूर्ण केला असे म्हणतात. यहोशवा ६:२५ लिहिले तेव्हा रहाब जिवंत होती असे दिसते. दाविदाचे राज्य सुरू होण्यापूर्वी ख्रि पू १४०५-१३८५ मध्ये हे पुस्तक लिहिले गेले.

यहोशवा: याचा जन्म मिसऱ्यांच्या गुलामगिरीत असताना झाला. मोशेने त्याला प्रशिक्षित केले. देवाच्या निवडीने तो नेतृत्वाच्या या उच्चपदी चढला व लोकांना कनानात घेऊन गेला.

(अ) त्याची सेवा: निर्गम १७:१०; २४:१३; ३३:११; गणना ११:२८
(ब) सेनानीचे काम: निर्गम १७:९-१३
(क) टेहळणीचे काम व हेरगिरी: गणना १२-१४अध्याय
(ड) मोशेची नेत्याकरता परमेश्वराला विनवणी: गणना २७:१५-१७. देव आपल्या सार्वभौमत्वाने त्याला नेता म्हणून निवडतो.
(इ) त्याच्याठायी आत्म्याचे सान्निध्य: गणना २७:१८; अनुवाद ३४:९
(फ) मोशेपासून तो विभक्त होतो. गणना २७:१८-२३; अनुवाद ३१:७,८,१३,१५.
(ग) पूर्णपणे परमेश्वराला अनुसरला व नि:स्वार्थी जीवन जगला. गणना ३२:१२

पार्श्वभूमी

मरण्यापूर्वी यहोशवाकडे मोशेने नेतृत्व सोपवले (अनुवाद ३४). ते अरण्यवासाचे ४०वे वर्ष होते. (ख्रि पू १४०५.) ९०व्या वर्षात पदार्पण करीत असता यहोशवा पुढारी झाला व ११० व्या वर्षी मरण पावला (यहो २४:२९). बहुतेक सर्व शत्रुंना घालवून देऊन १२ वंशांना वतन वाटून दिल्यावर तो मरण पावला. उत्पत्ती १२:७; १५:१८-२१ची इस्राएल लोक वाट पाहात होते. यार्देनेपलीकडील पश्चिम भागातील लोकांची दुष्टाई एवढी होती की देवाने त्या वसाहतींचा नायनाट केला (लेवीय १८:२४,२५). अब्राहामाला अभिवचन दिल्यानुसार देव त्यांना देश पादाक्रंत करून देणार होता. पण ते अभिवचन अंमलात आणताना देव तेथील अधम वसाहतींवर त्याचा न्याय आणणार होता (उत्पत्ती१५:१६). अब्राहामाच्या काळातच तेथे वसाहत करू लागणाऱ्यांविषयी देवाने अब्राहामाला आधीच सांगितले

होते (उत्पत्ती १०:१५-१९; १२:६; १३:७). यहोशवाच्या काळापर्यंत त्यांची नैतिक पातळी खूपच ढासळली होती.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

देव अब्राहामाच्या संतानाला भूमी देऊन कराराचे अभिवचन पूर्ण करणार होता. यात देवाचा विश्वासूपणा हा मुख्य विषय आहे (उत्पत्ती१२:७; १५:१८-२१;१७:८). त्यात देव स्वत: पुढाकार घेत होता (५:१४-६:२). "देश घेतला" "पादाक्रांत केला" "हस्तगत केला" असे शब्दप्रयोग २० वेळा आलेले दिसतात. तरीही देवाने दाखवलेला संपूर्ण प्रदेश पादाक्रांत करण्यात इस्राएल अपयशी ठरल्याच्या पापाचे परिणाम (यहो १३:१) शास्ते १,२ अध्यायात स्पष्ट दिसतात.

१. वचनदत्त देश हस्तगत करण्याविषयी देवाचे अभिवचन (यहो १:३,८).

२. देवाच्या वचनाचे मनन करणे लोकांना आवश्यक होते (१:८).

३. लोकांनी काही भाग हस्तगत केला. १३-२२ अध्यायात यहोशवा भूमी वाटून देतो. पुढे प्रत्येक वंशाने आपल्या भूमीतील शत्रूंचा नाश करणे ही त्यांची जबाबदारी होती. अशा प्रकारे संपूर्ण देश इस्राएलांनी हस्तगत करावा अशी देवाची इच्छा होती.

त्याची कारणे:

अ. त्याच्या वचनाची परिपूर्ती व्हावी.

ब. त्याच्या पुढे येणाऱ्या राज्याचे व्यासपीठ तयार व्हावे (उत्पत्ती १७:८, ४९:८-१२).
राजे व संदेष्ट्यांच्या काळात इस्राएल व्यवस्थित प्रस्थापित झालेले राष्ट्र असावे.

क. अत्यंत अधमपणासाठी त्याच्या लोकांचा न्याय करता यावा (लेवीय १८:२५).

ड. इतर लोकांपुढे इस्राएल लोक साक्षीदाखल दिसावेत (यहे २:९-११; उत्पत्ती १२:१-३).

महत्त्वाचे काही

निर्माणकर्ता देव या पुस्तकात काही हेतुपुरस्सर चमत्कार करताना दिसतो. (१) यार्देनेचे पाणी हटवणे (३:७-१७). (२) यरीहोचा बुरूज ढासळणे (६:१-२७). (३) गारांचा मारा १०:१-११) (४) सूर्य स्थिर झाल्याने दिवस मोठा होणे (१०:१२-१५). (५) विश्वासाने देवाला प्रतिसाद देणाऱ्या रहाब वेश्येवर देवाचा आशीर्वाद (अध्याय २). (६) आखानाचा परिवार त्यांच्यासह का ठार केला गेला (अध्याय ७)? (७) इस्राएलांपेक्षा कमी पुरुष आय नगरात असून ते का जिंकू शकले नाहीत (अध्याय ७,८)? (८) देवाने गांधिलमाशा पुढे पाठवल्या याचा अर्थ काय (२४:१२)? अभ्यास करताना हे सर्व स्पष्ट होईल.

रूपरेषा

(I) वचनदत्त देशात प्रवेश (१:१-५:१५).

(II) मध्यभागी, दक्षिणेवर, उत्तरेवर हल्ला; मग संपूर्ण विजयाचा सारांश.

(III) वतनाचे वाटप (१३:१-२२:३४). सूचनावली, यार्देनपाशी पश्चिम भाग, शरणपुरे; लेव्यांची नगरे, यार्देनपाशी पूर्व भाग.

(IV) भूमी अडवून ठेवणे (२३:१-२४:२८). यहोशवाचे पहिले व दुसरे भाषण.

(V) नंतर लिहिलेली वचने (२४:२९-३३).

यहोशवाची सेवेसाठी पूर्वतयारी

१. अमालेक्यांविरुद्ध युद्धाचे नेतृत्व. निर्गम १७:९,१०; १३,१४
२. मोशे आपला सेवक, यहूद्यांच्या भावी नेत्याला देवाच्या डोंगरावर सोबत नेतो. निर्गम २४:१३
३. लहानपणापासून तो मोशेची सेवा करायचा. गणना ११:२८
४. मोशेने त्याचे नाव "होशा" म्हणजे "तारण" बदलून "यहोशवा" म्हणजे "देव तारण करतो" असे ठेवले. गणना१३:१६
५. देश हेरायला गेलेल्या बारा हेरांपैकी फक्त यहोशवा व कालेब हे दोघेच वतन घ्यायला गेले. गणना१४:६-१०,३०,३८.
६. यहोशवाच्या ठायी देवाचा आत्मा वसत होता. गणना२७:१८
७. आत्मिक सेवेत मोशेला सोबत देण्यास हे पहिले पाचारण. गणना २७:१८-२३
८. यहोशवा पूर्ण मनाने नि:स्वार्थीपणे देवाला अनुसरला. गणना ३२:१२
९. मोशेच्या जागी यहोशवाला नेमण्याची दुसऱ्यांदा आज्ञा झाली. अनुवाद ३१:२३
१०. यहोशवा ज्ञानाने परिपूर्ण होता. अनुवाद ३४:९

वचनदत्त देशाभोवतालचे लोक: (निर्गम३४:१०-१७; अनुवाद २०:१७; यहोशवा ३:१०; ९:१; २४:११)

१. अमालेकी एसावाचा प्रथमपुत्र अमालेकाचे वंशज (उत्पत्ती २६:१२). पॅलेस्ताइनच्या पश्चिमेस नेगेव्ह येथे राहत होते.

२. अम्मोनी लोटाला त्याच्या मुलीकडून झालेला नातू अम्मोन याचे वंशज (उत्पत्ती १९:३८). यार्देनेच्या पूर्वेकडचा व मवाबाच्या उत्तरेस राहात.

३. अमोरी त्या भूमीचे रहिवासी. यार्देनेच्या दोन्ही तीरांवर कनानाचे हे वंशज वसाहत करून राहात होते.

४. कनानी नोहाचा पुत्र हाम याचा पुत्र कनान याचे वंशज (उत्पत्ती१०:१५-१८). त्यात अनेक पोटगट होते ते पुढे दिले आहेत.

५. अदोमी एसावाचा वंशज. पॅलेस्ताइनच्या ईशान्येस सेईरात वस्ती होती (उत्पत्ती २५:३०).

६. गिबली यहोशवा १३:५. प्राचीन बंदराजवळचे, बिबलॉस म्हणून नावारूपाला आलेले लोक. आताच्या बैरुतच्या उत्तरेस २० मैलांवर.

७. गशूरी यहोशवा १२:५. गशूरचे रहिवासी. यार्देनेच्या पूर्वेच्या व सेईरच्या दक्षिणेला वस्ती.

८. गिबोनी यहोशवा ९:७. गिबोनाचे वंशज व त्यासभोवतालचे रहिवासी.

९. गिर्गाशी कनानाचे वंशज. खास भौगोलिक स्थान नव्हते.

१०. गिरजी (१ शमुवेल २७:८,९) नेगेव्हच्या नैऋत्येला राहात होते. दाविदाने त्यांचा विध्वंस केला.

११. हित्ती हित्ती साम्राज्यातील स्थलांतरित लोक सेईर प्रांतात राहात होते. उत्पत्ती २३:१०; २ शमुवेल ११:३

१२. हिव्वी कनानाचे वंशज, उत्तरेकडील वस्ती.

१३. होरी प्राचीनकाळी अदोमात वस्ती. मूळ ठाऊक नाही. एसावाच्या वंशजांनी त्यांचा नायनाट केला. अनुवाद २:२२

१४. यबूसी कनानाचे वंशज, यरुशलेमच्या डोंगराळ भागात वस्ती. उत्पत्ती १५:२१; निर्गम३:८

१५. केनी मिद्यानी वंश. अकाब प्रांतातल्या सामुद्रधुनीत वस्ती. १ शमुवेल २७:१०

१६. मवाबी लोटाला त्याच्या थोरल्या मुलीपासून झालेल्या नातवाचे वंशज. उत्पत्ती १९:३७. मृत समुद्राच्या पूर्वेस राहात होते.

प्रकरण १०

शास्ते

दुसरे ऐतिहासिक पुस्तक

प्रस्तावना

या पुस्तकाला हे नाव योग्यच आहे. लोकांचा शत्रुंपासून बचाव करण्यासाठी देवाने खास प्रकारचे नेते पुरवले (२:१६-१९). "शास्ते" या शब्दांचा अर्थ "सोडवणारे," "बचाव करणारे," "न्यायाधीश" (अनु. १६:१८; १७: ९; १९:१७). शमुवेलापूर्वी असे १२ शास्ते झाले. नियमशास्त्रात तशी तरतूद होती. एली धरून १४ शास्ते झाले. देव स्वत: सर्वोच्च शास्ता आहे (११:२७). यहोशवाच्या विजयापासून शमुवेलाने राजेशाही सुरू करीपर्यंत ३५० वर्षांचा काळ होतो (ख्रि पू १३९८- ख्रि पू १०४३).

लेखक व काळ

या घटना घडल्या तेव्हा अखेरच्या टप्प्यात शमुवेल जिवंत होता. त्यानेच या इतिहासाचा गोषवारा लिहून काढला (१शमुवेल १०:२५). दाविदाने ख्रि पू १००४ मध्ये यरुशलेम हस्तगत करेपर्यंत यबूसी लोकांचे तेथे वर्चस्व होते (शास्ते १:२१). राजेशाही सुरू झाल्याचा काळही लेखक हाताळतो (१७:६,१८:१, २१:२५). ख्रि पू १०४३ मध्ये शौलाने राज्य करायला सुरुवात केली.

पार्श्वभूमी

यहोशवाच्या मागोमाग घडलेल्या खेदजनक घटनांच्या नोंदी हे पुस्तक देते. भूमी हस्तगत करताना लोक देवाची आज्ञा पाळत असल्याचे आपण यहोशवाच्या पुस्तकात पाहातो तर ते अवज्ञा व मूर्तिपूजा करीत असलेले पराभूत लोक असे आपण शास्तेच्या पुस्तकात पाहातो. शास्ते १:१-३:६ मध्ये यहोशवाच्या पुस्तकाची सांगता व यहोशवाच्या मृत्यूचा सारांश आपण पाहातो. प्रभूपासून भटकत जाण्याची इस्राएलांची सात चक्रे या नोंदींमध्ये आढळतात. त्याची सुरुवात यहोशवाच्या मृत्युपूर्वीच झालेली दिसते. इस्राएलांच्या नैतिक व आत्मिक अध:पाताची व त्यानंतरच्या पूर्ण धर्मत्यागाची पुढील पाच कारणे स्पष्ट दिसतात.

१. कनान्यांचे त्या भूमीतून पूर्ण उच्चाटन करण्यात अपयश (१:१९,२१,३५).
२. मूर्तिपूजा (२:१२).
३. दुष्ट कनान्यांशी आंतरविवाह (३:५,६).
४. शास्त्यांचे न ऐकणे (२:१७).
५. शास्त्याच्या मरणानंतर देवापासून बहकणे (२:१९).

इस्राएलांच्या इतिहासात चार गोष्टींची पुनरावृत्ती झाल्याचे आढळते:

(अ) इस्राएलांचे देवापासून बहकणे.
(ब) लढाईत पराभवाने केलेले शासन अथवा दिलेला विजय.
(क) इस्राएलांनी सुटकेसाठी केलेली याचना.
(ड) देवाने शास्ता उभा करणे; तो लढवय्या असे किंवा नागरिकांपैकी असे. तो शत्रुंना नामोहरम करीत असे.

१४ शास्त्यांपैकी अथनीएल, एहूद, दबोरा, गिदोन, इफ्ताह व शमशोन सैनिकी होते. आत्मिक नेतृत्त्व करणाऱ्या दोन ठळक व्यक्ती म्हणजे एली: शास्ता व मुख्य याजक पण चांगला आदर्श नव्हता. व शमुवेल याजक: संदेष्टा व शास्ता कित्तादाखल होता.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

इतिहासापेक्षा खास उद्दिष्ट असलेले हे पुस्तक दिसते. इस्राएलांना त्यांच्या पतनाच्या परिणामातून देव आपल्या महान दयेने, कृपेने व कराराच्या सामर्थ्याने सोडवतो हा मुख्य विषय आहे. आपल्या दुष्ट तडजोडींमुळे त्यांना फार भोगावे लागले (२:१८,१९ ;२१:२५). यहोशवाने वंशांनुसार वाटून दिलेल्या निरनिराळ्या भौगोलिक स्थळी असताना देवाला सातत्याने आलेला कळवळा व त्याने दिलेली सुटका लक्षात येते. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम, मध्य भाग अशा संपूर्ण भूमीत धर्मत्याग झालेला दिसतो. शेवटच्या अध्यायाचा सारांश पाहाताना माणसाने केलेल्या तडजोडीच्या गहन पापांच्या काळ्याकुट्ट पडद्याच्या पार्श्वभूमीवर देवाचे विश्वासू सामर्थ्य चकाकताना दिसते (अध्याय १७-२१). सर्व नोंदींचे सार शेवटचे वचन देते: **"त्यावेळी इस्राएलांस राजा नव्हता. प्रत्येक जण आपल्या मनास येईल तसे करी."**

मननासाठी आव्हानात्मक मुद्दे

(१) माणूस बिघडून शत्रुंविरुद्ध किंवा आपल्या लोकांविरुद्ध वागतो त्याला देवाची संमती असते की नसते?
(२) देवाने उभे केलेले नेते कधी देवाच्या इच्छेप्रमाणे करतात किंवा स्वत:च्या इच्छेने पापी मार्गांचा अवलंब करतात.
(३) इफ्ताहाची शपथ/नवस आणि आपल्या कन्येचे अर्पण याकडे कसे पाहायचे? देवाची सार्वभौम इच्छा व मानवाने पाप करूनही देवाने आपल्या कार्यासाठी केलेली तरतूद यांची सांगड कशी घालायची?

शास्त्यांचा काळ व संपूर्ण निर्गमनाचा ख्रि पू १४४५ पासून ते शलमोनाचा ख्रि पू ९६७/९६६ पर्यंतचा काळ ४८० वर्षांचा होतो. काही शास्त्यांचा काळ एकात एक गुंततो हे लक्षात घ्यावे. म्हणूनच प्रे कृ १३:२० मध्ये तो सुमारे ४५० वर्षांचा काळ धरला आहे.

रूपरेषा

(I) प्रस्तावना व सारांश. १:१-३:६

(II) शास्त्यांचा निवडक, ठळक इतिहास व इस्राएलांची सुटका. ३:७-१६:२१

(१) पहिला कालावधी: (३:७-११)
(२) दुसरा कालावधी: (३:१२-३१)
(३) तिसरा कालावधी: ४:१-५:३१)
(४) चौथा कालावधी: (६:१-८:३२)
(५) पाचवा कालावधी: ८:३३-१०:५)
(६) सहावा कालावधी: (१०:६-१२:१५)
(७) सातवा कालावधी: (१३:१-१६:३१)

(III) समारोप: इस्राएलांचे समर्पण. १७:१-२१:२५

चौदा शास्ते: अथनीएल, एहूद, शमगार, दबोरा आणि बाराक, गिदोन, अबीमलेख, इस्साखार, तोला, याईर, इफ्ताह, इब्सान, एलोन, अब्दोन, शमशोन.

प्रकरण ११

रूथ

ऐतिहासिक पुस्तक

प्रस्तावना

रूथ या नावाचा अर्थ आहे ‘मैत्री.’ चार अध्यायांत तिचे नाव २० वेळा आले आहे. देवाच्या वचनात स्त्रीच्या नावाची दोन पुस्तके आहेत. जुन्या करारात रूथचा उल्लेख पुन्हा आलेला नाही. नव्या करारात वंशावळीत तिचे नाव आढळते (मत्तय १:५). रूथ बेथलेहेमात परदेशी म्हणून आली (२:१०), चाकरीण बनली (२:१३), श्रीमंत बवाजाशी विवाहबंधनांनी बांधली गेली (४:१३). ख्रिस्ताच्या वंशावळीत नाव पटकावले.

लेखक व काळ

शमुवेल या पुस्तकाचा लेखक आहे असे मानतात. कारण दाविदाचा राज्याभिषेक होईपर्यंत तो जिवंत होता (१ शमुवेल १६:६-१३; २५:१). बाकी कोठे लेखकाचा मागमूस लागत नाही. दावीद इस्राएलांवर राज्य करत असता तिची गोष्ट लोकांपुढे आली. (ख्रि पू १०११- ख्रि पू ९७१.) रूथ ४:१७,२२ मध्ये दाविदाचा उल्लेख आहे पण शलमोनाचा नाही. "छोट्या प्रमाणात देवाचे सुरेख पण परिपूर्ण कार्य" असे देवाचा एक भक्त या पुस्तकाचे वर्णन करतो. साहित्यात मोनालिसाच्या पेंटिंगप्रमाणे रूथचे पुस्तक उठून दिसते.

पार्श्वभूमी

बेथलेहेमात हे कथानक घडले. सततचा शत्रू मवाब त्याच्या पूर्वेला मृत समुद्रापाशी होता. लोटास त्याच्या मुलीपासून अनैतिक संबंधातून झालेला नातू मवाब याचे ते नगर होते (उत्पत्ती १९:३७). पुढे काही शतकांनंतर मवाबाचा राजा बालाक याने बलाम संदेष्ट्याद्वारे यहुद्यांना विरोध केला होता (गणना २२-२५ अध्याय).

शास्तेच्या काळात मवाबाने १८ वर्षे इस्राएलांना छळले (शास्ते ३:१२-३०). शौलाने मवाब्यांचा मोड केला (१ शमुवेल १४:४७). दावीद त्यांच्याशी शांती राखून होता (१ शमुवेल २२:३,४). पुढे पुन्हा मवाब्यांनी इस्राएलांना त्रास दिला (२ राजे ३:५-२७, एज्रा ९:१). ते कमोशाची मूर्तिपूजा करीत होते (१ राजे ११:७,३३;२ राजे २३:१३). मवाब्यांनी इस्राएलांना त्रास दिला म्हणून देवाने त्यांना शाप दिला (यशया अध्याय १५,१६; यिर्मया ४८, यहेज्केल २५:८-११; आमोस २:१-३).

शास्त्यांच्या काळात रूथचे कथानक घडले (ख्रि पू १३७०- ख्रि पू १०४१, शास्ते २:१६-१९). यहूदातील दुष्काळाचा वापर करून देवाने हे कथानक रंगमंचावर आणले. शास्तेच्या पुस्तकात या दुष्काळाचा उल्लेख नसल्याने रूथचा कालावधी अचूक सांगणे जड जाते. पण दाविदापासून मागे बवाजापर्यंत काळ मोजत गेल्यास रूथचे कथानक शास्तेमधील याईरच्या काळात येते. (ख्रि पू ११२६-११०५; शास्ते१०:३-५.)

रूथच्या जीवनातील बारा वर्षांचा काळ या पुस्तकात रेखाटला आहे. मवाबात १० वर्षे (१:१-१०); एप्रिल ते जून दोन महिने बवाजाच्या शेतात (१:१९-२:२३); एक दिवस बेथलेहेमात व एक रात्र मळणीच्या जागी (३:१-१८); सुमारे एक वर्ष बेथलेहेमात (४:१-२२).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचा दृष्टिकोन

ही सर्व ८५ वचने यहूद्यांनी देवाची वचने म्हणून मान्य केली आहेत. गीतरत्न, एस्तेर, उपदेशक, विलापगीत व रूथ या पुस्तकांना "पाच गुंडाळ्या" म्हणतात. वर्षातील विशेष प्रसंगी रब्बी ही खास पुस्तके वापरत. रूथचे पुस्तक पेंटेकॉस्टच्या सणात, हंगामाच्या सोहळ्यात वाचले जाई. हे पुस्तक ९०० वर्षे मागे याकोबापर्यंत तर १०० वर्षे पुढे दाविदापर्यंत नेते (४:११,१७-२२). यहोशवा व शास्ते वचनदत्त देश प्राप्त झाल्यावरची इस्राएलांची वाटचाल सांगतात; तर रूथचे पुस्तक दाविदाच्या वंशावळीवर लक्ष केंद्रित करते.

सात सैध्दांतिक बाबी रूथच्या पुस्तकातून व्यक्त होतात:

१. देवाची मुक्तीची योजना यहूद्यांच्या पलीकडे विदेश्यांपर्यंत पोचली गेली (२:१२).
२. देव कृपेने देऊ करत असलेल्या तारणाचे पुरुषांसह स्त्रियांनाही वारसत्व आहे (१ पेत्र ३:७).
३. रूथ ही नीतिसूत्रे ३१:१० व ३:११ मधील सद्गुणी स्त्रीचे चित्र रेखाटते.
४. देव आपल्या सार्वभौमत्वाने काळजी घेऊन करीत असलेल्या पुरवठ्याचे वर्णन रूथ करते (२:३, १:६; ४:१३). हा अगदी क्षुल्लक वाटणारा काळ होता. पण कालांतराने दिसते की देवाची इच्छा पूर्णत्वाला नेणारा हा अत्यंत महान व महत्त्वाचा काळ होता.
५. तामार (उत्पत्ती ३८); रहाब (यहोशवा २); बथशेबा (२ शमुवेल११,१२) यांच्या रांगेत रूथ येशूच्या वंशावळीत विशेष उठून दिसते.
६. बवाज हा ख्रिस्ताचा दर्शक आहे. तो रूथचा सोडवणारा आहे; तसा ख्रिस्त आपला उद्धारक आहे (४:१-१२).
७. यहूदामध्ये दाविदाचे म्हणजे पर्यायाने ख्रिस्ताचे सिंहासन प्रस्थापित होण्याची प्रक्रिया दिसते (४:१८-२२; उत्पत्ती ४९:८-१२).

मननासाठी विशेष काही

रूथचा वृत्तांत ऐतिहासिक दृष्ट्या सत्य आहे; याविषयी शास्ते व शमुवेलाच्या पुस्तकातून खात्री पटते.

(१) अनुवाद २३:३ नुसार मवाब्यांच्या दहा पिढ्यांना निवासमंडपात भक्तिला येण्याची बंदी होती. ख्रि पू १४०५ मध्ये यहूद्यांनी भूमी हस्तगत केली होती. रूथ तर ख्रि पू ११५० पर्यंत जन्मली नव्हती. त्यामुळे ती निदान ११व्या पिढीतील किंवा त्यानंतरच्या पिढीतीलही असेल. तोवर दहा पिढ्यांचा काळ संपून जातो. शिवाय यशया ५६:१-८ नुसार देवाला संतोषवणाऱ्या विदेशी व्यक्तीचाही देव स्वीकार करतो, या तत्त्वानुसार तिला देवाच्या मंदिरात जाण्याबाबत कोणी हरकत घेऊ शकत नव्हते. त्यामुळे रूथ निवासमंडपात भक्तिला जाऊ शकली असेल.

(२) बवाज व रूथ यांनी रात्री माळरानावर एकत्र वेळ घालवला हे नैतिकतेच्या चौकटीत बसत नाही असा कोणी आक्षेप घेईल (३:३-१८). पौर्वात्य रिवाजाप्रमाणे बवाजास पांघरुणाखाली घेण्याची रूथची विनंती ही त्याने पत्नी म्हणून तिचा स्वीकार करण्याची इच्छा व्यक्त करण्याचे चिन्ह होते (३:९). असेच यहोवाने इस्राएल राष्ट्राला आपल्या पदराखाली अच्छादले होते (यहेज्केल१६:८) असा उल्लेख आहे.

रूथ बवाजाच्या पायाशी निजल्याच्या वृत्तांतात अनैतिक वर्तनाचा थोडाही मागमूस आढळत नाही (३:१४). बवाज तिच्यासाठी २:१२ प्रमाणे उत्तर झाला.

(३) अनुवाद २५:५-६ नुसार जवळच्या आप्ताशी लग्न केल्याने बहुपत्नित्वाला दुजोरा नाही का मिळत? ज्या अनैतिकतेविषयी दगडमाराची शिक्षा आहे अशाचा वापर देव त्याच्या उत्तम योजनेत करणार नाही. अनुवाद २५:५-६ नुसार तो जवळचा आप्त विवाहित असणे गरजेचे होते.

(४) मवाब्यांशी विवाह करायला मनाई होती ना? मग बवाजाने तिच्याशी लग्न कसे केले? इस्राएलांची भूमी मवाब्यांनी बळकावली असेल तर त्यांच्याशी विवाह करण्याची मनाई होती (निर्गम ३४:१६; अनुवाद ७:१-३; यहोशवा २३:१२). पण त्यात मवाब्यांचा समावेश नव्हता. रूथ तर यहोवा देवाची भक्त होती (रुथ १:१६,१७). ती कमोश दैवताची उपासक नव्हती. ते मवाब्यांचे प्रमुख दैवत होते (एज्रा ९:१,२; नहेम्या १३:२३-२५).

रूपरेषा

(I) अलीमलेख व नामीची दुरावस्था. १:१-५

(II) रूथ व नामीचे बेथलेहेमात परतणे. १:६-२२

(III) बवाज रूथचा आपल्या शेतात स्वीकार करतो. २:१-१३

(IV) रूथची बवाजाला विनंती. ३:१-१८

(V) बवाज रूथला सोडवतो. ४:१-१२

(VI) बवाज रूथला पुत्ररत्न देतो. ४:१३-१

(VII) दाविदाचे यहूदात राजासन प्रस्थापित. ४:१८-२२

प्रकरण १२

पहिले व दुसरे शमुवेल

ऐतिहासिक पुस्तके

शीर्षक

हिब्रू जुन्या करारात पहिले व दुसरे शमुवेल एकच पुस्तक आहे. पुढे भाषांतरकारांनी त्याचे दोन भाग केले. इस्राएलात ज्याच्याद्वारे राज्यव्यवस्था प्रस्थापित झाली त्याचे नाव या पुस्तकाला देण्यात आले आहे.

लेखक व काळ

शमुवेल किंवा गाद व नाथान या पुस्तकाचे लेखक समजले जातात. पण १ शमुवेल २५:१ नुसार दाविदाच्या जीवनातील कित्येक घटना घडण्यापूर्वीच शमुवेल मरण पावला. गाद व नाथान दाविदाच्या काळात संदेष्टे होते. पण या पुस्तकाचे लिखाण होण्यापूर्वीच्या ते मृत्यू पावले होते. मात्र या तिघांच्या लिखाणाचे संकलन करून हे पुस्तक ज्या कोणी प्रस्तुत केले त्याचे नाव अज्ञात आहे. पण देवाचे ईश्वरप्रेरित बोल या लेखकाने सादर केले.
लिखाणाचा काळही नक्की सांगता येत नाही. पण उत्तर राष्ट्र इस्राएल व दक्षिण राष्ट्र यहूदा अशी एकसंघ राज्याची शकले पडल्यानंतर ख्रि पू ९३१ मध्ये लिहिण्यात आले हे नक्की. १ शमुवेल ११:८; १७:५२; १८:१६; २ शमुवेल ५:५; ११:११; १२:८; १९:४२,४३; २४:१,९ ही वचने त्याचे पुरावे देतात. २ राजे मध्ये बाबेलच्या बंदीवासाचे वर्णन आहे. त्यामुळे ख्रि पू ५६० ते ख्रि पू ५४० मध्ये ते लिहिले असावे असे मानतात.

पार्श्वभूमी

यातील घटना इस्राएलच्या मध्य प्रांतात घडलेल्या दिसतात. महत्वाची शहरे उंचावर वसली होती. एलीचे घर शिलोमध्ये, तेथेच निवासमंडप होता. शमुवेलाचे घर रामामध्ये, शौलाची छावणी गिब्बा नगरात, दाविदाचे जन्मस्थान बेथलेहेम, दाविदाची राजधानी हेब्रोन होती. तेथून त्याने राज्यकारभार चालवला. यरुशलेम हे दाविदाचे नगर होते. ख्रि पू ११०५ मधील शमुवेलाच्या जन्मापासून ख्रि पू ९७१ पर्यंतच्या घटना १ व २ शमुवेलात असून २ शमुवेल २३:१-७ मध्ये दाविदाचे अखेरचा बोल आढळतात. अशा प्रकारे सुमारे १३५ वर्षांचा काळ ही दोन पुस्तके वर्णन करतात. शास्तेच्या काळात स्वतंत्र गटा-गटांनी राहाणारे लोक राजेशाही तंत्रानुसार एकसंघ राष्ट्र म्हणून साकार झाले. शमुवेल संदेष्टा ख्रि पू ११०५ ते ख्रि पू १०३०; शौलाची राजवट ख्रि पू १०५२ ते ख्रि पू १०११ ; व दाविदाची राजवट ख्रि पू १०११ ते ख्रि पू ९७१ असा अंमल दिसतो.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

१ शमुवेलाच्या आरंभीच्या काळात इस्राएलची आध्यात्मिक स्थिती फारच खालावलेली होती. याजकांच्या कामात भ्रष्टाचार होता (१ शमुवेल अध्याय २), देवाचा कोश निवासमंडपात नव्हता (१ शमुवेल अध्याय ४ ते ७), मूर्तिपूजा चालू होती, शास्ते अप्रामाणिक होते. पण शमुवेल देवभीरू होता. त्याचा प्रभाव होता. दावीद पण देवभीरू व प्रभावी होता. त्यामुळे ही परिस्थिती पालटली. २ शमुवेलचा शेवट दर्शवतो की देवाचा इस्राएलांवरचा कोप दूर झाला होता (२ शमु २४:२५).

या दोन पुस्तकांच्या काळात जगातील प्राचीन साम्राज्ये खिळखिळी झाली होती. मिसर, अश्शूर, मेसोपोटेमिया, बाबिलोन या कोणालाच इस्राएल भीत नव्हते. पश्चिमेकडील पलिष्टी व पूर्वेकडील अम्मोनी ही दोन राज्ये वैर धरून शत्रुत्व करणारी होती. ख्रि पू १२ व्या शतकात बरेच पलिष्टी आशिया मायनरमधून तेथे स्थलांतरित झाले होते. मिसरात त्यांना प्रवेश नाकारला होता. पॅलेस्ताइनच्या भूमध्य समुद्राच्या किनाऱ्याला पूर्वीपासून जे पलिष्टी राहात होते त्यांच्यामध्ये हे स्थलांतरित पलिष्टी स्थायिक झाले होते. लोखंडाच्या कलाकुसरीत पलिष्टी लोक तरबेज होते. त्या वापराने इस्राएलांच्या लष्करावर मात करण्याचा त्यांचा मनसुबा होता (१ शमुवेल १३:१९-२२). अम्मोनी यार्देनेच्या खोऱ्यात व पठारावर राहात होते. पलिष्टी व अम्मोनी दोहोंचाही दाविदाने पाडाव केला व इतरही राष्ट्रे जिंकली.

सैद्धांतिक विषय

(१) दाविदाशी करार : हन्नाच्या प्रार्थनेत (१ शमु २:१०) व दाविदाच्या गीतात (२ शमु २२:५१) "अभिषिक्त" राजाविषयी म्हणजेच मशीहाविषयी संदर्भ आहेत. देवाच्या विरोधकांवर विजयी होणाा़ हा राजा (उत्पत्ती ४९:८-१२; गणना २४:७-९, १७-१९). अभिवचनानुसार हा राजा दाविदाच्या घराण्यात येईल व दाविदाचे साम्राज्य सर्वकाळ स्थापील (२ शमु ७:१२-१६).

(२) **देव सार्वभौम आहे:** या पुस्तकात हे दाखवले आहे. शमुवेलाचा जन्म (१ शमु १:१२-१७) दाविदाने इस्राएलांवर राज्य करावे या देवाच्या योजनेला कोणतीच बाब अडथळे आणू शकत नाही (१ शमु २४:२०).

(३) **दैवी योजनेने सोपवलेले काम करण्यास पवित्र आत्मा त्याच्या सामर्थ्याने भरतो.** ही बाब या पुस्तकात प्रकर्षाने आढळते. अभिषेकानंतर शौल व दावीद दोघांवर पवित्र आत्मा आला. देवाच्या आत्म्याने संदेश दिले (१शमु १०:६), युद्धात जय दिला (१ शमु ११:६). वैयक्तिक व सामूहिक पापाचे परिणाम या पुस्तकात आपण पाहतो. एलीच्या पुत्रांचा भ्रष्टाचारामुळे मृत्यू, कोशाचा अनादर केल्याने झालेले मृत्यू, शौलाने अवज्ञा केल्याने झालेला न्याय व राजपदावरून त्याला झुगारण्यात आले. दाविदाने केलेले व्यभिचाराचे, हत्येचे व लबाडीचा पाप. पश्चात्ताप केल्यामुळे क्षमा झाली तरी पापाचे अटळ परिणाम भोगावे लागले (२ शमु १२:१३,१४).

विशेष मुद्दे

(१) मानवी राजा स्थापण्याबाबत १ शमु ९ व ११ मध्ये सकारात्मक तर ८ व १२ मध्ये नकारात्मक दृष्टिकोन असा विरोधाभास आढळतो असा पेच पडतो. पण हे पुस्तक मानवी राजपदाविषयी समतोल दृष्टिकोन देणे पसंत करते. अनुवाद १७:१५ नुसार देव हे आधीच जाणून आहे म्हणून इस्राएलांची मागणी स्वीकारत आहे. मात्र राजा मागून इस्राएलांनी देवाच्या सामर्थ्यावर अविश्वास व्यक्त केला आहे (१ शमु ८:५-१०).

(२) संदेष्ट्यांच्या विचित्र वागण्याचे कसे स्पष्टीकरण करावे? आनंदाने बेहोष झालेले संदेष्टे विदेशी मूर्तिपूजक राष्ट्रांप्रमाणे विचित्र वागतात. पण त्या लिखाणात दैवी सुसंवादाशी त्यांची विसंगती दर्शवलेली नाही. काही वेळा संगीताची जोड देऊन ते भक्ती करतात.

(३) पेंटेकॉस्टपूर्वी पवित्र आत्मा कशी सेवा करतो? नव्या कराराप्रमाणे पवित्र आत्म्याच्या तारणाच्या सेवेचे तेथे वर्णन केलेले नाही. कारण अजून तारणाची योजना पूर्ण व्हायची आहे.

(४) देवापासून क्लेश देणारा आत्मा येतो. तो कोणी व्यक्ती नसून अशुद्ध आत्मा आहे.

(५) १ शमुवेल २८:३-५ मध्ये शमुवेल मृतांतून उठून कसा प्रकट झाला? शमुवेलाला पाठवून शौलाशी बोलण्याची परवानगी सार्वभौम देवानेच दिली असा निष्कर्ष निघतो. ती बाईही त्याला पाहून किंचाळते. तिलाही हे अनपेक्षित होते. आता या देवापुढे आपली धडगत नाही असे भय तिला वाटते. शौलाची आत्मिक पातळी किती खालावली होती याचे हे दारुण चित्र आहे.

(६) शलमोनाला दाविदाचे बीज म्हटले जाते (२ शमु ७:१२-१५; इब्री १:५) पण नव्या करारात येशूला देवाचा पुत्र म्हटले जाते.

१ शमुवेलची रूपरेषा

(I) शमुवेल संदेष्टा. १:१-४:१; शमुवेल शास्ता. ४:१-७:१७

(II) इस्राएलांचा राजा शौल. ८:१-१५:३५

(III) दावीद व शौल राजपदावरील बदल

दाविदाची ओळख १६:१-१७:५८;

शौलाच्या दरबारातून दाविदाची हकालपट्टी. १८:१-२०:४२

शौलाच्या पाठलागापासून दाविदाचे पलायन २१:१-२८:२

(IV) शौलाचा मृत्यू. २८:३-३१:१३

२ शमुवेल ची रूपरेषा

(I) दाविदाचे इस्राएलांवर राज्य

यहूद्यांवर राजपद. १:१-३:५

दाविदाचे इस्राएल राष्ट्रावर राजपद. ३:६-५:१६

दाविदाचे विजयी राज्य. ५:१७-८:१८

दाविदाचे त्रस्त राज्य. ९:१-२०:२६

(II) समारोप. २१:१-२४:२५

प्रकरण १३

१ ले व २ रे राजे

ऐतिहासिक पुस्तके

शीर्षक

हिब्रू जुन्या करारात दोन्ही पुस्तके एकत्र आहेत सोयीच्या दृष्टीने दोन भाग करण्यात आले. यात यहूदा व इस्राएलांच्या राजेशाहीचा इतिहास आहे.

लेखक व काळ

जो संदेष्टा बाबेलच्या बंदीवासात इस्राएलांसोबत राहिला त्याने हे पुस्तक लिहिले; पण त्याचे नाव कोणाला माहीत नाही. २ राजे २५:२७-३० मध्ये बाबेलचा अस्त दिलेला नाही, त्यावरून ख्रि पू ५६१ ते ख्रि पू ५६८ हा काळ निश्चित केला जातो

पार्श्वभूमी

प्रत्यक्ष घटना पाहून त्यात सहभागी असणाऱ्यांनी ही माहिती अचूक लिहून ठेवली होती ती यात संकलित केली आहे. ख्रि पू ९७१त दाविदाचा मृत्यू होऊन शलमोन राजा झाल्याच्या घटनेपासून ख्रि पू ५८६ मध्ये बाबेलकडून यरुशलेमचा नाश होईपर्यंतच्या घटना यात आहेत. त्या घडून गेल्यावरही हे पुस्तक लिहिले गेले. इस्राएलचे उत्तर राज्य व यहूदाचे दक्षिण राज्य अशी दोन शकले पडलेल्या दोन राज्यांचा स्पष्टीकरणासह यात इतिहास आहे. दोन्ही राज्यांनी संदेष्टे व देवाचे वचन जुमानले नाही म्हणून ते बंदीवासात गेले. बंदीवासात असलेल्यांना या इतिहासातील घ्यायचे धडे लेखक समजावून देत आहे.

१ राजे ९:३-९ मध्ये हे तो आरंभीच स्पष्ट करतो की देवाचे नियम पाळणे हे समर्पण आहे पण अवज्ञा केली तर बंदीवास अटळ आहे. खेदाची गोष्ट म्हणजे इस्राएलांच्या राजांनी व यहूद्यांच्या राजांनी देवाच्या दृष्टीने जे वाईट ते केले. मूर्तिपूजेला मना न करता त्यांनी मोकळीक दिली. त्यांच्या या चुकांबद्दल त्यांची व लोकांची कानउघाडणी करून त्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी देवाने संदेष्टे पाठवले. त्याचे निरोपही त्यांनी धिक्कारले. त्यामुळे दोन्ही राज्ये बंदीवासात जातील अशी संदेष्ट्यांनी भाकिते केली (राजे १७:१३-२३; २१:१०-१५) व ती खरी ठरली (२ राजे १७:५,६; २५:१-११). मूर्तिपूजेमुळे देवाकडून त्यांना शिक्षा झाल्याचे राजेंची पुस्तके समजावून देतात. तसेच अहाबाला (१राजे २२:२७-२९) व यहोयाकीनाला (२ राजे २५:२७-३०) देवाने जशी दया दाखवली तशीच त्यांना दाखवील हे स्पष्ट करतात. ख्रि पू ७२२ मध्ये उत्तर राष्ट्र इस्राएल अश्शूरच्या बंदीवासात गेले. तर बाबेलने ख्रि पू ६०५; ख्रि पू ५९७ व ख्रि पू ५८६ असे तीन वेळा दक्षिण राज्य यहूदावर हल्ले करून त्यांना बंदीवासात नेले व यरुशलेम आणि शलमोनाचे मंदिर उध्वस्त केले (२ राजे २४,२५ अध्याय).

दोन्ही राज्यांच्या प्रत्येक राजाचा तपशील ही पुस्तके देतात.

(१) राजाचे नाव, त्याचे पूर्वजांशी नाते.

(२) तो राजा दुसऱ्या राज्याच्या कोणत्या राजाशी समकालीन होता.

(३) यहूदाचा राजा राजपदावर आला तेव्हाचे त्याचे वय.

(४) त्याने किती काळ राज्य केले.
(५) त्याने कोणत्या स्थानावरून राज्य केले.
(६) यहूदाच्या राजाच्या आईचे नाव.
(७) त्याच्या कारकीर्दीत आत्मिक स्थिती.
(८) त्या राज्यांत घडलेल्या घटनांचा तपशील:- (i) त्यांचा कशाबद्दल सन्मान करावा (ii) ऐतिहासिक बखरींच्या नोंदी (iii) मृत्युची नोंद (iv) त्याच्यानंतर कोण राजा झाला (v) काही विशेष नोंद घेण्याचे असेल तर (vi) कोठे पुरले.
यहूदाचे राज्य ख्रि पू ७२२ ते ख्रि पू ५८६ पर्यंत तग धरून राहिले व बाबेलच्या बंदीवासात गेले.

ईश्वरविज्ञान विषयक काही मुद्दे

(१) देवाचे नियम मोडल्याबद्दल देवाने यहूदा व इस्राएल राज्यांचा न्याय केला. त्यांच्या देवाशी अविश्वासू राहिल्यामुळे त्यांच्या अधम राजांनी त्यांना मूर्तिपूजेत लोटले. म्हणून देवाने बंडखोर लोकांवर न्यायाची ओतणी केली.
(२) खऱ्या संदेष्ट्यांची भाकिते खरी ठरली. यावरून देव वचन पावणारा आहे यावर शिक्कामोर्तब झाले. सांगितल्याप्रमाणेच तो न्याय करतो.
(३) दाविदाला दिलेले वचन देवाने स्मरणात ठेवले. जरी दाविदानंतरचे राजे अधम व अवज्ञा करणारे निघाले तरी देवाने दाविदाच्या घराण्याचा अंत केला नाही. पुस्तक लिहून संपते तेव्हाही यहूदाचा वंश अस्तित्वात असतो. त्यामुळे दाविदाचा अंकुर येणार ही आशा बळावते (२ शमु ७:१२-१६). देव व त्याचे वचन विश्वसनीय आहे.

१ ले व २ रे राजे ची रूपरेषा

(I) एकसंघ राज्य. १:१-११:४३ राजे: शौल, दावीद, शलमोन.
(II) दुफळी पडलेले राज्य. उत्तर राज्य इस्राएल व दक्षिण राज्य यहूदाचे राजे (१ राजे १२:१- २ राजे १७:४१). इस्राएलचे २० राजे, यहूदाचे २१ राजे.
(III) तग धरून असलेले यहूदाचे राज्य.२ राजे १८:१-२५:२१
(IV) समारोप: लोकांची बंडखोरी व देवाची सततची दया. २ राजे २५:२२-३०

उत्तर राज्य- इस्राएलचे राजे **दक्षिण राज्य- यहूदाचे राजे**

	राजा	**संदर्भ**	**राजा**	**संदर्भ**
१	यराबाम १ला	१ राजे १२:२५-१४:२०	रहाबाम	१राजे१२:११४:३१;४; २ इतिहास१०:१-१२:१६
२	नादाब	१ राजे १५:२५-३१	अबीजाम/अबीजा	१ राजे१५:१-८; २ इतिहास १३:१-२२
३	बाशा	१ राजे १५:३२-१६:७	आसा	१ राजे १५:९-२४; २ इतिहास१४:१-१६:१४
४	एला	१ राजे १६:८-१४	यहोशाफाट	१राजे २२:४१-५०; २ इतिहास१७:१-२०:३७

५	जिम्री	१ राजे १६:१५-२०	यहोराम/ योराम	२ राजे ८:१६-२४; २ इतिहास २१:१-२०
६	तिब्नी	१ राजे १६:२१-२२	अजऱ्या	२ राजे ८:२५-२९; २ इतिहास२२:१-९
७	अम्री	१ राजे १६:२१-२८	अहज्या	२ राजे ८:२५-२९; २ इतिहास २२:१-९
८	आहाब	१ राजे १६:२९-२२:४०	अथल्या(राणी)	२ राजे११:१-१६; २ इतिहास २२:१-२३:२१
९	अजऱ्या	१राजे २२:५१-५३;२राजे १:१-१८	योवाश/यहोआश	२राजे११:१७-१२:२१;२इतिहास २३:१६-२४:२७
१०	यहोराम/योराम	२ राजे २:१-८:१५	अमज्या	२ राजे १४:१-२२; २ इतिहास २५:१-२८
११	येहू	२ राजे ९:१-१०:३६	उज्जीया/अजऱ्या	२ राजे १५:१-७; २ इतिहास २६:१-२३
१२	यहोआहाज	२ राजे १३:१-९	योथाम	२ राजे १५:३२-३८; २ इतिहास २७:१-९
१३	योवाश/यहोआश	२ राजे १३:१०-२५	आहाज	२ राजे१६:१-२०; २ इतिहास२८:१-२७
१४	यराबाम२ रा	२ राजे १४:२३-२९	हिज्कीया	२ राजे१८:१-२०; २ इतिहास२९:१-३२:३३
१५	जखऱ्या	२ राजे १५:८-१२	मनश्शे	२ राजे २१:१-१८; २ इतिहास३३:१-२०
१६	शल्लूम	२ राजे १५:१३-१५	आमोन	२ राजे २१:१९-२६; २ इतिहास ३३:२१-२५
१७	मनहीम	२ राजे १५:१६-२२	योशीया	२राजे २२:१-२३:३०; २इतिहास ३४:१-३५:२७
१८	पकह्या	२ राजे१५:२३-२६	यहोआहाज	२ राजे २३:३१-३३; २ इतिहास ३६:१-४
१९	पेकह	२ राजे १५:२७-३१	यहोयाकीम	२ राजे २३-३४-२४:७;२ इतिहास ३६: ५-८
२०	होशेआ	२ राजे १७:१-४१	यहोयाखीन	२ राजे २४:८-१६; २ इतिहास ३६:९,१०

२१			सिद्कीया	२ राजे २४:१८-२५;२ इतिहास ३६:११-२१

प्रकरण १४

१ ला व २ रा इतिहास

ऐतिहासिक पुस्तके

लेखक व काळ

हिब्रू भाषेत ही दोन पुस्तके सलग आहेत पण ग्रीकमध्ये भाषांतर करताना त्यांचे दोन भाग सोयीसाठी पाडले. यहूदी परंपरा मानते की या पुस्तकाचा लेखक एज्रा याजक आहे. १ इतिहास १-९ अध्यायांचा पुरावा देऊन ख्रि पू ४५०- ख्रि पू ४३० या काळात हे पुस्तक लिहिल्याचे प्रमाण मानले जाते.

पार्श्वभूमी

(१) नुकतेच एज्रा १-६ नुसार जरुब्बाबेल सोबत ख्रि पू ५३८ मध्ये
(२) एज्रा ७-१० नुसार एज्रा सोबत ख्रि पू ४५८ मध्ये व
(३) नहेम्या १-१३ नुसार नहेम्या सोबत बाबेलच्या बंदीवासातून तीन गटात इस्राएल लोक वचनदत्त देशात परतले होते. त्यापूर्वीच्या ख्रि पू ६०५ ते ख्रि पू ५३८च्या इतिहासाचे वर्णन २ राजे, एस्तेर, यिर्मया, यहेज्केल, दानीएल व हबक्कूक मध्ये सापडते. या पुनरुद्धाराच्या काळातील संदेष्टे हाग्गय, जखऱ्या व मलाखी आहेत. ख्रि पू ५३८ मध्ये बंदीवासात गेल्यानंतर ७० वर्षांनी ते दाविदाने ख्रि पू १०११- ख्रि पू ९७१ व शलमोनाने ख्रि पू ९७१- ख्रि पू ९३१ ज्या भूमीवर राज्य केले तेथे परतले होते. पण त्या भूमीचे रूप पार पालटून गेले होते.

(अ) आता इब्री राजा नव्हता तर पारसाचा सुभेदार होता. (ब) यरुशलेमला सुरक्षितता नव्हती म्हणून नहेम्याला पुन्हा तटबंदी बांधावी लागली. (क) पूर्वीचे मंदिर नव्हते म्हणून जरुब्बाबेलास पुन्हा मंदिर बांधावे लागले पण त्याला पूर्वीचे शलमोनाच्या मंदिराचे वैभव नव्हते. (ड) त्या प्रांतात यहूद्यांचा पूर्वीप्रमाणेच दबदबा नव्हता त्यामुळे ते आक्रमक नव्हे तर बचावात्मक जीवन कंठत होते. (इ) परतल्यानंतर ते देवाचे थोडेफार आशीर्वाद उपभोगत होते. (फ) पूर्वीच्या राज्यातील अल्पशी संपत्ती त्यांच्याकडे होती. (ह) देवाचे दैवी सान्निध्य पूर्वीप्रमाणे यरुशलेमात आता वसत नव्हते. यहेज्केल ८-११ अध्यायांमध्ये वर्णिल्याप्रमाणे ते त्यांच्यामधून निघून गेले होते.

सौम्य शब्दात सांगायचे तर विशेषत: दावीद व शलमोनाच्या गतकाळातील वैभवापुढे त्यांचे भविष्य धूसर वाटत होते. त्यांचे परतणे कडू-गोड मिश्रित होते. कडू असल्याचे कारण सध्याचे दारिद्र्य त्यांच्या पूर्वजांच्या पापामुळे देवाने केलेल्या न्यायाचे दु:खद स्मरण करून देत होते. गोड यासाठी की निदान १७ शतकांपूर्वी देवाने अब्राहामाला दिलेल्या भूमीवर ते परतले होते. १ इतिहास १:१ मध्ये आदामापासूनची वंशावळ सुरू करून बाबेलातून परतेपर्यंतच्या (२ इतिहास २६:२३) नोंदी दिल्या आहेत. त्यातून देवाची अभिवचने व त्याचे उद्देश निदर्शनास आणून देणे ही देवाची इच्छा आहे:- (१) भूमी (२) राष्ट्र (३) दावीदवंशाचा राजा (४) लेवीय प्रमाणे याजक (५) मंदिर (६) खरी उपासना . या सर्व गोष्टी विपत्ती काळाशी मुकाबला करताना त्यांना त्यांच्या आध्यात्मिक वारसांचे स्मरण करून देण्यासाठी होत्या, तसेच देवाशी विश्वासू राहण्यास उत्तेजन देण्यासाठी होत्या.

ऐतिहासिक व सिद्धांतिक मुद्दे

दाविदाशी केलेला करार व मंदिरातील उपासना यावर विशेष जोर देऊन ही दोन पुस्तके जुन्या कराराचा इतिहास थोडक्यात सादर करतात.१ ला इतिहास आदामाने सुरुवात करून ख्रि पू ९७१ मधील दाविदाच्या मृत्युने समारोप करतो (२९:२६-३०). २ रा इतिहास शलमोनापासून सुरुवात करून उत्तर इस्राएल राज्य वगळून फक्त दक्षिण राज्यातील यहूदाच्या राजांचा १ले व २ रे राजे मधील कालखंडाचा म्हणजे शलमोनाची राजवट ते ख्रि पू ६३८ मध्ये बंदीवासातून परत येईपर्यंतचा वृत्तांत देतो (३६;२३). कारण उत्तर राज्य पूर्णपणे अधर्मी व खोटी उपासना करणारे होते. ५५ टक्क्यांपेक्षा अधिक माहिती नवीन असून ती शमुवेल व राजेंच्या पुस्तकात सापडत नाही. राष्ट्राने गतकाळातील केलेल्या आत्मिक व नैतिक चुकांमुळे आलेल्या देवाच्या क्रोधाची चांगलीच किंमत मोजली. आता बंदीवासातून परतलेल्या यहुद्यांपुढे देवाचे भावी आशीर्वाद ठेवणे हा या पुस्तकात देवाचा हेतू आहे.

दोन्ही पुस्तकांचा सारांश

(I) वंशावळीनुसार इस्राएलांचा निवडक इतिहास: १ इतिहास १-९ अध्याय.
(II) एकसंघ इस्राएलांची राजवट: शौल (१ इतिहास अध्याय १०); दावीद (१ इतिहास अध्याय ११-२९); शलमोन (२ इतिहास १-९).
(III) दुभंगलेल्या यहूदाच्या दक्षिण राज्यातील दावीद वंशाचे राज्य (२ इतिहास १० ते ३६:२१).
(IV) यहूदाची ७० वर्षांच्या बंदीवासातून सुटका (२ इतिहास ३६:२२,२३).

सलग हाच इतिहास पुढे चालू राहून मानवी इतिहासाच्या मंचावर देवाची इस्राएलांसाठी असलेली योजना व हेतू सादर होताना दिसून येईल. ही पुस्तके या परतलेल्यांना हमी देतात की गतकाळात अडथळे आले व आता देखील हलाखीची अवस्था असली तरी देव त्याच्या कराराच्या अभिवचनांशी विश्वासू राहील. अनुवाद २८:१५-६८ नुसार जरी ते आजही देवाच्या न्यायाखाली असले तरी यहूदा वंश हीच ओळख राखून देवाने त्यांना प्रथम अब्राहामाला दिलेल्या भूमीत परत आणले व हद्दपारी होऊनही त्यांचे इस्राएल राष्ट्र म्हणून असलेली त्यांची ओळख जराही पुसून जाऊ दिली नाही. एक दिवस देवाचे सान्निध्य पुन्हा उतरून येईल या आशेमुळे एलाजाराचा पुत्र फिनहास याच्या वंशाचे याजकपद व लेवी वंशाची याजकीय कामे मंदिरातील उपासनेसाठी पुढे चालू राहण्यासाठी अबाधित राहातील (गणना २५:१०-१३; मलाखी ३:१). दाविदाला दिलेले राजपदाचे अभिवचन भावी काळी अंमलात येईल (२ शमुवेल ७:८-१७; १ इतिहास १७:७-१५). सार्वकालिक जीवनाची वैयक्तिक आशा आणि देवाचा पुनरुद्धाराचा आशीर्वाद नव्या करारात सर्वकाळासाठी आहे (यिर्मया ३१:३१-३४).
ही दोन पुस्तके जी महत्त्वाची दोन तत्त्वे ठळपणे मांडतात ती संपूर्ण जुन्या करारात आढळतात ती अशी:

आज्ञापालनामुळे आशीर्वाद प्राप्त होतात, अवज्ञा न्याय आणते.
राजांनी आज्ञा पाळली व देवावर विश्वास ठेवला तर देवाने त्यांना आशीर्वाद देऊन त्यांचे संरक्षण केले. पण राजाने अवज्ञा केली, देवाला सोडून दुसऱ्या कशावर किंवा दुसऱ्या कोणावर विश्वास ठेवला तर देवाने त्याचे आशीर्वाद व संरक्षण काढून घेतले. यहूद्यांच्या राजांकडून तीन प्रमुख चुका झाल्यामुळे देवाचा क्रोध ओढवला.
(१) वैयक्तिक पाप (२) खोटी उपासना/ मूर्तिपूजा आणि (३) देवाऐवजी मानवावर भरवसा ठेवला.

१ ला इतिहासची रूपरेषा

(I) निवडक वंशावळ. १:१-९:३४

(II) दाविदाचा चढता आलेख. ९:३५-१२:४०

(III) दाविदाची राजवट. १३:१-२९:२०

२ रा इतिहासची रूपरेषा

(I) शलमोनाची राजवट. १:१-९:३१

(II) यहूदातील राजांची राजवट. १०:१-३६:२१

(III) बंदीवानांस परत पाठवण्याचा कोरेशाचा जाहीरनामा. ३६:२२,२३.

प्रकरण १५ **एज्रा**

ऐतिहासिक पुस्तक

लेखक व काळ

एज्रा व नहेम्या या दोन्ही पुस्तकांचा लेखक एज्रा आहे. एज्रा या नावाचा अर्थ "यहोवा सहाय्य करतो." ७० वर्षांच्या बंदीवासानंतर देवाने आपले वचन पूर्ण करून आपल्या लोकांना परत आल्याचा वृत्तांत तो देतो. एज्रा अहरोनाच्या वंशातील याजक घराण्याचा होता (७:१-५). २ इतिहास ३६:२२,२३ ही वचने एज्रा १:१-३ शी साधर्म्य दाखवून या दोन्ही पुस्तकाचा लेखक एज्राच आहे अशी पुष्टी देतात.

एज्रा शास्त्री होता. एज्रा व नहेम्याच्या पुस्तकात जी व्यवस्थापकीय कागदपत्रे आढळतात अशा लक्षावधी दस्तऐवजांच्या संग्रहापर्यंत पोहंचण्यास सुलभ प्रवेश असणारा असा हा एज्रा शास्त्री होता. पारसाच्या राज्याच्या दफ्तरखान्यात फारच थोडक्यांना अशी परवानगी असे. एज्रा असा अपवाद होता. एज्रा ७:१० मध्ये तो आपली देवाच्या वचनांविषयी भूमिका व संकल्प स्पष्ट करतो. नहेम्याच्या काळातील तो असा खंबीर व देवभीरू शास्त्री होता. अशी पारंपरिक आख्यायिका आहे की ज्या भव्य सभास्थानात संपूर्ण जुन्या कराराची प्रथम मान्यता पावलेली ग्रंथसंहिता जतन करून ठेवली होती त्या सभास्थानाचा तो संस्थापक होता. ख्रि पू ४५८ मध्ये पारसातून एज्राच्या नेतृत्वाखाली दुसरा ताफा यरुशलेमात गेला. त्यामुळे ख्रि पू ४५७ ते ख्रि पू ४४४ दरम्यान हे पुस्तक लिहिले गेले.

पार्श्वभूमी

ख्रि पू १४४५ मध्ये मिसऱ्यांच्या गुलामीतून इस्राएलांना बाहेर काढल्यावर एज्रामधील घटना घडण्यापूर्वीच देवाने सांगितले होते की जर त्यांनी देवाशी केलेला करार मोडला, त्याचे आज्ञानियम पाळले नाहीत तर तो त्यांना पुन्हा बंदीवासात नेईल (यिर्मया २:१४-२५). संदेष्ट्यांच्या मुखाद्वारे देवाने पुनःपुन्हा पूर्वसूचना देऊनही यहूदा व इस्राएल ह्या दोन्ही राज्यांनी देवाला नाकारणे पसंत केले. परराष्ट्रांच्या दैवताची उपासना केली. शिवाय मूर्तिपूजेशी निगडित असलेली अधम कृत्ये केली (२ राजे १७:७-१८; यिर्मया २:७-१३). म्हणून देवाने आपले वचन पाळले व बहकलेल्या इस्राएल व यहूदाला अश्शूर व बाबेलकडून त्यांना ठरवलेली शिक्षा दिली. ख्रि पू ७२२ मध्ये अश्शूरांनी उत्तरेकडील दहा वंशाचा पाडाव करून त्यांना आपल्या संपूर्ण साम्राज्यात पांगवले (२ राजे १७:२४-४१). नंतर ख्रि पू ६०५ ते ख्रि पू ५८६ बाबेलचा वापर करून देवाने यहूदाला हद्दपार केले व यरुशलेम जवळ जवळ उध्वस्त केले. यहूदाही देवाच्या कराराशी अविश्वासू राहिल्याने देवाने त्यांना ७० वर्षांच्या बंदीवासाची शिक्षा दिली (यिर्मया २५:११).

मग एज्रा व नहेम्याने नोंद केल्याप्रमाणे ते यरुशलेमात परतले. पारसाचा राजा कोरेश याने ख्रि पू ५३९ मध्ये बाबेलचा पाडाव केला. एज्राचे पुस्तक कोरेशाने एक वर्षाने म्हणजे ख्रि पू ५३८ मध्ये काढलेल्या यहूद्यांनी यरुशलेमास परत जाण्याविषयीच्या जाहीरनाम्याने सुरू होते. त्यानंतर इस्राएलांचे यहूदी राष्ट्रीय कॅलेंडर प्रमाणे यहूदी सणवार, अर्पणे व विधिसंस्कार सुरू झाले एवढेच नव्हे तर दुसऱ्यांदा मंदिर बांधायला ख्रि पू ५३६ मध्ये सुरुवात होऊन ख्रि पू ५१६ मध्ये ते बांधून पूर्ण झाले.

इस्राएलमधून बाबेलात तीन वेळा हद्दपारी करण्यात आली (ख्रि पू ६०५; ख्रि पू ५९७ आणि ख्रि पू ५८६). त्यांचे परतणे देखील तीन गटांनी झाले. पहिला गट ख्रि पू ५३८ मध्ये जरुब्बाबेलच्या नेतृत्वाखाली, दुसरा ख्रि पू ४५८ मध्ये

एज्राच्या नेतृत्वाखाली आणि तिसरा गट ख्रि पू ४४५ मध्ये नहेम्याच्या नेतृत्वाखाली परतला. तरी सर्वच लोक परतले नाहीत. जरुब्बाबेलच्या काळात हाग्गय व जखऱ्या संदेष्टे त्यांना संदेश देत होते.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

मिसरच्या बंदीवासातून सुटका आणि बाबेलच्या बंदीवासातून सुटका यात बऱ्याच प्रकारचे साम्य आढळते.

१. मंदिराची व तटबंदीची पुनर्बांधणी नियमशास्त्राची पुनर्स्थापना.

२. जरुब्बाबेलच्या एज्रा व नहेम्या यांनी मिळून मोशेप्रमाणेच काम केले.

३. स्थानिक शत्रुंच्या आव्हानांना तोंड देणे.

४. यहूदीतरांशी आंतरविवाह करण्याचा मोह व त्याचे पर्यावसान मूर्तिपूजेत झाले. बाबेलातून परतलेल्यांना वाटले असेल की देवाने आपल्याला जणु नव्याने सुरुवात करण्याची संधी दिली.

परत आल्यानंतरही पारसाच्या दरबारातील दस्तऐवज काढण्यासाठी शास्त्री म्हणून तेथे प्रवेश करण्याची एज्राला संधी होती अशा नोंदी आढळतात. राजदरबारातील दस्तऐवजांचे पुरावे देणे वजनदार होते. तो पारंगत शास्त्री होता, परमेश्वराच्या वरदहस्त त्यावर होता (७:६,२८). जाहीरनामे, फतवे, पत्रे, याद्या, वंशावळ्या, बखरी यांचे पुरावे देता यावे म्हणून ही पारसाच्या दरबारात लिहिली जाण्यामागे सार्वभौम देवाचा हात इस्राएलांच्या उद्धारात स्पष्ट दिसतो. या पुस्तकाचा मुख्य संदेश हाच आहे की देवाने परकी सत्तेद्वारे इस्राएलांना बंदीवास घडवला आणि परकी सत्तेद्वारेच बंदीवासातून परत येण्याची व भावी काळाची आशा दिली. या जगाच्या कोणत्याही राजावर देवाचे नियंत्रण आहे. अशा प्रकारे एज्राचे पुस्तक इस्राएलांवरील देवाच्या कृपेचा करार पुढे चालू असल्याचा संदेश देतो.

मंदिर बांधण्यास व सर्व शमरोनी शत्रुंचा विरोध असताना निराश झालेल्या यहुद्यांना हाग्गय व जखऱ्याद्वारे देव उत्तेजन देऊन म्हणाला, "खंबीर व्हा...काम चालू ठेवा...मी तुमच्याबरोबर आहे" (हाग्गय २:४; एज्रा ४:२४-५:२). आणि थांबलेले काम ख्रि पू ५२० मध्ये पुन्हा सुरू होऊन ख्रि पू ५१६ मध्ये संपले.

काही महत्त्वाचे मुद्दे

१. इतिहासाची ही दोन्ही पुस्तके दाविदाचे राजपदाचे अभिवचन, अहरोनाचे याजकपद आणि मंदिरात खरी भक्ती यांचे स्मरण करून देण्यास एज्राने लिहिली. जेव्हा मंदिराचे बांधकाम पुन्हा सुरू झाले तेव्हा एज्रा ४-६ अध्यायांच्या काळात हाग्गय व जखऱ्या यांनी संदेश दिले. नहेम्या परत पारसभेटीला गेला (नहेम्या१३:६) तेव्हा मलाखीचे पुस्तक लिहिले गेले.

२. अब्राहामाचे बीज जे इस्राएल यांना राष्ट्र म्हणून तसेच व्यक्ती म्हणून अब्राहाम, दावीद व यिर्मयाला वचन दिल्यानुसार पुनर्स्थापना करण्यास आपल्या सार्वभौम हाताने राजांना देवाने कसे हलवले व विरोधकांवर कशी मात केली याचा वृत्तांत एज्रा देतो.

३. एज्रा ६ व ७ या अध्यायांच्या दरम्यान एस्तेरची घटना घडली.

४. एज्रा १० व्या अध्यायात एज्रा इतिहासातील अपवादात्मक परिस्थिती हाताळतो. मलाखी २:१६ नुसार देवाला घटस्फोटाचा वीट आहे या वचनाशी विसंगत निकष लावायचा त्याचा मनसुबा नाही. विदेश्यांशी झालेल्या विवाहामुळे दूषित झालेल्या इस्राएल वंशाची ही समस्या सोडवून दाविदाचा संपूर्ण वंश

मशीहाच्या जन्मासाठी दूषित होण्यापासून राखला जावा आणि पुष्कळ स्त्री पुरुषांना जीवदान मिळावे म्हणून देवाने दाखवलेला हा कृपेचा मार्ग त्याने स्वीकारला. गणना २५:१-९ नुसार देवाची कडक शिक्षा दिली नाही.

रूपरेषा

(I) जरुब्बाबेल सोबत पहिला ताफा बाबेलातून परतला. अध्याय १ व २

(II) दुसऱ्या मंदिराची पुनर्बांधणी. ३:१-६:२२

(III) एज्राच्या नेतृत्वाखाली दुसरा ताफा परतला. अध्याय ७ व ८

(IV) एज्रा संजीवनाचे नेतृत्व करतो. अध्याय ९ व १०

प्रकरण १६

नहेम्या

ऐतिहासिक पुस्तक

लेखक व काळ

नहेम्या या नावाचा अर्थ "यहोवा माझे सांत्वन". पूर्व इतिहास जाणून घेण्यासाठी यिर्मया २५:१-१४ वाचावे. नहेम्याच्या पुढारपणातील काही घटना या पुस्तकात आहेत. हे पुस्तक नहेम्याच्या रोजनिशीतील किस्से सांगत असले तरी एज्रा त्याचा लेखक मानला जातो. "परमेश्वराचा वरदहस्त" हे शब्द शास्त्री व याजक म्हणून एज्राची ग्वाही देतात. नहेम्या १ ला अध्याय पारसाचा राजा अर्तहशस्तच्या राजवटीतील २०व्या वर्षांच्या घटनेने सुरू होतो. १-१२ अध्याय यरुशलेमचा पहिला सुभेदार म्हणून ख्रि पू ४४५- ख्रि पू ४३३ हा नहेम्याच्या कारभाराचा पहिला टप्पा वर्णन करतात. तर १३ वा अध्याय ख्रि पू ४२४ या दुसऱ्या टप्प्याचे वर्णन करतो. दोन टप्प्यांमध्ये २० वर्षांचा काळ गेला आहे. पुस्तक ख्रि पू ४०० पूर्वी लिहिले गेले.

पार्श्वभूमी

बहकलेल्या उत्तर राज्य इस्राएल व दक्षिण राज्य यहूदावर देवाचा न्याय आला. ख्रि पू ७२२ मध्ये अश्शूराने इस्राएलचे १० वंश हद्दपार करून विखरले (२ राजे १७) आणि बाबेलने ख्रि पू ६०५ ते ख्रि पू ५८६ दरम्यान तीन हल्ले करून यहूदा वंशाला बंदीवान केले व यरुशलेम लुटून नेले (२ राजे २५). कारण यहूदा देवाच्या कराराशी अविश्वासू राहिला म्हणून देवाने आपल्या लोकांना ७० वर्षे बाबेलच्या बंदीवासात पाठवले (यिर्मया २५:११). यहूद्यांच्या बंदीवासाच्या काळात जागतिक साम्राज्याचे पुढारीपण दानीएल ५ प्रमाणे पारसाकडे ख्रि पू ५३९ मध्ये बाबेलकडून हस्तांतरित झाले. त्यानंतर दानीएलाला ६ आणि ९-१२ अध्यायांमध्ये अनेक भाकितांचे प्रकटीकरण झाले. एज्राच्या पुस्तकाची सुरुवात पारसाचा राजा कोरेशच्या जाहीरनाम्याने होते. देवाचे लोक यरुशलेमास परततात व यरुब्बाबेलच्या नेतृत्वाखाली मंदिर बांधतात (ख्रि पू ५३९). आणि यहूद्यांचे कॅलेंडर, सण व अर्पणे पुन्हा सुरू होतात. पारसात मागे राहिलेल्या यहूद्यांविषयी एस्तेरचे पुस्तक वृत्तांत सांगते (ख्रि पू ४८३-४७३). एज्रासोबत दुसरा ताफा परततो (ख्रि पू ४५८). नहेम्यासोबत तिसरा ताफा परततो व यरुशलेमची तटबंदी बांधतो (ख्रि पू ४४५).

यहूद्यांच्या इतिहासात जगातील संपूर्ण पौर्वात्य भागावर पारसाचे वर्चस्व होते. जरा कोठे बंडाचे लक्षण दिसले की त्यांचे व्यवस्थापन त्याची दखल घेत असे. त्यामुळे यहूद्यांनी तटबंदी बांधायला सुरुवात करताच तेथील व्यवस्थापनाला दहशत बसली. अशा ठिकाणी राजाचे अत्यंत विश्वासातले निकटवर्तीच कार्यवाही करीत. यहूदामध्ये पूर्वीच्या जोम निर्माण होण्याच्या महत्त्वाच्या क्षणी पारसाच्या राजदरबारात नहेम्या या यहूदी प्यालेबरदाराला खात्रीलायक व विश्वासाची भूमिका पार पाडण्यास देवाने उभे केले (ख्रि पू ४६४ - ख्रि पू ४२३). पारसाच्या दरबारात काम करण्याचा नहेम्या भरपूर फायदा उठवू शकला. पारसाचा यहूदावर कबजा असूनही यरुशलेमेच्या तटाची पुनर्बांधणी करण्याचे नेतृत्व करण्यासाठी देवाने त्याच्या पदाचा वापर करून घेतला. योसेफ, एस्तेर व दानीएलाप्रमाणे तोही अर्तहशस्त राजाच्या राजदरबारात प्यालेबरदाराच्या महत्त्वाच्या पदावर होता व देव त्याचा उपयोग करून घेत होता.

(१) एस्तेर ही या राजाची सावत्र आई होती. अहश्वरोश राजाला हा पुत्र वश्ती राणीपासून झालेला असावा. पण एस्तेरमुळे ह्या राजाची यहूद्यांवर मेहेरनजर असावी.

(२) दानीएलाच्या ७० सप्तकांचे भाकित ख्रि पू ४४५ मध्ये मंदिराची व नगराच्या तटबंदीची पुनर्बांधणी करावे आणि यहूद्यांनी मायदेशी जावे या कोरेशच्या फर्मानाने सुरू झाले (दानी ९:२४-२६).
(३) मिसरी लोकांच्या दस्तऐवजात ख्रि पू ५व्या शतकाच्या अखेरच्या वृत्तांतात नहेम्याने दिलेली सनबल्लाटाविषयीची नोंद आहे. सनबल्लाट हा शोमरोनाचा सुभेदार होता. यहोहानन (६:१८,१२:२३); तसेच यरुशलेमचा सुभेदार म्हणून नहेम्याच्या झालेली नेमणूक (१०:१६; ख्रि पू ४१०), या घटनांना पुष्टी देणारे वृत्तांत सापडतात.
(४) नहेम्या व मलाखी हे जुन्या कराराच्या लिखाणाचे अखेरचे लेखक आहेत. या काळातील अखेरच्या घटनांचे ते साक्षी आहेत (मलाखी १-४ व नहेम्या१३).

यानंतर पुढे ४०० वर्षांचा शांततेचा किंवा काळा काळ गेला. त्या काळात देवाचा संदेश आलाच नाही. ही ४०० वर्षे संपल्यावर बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या व येशूच्या जन्माने इतिहास पुढे सरकतो. जुन्या करारातील इस्राएलांच्या संपूर्ण इतिहासांत ख्रिस्ताचे देहधारी होण्याचे प्रकटीकरण पूर्ण होण्यापूर्वी देवाची कराराची अभिवचने पूर्ण होण्याचा अनुभव इस्राएलांनी घेतला नव्हता. यहूद्यांच्या अवशिष्टांची संख्या मिसरातून बाहेर पडताना होती तेवढी देखील आता नव्हती (गणना१:४६). यहूद्यांचा आपल्या भूमीवर कबजा नव्हता (उत्पत्ती १५:७). सार्वभौम राष्ट्र म्हणून त्यांचे अस्तित्व नव्हते (उत्पत्ती १२:२). दाविदाच्या गादीवर कोणी राजा नव्हता (२ शमुवेल ७:१६). मुख्य याजक हफनी व फिनहासाच्या वंशातले होते (गणना २५:१०-१३). तरी तारणाच्या नव्या कराराचे अभिवचन, मशीहाचा जन्म, वधस्तंभीचे मरण व पुनरुत्थान या भाकितांची लोक वाट पाहात होते.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

(१) काळजीपूर्वक देवाचे वचन वाचून त्याची इच्छा पूर्ण होताना पाहाणे हा या पुस्तकाचा मुख्य विषय आहे. एज्राने नियमशास्त्राच्या ग्रंथ वाचला (८:१) त्यामुळे संजीवन उतरले. वाचनानंतर एज्रा व काही याजकांनी वाचलेल्या वचनांचा उलगडा केला (८:८). ऐकले त्यानुसार कृती करायला दुसऱ्याचा दिवशी एज्राने याजक व वडील जनांस जमवले (१०:३४,३६). देवाच्या इच्छेचा उलगडा झाल्याने त्याच्या इच्छेत राहाण्याची त्यांना एवढी इच्छा झाली व काळजी वाटली की ते गांभीर्याने म्हणतात, हे वचन आम्ही पाळले नाही तर आम्हाला शाप येवो (१०:२०). देवाच्या वचनानुसार विदेश्यांशी केलेल्या विवाहांविषयी ते क्रांतीकारक निर्णय घेतात (१३:१).
(२) दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे संपूर्ण पुस्तकात प्रतिबिंबित झालेले नहेम्याचे आज्ञापालनाचे जीवन. देवाने त्याच्या आज्ञापालनाद्वारे कार्य केले. चुकीच्या प्रेरणेने चालणाऱ्या दुष्ट अंत:करणाच्या शत्रुंद्वारेही देवाने कार्य केले. नहेम्याच्या कौशल्यामुळे अगर कतृत्वामुळे त्या शत्रुंचा मोड झाला नाही तर देवाने त्यांचा कट उधळून लावला (४:१५). देवाने विरोधकांच्या वापर आपल्या लोकांना नम्र करून गुडघ्यांवर येण्यासाठी केला. तसेच कोरेशाची त्यांच्यावर मेहेरनजर व्हावी, लोकांनी आपल्या मायभूमीत परतावे, कोरेशाने पुनर्बांधणीच्या प्रकल्पाला निधी द्यावा, त्याने यरुशलेमच्या तटबंदीचे रक्षण करावे हे देवानेच घडवून आणले. देवानेच नहेम्याच्या मनात घातले म्हणून त्याने देवाच्या सांगण्यानुसार शिरगणती केली (७:५).
(३) एज्राप्रमाणेच नहेम्याच्या पुस्तकातही आपण पाहातो की नहेम्यालाही विरोध झाला. यहूद्यांच्या शत्रुंनीच अशा अफवा उठल्या की देवाच्या या लोकांनी पारसाविरुद्ध बंड केले आहे. त्यामागे हा हेतू होता की यरुशलेमची पुनर्बांधणी स्थगित व्हावी. बाहेरून विरोध व आतून भ्रष्टाचार चालू असतानाही यहूद्यांनी यरुशलेमेच्या तटबंदीच्या

पुनर्बांधणीचे काम ५२ दिवसात पूर्ण केले (६:१५).
(४) नहेम्याचे वैयक्तिक विचार, उद्देश, निराशा ही सर्व वाचकांना सहज समजतात. वाचक त्याच्याशी समरूप होतो. देवाचा त्याच्यावर वरदहस्त होता ही गोष्ट वाचक समजतो. हा तर या पुस्तकाचा प्रमुख संदेश आहे. देव नियंत्रक आहे, तो आपल्या लोकांच्या जीवनात हस्तक्षेप करतो. आपल्या हस्तक्षेपाने तो त्यांच्या शत्रुंवरही नियंत्रण ठेवतो हे समजते. या प्यालेबरदाराचे जीवन देवाचा वरदहस्त असल्याने कसे आदर्श बनते व त्याच्या जीवनाद्वारे देव आपले उद्दिष्ट कसे पूर्ण करून घेतो याचा प्रत्यय येतो.

रूपरेषा

पहिला टप्पा: सुभेदार नहेम्या (१:१-१२:४७).
(I) नहेम्या मायभूमीत परततो व पुनर्बांधणी करतो.(१:१-७:७३)
(II) एज्रा संजीवन आणतो व नवीकरण होते (७:७३-१०:३९).
(III) नहेम्याचे पुनर्वसन व आनंदोत्सव (११:१-१२:४७). मध्ये २० वर्षांचा काळ जातो.

दुसरा टप्पा: नहेम्या पुन्हा सुभेदार: कारकीर्द (१३:१-३१).

प्रकरण१७

एस्तेर

ऐतिहासिक पुस्तक

एस्तेर या नावाचा अर्थ आहे "तारा." स्त्रीच्या नावे बायबलमध्ये असलेली दोनच पुस्तके म्हणजे एस्तेर आणि रूथ. "हदस्सा " हे फारसी भाषेतील नाव असून त्या नावाचा अर्थ आहे "तारा." बाबेलची प्रेमदेवता "इश्तर" वरून हे नाव प्रचलित झाले असावे. तिचा बाप अबाहईल मेल्यानंतर ती अनाथ झाली. त्यामुळे तिच्या वयस्कर चुलत भावाने तिचा पोटच्या मुलीप्रमाणे सांभाळ केला.

लेखक व काळ

ख्रि पू ४८३- ख्रि पू ४७३ मध्ये हे कथानक घडले. एज्रा किंवा नहेम्याने हे पुस्तक लिहिले असावे. लेखकाला पारसाच्या चालीरीतींची बारकाईने माहिती दिसते आणि त्याच्या यहूदी राष्ट्रभावनाही खूप तीव्र दिसतात. एज्रा, नहेम्या ही पुस्तके एस्तेर नंतरचा इतिहास सांगतात. एस्तेरचे कथानक ख्रिपू ४७३ मध्ये संपते. अहश्वेरोश राजा ख्रि पू ४६५ मध्ये मरण पावला. त्यामुळे ख्रि पू ५ व्या शतकाचे मध्य ते पारसाचा ग्रीकांनी ख्रि पू ३३१ मध्ये पाडाव करण्यापूर्वी हे पुस्तक लिहिण्यात आले हे स्पष्ट आहे. पारसाच्या साम्राज्यात एस्तेरचा इतिहास घडला.

पार्श्वभूमी व इतिहास

पारसाचे साम्राज्य ख्रि पू ५३९ ते ख्रि पू ३३१ या काळात होऊन गेले. अहश्वेरोशची कारकीर्द ख्रि पू ४८६ ते ४६५ची होती. एस्तेरचा घटना त्याच कालावधीतील आहे. यहूद्यांचा पहिला ताफा जरुब्बाबेल सोबत ख्रि पू ५३८ मध्ये यरुशलेमास परतला होता. दुसरा ताफा एज्रा सोबत ख्रि पू ४५८ मध्ये परतला. या दोन घटनांच्या मधल्या काळात एस्तेरचे कथानक घडले. नहेम्याचा इतिहास त्याच्याही नंतर घडला. परकी सत्तांनी इस्राएलांस नामशेष करायला फार वेगाने पावले उचलली होती. पण देवाने अब्राहामाशी केलेला करार पाळून आपल्या सार्वभौमत्वाने त्यांचे रक्षण केले (उत्पत्ती १२:१-३; १७:१-८). देवाने दिलेल्या या विजयाबद्दल पुरीम सण सुरू झाल्याचा वृत्तांत ९ व १० अध्यायात आहे. देवाने लावून दिलेल्या सणाव्यतिरिक्त सुरू झालेले दोन सण म्हणजे पुरीम सण व दीपांचा सण (योहान १०:२२). ख्रि पू १७० मध्ये अंत्युखियात एपिफीनस या ग्रीक साम्राज्याच्या सिरीयातील सुभेदाराने इस्राएलांचा अमानुष छळ केला होता. त्याच्यावर मिळालेल्या विजयाबद्दल यहूद्यांनी दीपांचा सण सुरू केला. त्याने यहूद्यांच्या मंदिरातील वेदीवर मूर्तींची स्थापना करून ते विटाळले होते. मक्काबी क्रांतीकारकांच्या या काळात त्यांनी बंड करून गनिमी काव्याने युद्ध करून मंदिराची व आपल्या भूमीची ख्रि पू १६३ मध्ये सुटका करून घेतली होती. त्या जल्लोशासाठी हा दीपांचा सण सुरू झाला होता. ख्रि पू ६३ मध्ये रोमी लोकांची राजवट येईपर्यंत त्यांनी ते जतन केले होते. ख्रि पू १६४ मध्ये यहूद्यांनी पुन्हा मंदिराची प्रतिष्ठापना केली होती तेव्हापासून दीपांचा सण सुरू झाला होता.

हामानाचा इतिहास

या पुस्तकातील यहूद्यांच्या या कट्टर शत्रुचा इतिहास १००० वर्षे मागे नेतो. मिसरातून सुटका झाल्यावर रानातून जाताना एसावाचा वंशज असलेल्या त्यांचेच भाऊबंद असलेल्या अमालेक्यांनी त्यांच्यावर हल्ला केला म्हणून त्यांचा समूळ नाश करण्याचा शाप देवाने त्यांना दिला (निर्गम १७:१४; अनुवाद २५:१७-१९). त्या अनुषंगानेच देवाने

शौलाला अगाग राजासह सर्व अमालेक्यांचा संहार करण्याची आज्ञा दिली होती (१ शमुवेल १५:२,३). पण शौलाने देवाची अवज्ञा केली व त्याला जिवंत राखले. त्यामुळे शौलावरही देव कोपला. शेवटी शमुवेलाने देवाच्या आज्ञेप्रमाणे केले. त्याने अगागाचे तुकडे तुकडे केले (१ शमुवेल १५:३२,३३).

ही पार्श्वभूमी लक्षात घेता हामान अगागाच्या वंशातला असल्याने यहूद्यांचा अतिशय द्वेष करीत असे. हामान व मर्दखय या दोघांनाही आपला हा इतिहास ठाऊक आहे याचा आपल्याला प्रत्यय येतो. मर्दखय हामानाला मुजरा का करीत नाही व हामान यहूद्यांची संपूर्ण जमातच नामशेष करायला का सरसावतो याचे कारण त्यात सापडते. अखेर अमालेक्यांचा समूळ नाश करण्याची देवाची योजना व इस्राएलांचे जतन करण्याचे विजयी कार्य पूर्णत्वाला गेल्याचे आपण पाहातो. आगाग राजानंतर ५५० वर्षांनी एस्तेरची घटना घडली. मशीहा जन्माला येऊ नये म्हणून यहूदा वंशच नष्ट करण्याचा सैतानाचा धूर्त प्रयत्न देवाने येथे आपल्या सार्वभौमत्वाने हाणून पाडला.
यापूर्वी सैतानाने असाच घातकी हल्ला केला होता. एकटा योवाश उरेल येथवर दाविदाचा राजवंश नष्ट करण्याचा त्याने प्रयत्न केला. देवानेच योवाशाला वाचवले व जतन केले (२ इतिहास २२:१०-१२). पुढे सर्व बालकांसोबत येशूही मारला जावा म्हणून हेरोदाकडे बालकाची हत्या करण्याचे फर्मान काढण्यास सैतानाने हेरोदास उद्युक्त केले (मत्तय २:१६). येशूच्या हातून पाप घडावे व तो निर्दोष कोकरा ठरू नये म्हणून येशूने आपल्या पाया पडावे अशी कपटी योजना सैतानाने आखली (मत्तय४:९). येशूने वधस्तंभी जाऊ नये म्हणून पेत्राद्वारे त्याचा कालवरीचा रस्ता अडवण्याचा सैतानाने प्रयत्न केला (मत्तय १६:२२). अखेर सैतान यहूदात शिरला व त्याच्याकरवी येशूला रोमी लोकांच्या हाती दिले (लूक २२:३-६). एस्तेरच्या पुस्तकात देवाचा उल्लेखही नाही, पण सैतानाने त्यांचा पाठलाग केल्याने व देवाने स्वत: हस्तक्षेप करून सैतानाचा कट उधळल्याचे आपण पाहातो. जरी या पुस्तकात देवाचे नाव नसले तरी त्याचीच ही गोष्ट आहे.

देवाने अब्राहाम व दाविदाला दिलेली अभिवचने एस्तेरच्या पुस्तकात अडचणीत आलेली दिसतात, पण त्यातूनही सार्वभौम देवाची इस्राएलांवरील नितांत प्रीती व्यक्त झालेली दिसते. "इस्राएलांच्या रक्षकास झोप लागत नाही व तो डुलकीही घेत नाही". सर्वोपस्थित, सर्वसमर्थ, सार्वभौम, देव आपले उद्दिष्ट पूर्ण करीत असल्याचे आपण येथे पाहतो व तो इस्राएलांचे जतन करतो असे आढळते.

काही विशेष मुद्दे

देवानेच आपले नाव या पुस्तकात प्रकट न करणे पसंत केले आहे, कारण परिस्थितीच नाजुक आहे. पण प्रमुख पात्र तोच आहे हे नक्की. एस्तेर व मर्दखय हे दानीएल, एज्रा, नहेम्या यांच्याप्रमाणे आपला विश्वास उघडपणे व्यक्त करताना का दिसत नाहीत असा प्रश्न पडतो. पण-

१. या छोट्या पुस्तकात सर्वच नोंदी तपशीलवार दिलेल्या नाहीत. कदाचित येथे नमूद केल्यापेक्षा त्यांचा विश्वास अधिक दृढ असेल (४:१६).
२. एस्तेरच्या बाबतीत तर वल्हांडण, पेंटेकॉस्टचा सण असे यहूदी सण बराच काळ आधीच बंद झाले होते (२ राजे २३:२२; नहेम्या ८:१७).
३. शोमरोन्यांनी काही वर्षांपूर्वी अहेश्वरोश राजाला यहूद्यांविरुद्ध पत्र लिहिले होते त्यामुळे ते घाबरले असतील (एज्रा ४:६).

४. मर्दखयाने पहिल्यांदा मुजरा केला नसेल तेव्हाच हामानाची दुष्ट इच्छा कळली नसेल पण त्यांचे शब्दयुद्ध अनेकदा झाले असेल.
५. योग्य समयी एस्तेरने यहूदी परंपरांचा पाठपुरावा करण्याचा आग्रह धरला (७:३,४). तरीही प्रभूच्या राज्यांत आपला हा प्रश्न सुटेल की ते देवाचे नाव उघडपणे का व्यक्त करत नव्हते.

रूपरेषा

(I) एस्तेर वश्तीची जागा घेते. १:१-२:१८

(II) मर्दखयाची हमानावर मात. २:९-७:१०

(III) हामानाच्या कटातून इस्राएलांची सुटका. ८:१-१०:३

ईयोब

काव्यात्मक पुस्तक

ईयोब या नावाचा अर्थ "पीडीतग्रस्त, छळग्रस्त" किंवा "पश्चात्तप्त." त्याच्या जीवनाच्या परीक्षाकाळात देवाच्या स्वभावाचे त्याला प्रकटीकरण झाले. रोम ११:३५; १ करिंथ ३:१९; यहेज्केल १४:१४,२० व याकोब ५:११ ईयोब सच्चा माणूस असल्याची नोंद करतात.

लेखक व काळ

ईयोब लेखक असू शकत नाही कारण त्याच्या कठीण परीक्षेचा संबंध स्वर्गात घडलेल्या घटनांशी असून त्याविषयी तो अज्ञान आहे. आख्यायिका सांगतात की मोशे या पुस्तकाचा लेखक आहे. कारण मोशे ४० वर्षे ऊस देशाजवळच मिद्यानात वास्तव्यास होता (१:१). तेथे या कथानकाच्या नोंदी त्याला मिळाल्या असतील. या घटनेनंतर बऱ्याच काळानंतर हे पुस्तक लिहिले गेले असावे, कारण -

१. ईयोबाचे वय पाहा. पुढे तो आणखी १४० वर्षे जगला (४२:६).
२. आयुष्यमर्यादा सुमारे २०० वर्षे असेल. त्याच्या पूर्वजांच्या सादृश्य ही आयुमर्यादा वाटते (४२:१६). अब्राहाम १७५ वर्षे जगला होता. उत्पत्ती२५:७.
३. त्याचे कौटुंबिक व समाजजीवन त्या पूर्वजांशी सादृश वाटते.
४. ज्या खास्द्यांनी त्याच्या चाकरांना ठार केले (१:१७) ते भटके होते, नगरे बांधून राहात नव्हते.
५. ईयोबाची मालमत्ता सोन्या रुप्याऐवजी कळपांनी गणली आहे (१:३; ४२:१२).
६. ईयोब आपल्या कुटुंबात याजकपद करायचा (१:४,५).
७. अब्राहामाशी झालेला देवाचा करार, इस्राएल, निर्गमन, मोशेचे नियमशास्त्र या मूलभूत विषयांचा उल्लेख कोठेही आढळत नाही. कुटुंबप्रमुख म्हणून त्याचा हा दीर्घ व साहसी प्रवास आहे. त्याला आदामाविषयी व जलप्रलयाविषयी माहिती दिसते (३१:३३; १२:१५). हे सर्व लक्षात घेता बाबेलच्या घटनेनंतर (उत्पत्ती ११:१-९) पण अब्राहामापूर्वी किंवा त्याच्या समकालीन हे कथानक घडले असेल असा निष्कर्ष निघतो (उत्पत्ती ११:२७).

पार्श्वभूमी

ह्या पुस्तकाचे कथानक स्वर्गातील दृश्याने सुरू होते व वाचकांना सर्व काही स्पष्ट होते (१:६-२:१०). ईयोब यातना सहन करत होता कारण देवाचा सैतानाशी लढा चालू होता. ईयोबाला व त्याच्या मित्रांना याची पुसटशीही कल्पना नव्हती. त्यांच्या अज्ञानातून आपल्या परीने त्याच्या दु:खाचे ते स्पष्टीकरण करायची धडपड करीत होते. अखेर ईयोब देवाच्या चांगुलपणावर व सुटकेच्या आशेवर विश्वास ठेवतो. आपण विश्वासपात्र असल्याचे देव समर्थन करतो हा या पुस्तकाचा कळसाचा विषय आहे. जेव्हा यातना व संकटांना वास्तव किंवा ईश्वरविज्ञानाच्या दृष्टिकोनातून काहीही स्पष्टीकरण नसते तेव्हा देवावर विश्वास ठेवा.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

ईयोबाचे दु:खसहन व त्याच्या जीवनात घडलेले प्रसंग सर्व युगातील विश्वासी जनांसाठी महत्त्वाचे प्रश्न सादर करतात. ईयोब देवाची का सेवा करतो? ईयोबाच्या धार्मिकतेची ख्याती होती. नोहा व दानीएलाशी त्याची तुलना केली जात होती (यहेज्केल १४:१४-२०). त्याच्या आत्मिक धीराचे गुणगौरव केले आहे (याकोब ५:११). ईयोबाच्या सत्वपरीक्षेत इतरही प्रश्न निष्पन्न होतात.

उदा. "धार्मिकाला का कष्ट होतात?" हा प्रश्न महत्त्वाचा वाटला तरी त्याचे उत्तर हे पुस्तक देत नाही. ईयोबाला व त्याच्या मित्रांना दु:खसहनाचे कारण माहीत नव्हते. देव व सैतान यांच्या संवादातून एवढ्या तातडीने आलेल्या संकटाचे कारण "धार्मिकाला कष्ट होतात" हे सांगण्यात आल्याचे आढळत नाही. खरे तर जेव्हा अखेर विश्वाच्या प्रभूसमोर ईयोब आला तेव्हा आपले मुख झाकून घेऊन त्याने मुखातून एक शब्दही काढला नाही. त्याच्या गप्प राहाण्याने त्याच्या तीव्र यातना व त्याने सहन केलेले नुकसान क्षुल्लक ठरवण्यात आले नाही. तर त्या दु:खसहनातून जात असताना देवाच्या उद्दिष्टांवर विश्वास ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. कारण इतर मानवी अनुभवांप्रमाणेच दु:खसहन देखील दैवी सुज्ञतेच्या मार्गदर्शनाने आलेले असते. अखेर तो हाच धडा शिकला की माणसाला दु:खसहनाचे खास कारण समजू शकत नसते तरीही त्याने देवाच्या सार्वभौमत्त्वावर विश्वास ठेवलाच पाहिजे. केवळ हेच दु:ख सहन करण्याचे उत्तर आहे.

हे पुस्तक अनेक छोट्या मुद्यांसोबत दोन महत्त्वाचे मुद्दे मांडते. दोन्ही मुद्दे पूर्वार्धात (अध्याय १,२) व समारोपात तसेच ३:१-४२:६ मधील ईयोबाच्या यातनांच्या काव्यात्मक वर्णनात सापडतात.

पुस्तकाचा पहिला मुद्दा समजून घेण्यास स्वर्गात देव व सैतानामध्ये झालेले संभाषण लक्षात घेतले पाहिजे. मग भूतलावर ईयोब व त्याच्या मित्रांमध्ये झालेल्या संभाषणाच्या तीन फेऱ्यांशी असलेला त्याचा संबंध पाहिला पाहिजे. विश्वासी जनांचे गुणविशेष सैतान व त्याचे सर्व अशुद्ध आत्मे, देवदूत व मानवांना सिद्ध करून दाखवावेत अशी देवाची इच्छा होती. सैतान आरोप करत होता. ईयोबाची नीतिमत्ता कसोटीस लावण्यात आलेली नाही असा आरोप सैतान सातत्याने करत होता. देवाकडून जेव्हा काही प्राप्त होते तेव्हाच धार्मिक देवाशी विश्वासू राहातो असा त्याचा आरोप होता. सैतानाच्या दृष्टीने ईयोब शुद्ध हेतूने देवाची सेवा करत नसून त्याचे देवाशी ढोंगी संबंध होते. प्रकटी १२:३,४ नुसार देवाविरुद्धच्या बंडात सैतानाने आपल्या सोबत एक तृतीयांश पवित्र दूत सामील करून घेतले होते त्यामुळे त्याला खात्री होती की आपण ईयोबाला सहज देवाविरुद्ध उलटवू शकू. सैतानाला वाटले की ईयोबावर संकटे आणून आपण त्याचा देवावरचा विश्वास उद्ध्वस्त करू शकू. यावरून तारणासाठीच्या विश्वासाच्या ठिकऱ्या उडू शकतात हेच त्याला दाखवून द्यायचे होते. देवाने त्याला आपले म्हणणे सिद्ध करून दाखविण्याची मोकळीक दिली. पण तो त्यात अपयशी ठरला कारण देवावरील खरा विश्वास अभेद्य असतो. ईयोबाच्या पत्नीनेही देवाला अपशब्द बोलण्यास उद्युक्त केले (२:९) असता त्याने नकार दिला होता. देवावरील त्याचा विश्वास कदापि ढळला नाही (१३:१५).

हाच कपटी डाव सैतान पेत्राशी खेळला (लूक २२:३१-३४) तेव्हा पेत्राचाही विश्वास ढळवण्यात तो अपयशी ठरला (योहान २१:१५-१९). तारणाचा विश्वास नष्ट करण्याचे सैतानाने कितीही प्रयत्न केले तरी तो अढळ राहतो (रोम ८:३१-३९). अखेर देवाने आपला मुद्दा सैतानाला सिद्ध करून दाखवला की पवित्र जनांवर कितीही संकटे आली तरी त्यांचा विश्वास नाश पावू शकत नाही.

दुसरा निगडित मुद्दा म्हणजे देवाचा मानवासंबंधीचा स्वभावगुण सिद्ध करणे. देव ईयोबावरील कळवळ्यात, त्याच्या देखभालीत, सुरक्षितता देण्यात कमी पडत होता का? मुळीच नाही. याकोब ५:११ वरून देव ईयोबाची कनवाळू व दयाळू राहिला असेच दिसते (ईयोब ४२:१०-१७). देवाचा माणूस आपल्याला सहन करावे लागलेले क्लेश नाकारत नाही. पण त्याचे हे क्लेश पापाचा परिणाम किंवा भोग आहेत हे तो नाकारतो. तो का क्लेश पावत आहे हे त्याला समजत नसते. केवळ तो नम्रपणे अंत:करणपूर्वक आराधना करीत देवापुढे सादर होतो (४२:५,६) आणि सार्वभौम, व ज्ञानी निर्माणकर्त्याच्या हाती स्वत: ला सोपवून देतो. सैतानाशी होणाऱ्या संघर्षाविषयी ईयोबाने हेच शिकावे अशी देवाची इच्छा होती. अखेर देव ईयोबाला विपुल आशीर्वाद देतो.

या पुस्तकात निरपराध असतानाही दु:ख सहन करावे लागते हा महत्त्वाचा मुद्दा आहे. काही वेळा देव आपल्या मुलांना दु:ख संकटातून त्यांच्या पापामुळे जाऊ देतो (गणना १२:१०-१२). काही वेळा ती शिक्षा देतो (इब्री१२:५-१२). तर कधी त्यांना बळकटी यावी म्हणून ती पाठवतो (२ करिंथ १२:७-१०;१ पेत्र ५:१०). काही वेळा आपली सुखे व कृपा प्रकट करण्याची संधी म्हणून तो ती पाठवतो (२ करिंथ १:३-७). पण काही वेळा दु:खसहनाचे कारणच तो भक्ताला समजू देत नाही कारण त्यामागे स्वर्गीय हेतू असतो या भूतलावरील लोक तो समजू शकत नाहीत (निर्गम ४:११; योहान ९:१-३). ईयोब व त्याचे मित्र ईयोबाच्या दु:खसहनाचा शहानिशा करताना कारणे व उपाय शोधतात. आपले सर्व ज्ञान पणाला लावून उत्तरे शोधताना त्यातून चुकीच्या कल्पनाच बाहेर पडताना दिसतात. त्याबद्दल देव अखेर त्यांची कानउघाडणी करतो (ईयोब ४२:७). ईयोब का क्लेश भोगत आहे याचे कारण त्यांना कळले नाही कारण सैतान व देव यांच्यात जे काही चालले होते त्याविषयी ते अज्ञान होते. त्यांना वाटत होते आपल्याला सर्व उत्तरे माहीत आहेत, पण उलट त्यांच्या अज्ञानाने त्यांनी गुंतागुंत व पेच वाढवले.

ईयोबाच्या अनुभवावरून आपण खालील बाबी लक्षात घ्याव्यात:

१. स्वर्गात देवासमोर काही गोष्टी घडत असतात. विश्वासी जनांना त्याची काहीच कल्पना नसते, पण त्यांना त्याचे परिणाम मात्र भोगावे लागतात.
२. जीवनाविषयीच्या बाबींचे उत्तम स्पष्टीकरणही निरुपयोगी ठरते.
३. देवाच्या लोकांनाही दु:खसहन करावेच लागते. चांगल्या लोकांच्या बाबतीत सतत काही ना काही वाईट घडतच राहाते. म्हणून कोणीही एखाद्याच्या धार्मिकतेचे मापन त्या व्यक्तीच्या यातनांवरून किंवा यशावरूनही करू नये.
४. जरी देव फार दूर आहे असे भासत असले तरी चिकाटीने सहन करणे हा उदात्त गुण विश्वासी व्यक्तींच्या ठायी असणे अगत्याचे आहे कारण देव चांगला आहे आणि आपण आपले जीवन त्याच्या सुरक्षित हाती सोपवून देऊ शकतो.
५. क्लेशांमधून जात असता विश्वासी व्यक्तीने देवाला सोडू नये. तर त्याच्याशी अधिक जवळीक साधावी. म्हणजे आपल्या यातनांच्या स्पष्टीकरण मिळाले नसतानाही आपल्याला सांत्वन लाभते.
६. क्लेशांची तीव्रता कितीही प्रखर असली तरी त्यांचा शेवट धार्मिकतेतच होईल व देव विपुल आशीर्वाद देईल.

विचारासाठी काही मुद्दे

सतत हा मुद्दा लावून धरलेला दिसतो की ईयोबाच्या यातनांचे कारण त्याला का सांगितले नाही? वाचक जाणतो की सैतानाला काहीतरी सिद्ध करून दाखवण्यासाठी देव हे सारे घडू देतो. ईयोबाच्या समजशक्तीच्या तर हे सारे पार पलीकडचे असते. याकोबाचे पत्र सांगते की देवाला आपला कळवळा व दया निदर्शनास आणून द्यायची असते. पण

दिलगिरी व्यक्त न करता स्पष्टीकरण न देता ही सत्त्वपरीक्षा होते. पण वाचकही अवाक् होऊन मुखावर हात ठेवतो. सर्वज्ञानी, सर्वसमर्थ निर्माणकर्त्याला दोष न देता प्रश्न न करता देव आपल्या इच्छेस येईल ते करतो हे मान्य करतो. हे करत असताना तो दूत, दुष्टात्मे यांना आध्यात्मिक बाबी सिद्ध करून दाखवतो व आपल्या दयेची व कळवळयाची ओळख घडवतो हे वाचक समजतो. या सर्व दु:ख क्लेशांमध्ये देवाचा सहभाग असतो, त्यात विश्वासी मानव देवाच्या बाजूने उभा असतो. अखेर हे देखील स्पष्ट होते की देवाला कोणा मानवी वकीलाची गरज नसते.

ईयोबाचे अपराधीपणा आणि निरपराधित्व याविषयी आपण पेचात पडतो. देव त्याचे सात्विक, सरळ, देवभीरू व पापापासून दूर राहाणारा असे वर्णन करतो (१:१). पण ईयोबाचे सांत्वनदाते त्याच्या सत्त्वपरीक्षेवर प्रश्नचिन्ह उभे करतात.

ईयोबाने पाप केले नाही का? ईयोबही अनेकदा आपण पाप केले आहे अशी कबुली देतो (७:२१,१३:२६). पण ईयोब आपल्या पापांच्या तुलनेत आपल्या क्लेशांची तीव्रता अधिक असल्याचे म्हणतो. सांत्वनदात्यांच्या आरोपांवर स्वत:चे समर्थन करण्याचा आग्रह धरल्याबद्दल अखेर देव ईयोबाला धमकावतो (ईयोब ३८-४१). पण देवाने हे घोषित केले की ईयोबाचे म्हणणे बरोबर आहे व सांत्वनदात्यांचे म्हणणे चुकीचे आहे (४२:७).

आरंभी सर्वांचे एकमत होते की देव अधर्माला शासन करतो, आज्ञाधारकांना तो प्रतिफळ देतो, याला अपवाद नसतो. ईयोब स्वत: निरपराध असूनही दु:खसहन करत असल्याने जोरदार निष्कर्ष काढतो की धार्मिकासही क्लेश होतात. दुर्जनाची भरभराट होते हे देखील आपले निरीक्षण ईयोब मांडतो. अशा प्रकारे या अपवादांवरून देव आपल्या सार्वभौमत्वाने आपल्या लोकांशी संपर्क साधतो असा पुनर्विचार करणे ईयोबाला भाग पडले. ईयोबाचे हे ज्ञान प्रतिफळ अगर शासन याविषयीच्या अभिवचनांवर अवलंबलेले नाही. शेवटी देव ईयोबाला स्पष्टीकरण देत नाही तर ईयोब व त्याचे मित्र या दोन्ही पक्षांना निर्माणकर्त्यावर विश्वास ठेवण्यास पाचारण करतो. हा देव पापांच्या गोंधळात सापडलेल्या जगाला परिपूर्ण ज्ञानाद्वारे व दयेद्वारे आपल्या अधिकाराने व सामर्थ्याने मार्गदर्शन करतो.

हे पुस्तक कसे समजून घ्यावे?

१. प्रथम ज्ञानाचे स्वरूप समजून घेताना देवाचे ज्ञान व मानवी ज्ञान यातील भेद समजून घ्यावा.

२. ईयोब व त्याचे मित्र देवाच्या ज्ञानात उणे असल्याचे मान्य करावे. सांत्वन करायला आलेल्या मित्रांना ईयोबाच्या परिस्थितीचे अचूक आकलन होत नाही. त्यात ईयोब मात्र देवाच्या दयेवर व सार्वभौमत्त्वावर अवलंबून राहायला शिकला. या विषयाला २८व्या अध्यायात कलाटणी मिळालेली दिसते. तेथे दैवी ज्ञानाच्या गुणविशेषांचे स्पष्टीकरण केले आहे. दैवी ज्ञान दुर्मिळ व मोलवान आहे. मनुष्य ते विकत घेऊ शकत नाही. ते पूर्णपणे केवळ देवाच्या ठायीच आहे.आपण स्वर्गात काय चालू आहे हे जाणू शकत नाही; की देवाचे उद्देशही समजू शकत नाही. तरीही आपण त्याच्यावर निर्भेळ विश्वास ठेवणे आवश्यक आहे. यामुळे आपोआपच दु:खसहनाला शेवटचे स्थान मिळते व दैवी ज्ञानाला अग्रस्थान प्राप्त होते.

रूपरेषा

(I) पेच: (१:१-२:१३)

(II) संवाद

(अ) पहिले चक्र: (३:१-१४:२२)

ईयोबाचे भाषण : (३:१-२:६).

अलीफजचे पहिले भाषण व ईयोबाचे उत्तर (४:१-७:२१).

बिल्ददचे पहिले भाषण व ईयोबाचे उत्तर (८:१-१०:२२).

सोफरचे पहिले भाषण व ईयोबाचे उत्तर (११:१-१४:२२).

(ब) दुसरे चक्रः (१५:१-२१:३४)

अलीफजचे दुसरे भाषण व ईयोबाचे उत्तर (१५:१-१७:१६).

बिल्ददचे दुसरे भाषण व ईयोबाचे उत्तर (१८:१-१९:२०).

सोफरचे दुसरे भाषण व ईयोबाचे उत्तर (२०: १-२१:३४).

(क) तिसरे चक्रः (२२:१-२६:१४)

अलीफजचे तिसरे भाषण व ईयोबाचे उत्तर (२२:१- २४:२५).

बिल्ददचे तिसरे भाषण व ईयोबाचे उत्तर (२५:१-२६:१४).

(ड) ईयोबाचे बचावात्मक समर्थन (२७:१-३१:४०)

(ई) अलीहूचे भाषण: (३२:१-३७:२४)

(III) मुक्ती (३८:१-४२:१७)

देव ईयोबाला प्रश्न करतो (३८:१-४१:३४).

ईयोबाची कबुली, आराधना व निर्दोष असल्याचे शाबीत (४२:१-१७).

प्रकरण १९

स्तोत्रसंहिता

काव्यात्मक पुस्तक

जुन्या कराराच्या ग्रीक भाषांतरात या पुस्तकाला "स्तोत्रसंहिता" असे संबोधले आहे (लूक २०:४२; प्रे कृ १:२०). मूळ अर्थानुसार वाद्यांच्या नादाशी त्याचा संबंध लागतो. प्राचीन इस्राएलांसाठी देवाचा श्वास फुंकलेली ती ही स्तोत्रे म्हणजे गीतसंहिता होती. त्यातून आराधनेचा आत्मा अगदी योग्य प्रकारे व्यक्त होतो. त्यात लेखकाची अधिकृतता, ऐतिहासिक प्रसंग, सामूहिक उपासना चालवण्यासाठी चालकाला दिलेल्या सूचना, ते स्तोत्र कशाविषयी आहे, त्याला वाद्यांची साथ हवी का, कोणता सूर लावावा याविषयी माहिती व सूचना आहेत. ती प्राचीन काळची असल्याने अर्थसूचक तांत्रिक सूचनाही दिल्या आहेत. कोणते स्तोत्र दावीद, आसाफ, मोशे, शलमोन किंवा कोरहपुत्रांचे आहे याचीही नोंद आहे.

दैवी दृष्टिकोनातून तर देवच त्याचा लेखक असल्याचे सूचित होते. तरी मानवी दृष्टीकोनातून ती सात व्यक्तींनी लिहिली आहेत. दावीद ७५; कोरहपुत्र १०; आसाफ १२; शलमोन २; मोशे १; हेमान १; एथान १ आणि उरलेली ४८ स्तोत्रे अनामिक आहेत. त्यापैकी काही स्तोत्रे एज्राने लिहिली असे मानले जाते. मोशेचे ९० वे स्तोत्र ख्रि पू १४१० मध्ये तर १२६ वे स्तोत्र बंदीवासानंतरच्या काळात म्हणजे ख्रि पू ५ व्या शतकाच्या आरंभी लिहिल्याचे सूचित होते. म्हणजे सुमारे ९०० वर्षांच्या कालखंडातील ही स्तोत्रे आहेत.

पार्श्वभूमी

(१) देवाचे निर्मितीतील व इतिहासातील कार्य (२) इस्राएलांचा इतिहास या दोन पार्श्वभूमीवर ही स्तोत्रे आहेत. स्तोत्रांची ऐतिहासिक रचना सजीवांच्या निर्मितीपासून ते बाबेलच्या बंदीवासातून परतलेल्या हर्षित यहूद्यांच्या जीवनवृत्तांतावर आधारित आहे. स्वर्गातील आराधनेपासून ते भूतलावरील लढायांपर्यंतचे वृत्तांत त्यात आहेत. योग्य प्रकारे आराधना करणे हा स्तोत्रांचा उद्देश आहे. ११७ वे स्तोत्र बायबलच्या ११८९ अध्यायांच्या मध्यभागी आहे. ११९ वे स्तोत्र बायबलमधील सर्वात मोठा अध्याय आहे.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाच्या दृष्टीने मुख्य मुद्दे

वास्तव जगात वास्तव जीवन जगावे हे स्तोत्रे दर्शवतात. ती वास्तवता दोन प्रकारे दिसते.

(१) तात्पुरती, क्षणिक वास्तवता (२) श्रेष्ठ, उत्कृष्ट वास्तवता.

त्यातून हेच दिसते की जगातील वेदना नाकारता येत नाहीत. तरीही देवाच्या लोकांनी आनंदाने देवावर अवलंबून राहावे. स्वर्गीय अभिवचनांवर दृढ उभे राहून जीवन जगावे. मानवी जीवनात संकट, क्लेश व विजयाच्या चक्रातून जाताना विश्वासी व्यक्तीने आपली तक्रार, विश्वास, प्रार्थना, स्तुती करून सार्वभौम देवाला सादर करावी. हे समोर ठेवून स्तोत्रांची रचना विस्तृतपणे ईश्वरी सिद्धांतांनी, नित्याच्या जीवनाच्या वास्तवतांनी व व्यावहारिकतेने केली आहे. मानवाचा पापी स्वभाव ठामपणे मांडला आहे. केवळ दुष्टांचा स्वभाव पुढे करून नव्हे तर विश्वासी व्यक्तीच्या जीवनात वारंवार येणाऱ्या अडथळयांवरून तो पापी स्वभाव दाखवून दिला आहे. त्यात सर्व ठिकाणी देवाचे सार्वभौमत्व प्रकर्षाने दिसते. तरीही काही गोष्टींना देव नव्हे तर मानवच जबाबदार असल्याचे दाखवून दिले आहे. अनेकदा जीवन नियंत्रणाबाहेर गेल्यासारखे वाटले तरीही देवाच्या वेळापत्रकाप्रमाणे सर्व काही सुरळीत व योग्य मार्गाने चाललेले

असते आणि देवाच्या पुरवठ्याने सर्व परिस्थितीला व प्रसंगांना सामोरे जाता येते हे लक्षात येते. "प्रभूचा दिवस" अखेर येणारच याची खात्री देऊन चिकाटीने जीवन जगण्यास पाचारणही केले आहे.

स्तुती प्रशंसेच्या या पुस्तकात अगदी व्यावहारिक ईश्वरी सिद्धांत आढळतात. दाविदाच्या स्तोत्रात अनेकदा एकाचा अनेकांशी संबंध दाखवताना घोळ घातला जातो. मध्यस्थ व अधिपती म्हणून त्याचे लोकांशी अतूट नाते होते. मशीहाच्या स्तोत्रात दाविदाचे ख्रिस्ताशी निकटचे संबंध दिसतात. शापाची स्तोत्रे वाचताना हे लक्षात घ्यावे लागेल. पृथ्वीवरील देवाचा मध्यस्थ म्हणून आपल्या शत्रुंचा न्याय करावा अशी दावीद प्रार्थना करतो. तेव्हा हे शत्रू केवळ त्यालाच नव्हे तर देवाच्या लोकांनाही इजा करत होते हे लक्षात घ्यावे. पर्यायाने ते इस्राएलांचा राजा, जो राजांचा राजा यालाच ते आव्हान देत होते हेच स्पष्ट होते.

स्तोत्रांचे विषय पुढीलप्रमाणे विचारात घ्यावेत

अ. (१) काही स्तोत्रे बोधप्रद असून योग्य जीवन जगण्याचे ती मार्गदर्शन करतात.
(२) शत्रुंपासून किंवा इतर कारणांवरून होणाऱ्या तीव्र यातनांविषयी विलापाची काही स्तोत्रे आहेत.
(३) अंतरंगातील पापांशी मुकाबला करणारी पश्चात्तापाची स्तोत्रे आहेत.
(४) राजपदावर केंद्रित स्तोत्रे आहेत. ती विश्वाच्या राजास, पर्यायाने मशीहास उद्देशून आहेत.
(५) आभारप्रदर्शन करणारी स्तोत्रे आहेत.
प्रत्येक स्तोत्र वाचताना वरीलपैकी ते कोणत्या प्रकारात बसते हे पाहावे.

ब. आपल्या काव्यात यमक जुळवलेले असतात तर हिब्रू काव्यात समान विचार जुळवलेले असतात.
(१) पहिल्या ओळीतील विचार दुसऱ्या ओळीत अधिक स्पष्ट केलेला असतो (उदा.२:१).
समान विचारांच्या पहिल्या ओळीतील विचारच दुसऱ्या ओळीत पण असतो.
(२) पहिल्या ओळीच्या उलट विचार दुसऱ्या ओळीत असतो (१:६).
(३) वातावरणनिर्मिती करणारी काही वाक्ये असतात (२९:१,२).
(४) अंतर्मुख करणारी काही स्तोत्रे असतात (१:२).

क. (१) काही स्तोत्रांच्या प्रत्येक ओळीची सुरुवात क्रमश: मुळाक्षरांनी होते.
स्तोत्र ९, १०, २५, ३४, ३७, १११, ११२, ११९, १४५ हिब्रू भाषेची २२ मुळाक्षरे आहेत.
(२) एकशे पन्नास स्तोत्रांचे पाच भाग पाडले आहेत. प्रत्येक विभागाचा शेवट स्तुतीने केला आहे.
(i) ४१:१३ (ii) ७२:१८-२० (iii) ८९:५२ (iv) १०६:४८ (v) १५०:६. पाच हा अंक नियमशास्त्राचा दर्शक असल्याने यहूद्यांसाठी अत्यंत प्रिय व महत्त्वाचा आहे.
(३) स्तोत्रांचे काही संच आहेत.
(i) उदा. कोरहाची स्तोत्रे ४२-४९. आसाफाची स्तोत्रे ७३-८३
(ii) विशिष्ट विधिकार्यांसाठी स्तोत्रे. उदा. आरोहण स्तोत्रे, १२०-१३४
(iii) स्तुती आराधनेची स्तोत्रे. १४६-१५०
(४) स्तोत्रांचे प्रकार

(i) वैयक्तिक व सामूहिक विलाप. तारणाची गरज व्यक्त करणारी स्तोत्रे.

(ii) आभारप्रदर्शन करणारी स्तोत्रे.

(iii) देव राजासनारूढ असल्याचे वर्णन करणारी स्तोत्रे, देवाच्या सार्वभौम राज्याचे वर्णन करतात.

(iv) आराधनेची भावना उद्युक्त करणारी यात्रेकरूच्या प्रवासाची स्तोत्रे.

(v) सार्वभौम ख्रिस्ताचे वर्णन करणारी राजेशाही स्तोत्रे.

(vi) देवाच्या इच्छेविषयीचा बोध व ज्ञानाने भरलेली स्तोत्रे.

(vii) देवाच्या शत्रुंविरुद्ध क्रोध व न्याय व्यक्त करणारी पारदर्शक स्तोत्रे.

(५) दाविदाच्या जीवनातील घटनेच्या पार्श्वभूमीवरील स्तोत्रे.
(३,७,१८,३०,३४,५१,५२,५४,५६,५७,५९,६०, ६३,१४२)

(६) भूतलावर मानव होऊन आलेल्या मशीहाच्या जीवनाविषयीची भाकिते असणारी वचने व स्तोत्रे:
(२:७; ८:६; १६:१०; २२:१,७,८,१६,१८; ३४:२०; ३५:१९; ४०:७,८; ४१;९; ४५:६; ६८:१८; ६९:९,२१; १०९:८; ११०:१,४; ११८:२२,२६)

(७) देवासाठी वापरलेली रूपके - ढाल (३:३;२८:७;११९:११४), खडक (१८:२;४२;९;९५:१), राजा (५:२;४४:४;७४:१२), मेंढपाळ (२३:१;८०:१), शास्ता/ न्यायाधीश (७:११), आश्रय (४६:१;६२:७), गड (३१:३;७१:३), सूड घेणारा (२६:१), निर्माता (८:१,६), मुक्तिदाता (३७:३९:४०), आरोग्यदाता (३०:२), संरक्षक (५:११), पुरवठा करणारा (७८:२३-२९), तारणारा (१०७:२)

(८) स्तोत्रांमध्ये ख्रिस्त पुढीलप्रमाणे व्यक्त केला आहे: देहधारी ख्रिस्त (२:१-१२, ४०: ६-८), निर्मितीतील ख्रिस्त (८:३-८; १०२:२५-२७), वधस्तंभी जाणारा, मृत पावणारा, पुनरुत्थित ख्रिस्त (१६:८-११,२२:१-३१), धरून दिला जाणारा ख्रिस्त (४१:९; ६९:२०, २१,२५; १०९ :६-१९), ख्रिस्ताचे देवत्व (४५:६-८; ११०: १- ७), स्वर्गारोहण व सिंहासनीचा ख्रिस्त (६८:१८); १०००वर्षांचे राज्य करणारा (७२:६-१७; ८९:३-१७; ११०:१-७;१३२:१२-१८), जगातील शिक्षण देणारी सेवा (७८:१,२,१५), स्वर्गीय याजकत्व (११०: १-७), तारणारा म्हणून धिक्कार (११८:२२,२३).

प्रकरण २०

नीतिसूत्रे

काव्यात्मक पुस्तक

प्रस्तावना

हिब्रू भाषांतरात "शलमोनाची नीतिसूत्रे " असे या पुस्तकाचे नाव आहे. १ शमुवेल ४:३२ व उपदेशक १२:९ नुसार शलमोनाने ३००० नीतिसूत्रे लिहिली. त्यापैकी येथे ५१३ ची नोंद आहे. "नीतिसूत्रे" याचा अर्थ "च्या समान होणे." हे तुलना करून दाखवणारे पुस्तक आहे. त्यात प्रत्यक्षातील सर्वसाधारण ठळक उपमांची जीवनाच्या सत्यांशी तुलना केली आहे. ही नीतिसूत्रे म्हणजे साध्यासुध्या नीतिमूल्यांची उदाहरणे देऊन केलेली विधाने आहेत. ती जीवनाच्या वास्तवावर प्रकाश टाकून मूलभूत सत्ये शिकवतात. शलमोनाने देवाकडे ज्ञान मागितले (२ इतिहास १८:१२). त्याने थोडक्यात अर्थपूर्ण विधानांची रचना करण्याचे कारण: (१) मनुष्याने देवाचे भय धरावे व (२) देवाच्या ज्ञानाने व सुज्ञतेने जीवन कंठावे (१:७;९:१०). या सर्व ज्ञानाची गोळाबेरीज येशू या व्यक्तीमध्ये एकवटलेली आहे (१करिंथ १:३०).

लेखक व काळ

ख्रि पू ९४१- ख्रि पू ९३१ या कालखंडात इस्राएलांवर राज्य करणाऱ्या ज्या शलमोन राजाने देवाजवळ ज्ञान मागितले होते (१ राजे ४:२९-३४); त्याने १-९ अध्यायातील नीतिसूत्रे स्वत: रचली आहेत. १०:१ ते २२:१६ मध्ये त्याने ज्ञान्यांच्या उक्तींचा संग्रह सादर केला आहे. २२:१७ ते २४:३४ मध्ये आपल्यापूर्वीच्या लेखकांच्या लिखाणाचा संग्रह दिला आहे. त्यांचा काळ निश्चित ठाऊक नाही. पुन्हा २५-२९ अध्यायात त्याने स्वत: लिहिलेली नीतिसूत्रे आहेत. शलमोनानंतर दुफळी झालेल्या यहूदाच्या राज्यातील हिज्किया राजाच्या काळात लिहिण्यात आलेल्या नीतिसूत्रांच्या संग्रहाची नंतर भर घालण्यात आली आहे (ख्रि पू ७१५- ६८६). ३० व्या अध्यायात अगुराची नीतिसूत्रे आहेत तर ३१ व्या अध्यायात लमुवेल म्हणजेच शलमोनाचे लिखाण आहे. हिज्कियाच्या काळात किंवा नंतर नीतिसूत्रे पुस्तक स्वरूपात तयार झाले. मात्र १ राजे ११: १-११ नुसार शलमोनाचे अंत:करण देवापासून फिरण्यापूर्वी ही नीतिसूत्रे लिहिली गेली. साध्या, भोळसर व तरुणांसाठी ती खास आहेत कारण त्यांनी वेळीच देवाचे भय धरण्याची नितांत गरज आहे. शलमोनाने स्तोत्र ७२ व १२७ आणि उपदेशक व गीतरत्न ही पुस्तकेही लिहिली.

पार्श्वभूमी

या पुस्तकाचे तीन भाग पडतात. (१) सर्वसाधारण ज्ञानाची वचने (२) त्याने राजमहालातून केलेले निरीक्षण (३) आई वडिलांनी आपल्या मुलांना केलेला मृदू बोध.

सर्व सूत्रवचने देवावर मनन करायला उद्युक्त करतात. ही ज्ञानवचने असल्याने काही वेळा समजायला कठीण जातात (१:६). ही ज्ञानवचने संपूर्ण जुन्या करारातील सत्यांचा एक भाग आहेत. याजक नियमशास्त्राचे विवेचन करीत. संदेष्टे देवाकडून आलेले वचन सांगत आणि ज्ञानी लोक सुज्ञतेचा सल्ला देत (यिर्मया १८:१८; यहेज्केल ७:२६).

नीतिसूत्रांमध्ये ज्ञानी शलमोन आपली आंतरदृष्टी " गुंतागुंतीच्या" विषयांकडे वळवतो (१:६). या गोष्टी नियमशास्त्रात अगर संदेशवहनात सरळ दिलेल्या नाहीत. नीतिसूत्रे बाह्यरूपी किंवा वरवरची नाहीत. कारण त्यात नीतिमूल्यांच्या व शिष्टाचाराच्या विषयांवर जोर देऊन "सरळमार्गी, देवभीरू जीवन" आचरणात कसे वाहते ठेवावे हे दर्शवले आहे. हे तर थेट देवाशी योग्य नातेसंबंध प्रस्थापित झाल्यानेच घडून येते.

४:१-४ मध्ये शलमोन तीन पिढ्या जोडताना दिसतो. (१) तो स्वत: (२) दावीद व बथशेबाच्या चरणाशी बसून जे शिकला ते, तो आपला (३) पुत्र रहाबाम याच्या हाती सोपवताना दिसतो. एका पिढीने केलेला बोध दुसऱ्या पिढीला मृदुपणे सुपूर्त करण्याचा नमुना आपण नीतिसूत्रांमध्ये पाहातो. त्यात विस्तृत सत्यांचा समावेश आहे. धर्मशास्त्राची तत्त्वे व त्यांचे लागूकरण नीतिसूत्रांमध्ये आहे. ही तत्त्वे बायबलमधील देवभीरू चारित्र्याचे जीवन उदाहरणादाखल समोर ठेवतात.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानाचे मुद्दे

१. अभिवचनामुळे व मिळालेल्या संधीमुळे शलमोन राजा झाला होता. देवाने त्याची ज्ञानाची मागणी मान्य केली होती (१ राजे ३:९-१२; १इतिहास १:,११). इतर सर्वांहून तो ज्ञानी होता (१ राजे ४:२९-३१). पण धक्कादायक व खेदाची बाब म्हणजे त्याला जे सत्य माहीत होते व जे त्याने आपला पुत्र रहाबाम याला शिकवले होते, त्याप्रमाणे तो स्वत: चालण्यात अपयशी ठरला (१ राजे ११:१,४,६,७-११).
रहाबामानेही आपल्या बापाची शिकवण पुढे धिक्कारून टाकली (१ राजे १२:६-११).

२. बायबलमधील सोन्यासारख्या सिद्धांतांचा नीतिसूत्रांमध्ये खजिनाच भरला आहे. व्यावहारिक धार्मिकतेत ते प्रतिबिंबित केले आहेत (१:३). माणसांचीच नैतिक निवड कशी असते, तो कसा विचार करतो व जगतो यावर प्रश्न उभे केले आहेत. दैवी सत्याच्या प्रकाशात आपण दैनंदिन जीवन कसे जगतो यावर प्रकाश पाडला आहे. मनुष्याला निर्माण केले तेव्हा त्याने जसे वर्तावे अशी देवाची इच्छा होती, नेमके तसेच जगण्यास हे पुस्तक स्पष्ट आग्रह धरते. "देव पिढ्यानपिढ्या निजधाम आहे. पर्वत व जग निर्माण होण्यापूर्वी तो युगानुयुग देव आहे (स्तोत्र ९०:१,२) म्हणून आपण आपले जीवन असे जगण्यास शिकावे की आपल्याला सुबुद्ध हृदय प्राप्त होईल (स्तोत्र ९०:१२).
नीतिसूत्रांमध्ये अशी हमी देणारी अभिवचने आहेत की धार्मिक म्हणजे देवाचे आज्ञापालन करणारी व्यक्ती दीर्घायुषी होते (९:११). समृद्ध होते (२:२०-२२), आनंद उपभोगते (३:१३-१८), देवाचे चांगुलपण या जगात अनुभवते (१२:२१). तर मूर्ख व्यक्ती लज्जित होते (३:२५), मृत्यू पावते (१०:२१). तरीही या सर्व सामान्य तत्त्वाशी समतोल राखला आहे की दुष्ट काही वेळा भरभराट पावतो (स्तोत्र ७३:३,१२), पण तेही अल्पकाळ (स्तोत्र ७३:१७-१९). ईयोबाचे ज्वलंत उदाहरण आहे की धार्मिक देखील काही प्रसंगी आपत्ती व क्लेशाच्या तडाख्यात सापडतो.

३. पुढील काही महत्त्वाचे मुद्दे नीतिसूत्रात हाताळले आहेत. त्यानुसार अभ्यास करता येईल.
(अ) मानवाचा देवाशी नातेसंबंध - मानवाचा विश्वास (२२:१९); त्याची नम्रता (३:३४). त्याचे देवाविषयीचे भय (१:७); त्याची धार्मिकता (१०:२५); त्याचे पाप (२८:१३); त्याचे आज्ञापालन (६:२३); मोह, परीक्षांशी मुकाबला (१७:३); आशीर्वादांशी सामना (१०:२२); मरणाला सामोरे जाणे (१५:११).
(ब) मानवाचा स्वत:शी नातेसंबंध - मानवाचे चारित्र्य (२०:११); त्याचे ज्ञान (१:३); त्याची मूर्खता (२६:१०,११); त्याचे बोलणे (१८:२१); त्याचे स्वत:वरील नियंत्रण (६:९-११); त्याचे दयालुत्व (३:३); त्याची सधनता (११:४); त्याचा गर्व (२७:१); त्याचा राग (२९:११); त्याचा आळस (१३:४).
(क) मानवाचे इतरांशी नातेसंबंध - प्रेम (८:१७); मैत्री (१७:१७); शत्रुत्त्व (१९:२७); खरेपणा (२३:२३); निंदा करण्याची वृत्ती (२०:२९); पितृत्त्व (२०:७,३१:२-९); मातृत्त्व (३०:१०-३१); मूल म्हणून (३:१-३); मुलांना

शिकवताना (४:१-४); मुलांना शिस्त लावताना (२२:६).
संपूर्ण नीतिसूत्रात सुज्ञता व मूर्खता याविषयी वारंवार बोलल्याचे आढळते.

४. ज्ञानात सुज्ञता, समंजसपणा, बोध, सूचना, आहारातील दक्षता, आज्ञापालन या गोष्टींचा समावेश होतो. देवाचे व त्याच्या वचनाचे भय धरल्याने सुज्ञता मूळ धरून वाढीस लागते. सुज्ञतेच्या उलट ते सर्व मूर्खत्व व चुकीचे होय. ज्ञान व सुज्ञता यात फरक काय? वचनातून होणारी देवाविषयी व इतर सर्व माहिती. सुज्ञता म्हणजे त्या माहितीचे व्यवहारात लागूकरण करणे.

५. यातील ज्ञानाचे लिखाण काही वेळा सहज समजत नाही. त्यातील दाखल्यांवर मनन करून त्यातील सत्ये ग्रहण करावी लागतात (१:६; २:१-४; ४:४-९).

६. तुलना पद्धत वापरलेली आहे. वरच्या ओळीचे खालच्या ओळीत स्पष्टीकरण केलेले असते; वर व्याख्या देऊन खालच्या ओळीत विस्ताराने तार्किक निष्कर्ष काढलेला असतो. यात लागूकरणाचा भाग असतोच.
उदा.२८:७ पाहा. नीतिसूत्रांच्या अभ्यास करताना -
(i)तुलना लक्षात घ्यायची व त्याचा शाब्दिक अर्थ नव्हे तर मतितार्थ समजून घ्यायचा.
(ii) रूपके किंवा उपमा ओळखायच्या त्यातून कोणता विचार मांडला आहे ते पाहायचे.
(iii) थोडक्यात त्या वचनाचे सार सांगायचे.
(iv) त्यात शिकवलेल्या वर्तनाचे वर्णन करायचे.
(v) देवाच्या इतर वचनातून उदाहरणे शोधायची.

७. नीतिसूत्रांचा अभ्यास करताना संदर्भ लक्षात घ्यावा.
(i) ती राजमहालातून तरुणांसाठी लिहिण्यात आली आहेत.
(ii) पुस्तकाची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी. त्यातील शिकवण संपूर्ण शास्त्राशी कशी जुळते ते पाहावे. उदा. शलमोनाच्या उक्तींचा ख्रिस्त या व्यक्तीला धरून अर्थ लावायचा.
(iii) जी उदाहरणे दिली आहेत त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घ्यावी. त्या काळातील उदाहरणे देऊन सत्ये विदित केली आहेत.

८. कालपरत्वे मनुष्याच्या वर्तशैलीत बदल होत राहातो त्यामुळे लागूकरणाबाबत एकसूत्रतेची हमी देता येत नाही. पण न बदलणाऱ्या देवाचे मन आपल्याला नक्कीच समजते.त्याचा स्वभाव, चारित्र्य, त्याची कामे त्याचे आशीर्वाद समजतात. नीतिसूत्रातील सर्व ज्ञान व सुज्ञतेने विवेचन ख्रिस्तासाठी असलेले गुप्तनिधी आहेत.

रूपरेषा

(I) प्रस्तावना. १:१-७
(II) तरुणांसाठी बोध. १:८-९:१८
(III) सर्वांसाठी नीतिसूत्रे. १०:१-२९:२७
(IV) वैयक्तिक नोंदी. ३०:१-३१:३१

प्रकरण २१

उपदेशक

काव्यात्मक पुस्तक

प्रस्तावना

उपदेशक म्हणजे "बोध करणारा". हिब्रू भाषेत या शब्दांचा अर्थ "जो लोकांस पाचारण करतो अगर जमा करतो." मंडळीला बोध करणारा ही कृती करीत आहे. एस्तेर, रूथ, उपदेशक, गीतरत्न व विलापगीत ही पुस्तके विशेष प्रसंगी सभास्थानात वाचली जात असत. उपदेशकाचे पुस्तक पेंटेकॉस्टच्या दिवशी वाचण्यात येई.

लेखक व काळ

(१) दाविदपुत्र, इस्राएलचा राजा, शलमोन हा लेखक आहे.

(२) १ राजे २-११ चा शलमोनाच्या नैतिकतेचा प्रवास त्यात आहे.

(३) लोकांना ज्ञान शिकवण्यांची भूमिका त्याने बजावली होती व पुष्कळ नीतिसूत्रे लिहिली होती (१२:९). त्यांचा त्याच्या जीवनाशी मेळ जमतो. त्यामुळे लिहिण्याचा काळही स्पष्ट होतो की ती ख्रि पू ९३१ पूर्वी लिहिली. कोणालाही त्यातून वगळले नसले तरी ती विशेषत: तरुणांसाठी लिहिली आहेत. मानवी ज्ञानाच्या मार्गाने मुळीच चालू नये असाही इशारा देतात व देवाने प्रकट केलेल्या ज्ञानाने चालण्याचे बोध करतात (१२:९-१४).

पार्श्वभूमी

शलमोनाला असामान्य ज्ञान व बुद्धी असल्याचे या पुस्तकातून व्यक्त होते. दाविदाने आपल्या मुलांची बुद्धिमत्ता ओळखली होती. १ राजे २:६-९. त्यानंतर देवाने त्याच्यावर ज्ञानाची अधिक ओतणी केली होती. त्याला देवापासून सुबुद्ध ऱ्हदय प्राप्त झाल्यानंतर (१ राजे ३:७-१२) उत्तम निर्णय देण्याबाबत शलमोनाची कीर्ती पसरली होती (१ राजे ३:१६-२८). त्याच्या कीर्तीमुळे राजे त्याच्याकडे आकर्षित झाले होते (१ राजे ४:३४). शिवाय त्याने कवने व नीतिसूत्रेही लिहिली होती (१ राजे ४:३२, १२:९). त्याचे हे सर्व कार्य साधुसंतांच्या तोडीचे होते. ईयोबाप्रमाणे शलमोनाचे ज्ञान, संपत्ती व मालमत्ता पूर्वेकडील सर्व लोकांहून अधिक होती (१ राजे ४:३०; ईयोब १:३). शलमोनाच्या अनुभवापेक्षा त्याने मांडलेल्या तत्त्वांचा अभ्यास व लागूकरण केल्याने वाचकांना या पुस्तकाचा फायदा होतो. आयुष्यातील अगदी आव्हानपर प्रश्नांना उत्तर देणे हा या पुस्तकाचा उद्देश आहे. काही प्रश्न शलमोनाच्या जीवनातील विसंगतीमुळे उद्भवतात. त्यामुळे काही लोक उगाच या पुस्तकावर संशय घेतात. पण अगदी मूर्खपणाने वर्तन करूनही शलमोनाने विश्वास सोडला नव्हता (१२:१३,१४). देव सर्व कृत्यांनी झाडाझडती घेईल याची त्याला पूर्ण जाणीव आहे म्हणूनच देवाचे भय धरून आज्ञापालनाचा तो बोध करतो. पुढील सर्व पिढ्यांना मोलवान संदेश देण्यासाठी व ज्ञानी, देवाचे दर्शन झालेलाही पतन पावू शकतो हे दाखवून देण्यासाठी देवाने त्याला या सर्व अनुभवांमधून जाऊ देऊन त्याचे जिवंत उदाहरण आपल्यासमोर ठेवले.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

१. शलमोनाच्या वैयक्तिक जीवनयात्रेखेरीज येथे काही ऐतिहासिक कथन आढळते. या राजेशाही संताने उच्च अपेक्षेने जीवनाविषयी अभ्यास केला. पण त्यांतील त्रुटींमुळे तो शोक करतो कारण त्या शापामुळे आल्याचे तो मान्य करतो

(उत्पत्ती ३:१४-१९). देवाचे गौरव व्हावे म्हणून नव्हे तर देवाचे आशीर्वाद वैयक्तिक सुखासाठी वापरून शलमोनाने आपले जीवन उधळपट्टी करून वाया घालवले त्यामुळे त्याला झालेल्या वेदनांचे आत्मवृत्त हे पुस्तक कथन करते. अशी खेदजनक चुकीची कृती करू नये म्हणून पुढच्यास सर्व पिढ्यांसाठी तो हे इशारादाखल लिखाण करतो (१करिंथ १:१८-३१; २:१३-१६).

२. "व्यर्थ" हा शब्द जीवन हे देवाशिवाय निष्फळ असल्याचे दर्शवतो. जीवनाविषयीच्या ज्या गोष्टी समजणे अवघड आहेत त्यांच्याविषयी हा शब्द बोलतो. हा शब्द ३७ वेळा आला आहे. जगिक गोष्टी व महत्वाकांक्षांचा पाठपुरावा केल्यास त्यातच अंत होतो. त्यातून रिक्तताच हाती येते. पौलही जेव्हा लिहितो की पृथ्वी व्यर्थतेच्या स्वाधीन झाली आहे (रोम ८:१८-२९) तेव्हा तो शलमोनाचे हेच असमाधान व्यक्त करताना दिसतो. शापाच्या परिणामांच्या अनुभवाने (उत्पत्ती ३:१७-१९) त्याला जीवन हे वाऱ्याचा पाठलाग केल्यासारखे वाटते.

३. "मनुष्य या भूतलावर जे परिश्रम घेतो त्याचा त्याला काय लाभ?" हा प्रश्न शलमोन पुन्हा पुन्हा विचारतो (१:३; २:२४; ३:९). ह्याच पेचावर त्याने भर दिला आहे. देवाच्या निर्मितीचे अंतर्गत कार्य समजण्याची अशक्यता आणि शलमोनाच्या वैयक्तिक जीवनात देवाने केलेला पुरवठा याचा राजाला खोलवर त्रास होत होता. ईयोबाला पण याच गोष्टींचा त्रास होत होता. पण सर्वांचा खात्रीने न्याय होणार ही गोष्ट प्रकर्षाने समोर येत होती. देवाच्या येणाऱ्या न्यायाच्या प्रकाशात पाहाता देवाच्या ओळखीत व त्याच्या सेवेसाठी जगलेले जीवनच फलदायी होणार होते. इतर कोणत्याही प्रकारचे जीवन निरर्थक, निराशाजनक व अस्वस्थ करणारे होते. "जगात मौजमजा करून सुख भोगणे "हा मुख्य मुद्दा आहे. पण देवाच्या न्यायाशी समतोल राखून देवावरील विश्वासाच्या साखळीने बांधून शलमोन वाचकांना खिळवून ठेवतो. आज्ञांकितपणाच्या मार्गावर राहून, यहोवाच्या येणाऱ्या न्यायाविषयी भय न धरता, या जगातील जीवनाचा सुखभोग घेताना समतोल ढळू दिल्याने शलमोनाला काही काळ खूप यातना सहन कराव्या लागल्या. अखेर त्याने आज्ञांकितपणाची कास धरण्याचे सूत्र ग्रहण केले. शलमोनाच्या वैयक्तिक जीवनाचे खेदजनक परिणाम झाले. तरी त्या जोडीला त्याला असामान्य ज्ञानाची आंतरदृष्टी होती. त्यामुळे त्याचे उपदेशकाचे पुस्तक सर्व विश्वासी जनांना इशारा देते व विश्वासात वृद्धी होण्यास मदत करते (२:१-२६). हे पुस्तक आपल्याला हेच सांगते की आपले अस्तित्व, परिश्रम व नित्याच्या गरजांचा पुरवठा यामागे देव असतो. हे आपण मान्य केले व देव जे काही पुरवील ते गुपचुप स्वीकारले तर आपण विपुल जीवन जगू शकू (योहान १०:१०). पण जर देवाला बाजूला सारून सुखी व संतुष्ट होण्याचा आपण प्रयत्न करू तर आपण कितीही संचय केला तरी आपले जीवन निष्फळ ठरेल.

विचारासाठी विशेष मुद्दे

"सर्व काही व्यर्थ आहे" हाच मुद्दा हे पुस्तक समोर ठेवते . हा शब्द तीन प्रकारे वापरला आहे व प्रत्येक वेळा मनुष्याच्या भूतलावरील कृतीने गुणवैशिष्ट्य तो स्पष्ट करतो.

१. ते वाफेसारखे विरणारे (याकोब ४:१४) किंवा क्षणभंगुर आहे

२. "निष्फळ" किंवा "निरर्थक "आहे. ते मानवाच्या शापित अवस्थेवर लक्ष केंद्रीत करते. आणि मानवाच्या जगिक अनुभवांचे परिणाम कमजोर असल्याचे दाखवते.

३. सर्व काही "अनाकलनीय" किंवा अगम्य आहे. जीवनाच्या अनुत्तरित प्रश्नावर ते विचार करायला लावते.

या तिन्ही अर्थांनी शलमोनाने हा शब्द वापरला आहे. वचनाचा संदर्भ लक्षात घेतल्यास नेमक्या कोणत्या अर्थाने तो शब्द वापरला आहे ते वाचकाच्या लक्षात येते. अगम्य व अनाकलनीय हा शब्द बहुधा देवाचे भय, उद्देश व रहस्ये या संदर्भात वापरला आहे. शलमोनाचा निष्कर्ष असा आहे की "देवाचे भय धरा व त्याच्या आज्ञा पाळा" (१२:१३,१४). या पुस्तकाच्या सारापेक्षा या सूत्राला जास्त महत्त्व आहे. उत्तम जीवनाची आशा केवळ हेच करण्यावर आहे. सार्वभौम देवाला विश्वास व आज्ञापालनाचे प्रतिसाद देणे हीच केवळ विचारपूर्वक करण्याची कृती होय. भूतलावरील सर्व कार्याची तो अचूक नोंद घेतो. त्या प्रत्येकाचा समय त्याच्या नेमलेल्या वेळेप्रमाणे असतो. पण तो तेवढ्याच प्रमाणात तो उघड करीत राहातो. त्याच्या परिपूर्ण ज्ञानाने तो सर्व मनुष्यांना हिशेब देण्यासाठी जबाबदार धरतो. जे देव व त्याच्या वचनाकडे गांभीर्याने पाहाणे टाळतील त्यांचा व्यर्थ जीवनामुळे भयानक नाश होईल. मनुष्याची कृत्ये, कामे, त्याची वरदाने व त्याचे मर्यादित समाधान यावर तो उहापोह करतो. यशस्वी होण्यासाठी तो ज्ञानाची भूमिका वारंवार सांगतो. देव सर्व तपशील प्रकट करत नाही हे समजून घ्या असेही शलमोन आवर्जून सांगतो. एदेनातील पतनावरून तो निष्कर्ष काढतो की दैवी आशीर्वादाचा व दैवी न्यायाचा उपभोग घेण्याची सर्वांनी तयारी केली पाहिजे.

रूपरेषा

(I) प्रस्तावना व काव्य. १:१-२:११

(II) शलमोनाचा शोध. १:१२-६;९

(III) शलमोनाचे निष्कर्ष. ६:१०-१२:८

- **(अ)** मनुष्याचे ज्ञान. ७:१-८:१७
- **(ब)** मानवाच्या मागे काय लागले आहे ते तो जाणत नाही. ९:१-११:६
- **(क)** मनुष्याने जीवनाचा सुखभोग घ्यावा पण पाप करू नये कारण सर्वांचा न्याय होणार आहे. ११:७-१२:८

(IV) शलमोनाचा अखेरचा सल्ला. १२:९-१४

प्रकरण २२

गीतरत्न

काव्यात्मक पुस्तक

प्रस्तावना

जसे राजांचा राजा, किंवा परम पवित्र स्थान म्हणावे तसे या पुस्तकाला "गीतांचे गीत" असे म्हणतात. शलमोनाच्या १००५ गीतांमधले हे सर्वोत्तम गीत समजले जाते. देवाचा सन्मान करणारे संगीत म्हणजे गीत असे म्हणतात. नवे गीत गाऊन ते देवाला सादर करतात. देवच ते नवे गीत आपल्या मुखात घालतो. ते ऐकल्यावर लोक देवाचे भय धरतात व देवावर विश्वास ठेवतात. नवे गीत दहातारी वीणा या तंतुवाद्यावर सादर करीत.

लेखक व काळ

ख्रि पू ९७१ ते ख्रि पू ९३१ या काळात असलेल्या शलमोन राजाने हे पुस्तक लिहिले. त्याचे या पुस्तकात सात वेळा नाव आले आहे. त्याची ही लेखनशैली असून त्याला संगीताचे वरदान असलेले दिसते. शलमोनाने त्याच्या ४० वर्षांच्या एकसंघ इस्राएलच्या राजवटीच्या कारकीर्दीत केव्हातरी ते लिहिले. ते काव्यात्मक ज्ञानांचे साहित्य म्हणून वाचावे. त्यात ११७ वचने आहेत.

पार्श्वभूमी

या प्रेमगीतात दोन व्यक्तींचे वास्तव जीवन रेखाटले आहे. शलमोनाच्या राजपदाचा पाच वेळा उल्लेख आला आहे. राजाला "वल्लभ" "प्रियकर" म्हणून संबोधले आहे. शुनेमकरीण अंधुक दिसते. गालीलच्या दक्षिणेकडील इज्रेलपासून उत्तरेस तीन मैलांवर असलेल्या शुनेमची ती अपरिचित स्त्री दिसते. तिच्या परिवारासाठी शलमोनाच्या दरबारात काही नोकरी दिलेली असावी. ती शलमोनाची पहिली पत्नी असावी. पुढे ६९९ पत्नी व ३०० उपपत्नी ठेवण्याचे पाप करण्यापूर्वीची ती पहिली पत्नी असावी. यरुशलेमच्या कन्या, घरातील कामगार, शलमोनाचे मित्र, शुनेमकरणीचे भाऊ अशी छोटी छोटी पात्रे या कथानकात आढळतात. या दांपत्याच्या मिलनावर देवाचा आशीर्वाद असल्याचे दिसते. गीताच्या उपशीर्षकांचा वाचक पाठपुरावा करू शकतो.

शहरी व ग्रामीण अशी दोन चित्रे रेखाटलेली दिसतात. यरुशलेमच्या उत्तरेकडील डोंगराळ भागात काही नाट्य घडलेले दिसते. तेथे शुनेमकरण वास्तव्यास होती (६:१३). आणि शलमोन तेथे मेंढपाळ व द्राक्षमळयांचा प्रमुख होता (उपदेशक २:४-७). शहरी वर्णनात लग्नसोहळा व पुढे शलमोनाच्या वास्तव्याच्या काळेच्या नोंदी आहेत (३:६ ते ७:१३). पहिला वसंत २:११-१३ मध्ये तर दुसरा वसंत ७:१२ मध्ये दिसतो. घटनांचा कालक्रम लक्षात घेतल्यास तो १ ते २ वर्षांइतक्याच कालावधीतील घटनांचा वृत्तांत देतो.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानांचे मुद्दे

१. यहूदी लोक हे पवित्र लिखाण मानतात. रूथ, एस्तेर, उपदेशक, विलापगीत व गीतरत्न यांना "पाच गुंडाळया " व "परमपवित्र" गीते संबोधतात आणि ती वल्हांडण सणात ती वाचतात. ८:६ खेरीज परमेश्वराचा यात स्पष्ट उल्लेख आढळत नाही याचे नवल वाटते. ईश्वरी सिद्धांत यात दिलेला नाही.

२. विवाहबाह्य संबंधात असलेल्या वासनांचे दुरुपयोग करणे वा ब्रह्मचर्य अशा दोन टोकांच्या विपर्यासांकडे पाहिले तर हे प्राचीन प्रेमगीत शुद्ध वैवाहिक प्रेम व श्रृंगार उच्च प्रीतीने सादर करते. देवाने आखून दिलेली विवाहाची योजना इतर शास्त्रभागात मांडली आहे ती विस्ताराने शलमोनाने येथे चितारली आहे. या चित्रात त्याने पती-पत्नीसंबंधांतील लावण्य, सौंदर्य, लैंगिक घनिष्ठता रंगवली आहे. हे गीत शास्त्रवचनांशी मिळते जुळते आहे. पुढील वचनांमध्ये त्याची विस्ताराने मांडणी केली आहे. उदा. उत्पत्ती २:२४; स्तोत्र ४५; नीति ५:१५-२३;१ करिंथ ७:१-५;१३:१-८; इफिस ५:१८-२३; कलसै ३:१८,१९ व पेत्र ३:१-७. या गीतातील वर्तनाचा गाभा इब्री १३:४ हा आहे. "लग्न सर्वस्वी मान्य असावे व अंथरूण निर्दोष असावे. जारकर्मी व व्यभिचारी यांस देव दंड करील".

काही विशेष मुद्दे

अनेक लोक या गीतांचे रूपकात्मक पद्धतीने अर्थ लावतात व दावा करतात की या पुस्तकाला ऐतिहासिक बैठक नाही. तर काही लोक देवाचे इस्राएलांवरील व ख्रिस्ताचे मंडळीवरील प्रेम व्यक्त केल्याचा दावा करतात. म्हणूनच काही गीतांत त्याचे शारोनातला गुलाब असे वर्णन केल्याने आढळते. ते कथानकाची वास्तवता मान्य करतात पण असा निष्कर्ष काढतात की यात ख्रिस्त या वराचे मंडळी या वधुवरील प्रेम रेखाटले आहे.
गीतरत्नाच्या अभ्यासाची समाधानकारक पद्धत म्हणजे ते जसे दिसते तसे वाचून ऐतिहासिक पार्श्वभूमी डोळ्यांसमोर ठेऊन अभ्यासावे. काव्यकल्पना समजून घेण्यासाठी वारंवार वापरलेले वास्तव वर्णन समजून घ्यावे. शलमोन काय मांडत आहे ते समजून घ्यावे. (१) त्याचे दरबारातील दिवस (२) त्याच्या पहिल्या विवाहाचा आरंभीच्या काळ व (३) त्यानंतरच्या बऱ्यावाईट दिवसापासून हे शाही दांपत्य कसे प्रौढ बनत जाते. उत्पत्ती २:२४ मधील विवाहाचा प्राचीन बोध या पुस्तकात विस्ताराने चितारला आहे. आयुष्यभर गुण्यागोविंदाने आध्यात्मिक गीत गात गात वैवाहिक जीवन कंठण्याची त्यात तरतूद केली आहे. देवाने हे पुस्तक दिले आहे. त्यात देवाचा हेतू हाच की अत्यंत मोलवान मानवी संबंध असलेले व जीवनाची कृपा लाभलेले (१ पेत्र ३:७) श्रृंगारिक व सौंदर्यपूर्ण वैवाहिक जीवन आपण जगावे.

रूपरेषा

उत्पत्ती २:२४ मध्ये देवाने लावून दिलेली वैवाहिक जीवनाची चाकोरी सोडणे, जडणे व एकदेह होणे ही आहे. तीच या कथानकात लागू केल्याने दाखवून दिले आहे.

(I) सोडणे. १:२-३:५

(II) जडणे: विवाहबद्ध होणे. ३:६-५:१

(III) एकदेह होणे. ५:२-८:१४

(अ) पहिले असहमत ५:२-६:३

(ब) पुनरुद्धार ६:४-८:४

(क) कृपेत वृद्धी ८:५-१४

प्रकरण २३ **मोठ्या संदेष्ट्यांची पाच पुस्तके**

यशया

मोठ्या संदेष्ट्याचे पुस्तक

अलीशा, यहोशवा, येशू व यशया या नावाचा एकच अर्थ आहे, "प्रभू तारण आहे".

लेखक व काळ

स्वत: यशया लेखक आहे. तो आमोजाचा पुत्र आहे. यहूदा व यरुशलेमात ख्रि पू ७३९ ते ख्रि पू ६८३ या काळात उज्जीया (अजऱ्या), योथाम, आहाज व हिज्कीया या चार राजांच्या राजवटीत त्याने संदेष्ट्याची सेवा केली. तो उच्च राजघराण्यातून आलेला दिसतो कारण त्याला थेट राजमहालात प्रवेश असे (७:३). आणि याजकांशी त्याचे धनिष्ठ संबंध होते (८:२). त्याचा विवाह झाला होता. त्याला दोन पुत्र होते. त्यांची नावे चिन्हात्मक व अर्थपूर्ण होती. "शहार - याशूब" याचा अर्थ "अवशेष परत येईल" (७:३). "महेर शालाल हाश बज" याचा अर्थ "लूट त्वरा करते, पारध घाई करते" (८:३). जरी आपल्या सेवेला फळ येणार नाही आणि लोक आपला इशारा व बोध याकडे लक्ष देणार नाहीत हे त्याला स्पष्ट माहीत होते (६:९-१३), तरी उज्जीया राजा मरण पावला व देवाने त्याला संदेश देण्यास पाचारण केले तेव्हा तो आनंदाने तयार झाला. यरुशलेमातच लहानाचा मोठा झाल्याने राष्ट्राच्या राजकीय व धार्मिक सल्लागार म्हणून त्याची निवड योग्यच होती. यशया हा होशेय व मीखाला समकालीन होता. त्याची लेखनशैली अष्टपैलू असून त्याच्या विवेचनात हात धरणारा कोणी नव्हता. तो विद्वत्ताप्रचुर रूपके वापरतो. त्याची शब्दसमृद्धी अफाट दिसते. त्याने हिज्कियाचे चरित्रही लिहिले. तो ख्रि पू ६८१ पर्यंत तरी नक्कीच जगला. कारण ३७:३८ मध्ये तो सन्हेद्रीबच्या मृत्यूचा उल्लेख करताना दिसतो. मनश्शे राजाने त्याला तलवारीने चिरले अशी वदंता आहे (इब्री ११:१७). ख्रि पू ६९५ ते ख्रि पू ६४२ मध्ये मनश्शेची राजवट झाली.

पार्श्वभूमी

उज्जीया राजाच्या ख्रि पू ७९० ते ख्रि पू ७३९ या ५२ वर्षांच्या कारकीर्दीत यहूदी राष्ट्र लष्करी व व्यापारीदृष्ट्या खूप विकसित राष्ट्र झाले होते. बंदर होते, दीपस्तंभ व तटबंदी बांधली होती. पण यहूदाचा आध्यात्मिक ऱ्हास झाला होता. उज्जीयाने याजकाचा हक्क स्वत: चालवून वेदीवर धूप जाळल्यापासून ऱ्हासाला सुरुवात झाली होती (२ राजे १५:३,४, २ इति २६.१६-१९). त्याच्यावर देवाचा क्रोध आला व तो कोडी झाला. त्यातून तो बरा झालाच नाही (२ राजे १५:५,२ इतिहास २६:२०,२१). त्याचा पुत्र योथामने त्याच्या मृत्युपूर्वीच राजसूत्रे हाती घेतली (ख्रि पू ७५० - ख्रि पू ७३१) तिग्लथ पिलेसरच्या हस्ते अश्शूर ही आंतरराष्ट्रीय नवी सत्ता उदयास आली. योथाम राजा असता यहूदाला उत्तरेकडील इस्राएल राष्ट्र व सिरीयाकडून विरोध व्हायला सुरुवात झाली (२ राजे १५:१९ ते ३७). योथामही उत्तम योद्धा व बांधकाम करणारा होता. पण आत्मिक भ्रष्टाचार चालूच होता (२ इतिहास २७:१,२).
आहाज वयाच्या २५ व्या वर्षी राजा झाला, वयाच्या ४१ व्या वर्षापर्यंत त्याने राज्य केले (ख्रि पू ७३५ ते ख्रि पू ७१५). इस्राएल व सिरीयाने अश्शूरला थोपवायला युती केली पण यहूदास त्यांच्याशी मित्रत्व करण्यास आहाजाने नकार दिला (यशया ७:६; २ राजे १६:५). म्हणून उत्तर राष्ट्रांनी त्याला गादीवरून झुगारून देण्याचा मनसुबा रचला. त्यामुळे युद्ध झाले (ख्रि पू ७३४). घाबरून आहाजाने अश्शूरच्या राजाकडे कुमक मागितली (२ राजे १६:७). अश्शूरच्या

राजाने आनंदाने प्रतिसाद दिला (ख्रि पू ७३२). दमास्कस, गज्जा व गिलाद काबीज केले व गालील आणि गिलाद गुलामीत नेले. आहाजाने अश्शूरशी मैत्री केल्याने मूर्तिपूजक विदेश्यांशी परिचय झाला. त्यामुळे शलमोनाच्या मंदिरात त्याने मूर्तींची स्थापना केली (२ राजे १६:१०-१६;२ इतिहास२८:३). त्याच्याच कारकीर्दीत ख्रि पू ७२२ मध्ये अश्शूरने उत्तर इस्राएलची राजधानी शोमरोन ही जिंकून घेतली आणि इस्राएलच्या मातब्बर लोकांना बंदीवासात नेले (२ राजे १७:६,२४).

दक्षिण राज्याच्या हिज्कीया राजाने ख्रि पू ७१५ ते ख्रि पू ६८६ पर्यंत २९ वर्षे राज्य केले (२ राजे १८:१,२). राजा होताच त्याने सुधारणांवर भर दिला. अश्शूरच्या महासत्तेस कर देण्याचे वचन दिले. ख्रि पू ७०१ मध्ये हिज्कीयाला जीवघेणा आजार झाला. पण त्याने देवाला प्रार्थना केली आणि देवाने त्याला १५ वर्षे वाढवून दिली (२ राजे २०; यशया ३८). बाबेलच्या राजाने त्याचे आजारपण व बरे होण्याच्या संधीचा फायदा उठवला (२ राजे २०, यशया ३९). अंतर्गत कलहामुळे अश्शूर दुर्बल बनले असता हिज्कीयाने त्यांना कर देणे बंद केले. म्हणून ख्रि पू ७०१ मध्ये अश्शूरच्या सन्हेद्रीब राजाने हल्ला केला. या प्रक्रियेत कितीतरी यहूदी गावे उध्वस्त केली. त्यांना लुटले व बंदीवान करून अश्शूरास नेले. लाखीशचा वेढा चालू ठेवून यरुशलेमास वेढा देण्यास त्याने सैन्य धाडले (यशया३६:२-३७:८). ही मोहीम अपयशी ठरली. दुसरा प्रयत्न करून यरुशलेमास ताबडतोब शरण येण्याची आज्ञा केली (यशया ३७:९). यशयाने उत्तेजन व धैर्य दिल्याने हिज्कीयाने शरण जाण्यास नकार दिला. येणाऱ्या आपत्तींचे अंदाज आल्याने भिऊन सन्हेद्रीब निनवेस परत गेला. तो पुन्हा यहूदावर चाल करून आलाच नाही.

ऐतिहासिक व सैद्धांतिक मुद्दे

राष्ट्रांची दोन शकले पडली, त्या काळात यशयाने संदेश दिला. विशेष करून दक्षिण राष्ट्र यहूदास त्याने संदेश दिले. तेव्हा त्याच्या काळातील रिक्त विधिसंस्कार त्याने तिरस्करणीय लेखले (१:१०-१५). पुष्कळ लोक मूर्तिपूजेत पतन पावले होते, त्यांना उद्देशून संदेश दिला (४०:१८-२०). प्रभूपासून दूर गेल्यामुळे आगामी काळात येणाऱ्या बाबेलच्या बंदीवासाचे भाकित त्याने पाहिले (३९:६-७). त्याच्या हयातीतच पूर्ण झालेल्या काही भाकितांमुळे त्याला जणु भाकितांचे अधिकारपत्रच प्राप्त झाले. यशयाच्या भाकिताप्रमाणेच सन्हेद्रीबचा डाव अपयशी ठरला होता. यशया अध्याय ३६-३८. यशयाच्या भाकितानेच देवाने हिज्कीयाचा प्राणघातक आजार बरा केला होता. कोरेश हा पारसाचा राजा जन्माला येण्यापूर्वीच देवाने त्याला यहूद्यांना बंदीवासातून सोडवणारा म्हणून जाहीर केले होते (४४:२८; ४५:१). ख्रिस्ताच्या पहिल्या आगमनाची भाकिते पूर्ण झाल्याने यशयाच्या भाकितांच्या सत्यतेचे पुरावे अधिकच वाढले आहेत (७:१४; ९:६,७; ५२:१३ ते ५३:१२). या पूर्ण झालेल्या भाकितांमुळेच ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाची भाकितेही अक्षरश: जशीच्या तशी पूर्ण होतील याला खात्रीलायक पुष्टी मिळते.

इतर संदेष्ट्यांच्या तुलनेत यशया पुढे येणाऱ्या प्रभूच्या दिवसाचा तपशील व त्यानंतरच्या घटनांचा तपशील अधिक देतो. इस्राएलांच्या या भूतलावरील भावी घटनांचे बारीकसारीक तपशील तोच सर्वाधिक देतो. निसर्गात व प्राण्यांच्या वागणुकीत होणारे बदल, यरुशलेमचे राष्ट्रामधील स्थान, दु:खसहन करणाऱ्या सेवकाचे म्हणजे ख्रिस्ताचे नेतृत्व व इतर घटनांचे तो तपशील देतो. त्याने भाकितांनी देवाच्या योजनेचे सुरेख चित्रच रेखाटले आहे. त्याने घटनांचा अचूक क्रम व मध्यंतरांचे समय न देता भाकितांचे हुबेहूब चित्र रंगवले आहे. उदा. येशूच्या दोन आगमनांच्या मधल्या मध्यंतराचे काळ न देता ते चित्र जसे दिसेल तसे वर्णन करून ही भाकिते दिली. दोन्ही आगमनांच्या भाकितांची

क्रमवार रचना केलेली नाही. उदा. प्रकटीकरणात योहान तात्पुरते जग व अनंतकालिक राज्य यातील भिन्नता स्पष्ट दाखवतो तशी यशया दाखवत नाही. देवाने प्रकटीकरणाचे पुस्तक उपलब्ध करून देऊन आपल्या योजनेचा कार्यक्रम दाखवून दिला आहे. अशा रीतीने यशयाने दिलेली भाकिते नंतरच्या संदेष्ट्यांकडून स्पष्ट करून सांगितली आहेत.

यशयाला सुवार्ताप्रसारक संदेष्टा असेही म्हणतात. तो इस्राएलांवरील देवाच्या कृपेविषयी बरेच काही बोलतो. विशेषत: अखेरच्या २७ अध्यायांमध्ये तो हा मुद्दा हाताळतो. त्यांचे मध्यवर्ती स्थान घेणारा ५३वा अध्याय देवाच्या "वधलेल्या कोकरा" चे चित्र रेखाटतो .

अर्थ समजून घेण्याचे मुद्दे

यात अशी बरीच वचने आहेत की त्यांचा अर्थ समजून घेणे जड जाते. त्यातील काही यशयाची भाकिते अक्षरश: पूर्ण होतील का यावर लक्ष केंद्रित करतात. देवाने आपल्या कार्यक्रमातून इस्राएलांना वगळून त्या जागी मंडळीलाच कायमचे स्थान दिले की काय असे वाटू लागते. मग इस्राएलांना भावी आशाच नाही की काय असा संभ्रम पडतो. पण पुढे इस्राएलांच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांविषयीचे असंख्य शास्त्रभाग या गोष्टींना दुजोरा देतात की देवाने या इस्राएलांच्या जागी दुसऱ्या इस्राएलचा नवा पर्याय तयार केलेला नाही. म्हणूनच इस्राएलाविषयीच्या देवाच्या विश्वासूपणाबद्दल यशया बरेच काही बोलतो. आणि ज्या लोकांना निर्मिले व निवडले त्यांना तो धिक्कारणार नाही असे सांगतो (४३:१). हे राष्ट्र त्याच्या तळहातावर आहे आणि यरुशलेमच्या भिंती सतत त्याच्या नेत्रांसमोर आहेत (४९:१६). तो अब्राहामाशी केलेल्या कराराच्या वचनास सतत कटिबद्ध आहे. तो त्यांना आपल्याकडे वळवील व ती कराराची वचने पूर्ण करीलच करील व भावी काळात त्यांना आशीर्वाद देईल (५५:१०-१२). गतकाळात घडलेल्या घटनांवरून इस्राएलांविषयीच्या अनेक भाकितांची पूर्तता झाली आहे. त्यामुळे उरलेली भाकिते अक्षरश: जशीच्या तशी पूर्ण होणार नाहीत असे म्हणणे चुकीचे ठरेल. अशा मतांना वचनाचा आधारही नाही. त्यामुळे इस्राएलांस देण्यात आलेली ही अभिवचने मंडळीला प्राप्त होतील हा विचार तर निकालातच निघतो.

अभिवचनांमध्ये दाविदाला देण्यात आलेले राज्य दाविदाचेच आहे. मंडळीचे नाही. मंडळीसाठी व विदेश्यांसाठी देवाची स्वतंत्र योजना आहे. यरुशलेमचा भूतलावर भावी काळी उद्धार होणार आहे. स्वर्गात नव्हे. ख्रिस्त स्वत: या पृथ्वीवर नंतर नवे आकाश व नव्या पृथ्वीवर विश्वासी इस्राएल व सर्व विश्वासी जनांसह राहाणार आहे (प्रकटी २२:१-३).

रूपरेषा

(I) न्याय. १:१ ते ३५:१०

- (अ) यहूदा व यरुशलेमविषयी. १:१-१२:६
- (ब) तारण व न्यायाचे संदेश. १३:१-२३:१८
- (क) जगाच्या न्यायाद्वारे इस्राएलांस मुक्ती. २४:१-२७:१३
- (ड) मिसराशी मैत्री केल्याबद्दल इशारा. २८:१-३५:१०

(II) ऐतिहासिक मध्यंतर. ३६:१-३९:८

(II) तारण. ४०:१ ते ६६:२४

(अ) बंदीवासातून मुक्ती ४०:१-४८:२२; बाबेलच्या बंदीवानांचे सांत्वन ४०:१-३१; इस्राएलांच्या दु:खाचा शेवट ४१:१-४८:२२.

(ब) प्रभूच्या सेवकाचे दु:खसहन ४९:१-५७:२१; सेवकाचे कार्य ४९:१-५२:१२; सेवकाच्या द:खसहनाद्वारे मुक्ती ५२:१३-५३:१२; या मिळालेल्या मुक्तीचे परिणाम ५४:१-५७:२१.

(क) देवाच्या लोकांचे भावी गौरव ५८:१-६६:२४; दोन प्रकारचे धर्म ५८:१-१४; इस्राएलांनी पापाचा त्याग करावा म्हणून विनवणी ५९:१-१९; भावी सीयोन ५९:२०-६१:११; जवळ येऊन ठेपलेली सीयोनाची मुक्ती ६२:१-६३:९; राष्ट्राच्या मुक्तीसाठी प्रार्थना ६३:७-६४:१२; देवाचे इस्राएलांच्या विनवणीला उत्तर ६५:१-६६:२४.

यशयाच्या सेवाकार्याचा काळ व नोंदी: राजे १५-२० अध्याय; २ इतिहास २६-३२ अध्याय व यशयाचे पुस्तक.

प्रकरण २४

यिर्मया

मोठ्या संदेष्ट्याचे पुस्तक

यिर्मयाला काळ ख्रि पू ६२७ ते ख्रि पू ५६१ असून यहूदा बंदीवासात गेल्यानंतरही तो जिवंत होता. यिर्मयाच या पुस्तकाचा लेखक आहे. इतर संदेष्ट्यांच्या तुलनेत तो आपल्या जीवनातील सर्वाधिक प्रसंगांची नोंद देतो. आपली सेवा, त्याच्या श्रोतेगणाने त्याला दिलेला प्रतिसाद, त्याच्या कसोट्यांवर तो मनोभाव व्यक्त करतो. "यिर्मया" या नावाचा अर्थ "यहोवा स्थापतो, नेतो किंवा पाठवतो." पायाभरणीच्या दृष्टिकोनातून "यहोवा फेकतो" असा अर्थ होतो.

लेखक व काळ

यिर्मयाने याजक व संदेष्टा म्हणून सेवा केली. अनानोथ गावच्या हिल्कीया याजकाचा तो पुत्र होता (२ राजे २२:८ मध्ये ज्याला गुंडाळी सापडली तो हा मुख्य याजक नव्हता). आज त्याच्या या गावाचे नाव अनाता असे आहे. यरुशलेमपासून ३ मैलांवर असलेले बन्यामिनाच्या वतनाचे ते गाव आहे. यहूदापुढे प्रत्यक्ष कित्तादाखल असावा म्हणून तो अविवाहित राहिला (१६:१-४). बारूख शास्त्र्याने त्याला सेवेत साह्य केले. यिर्मया त्याला कथन करीत असे व बारूख लिहीत असे व त्याची संदेशवचने जतन करून ठेवीत असे. यिर्मयाला "रूदन करणारा" किंवा "अश्रू ढाळणारा" संदेष्टा म्हणतात. त्याने जीवनात फार संघर्ष केला. बाबेलच्या हल्ल्याद्वारे होणाऱ्या न्यायाविषयी त्याने केलेल्या भाकितांमुळे मनोवेदना होऊन त्याला संघर्ष करावा लागला. त्याला धाकदपटशा दाखवला, त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न झाला, त्याला खोड्यात अडकवले, अटकेत ठेवले, यहोयाकीमापासून जबरदस्तीने पळवून लावण्यात आले, खोट्या संदेष्ट्यांनी जाहीरपणे त्याचा अपमान केला व त्याला खाड्यात टाकले.
यिर्मयाने मुख्यत्वे यहूदातील आपल्या लोकांमध्ये सेवा केली. कालांतराने विस्तृतपणे ती इतर राष्ट्रांपर्यंत पोचली. हल्लेखोर राष्ट्रांकडून न्याय होऊ नये म्हणून पश्चाताप करण्याची त्याने आपल्या लोकांस विनवणी केली. पण हल्ला होणे अटळ झाले कारण यहूदाने पश्चात्ताप केला नाही. म्हणून बाबेलच्या हल्लेखोरांना प्रतिकार करू नये अशी यिर्मयाने लोकांना मनधरणीचे केली यासाठी की शत्रुंनी त्यांचा पुरता विध्वंस करू नये (अध्याय२७). अनेक राष्ट्रांवर येणाऱ्या न्यायाची त्याने भाकिते केली (२५:१२-४६:५१).
त्याने पन्नास वर्षे सेवा केली. यहुदाचा राजा योशिया याच्या कारकीर्दीच्या १३ व्या वर्षांपासून ख्रि पू ६२७ मध्ये त्याने सेवेला सुरुवात केली (१:२), ते ख्रि पू ५८६ मध्ये बाबेलात यहूद्यांचा पाडाव झाल्यानंतरही त्याने सेवा केली (अध्याय ३९, ४०, ५२). ख्रि पू ५८६ नंतर अवशिष्ट यहूद्यांसोबत त्याला मिसरात पळून जावे लागले (अध्याय ४३,४४).
तो ख्रि पू ५७० मध्येही सेवा करताना दिसतो. ४४:३० चे स्पष्टीकरण लक्षात घ्यावे त्या भाकितामध्ये मिसऱ्याच्या राजाला देवाने शिक्षा जाहीर केली होती. ५७० मध्ये फारो हा अमॅसिसच्या हाती सापडला व ५६८-६७ च्या दरम्यान बाबेलचा राजा नबुखद्नेसरच्या हल्ल्यास मार्ग मोकळा झाला. रब्बींच्या नोंदींमध्ये आढळते की या हल्ल्यात यिर्मयाला बाबेलात बंदीवान करून नेण्यात आले. या पुस्तकातील ख्रि पू ५६१ चा देखावा नोंदवेपर्यंत तो जिवंत होता असे दिसते. तो वयाची ८५-९० वर्षे जगला.

पार्श्वभूमी

यिर्मयाच्या काळची परिस्थिती २ राजे अध्याय२२-२५ व २ इतिहास ३४-३६ या अध्यायांवरून लक्षात येईल.
यिर्मयाचे संदेश पुढील चित्र रेखाटतात.

(१) त्याच्या लोकांचे पाप.

(२) देव कोणास हल्ला करावयास पाठवील,

(३) कडक वेढा आणि विध्वंसामुळे येणारी आपत्ती. मूर्तिपूजा व इतर पापांमुळे येणाऱ्या देवाच्या न्यायाविषयी त्याने सुमारे ४० वर्षे संदेश दिले (ख्रि पू ६२७ ते ५८६ व त्यानंतरही). त्याची भाकिते यहूदाच्या शेवटच्या पाच राजांच्या कारकीर्दीत पूर्ण झाली. योशीया (ख्रि पू ६४० ते ख्रि पू ६०९). यहोआहाज(ख्रि पू ६०९). यहोयाकीम (ख्रि पू ६०९ ते ख्रि पू ५९८). मग यहोयाखीन (ख्रि पू ५९८ ते ख्रि पू ५९७) आणि सिद्‌कीया (ख्रि पू ५९७- ख्रि पू ५८६).

यहूदा धडधडीत निंद्य भक्ती करण्याच्या वाईट आत्मिक अवस्थेत होता (अध्याय२). यशयाच्या काळातील आहाज व त्याचा पुत्र हिज्कीया यांनी तर आपल्या मुलांचा मोलेख दैवताला यरुशलेमबाहेरील हिन्नोम खोऱ्यात होम करण्याची प्रथा सुरू केली होती. (ख्रि पू ७३५-७१५). हिज्कीयाने सुधारणा व शुद्धीकरण करूनही मनश्शेने तर मूर्तिपूजा व होम करणे चालूच ठेवले होते. ह्या सर्व गोष्टी यिर्मयाच्या काळापर्यंत चालू होत्या. (७: १८,३१; १९:५;३२:३५). अनेक लोक आकाशराणीची भक्ती करत होते. योशियाने केलेल्या सुधारणा ख्रि पू ६२२ पर्यंत चालू होत्या.अनेक चालीरीती बाह्यत: दडवण्याचा प्रयत्न झाला. पण पाप कॅन्सरप्रमाणे पोखरले गेले होते त्यामुळे उथळ संजीवनानंतर पाप बहरून अधिकच फोफावले. धार्मिक आत्मियता, सचोटी, प्रामाणिकपणा यांचा अभाव होता. तर व्यभिचार, अन्याय, असहायांची पिळवणूक व निंदानालस्ती करण्याचे स्तोम माजले होते. या अपवादाने घडणाऱ्या गोष्टी नव्हत्या तर अंगवळणी पडून गेलेल्या नित्याच्या बाबी झाल्या होत्या.
यिर्मयाच्या काळात राजकीय दृष्ट्या वेगाने काही गोष्टी घडल्या. अश्शूर दुर्बल होत होत अजिंक्य समजली जाणारी त्याची राजधानी निनवे ख्रि पू ६१२ मध्ये धुळीस मिळाली. (नहूमचे पुस्तक वाचा). बाबेलचे नवोदित साम्राज्य लष्करी दृष्ट्या बलाढ्य बनले. अश्शूर, मिसर व इस्राएलचा त्याने पाडाव केला. इस्राएलांवर ख्रि पू ६०५ (दानीएल अध्याय १) मध्ये; ख्रि पू ५९७ (२ राजे२४:१०-१६) मध्ये व ख्रि पू ५८६ (यिर्मया अध्याय ३९,४० व ५०) मध्ये अशा तीन स्वाऱ्या केल्या. योशीयाच्या राजवटी याविषयी योएल व मीखा यांनी भाकित केले होते. यिर्मया, हबक्कूक व सफन्या हे देवाचे खास संदेष्टे होते. यहेज्केल व दानीएल यिर्मयाला समकालीन संदेष्टे होते. भाकितांची महत्त्वाची भूमिका त्यांनी पार पाडली.

ऐतिहासिक व ईश्वरीविज्ञानाचे मुद्दे

(१) यहूदावर येणारा देवाचा न्याय हा यिर्मयाचा मुख्य विषय आहे (अध्याय १-२९). भावी काळी मशीहाच्या राज्यात त्यांचा उद्धार होण्याविषयीची ते आशा देतात (२३-३-८,३०-३३). यशयाने इस्राएलच्या भावी गौरवाविषयी ४०-६६ अध्याय लिहिले. पण यिर्मया तो विषय तितका तपशीलवार हाताळत नाही. बाबेलद्वारे होणारा न्याय अगदी जवळ येऊन ठेपला होता. त्यामुळे त्याच विषयावर व तेव्हाच्या समस्यांवर त्याने लक्ष केंद्रित केले होते. लोक परत माघारी वळणार नाहीत अशा बिंदुपाशी त्यांना आणण्याचा त्याने प्रयत्न केला होता.

(२) जर लोकांनी पश्चात्ताप केला तरच देव राष्ट्राला वाचवणार होता व आशीर्वाद देणार होता. हा मुद्दा वारंवार

हाताळून व कुंभारांचे हुबेहूब चित्र रंगवून याचे स्पष्टीकरण केले आहे (१८:१-११). पुढे यिर्मयाच्या जीवनाविषयी देवाच्या योजना काय आहेत यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्याने देवाच्या संदेशाचा केलेली घोषणा व देवाची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून असलेली त्याची बांधिलकी दाखवली आहे (१:५-१९;१५:१९-२१).

(३) इतर मुद्दे

(अ) इस्राएलने देवापुढे नरमाई दाखवून पहिल्याप्रमाणे प्रेम करावे (२:१-३).

(ब) सेवक म्हणून यिर्मयाचे अश्रू ढाळणे (९:१-१४:१७).

(क) देवाचे इस्राएलांची घनिष्ठ नातेसंबंध होते आणि तो ते जतन करू पाहात होता (१३:११).

(ड) यिर्मयाच्या कसोट्यांप्रमाणे येणारे दु:ख:सहन (११:१८-२३;२०:१-१८) व सर्व संकटात पुरे पडणारे देवाचे सामर्थ्य (२०:११-१३).

(ई) देवाचे वचन जीवनात किती महत्त्वाची भूमिका बजावते (१५:१६).

(फ) ज्या देवाला काहीही अवघड नाही त्याच्यापासून पुनरुद्धार व्हावा या अपेक्षेने विश्वासाला असलेले स्थान. (अध्याय ३२-२७).

(ग) देवाची इच्छा पूर्ण होताना इस्राएलने आपल्या देशात आपले पुनरागमन व्हावे म्हणून प्रार्थना करणे (३३:३,६-१८).

(४) काही आव्हानात्मक वचनांचे अर्थ समजून घेणे.

(अ) ७:१६ व १५:१ मध्ये देव असे का म्हणतो? त्यासाठी पूर्ण ७ वा अध्याय, १९:१५, १योहान ५:१६ वाचा. ते ऐकणार नाहीत. त्यांना हाक मारल्यास प्रतिसाद देऊन उत्तर देणार नाहीत. मूर्तिपूजेशी निंद्य कृती करून देवाचे न ऐकण्याचा निर्धार असल्याप्रमाणे वागून ते देवाचा क्रोध ओढवून घेत आहेत. देवाविरुद्ध त्यांनी आपली मान ताठ केली आहे. देव म्हणतो ज्यांचा परिणाम मरण आहे असे हे पाप आहे म्हणून असे म्हटले आहे.

(ब) यिर्मया १३:४-७ या चिन्हाचा अर्थ काय? हा कमरबंद देवाशी असलेले इस्राएलांचे कराराचे निकटचे नाते त्यांनी देवाचे गौरव करावे यासाठी दर्शवतो.अनैतिकतेने तो मलीन होऊ द्यायचा नाही यावरून राष्ट्राच्या पापाकडे निर्देश केला आहे. पुरून तो सडू दिल्यावरून पापामुळे इस्राएल देवाच्या दृष्टीने काहीही उपयोगाचे नाही हे दर्शवले आहे. ते देवाची वचने न ऐकता हट्टाने मूर्तिपूजा करून निरूपयोगी बनले आहेत. फरात नदीपाशी तो पुरून बाबेलकडे देव त्यांना बंदीवासात नेऊन त्यांचा गर्व हाताळील असा इशारा केला आहे. फरात त्या बंदीवासाच्या स्थानकांचे दर्शक आहे. १००० मैलांच्या त्या प्रवासासाठी "बरेच दिवस " हा शब्द वापरला आहे.

(क) यिर्मया २०:१४-१८ मध्ये एवढे कठोर शब्द का उच्चारले आहेत? पशहूर"चा अर्थ "सुटका जवळ आली आहे" (वचन १). पण वचन ३ मध्ये नाव व अर्थ पार बदलला आहे. त्याचा बाप काही मुख्य याजक नव्हता तर मंदिरात शिस्त राखणारा अधिकारी होता (संपूर्ण २० वा अध्याय वाचा). त्याच्या करणीला योग्य असेच ते नवे नाव होते. न्यायाचे भाकित केल्यावर ७-१८ वचनात यिर्मया उपहासाबद्दल विलाप करतो, कामातून माघारीची भाषा करतो, देवाने उत्तेजन दिल्यावर मदतीची याचना करतो व देवाचे स्तवन करतो. पण आतून ते काम चालू ठेवावे असेच त्याला वाटत राहते. ईयोब ३२:१८,१९; स्तोत्र३९:३; प्रे कृ १८:९;१ करिंथ ९:१६,१७ वाचा. त्याचा अंतरात्मा स्फूर्ती देत होता, संतप्तही झाला होता पण प्रभुचा आत्मा त्याला भिऊ नको व उगा राहू नको असे सांगत उमेद देत राहिला. प्रतिष्ठेची अपेक्षा न करता संदेश देत राहाणे त्याला क्रमप्राप्त होते. देवाने सोपवून दिलेल्या कामात आपण अपयशी

होऊन पतन झाल्याचे शत्रुंनी म्हणू नये असे यिर्मयाला वाटत होते. त्याच्या मनातील घालमेल आपण पाहातो.
(ड) २२:३० मध्ये ख्रिस्ताशी संबंधित असलेल्या यहोयाकीनाच्या राजघराण्याला तो का शाप देतो? प्रथम २२वा अध्याय संपूर्ण वाचा.२ शमुवेल ७:३-१७ मधील दाविदाशी झालेल्या कराराचे येथे स्मरण केले आहे. दाविदाचे संतान इस्राएलांवर राज्य करणार होते. योशीयानंतर यहोआहाज, यहोयाकीम हे पुत्र अधम निघाले. लेवीय१९:१३, अनुवाद२४:१४,१५; मीखा ३:१०, इब्री २:९; याकोब ५:४ वचनांमधील नियम त्यांनी मोडले होते. पुढे यहोयाकीनला तर बंदीवासात नेले. त्याचे पुत्र राज्य करण्याजोगे नव्हते म्हणून त्याच्या संतानाला निर्वंश संबोधण्यात आले आहे. अशा शापाखाली असलेले संतान मरीयेचा पति योसेफ होता. पण येशूचे योसेफाशी रक्ताने संबंध नव्हते. कारण त्याचा जन्म मरीयेद्वारे कुमारीकेपासून झाला होता. त्यामुळे मरीयेच्या राजघराण्यातून नाथानाद्वारे म्हणजे शलमोनाच्या भावाच्या संतानाद्वारे येशू कायद्याने राजपदावर पात्र होता. अशा प्रकारे शलमोनाच्या म्हणजे यहोयाकीनाच्या रक्ताच्या वंशाचा शाप टाळून येशूला राजपदाचा हक्क होता. लूक३:३१,३२; यिर्मया३६:३० पाहा.

(५) ३१:३१-३४ नुसार देव इस्राएल व मंडळीसंबंधी आपला करार कसा पूर्ण करील? मोशेशी केलेल्या करारात इस्राएल लोक अपयशी झाले होते. म्हणून देवाने आध्यात्मिक, दैवी व चैतन्यदायी असा नवा करार केला. त्याद्वारे त्याला जे ओळखतील ते तारणाच्या आशीर्वादाचे सहभागी होणार होते. त्याची परिपूर्ती व्यक्तिगत तर होतीच पण इस्राएल राष्ट्राबाबतही होणार होती (रोम ११:१६-२७). इस्राएलांसाठीही हा करार असल्याचे देव ठामपणे सांगतो. अत्यंत कठीण परिस्थितीत त्यांच्या भूमीवर तो त्यांची प्रस्थापना करील. (अध्याय ३०-३३पूर्ण वाचा). शेवटल्या भोजनाच्या वेळी येशूने सर्व विश्वासी जनांच्या सार्वत्रिक मंडळीसाठी नवा करार स्थापला. (१ करिंथ ११:२५; इब्री ८:७-१३; ९:१५; १०:१४-१७; १२:२४; १३:२० वाचा) १००० वर्षांच्या राजवटीत त्या सर्वांचा संगम होणार आहे.

रूपरेषा

(I) यिर्मयाची पूर्वतयारी. १:१-१९

(II) यहूदास घोषणा. २:१ - ४५:५

(अ) यहूदाला दोषी ठरवणे: २:१- २९:३२ यिर्मयाचे १४ संदेश

(ब) यहूदाचे सांत्वन : नवा करार ३०:१-३३:२६ .

(क) यहूदावरील आपत्ती: ३४:१-४५:५

(III) राष्ट्रावरील न्यायाची घोषणा. ४६;१-५१:६४

(IV) यरुशलेमचे पतन. ५२:१-३४.

प्रकरण २५

विलापगीत

लेखक व काळ

शोक व्यक्त करणारे बायबलमध्ये हे एकमेव पुस्तक आहे . यिर्मयाच या पुस्तकाचा लेखक असल्याचे पुष्कळ पुरावे आहेत. इस्राएल बंदीवासात गेले तेव्हा यिर्मया रडत बसला होता. यहूदाला विलाप करण्याचा संदेश देण्याचे काम देवाने यिर्मयाला सांगितले होते. योशीयासाठीही यिर्मयाने विलापगीत रचले होते (२ इतिहास ३५:२५). प्रत्यक्ष साक्षी म्हणून यिर्मयाने विलापगीत लिहिले. बारूखाने लेखनिकाचे काम केले असणार. ख्रि पू ५८६ मध्ये यरुशलेमचा विध्वंस होताच त्याने हे लिहिले असावे. जुलैच्या मध्यावर नगराच्या पाडाव झाला तर ऑगस्टच्या मध्यावर मंदिर जाळून टाकण्यात आले. यिर्मयाने तटबंदी, टेहळणीचे बुरूज, घरे, राजवाडा, मंदिर ही नाश पावत असता प्रत्यक्ष पाहिले होते. या घटना त्याच्या स्मरणात ताज्या असतानाच त्याने हे लिखाण केले. जबरदस्तीने त्याला मिसरात जावे लागण्यापूर्वीच केले असावे (ख्रि पू ५८३). त्याच्या संदेशातील भाषाशैलीच विलापगीतात आढळते.

पार्श्वभूमी

यरुशलेमेच्या विध्वंसाची बीजे यहोशवाच्या काळात ८०० वर्षांपूर्वीच रुजलेली दिसतात. यहोशवा २३:१५,१६ मध्ये त्यांच्या अधर्मामुळे होणाऱ्या विनाशाचे स्पष्ट भाकित दिसते. यिर्मयाने ४० हून अधिक वर्षांनंतर येणाऱ्या न्यायाविषयीचा संदेश दिला. नाशाचे भाकित केल्याबद्दल लोकांनी त्याची फारच निंदा व तिरस्कार केला (ख्रि पू ६४५-६०५). जेव्हा या अविश्वासू लोकांवर नबुखद्नेसराच्या बाबेलच्या सैन्याद्वारे न्याय आला तेव्हा यिर्मयाने क्लेशाने व कळवळयाने हट्टी लोकांबद्दल क्लेशाचा प्रतिसाद दिला. या पुस्तकाचे यिर्मयाच्या पुस्तकाशी घनिष्ट संबंध दिसतात. पश्चात्ताप न केलेल्या पापांबद्दल यरुशलेमावर देवाचा भयानक न्याय आल्याबद्दलच्या यातना त्यात व्यक्त केल्या आहेत. यिर्मयाच्या पुस्तकात येणाऱ्या आपत्तीविषयी त्याने भाकिते दिली आहेत. तर या पुस्तकात यरुशलेमावर आलेल्या आपत्तींमुळे होणाऱ्या मनोवेदना व्यक्त केल्या आहेत. यरुशलेमेचा नाश चिंताजनक होता. जुन्या करारात चार ठिकाणी त्याच्या नोंदी आहेत. २ राजे २५; यिर्मया ३९:१-११,५२ आणि २ इतिहास३६:११-२१.

यिर्मया, २ राजे व विलापगीत यांच्यात तुलना केल्यास पुढील विषयांच्या नोंदी तिन्ही ठिकाणी आढळतात. यरुशलेमास वेढा, नगरात दुष्काळ, राजा व सैन्याचे पलायन, राजमहालात मंदिर व नगराची जाळपोळ, तटबंदीची तोडफोड, सामान्य लोकांचा बंदीवास, मंदिराची लूट, पुढाऱ्यांची हत्या, यहूद्यांची गुलामावस्था, अपेक्षा केलेली परकीय मदत ठप्प.

रूपरेषा

(I) पहिला विलाप. यरुशलेमची नासधूस (१:१-२२)
(II) दुसरा विलाप. देवाच्या क्रोधाचे स्पष्टीकरण (२:१-२२)
(III) तिसरा विलाप. यिर्मयाच्या दु:खाचे स्पष्टीकरण (३:१-६६)
(IV) चौथा विलाप. देवाच्या क्रोधाचे तपशील (४:१-२२)
(V) पाचवा विलाप. अवशिष्टांची प्रार्थना (५:१-२२)

प्रकरण २६

यहेज्केल

मोठ्या संदेष्ट्यांची पाच पुस्तके

यहेज्केल या शब्दांचा अर्थ आहे "देव समर्थ करतो." ज्या संदेशासाठी देवाने त्याला पाचारण केले त्यासाठी देवानेच त्याला सामर्थ्य पुरवले (३:८,९). बंदीवासातील देवाच्या लोकांना संदेश देताना तो दृष्टांत,भाकिते, दाखले, चिन्हे व रूपके किंवा खुणांचा वापर करतो व नाट्यमय रीतीने संदेशाची घोषणा करतो.

लेखक व काळ

त्याला बंदीवासात नेले तेव्हा त्याचे वय २५ होते. त्याला सेवेस पाचारण झाले तेव्हा तो ३० वर्षांचा होता. याजक लोक याजकीय सेवा ३०व्या वर्षीच सुरू करीत असत. त्यामुळे ही अविस्मरणीय सेवा त्याने ख्रि पू ५९३ - ख्रि पू ५९२ मध्ये सुरू केली. पुढे २२ वर्षे म्हणजे ख्रि पू ५७१/५७० पर्यंत त्याने सेवा केली (२५:१७). यिर्मयाला तो समकालीन असून यिर्मया त्याच्यापेक्षा २० वर्षांनी मोठा होता. दानीएलासही तो समकालीन होता. दोघे साधारण समवयस्क असावेत. तो प्रसिद्ध असलेल्या दानीएलाचा उल्लेख करताना दिसतो (१४:१४,२०,२८:३). यिर्मया व जखऱ्याप्रमाणे यहेज्केल संदेष्टाही होता व याजकही होता. त्याची याजकीय पार्श्वभूमी असल्याने तो मंदिराच्या तपशीलाविषयी माहितगार असून त्यात विशेष रसिकता दाखवतो. म्हणून त्या विषयावर पुष्कळ लिखाण करून घेण्यास देवाने त्याचा वापर करून घेतला (८:१-११:२५, ४०:१-४७:१२).

यहेज्केलच्या पत्नीचा उल्लेख २४:१५-२७ मध्ये आहे. ख्रि पू ५९७ मध्ये जे १०,००० यहूदी बंदीवान करून नेण्यात आले त्यांच्यामध्ये हे दोघे होते (२ राजे २४:११-१८). पत्नीच्या मृत्यूची नोंद तो २४:१८ मध्ये करतो. त्याच्या मृत्युची यात नोंद नाही. पण रब्बींच्या परंपरागत नोंदींनुसार ज्या इस्राएलच्या राजपुत्राला ख्रि पू ५६०मध्ये मूर्तिपूजेसाठी दटावून अखेर वधले अशी त्याच्याविषयी नोंद सापडते. त्याने दिलेले संदेश कालक्रमानुसार दिलेले नाहीत.

पार्श्वभूमी

इस्राएलचे एकसंघ राज्य ख्रि पू १०४३-९३१ पर्यंत टिकले. त्यात शौल, दावीद व शलमोनाची कारकीर्द दिसते. दुफळी झालेले उत्तर राज्य इस्राएल अश्शूरने पाडाव करीपर्यंत (ख्रि पू ९३१- ख्रि पू ७२२) टिकले. दक्षिण राज्य यहूदा पुढे आणखी १३५ वर्षे टिकून राहिले. अखेर ख्रि पू ६०५ - ख्रि पू ५८६ मध्ये बाबेलने त्यांचा पाडाव केला. पुढे बाबेलने मिसर व अश्शूर साम्राज्यांचा पूर्ण नायनाट केला. त्यांनी केलेल्या ऐतिहासिक नोंदींनुसार काहीच शेष राहिले नाही. इस्राएलांवरील ख्रि पू ६०५ च्या पहिल्या हल्ल्यातील बंदीवानांमध्ये दानीएलास बाबेलास नेले. ख्रि पू ५९७ तील दुसऱ्या हल्ल्यातील दहा हजार बंदीवानांमध्ये यहेज्केलाला नेले. ख्रि पू ५८६ मधील तिसऱ्या हल्ल्यात यहूदाचा पाडाव व यरुशलेमचा विध्वंस झाला. ते १०,००० लोक बाबेलात गुलाम म्हणून नव्हे तर वसाहती करून राहिले. यिर्मया २९ नुसार त्यांना लागवडीच्या जमिनी होत्या. यहेज्केलास स्वत:चे घर होते (३:२४;२०:१). खोटे संदेष्टे वरचेवर लवकर बंदीवास सुटून मायदेशी जाण्याविषयीच्या खोट्या आशा पल्लवीत करीत होते. तेव्हा यहेज्केलाने देवाचा इशाऱ्याचा संदेश दिला की यरुशलेम धुळीस मिळेल. त्यानंतर प्रथम यहेज्केलास यरुशलेम धुळीस मिळाल्याची बातमी आली (३३:२१) व खोट्या संदेष्ट्यांची भाकिते खोटी ठरली. त्यानंतर यहेज्केलाने इस्राएलांच्या भावी उद्धाराची भाकिते केली व आपल्या लोकांना मायभूमीत जाण्याचे संदेश दिले. तसेच मशीहाच्या भावी राज्याची भाकिते केली.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

"देवाचे गौरव" हा मध्यवर्ती विषय आहे. इस्राएलांची मूर्तिपूजा, देवाची दया धुडकावणे, स्वार्थी जीवन, यामुळे त्यांच्यावर आलेल्या आपत्तींचे वर्णन आहे. यहेज्केल गुंडाळी खातो (अध्याय २,३). देवाच्या निर्मितीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चार दुतांचे चेहरे (१:१०), न्हाव्याच्या दुकानाचा देखावे (५:१-४), मंदिराचे चित्र अशी अनेक आध्यात्मिक चिन्हे दाखवून संदेश दिले आहेत. देवाचे पावित्र्य व सार्वभौमत्व आणि देवाच्या गौरव प्रकर्षाने मांडले आहे. "मीच परमेश्वर आहे हे तुम्ही समजावे " हा वाक्यप्रयोग ६० वेळा वापरून देवाच्या अधिकृत कृतींवर शिक्कामोर्तब केले आहे. देव त्याचा कार्यक्रम घडवून आणताना दिसतो. तसेच धार्मिकतेचा पाठपुरावा करण्यास देव एकेका व्यक्तीला जबाबदार धरणार आहे (अध्याय १८). इस्राएलांचा अधर्म दाखवून देवाचा क्रोध आवश्यक असल्याचे सांगितले आहे. तरीही देव अब्राहामाच्या कराराशी बद्ध राहून अवशिष्टांचा उद्धार करणार. इस्राएलांची भावी अभिवचने मंडळीसाठी असलेल्या देवाच्या कार्याशी कसा व कोणता संबंध दर्शवतात हा विषय अभ्यासला आहे.

रूपरेषा

(I) यरुशलेमच्या विध्वंसाविषयी भाकिते. १:१-२४:२७

(अ) यहेज्केलाची पूर्वतयारी व कामगिरी सोपवणे. १:१-३:२७

(ब) यरुशलेमच्या दोषांची घोषणा. ४:१-२४:२७

(II) राष्ट्रांवरील दंडाविषयीची भाकिते. २५:१-३२:३२

(III) इस्राएलांस पश्चात्तापासाठी तरतूद. ३३:१-३३

(IV) इस्राएलांच्या उद्धाराविषयी भाकिते. ३४:१-४८:३५

यहेज्केल देव जो आत्मा याला उंचावतो. यशया देव जो पुत्र याला उंचावतो. यिर्मया देव जो पिता याला उंचावतो.

प्रकरण २७

दानीएल

मोठ्या संदेष्ट्यांची पाच पुस्तके

लेखक व काळ

इस्राएलांच्या बाबेलमधील बंदीवासाच्या ख्रि पू ६०५ ते ख्रि पू ५८६ या संपूर्ण काळात दानीएल संदेष्टा हयात होता (१:१ व ९:१). यहूदी व विदेशी जगासाठी दानीएल देवाचे मुख बनला होता. त्याने देवाच्या तत्कालीन व भावी योजना घोषित केल्या. दानीएल या पुस्तकाचा लेखक आहे. त्याच्या नावाचा अर्थ "देव माझा न्यायाधीश आहे " असा होतो. तो १५ वर्षांचा असताना सरदार घराण्यातील या तरुणाला जबरदस्तीने बंदीवान करून बाबेलास नेण्यात आले होते.

तेथे बाबेलच्या संस्कृतीचा व देवदैवतांचा त्यांच्यावर प्रचंड प्रभाव पाडण्याचा प्रयत्न झाला. तेथील बंदीवान यहूद्यांना मदत करण्यास व राज्यकारभाराच्या कामी त्याचा वापर करून घेण्यात आला. तेथे वयाची ८५ पेक्षा अधिक वर्षे त्याने व्यतीत केली. तेथे सेवा करताना आपल्या चारित्र्याने त्याने आपल्या देवाचे नाव उंचावले. राजदरबारात तो उच्च अधिकारपदावर चढला. राजाचा विश्वासू मंत्री व संदेष्टा अशा दुहेरी भूमिका त्याने बाबेल व मेदी पारसी या दोन जागतिक साम्राज्यात पार पाडल्या. ख्रि पू ५३६ नंतरही दानीएल जगला. हे पुस्तक त्याने ख्रि पू ५३० पूर्वी लिहिले. २:४ ते ७:२८ अध्यायांमध्ये विदेशी जगाच्या इतिहासाचे भाकित दिले आहे. यहेज्केल, हबक्कूक, यिर्मया व सफन्या त्याचे समकालीन संदेष्टे होते.

पार्श्वभूमी

ख्रि पू ६०५ मध्ये बाबेलने यरुशलेम जिंकले तेव्हा दानीएल व त्याच्या तीन मित्रांना बंदीवान करून नेल्याच्या वृत्तांताने पुस्तकाची सुरुवात होते. ख्रि पू ५३९ मध्ये बाबेल लयास गेल्याच्या घटना यात आहेत. मेदी पारसीने ख्रि पू ५३६ मध्ये बाबेलचा पूर्ण नायनाट केल्याचे वृत्त देऊन इतिहास पुढे सरकताना दिसतो. ख्रि पू ५९७ मध्ये बाबेलने यरुशलेमावर दुसरा व ख्रि पू ५८६ मध्ये तिसरा हल्ला केला व त्यांना ७० वर्षांच्या बंदीवासात नेले. या घटनांमध्ये यहुदाच्या शेवटच्या पाच राजांचा उल्लेख केला जातो. योशीया (ख्रि पू ६४१ - ख्रि पू ६०९), यहोयाकीम (ख्रि पू ६०९- ख्रि पू ५९७), सिद्किया (ख्रि पू ५९७ - ख्रि पू ५८६), यहोआहाज (ख्रि पू ६०९), यहोयाखीन (ख्रि पू ५९८-ख्रि पू ५९७). दानीएलाचा उल्लेख यहेज्केल अध्याय १४,२८ व इब्री ११:३२,३३ मध्ये आढळतो.

मूर्तिपूजेच्या घोर पापांबद्दल पश्चात्ताप न केल्यामुळे देवाचा न्याय येत असल्याचा इशारा यापूर्वीच्या यशया व अनेक विश्वासू संदेष्ट्यांनी व नुकताच यिर्मया, हबक्कूक व सफन्या या संदेष्ट्यांनी दिला होता. देवाच्या योजनेप्रमाणे बाबेलने ख्रि पू ६१२ मध्ये अश्शूरची राजधानी निनवे व ख्रि पू ६११ मध्ये मिसरास धुळीस मिळवले. यहूदावर बाबेलने ख्रि पू ६०५, ख्रि पू ५९७ व ख्रि पू ५८६ मध्ये तिसरा हल्ला करून यरुशलेम व देवाचे मंदिर धुळीस मिळवले. उत्तर राज्य इस्राएलचा तर ख्रि पू ७२२ मध्येच अश्शूरने पाडाव केला होता. आता बाबेलद्वारे यहूदाचा न्याय होऊन देवाच्या न्यायाची पूर्तता झाली. यानंतर कोणती साम्राज्ये येतील व जातील ते देवाने दानीएलाला प्रकट केले, तसेच मशीहाच्या महान व अजिंक्य राज्याचे भाकित सांगितले. तो शेवटच्या मानवी साम्राज्यांचा अंत करील, इस्राएलच्या सर्व शत्रुंचा नायनाट करील व आपल्या कराराच्या लोकांना १००० वर्षांच्या गौरवी राज्यांत नेईल हे दाखवले.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानांचे मुद्दे

त्या काळातील व विदेशी सत्तांनंतरच्या काळातील बंदीवासातील यहूद्यांसाठी असलेली देवाची योजना त्यांना सांगून त्याने लिहून ठेवली. जगातील सर्व सत्ताधिकाऱ्यांवर व त्यांच्या कारभारावर देव नियंत्रण करतो व तोच अखेर खरा राजा आहे हा या पुस्तकाचा प्रमुख विषय आहे. इस्राएलांचे पतन झाले तरी देव पराभूत झाला नव्हता तर ख्रिस्त या राजाला उंचावण्याच्या योजनेचा उद्देश देव पूर्ण करत होता. त्यानेच इस्राएलांवर बाबेलला ख्रि पू ६०५ - ख्रि पू ५३९; नंतर मेदी पारसाला ख्रि पू ५३९ - ख्रि पू ३३१, ग्रीकला ख्रि पू ३३१- ख्रि पू १४६ व रोमला ख्रि पू १४६ ते इ स ७० पर्यंत वर्चस्व गाजवू दिले.असे थेट ख्रिस्ताच्या द्वितीयागमनापर्यंत चालू राहणार आहे. हे सर्व दानीएलात अभ्यासायला मिळते. अध्याय २,७ व ८ मध्ये हीच साम्राज्ये दाखवली आहेत. तर ९-१२ अध्यायात दानीएलाच्या काळापासून ख्रिस्ताच्या राज्याच्या योजनेचा कालक्रम दिला आहे.

पहिल्या सहा अध्यायात देवाचे सार्वभौमत्व व अद्भुत चमत्कारांची नोंद आहे. देव त्यातून आपले उद्देश अंमलात आणताना दिसतो. या व्यतिरिक्त इतर कालावधी पण लक्षात घेऊ या -

(१) निर्मिती व जलप्रलय. उत्पत्ती १-११

(२) मूळ पुरुष व मोशे. उत्पत्ती १२ ते अनुवाद

(३) एलीया व अलीशा. १ राजे १९ ते २ राजे १३

(४) येशू व प्रेषित शुभवर्तमाने व प्रे कृत्ये.

(५) ख्रिस्ताचे द्वितीयागमन व तिच्याशी निगडित घटना प्रकटीकरण.

लक्षात घ्या की देवाचेच सार्वकालिक प्रभुत्व असून त्याच्या इच्छेने सर्व काही सिद्धीस नेण्याची त्याची क्षमता आहे. तो अद्भुत कृत्ये करतो हे या पुस्तकात नमूद केले आहे. त्याने अद्भुत प्रकारे विश्वाची निर्मिती केली. स्वप्ने व त्यांचे अर्थ देवानेच दानीएलास प्रकट केले व आपली इच्छा जाहीर केली. भिंतीवर संदेश लिहून आपली इच्छा व्यक्त केली (अध्याय ५). तीन तरुणांना सातपट जळत्या भट्टीतून वाचवले (अध्याय३). दानीएलास सिंहाच्या तावडीतून सोडवले (अध्याय ६). दानीएलाला दैवी भाकिते प्रकट केली (२ ,७,८,९:२४-१२:१३).

काही महत्त्वाचे विचार

दानीएलातील भाकितांप्रमाणे मानवी साम्राज्यांचा इतिहास तंतोतंत पूर्ण झाल्याने बायबल देवाचे सत्य वचन आहे यावर शिक्कामोर्तबच झाले. त्यामुळे जगिक ज्ञानी आरोप करतात की दानीएलाचे पुस्तक ख्रि पू १७४ ते ख्रि पू १६४ दरम्यान हा इतिहास पूर्ण घडून गेल्यावर लिहिले असे म्हणतात. पण जुना करार ख्रि पू ४०० मध्येच लिहून पूर्ण झालेला होता. त्यामुळे हा आरोप सैतानी डावाचाच एक भाग आहे. शिवाय जुन्या कराराच्या पुस्तकांच्या पुराण प्रती सापडल्याने या लिखाणाला पुष्टीच मिळते.

रूपरेषा

(I) दानीएलाची वैयक्तिक पार्श्वभूमी. १:१- २१

(II) विदेशी साम्राज्यांची भाकिते. २:१-७:२८

(III) दानीएलाची भावी काळाविषयीची भाकिते. ८:१-१२:१३.

प्रकरण २८

होशेय

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र. १

लेखक व काळ

होशेय या नावाचा अर्थ आहे "तारण." केवळ होशेयच्या पुस्तकात त्याच्याविषयी जेवढी माहिती मिळते तेवढीच उपलब्ध आहे. त्याचे वडील बेरी हे इस्राएलाच्या उत्तर राज्यात वास्तव्यास होते. पुस्तक वाचताना तो इतिहास, तेथील वातावरण व उत्तरेकडील भौगोलिक दृश्यांची अनुभूती मिळते. योना व होशेय हे दोघेच उत्तर राज्यातील संदेष्टे असल्याचे स्पष्ट दिसते. मात्र उत्तर व दक्षिण दोन्ही राज्यांना उद्देशून ही पुस्तके लिहिली आहेत.

ख्रि पू ७५५ ते ख्रि पू ७१० असा दीर्घकाळ होशेयने संदेश दिला. हा काळ यहूदाचे राजे उज्जीया (ख्रि पू ७९० ते ख्रि पू ७३९); योथाम (ख्रि पू ७५० ते ख्रि पू ७३१); आहाज (ख्रि पू ७३५ ते ७१५) व हिज्कीया (ख्रि पू ७१५ ते ख्रि पू ७१५ ते ख्रि पू ६८६) आणि इस्राएलचा राजा २ रा यराबाम (ख्रि पू ७३२ ते ख्रि पू ७२२) यांच्या राजवटीच्या आहे. त्याने उत्तरेकडील आमोस पाठोपाठ संदेश दिला. तो यशया व मीखाच्या समकालीन होता. ते दोघेही यहूदात संदेश देत होते. होशेयचा काळ २ राजे १४ -२० व २ इतिहास २६ - ३२ या अध्यायांमध्ये आहे.

पार्श्वभूमी

उत्तर राज्य इस्राएल ज्याला सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या एफ्राइमच्या वंशाच्या नावाने ओळखले जात होते, तेथे होशेयने आपली सेवा सुरू केली. तेव्हा दुसऱ्या यराबामाची तेथे राजवट होती. त्याच्या कारकीर्दीत इस्राएलांस राजकीय शांती, भौतिक भरभराट प्राप्त झाली असली तरी नैतिक भ्रष्टाचार व आत्मिक शून्यता तेथे होती.२ रा यराबाम ख्रि पू ७५३ मध्ये मृत्यू पावला आणि अराजक माजून इस्राएलचा वेगाने ऱ्हास सुरू झाला. त्यानंतर २० वर्षांनीच अश्शूरने त्यांना धुळीस मिळवले. इस्राएलच्या चार राजांचा वध झाला. शोमरोनचा पाडाव होत असता होशेयने नैतिक दृष्ट्या बहकलेल्यांवर लक्ष केंद्रित केले. देवाचा करार मोडल्यामुळे त्यांचा न्याय अटळ असल्याचे त्याने घोषित केले.

दक्षिण राज्य यहूदाचीही स्थिती फारसी चांगली नव्हती. याजकीय कार्यपद्धतीचा गैरवापर केल्यामुळे उज्जीयाला कोड फुटले होते (२ इतिहास २६:१६- २१). योथामने मूर्तिपूजा बोकाळू दिली होती. आणि आहाजाला बालदैवताची पूजा करायला वाट मोकळी करून दिली होती (२ इतिहास २७:१-२८:४). हिज्कियाच्या काळातील उथळ संजीवनामुळे आजचे संकट उद्यावर जावे एवढेच घडले होते. यहूदाचाही इस्राएलप्रमाणे नाश होणे अटळ होते. दोन्ही राज्यांचे दुर्बल राजे देवाचे प्रभुत्व झुगारून देऊन सतत विदेशी राष्ट्रांशी मैत्री करत होते.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

कराराच्या आपल्या इस्राएल लोकांनी मूर्तिपूजा करूनही त्यांच्यावर देवाची शाही प्रीती होती. त्याच्या या प्रीतीचा संदेश आणणाऱ्या होशेयला त्यामुळे योहान (प्रीतीने भरलेला प्रेषित) असे संबोधले जाते. आपल्या लोकांवरील देवाची प्रीती कधीही आटत किंवा संपत नाही. त्यामुळे याबाबतीत तो कोणताच प्रतिस्पर्धी खपवून घेत नाही. होशेयच्या संदेशात राष्ट्रावर व वैयक्तिक दोषारोप केले आहेत, पण त्याच वेळी देवाचे त्याच्या लोकांवरील कळवळ्याने भरलेले प्रेम तो रेखाटतो. एका विशिष्ट स्त्रीशी विवाह करण्याची देवाने होशेयला सूचना दिली होती.

तिच्याशी कौटुंबिक जीवनाचा अनुभव घेताना इस्राएलांच्या अविश्वासूपणाच्या पापाचे प्रात्यक्षिक त्याने लोकांच्या समोर ठेवले. होशेय व त्याची पत्नी गोमर यांच्या वैवाहिक जीवनाचे एक उच्च प्रतीचे रूपक वापरून पाप, देवाचा न्याय व त्याची क्षमाशील प्रीती हे विषय या पुस्तकात स्पष्ट केले आहेत. अर्थात विवाह करताना गोमर वेश्या नव्हती तर तिने नंतर व्यभिचाराचे जीवन जगण्यास सुरूवात केली. त्याने वेश्येशी विवाह केला नव्हता हे लक्षात घ्यावे. कारण यापूर्वी मिसरातून बाहेर आलेल्या राष्ट्राला ही उपमा (२:१५,९:१०,११:१) लागू पडणार नाही. हे राष्ट्र नंतर देवापासून बहकले. त्याला पुष्टी देणाऱ्या मुद्दा म्हणजे होशेयाचे त्याच स्त्रीवरील प्रेम नवे व्हावे असे अध्याय ३ वरून देव दाखवतो.

रूपरेषा

(I) व्यभिचारी पत्नी व विश्वासू पती. १:१ -३:५

(अ) होशेय व गोमर. १:१ -९

(ब) देव व इस्राएल. १:१०-२:२३

(क) दोन पक्षात समेट. ३:१-५

(II) व्यभिचारी इस्राएल व विश्वासू देव. ४:१-१४:९

(अ) व्यभिचारी इस्राएल दोषी. ४:१-६:३

(ब) व्यभिचारी इस्राएलास दूर केले. ६:४-१०:१

(क) व्यभिचारी इस्राएलचा देव पुनरुद्धार करतो. ११:१-१४:९

प्रकरण २९

योएल

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र.२

लेखक व काळ

योएल या नावाचा अर्थ “प्रभू देव आहे." तो पथुएलाचा पुत्र होता. मंदिरातील अर्पणांबद्दल तो तीव्र आवेश दाखवतो (१:९,२:१३-१६). तो याजकीय व शेतकरी जीवनाशी परिचित दिसतो (१:१३,१४;२:१७). पण तो स्वत: लेवी आहे असे दिसत नाही. आख्यायिकांवरून असे दिसते की तो मृत समुद्र किनाऱ्यावरील रूबेन व गाद यांच्या वतनाच्या सीमेवर असलेल्या बथामचा रहिवासी होता. तो यरुशलेमच्या परिसरातील यहूदी होता. ऐतिहासिक उल्लेख व ग्रंथसंहितेतील या पुस्तकाचे स्थान यावरून पुस्तकाचा काळ लक्षात येतो. अश्शूर, बाबेल, पारस या कोणत्याही जागतिक साम्राज्याचा यात उल्लेख नाही. त्याची भाषाशैलीच बंदीवासानंतरच्या नव्हे तर होशेय व आमोस प्रमाणे असल्याने ते योवाशच्या काळात (ख्रि पू ८३५-७९९) लिहिले असावे याची खात्री पटते. योएलचा संदेश सर्व युगातील पिढ्यांसाठी आहे. सर्व पिढ्यांनी या सिद्धांतांची पुनरावृत्ती करावी व त्यांचे लागूकरण करून घ्यावे.

पार्श्वभूमी

सोर, सीदोन व पलिष्ट्यांनी वारंवार इस्राएलांवर अचानक हल्ले केले होते. दीर्घ काळचा दुष्काळ व प्रचंड टोळधाडीमुळे भूमीतील सर्व वनस्पती उद्ध्वस्त झाली होती. त्यामुळे आर्थिक परिस्थिती हलाखीची झाली होती (१:७-२०). त्यामुळे दक्षिण राज्य यहूदा दुर्बल बनले होते. हा देवाचा न्याय असल्याचे योएलास दिसते. प्रभुच्या दिवसात देव पापांबद्दल करणार असलेल्या न्यायाचे दर्शक हे टोळ होते. त्या काळी देव त्याच्या शत्रुंचा न्याय करणार असून विश्वासी जनांना आशीर्वाद देणार आहे. विशिष्ट पापाचा या पुस्तकात उल्लेख केलेला नाही. किंवा यहूदाला मूर्तीपूजेसाठी दटावलेले नाही. पण असंवेदनशीलता व निष्ठुर अलिप्ततेसाठी हा संदेष्टा त्यांना पश्चात्तापास पाचारण करतो आणि वस्त्रे नव्हे तर ऱ्हदय फाडण्यास सांगतो (२:१३).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

योएल पुस्तकाचा विषय आहे "प्रभूचा दिवस." कोणत्याही विशिष्ट काळासाठी त्याचे आव्हान नाही. तर देवाच्या सर्वसाधारण क्रोध व न्यायाविषयी तो बोलतो. त्या दिवशी देवाचा क्रोध व न्यायत्व उघड होत असता त्याची सर्वसमर्थता, पराक्रम व पावित्र्य हे गुण पाहून शत्रुंना दहशत बसणार आहे. यातील भाकितांची परिपूर्ती त्याच्या काळाला व भावी काळालाही लागू आहे. प्रभूचा तो महाभयंकर दिवस देवाकडून आलेले हिंसक हवामान (यहेज्केल १३:५), निबिड व घनदाट मेघ (२:२) व अवकाशातील बदलांचा असेल. पुस्तकाच्या उत्तरार्धात त्या दिवसाशी निगडित असलेली आशा व अभिवचने योएल देतो. त्यावेळी देव आत्म्याची वृष्टी करील तेव्हा संदेश दिले जातील, स्वप्ने पडतील व दृष्टांत होतील. एलीयाचे आगमन होईल व पुनरुद्धाराची आशा प्रज्ज्वलित होईल (४:५,६). त्या दिवसाचा परिणाम अखेर आशीर्वाद, फलप्राप्ती व भरभराट हा असेल. त्या दिवशीच पाप्यांचा न्याय होईल तर देवाच्या कराराच्या लोकांना आशीर्वाद प्राप्त होईल.

योएल प्रे कृ २ ऱ्या अध्यायातील पेंटेकॉस्टच्या घटनांविषयी बोलत नसून त्याचा रोख शेवटच्या काळातील प्रभूच्या दिवसावर आहे. प्रे कृ २ मधील घटना या भाकितांच्या परिपूर्ततेची घटना नव्हती, तर प्रभूचा दिवस आल्यावर

मशीहाच्या राज्यात आत्म्याचे जे सामर्थ्यशाली कार्य होणार आहे त्याचे नमुनादाखल दर्शन घडवणारी घटना होती (प्रे कृ २:१६-२१).

या पुस्तकाचे तीन स्तर आहेत

पहिला स्तर - १:१-२०. त्यात टोळधाड व दुष्काळाच्या आपत्तींचा तपशील देऊन तत्कालीन प्रभूच्या दिवसाचे वर्णन आहे.

दुसरा स्तर - २:१-१७. त्या ऐतिहासिक पीडेला कलाटणी देऊन येणाऱ्या प्रभूच्या दिवसावर लक्ष केंद्रित केले आहे.

तिसरा स्तर - २:१८-३:२१. देव थेट त्यांच्याशी बोलत असलेले दाखवले आहे. पश्चात्ताप केल्यावर देव त्यांच्या प्रार्थनांना प्रतिसाद देतो असे दाखवून शाप व विलापाच्या संदेशाला कलाटणी दिली आहे. देवाकडून मिळणारी आशेची खात्री व दैवी सान्निध्य दर्शवले आहे. पश्चात्ताप केलेल्यांनाही खात्री देताना तीन अभिवचने दिली आहेत.

(१) त्या भूमीचा भौतिक जीर्णोद्धार होऊन तिला दैवी आरोग्य मिळेल. २:२१-२७.

(२) त्याच्या आत्म्याच्या ओतणीने आध्यात्मिक उद्धार होईल. २:२८-३२.

(३) दुर्जनांचा दैवी न्याय होऊन राष्ट्राच्या उद्धार होईल. ३:१-२१.

रूपरेषा

(I) प्रभूच्या दिवसाचा ऐतिहासिक अनुभव. १:१-२०

(अ) संदेशाचा उगम. १:१.

(ब) आपत्तींवर गांभीर्याने विचार करण्याची आज्ञा. १:२-४

(क) पूर्ण ओसाडी. १:५-१२

(ड) पश्चात्तापास पाचारण. १:१३-२०

(II) कलाटणी देऊन प्रभूच्या दिवसाचे उदाहरण. २:१-१७

(अ) गजर होतो. २:१

(ब) सैन्याचा हल्ला. २:२-११

(क) पश्चात्तापास उत्तेजन. २:१२-१७

(III) शेवटच्या काळाविषयी प्रभूच्या दिवसाचे वर्णन. २:१८-३:२१.

(अ) प्रस्तावना. २:१८-२०.

(ब) भौतिक जीर्णोद्धार. २:२१-२७.

(क) आत्मिक पुनरुज्जीवन. २:२८-३२.

(ड) राष्ट्राचा पुनरुद्धार. ३:१-२१.

प्रकरण ३०

आमोस

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ३

लेखक व काळ

आमोस या नावाचा अर्थ "भार किंवा भारवाहक." हा यशयाचा बाप नव्हे. यरुशलेमपासून १० मैलांवर दक्षिणेकडील तकोवा गावचा हा रहिवासी. आपला मेंढपाळीचा व उंबराच्या झाडांची निगा राखण्याचा व्यवसाय असल्याचे तो सांगतो. तो याजक किंवा सरदार घराण्यातला नव्हता. तो योना, होशेय व यशयाचा समकालीन होता. ख्रि पू आठव्या शतकाच्या मध्यावर अविस्मरणीय भूकंप होण्यापूर्वी २ वर्षे आधी (जखऱ्या १४:५; ख्रि पू ७६०) त्याने हे पुस्तक लिहिले. त्यावेळी उज्जीया हा दक्षिणराज्य यहूदाचा राजा होता (ख्रि पू ७९०- ख्रि पू ७३९) व दुसरा यराबाम उत्तर राज्य इस्राएलचा राजा होता. (ख्रि पू ७९३-ख्रि पू ७५३).

पार्श्वभूमी

आमोस हा यहूदातील संदेष्टा असून त्याने मुख्यत: उत्तरेकडील इस्राएलांच्या १० वंशांस संदेश दिला (७:१५). दुसऱ्या यराबामच्या राजवटीचा तो भरभराटीचा व शांतीचा काळ होता (२ राजे १३:२५). त्याने आपला बाप योवाशचा (२ राजे १४:२५; आमोस ५:५) कित्ता गिरवून इस्राएल प्रांताचा उद्धार केला. यहूदा व इतर सर्व शेजार राष्ट्रांपासून त्यांना शांतता लाभली होती. कारण नुकताच अश्शूरच्या निनवे या राजधानीने योनाच्या संदेशामुळे पश्चात्ताप केला होता. पण अध्यात्मिक दृष्ट्या तो नैतिक पतनाचा व भ्रष्टतेचा काळ होता.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

इस्राएलची प्रमुख दोन पापे आमोस सांगतो.

(१) खऱ्या उपासनेचा अभाव

(२) न्यायाच्या अभाव

त्यांच्या भक्तीत खूप विधिसंस्कारांचा समावेश होता पण ते आपल्या देवाला अंत:करण पूर्वक अनुसरत नव्हते (४:४, ५;५:४-६). शेजाऱ्यांशी ते देवाच्या दर्जानुसार वागत नव्हते (५:१०-१३;६:१२). या धर्मत्यागाचा पुरावा म्हणजे ते आमोसच्या संदेशवचनांचा हेतुपुर:स्सर धिक्कार करत होते. तो दैवी न्यायाच्या संदेश देत होता. देव आपल्या करारास बद्ध असल्याने इस्राएलांना पूर्णपणे सोडून देणार नव्हता तर भावी काळी अवशिष्ट धार्मिकांचा उद्धार करणार होता (९:७-१५).

विचारासाठी विशेष मुद्दे

९:११ मध्ये देव अभिवचन देतो की "दाविदाचा पडलेला डेरा मी उभारीन." प्रे कृ १५ मध्ये यरुशलेमच्या पहिल्या मंडळीतील धर्मसभेत सुंता न झालेल्या विश्वासी विदेश्यांना मंडळीत घ्यावे का या मुद्द्यावर चर्चा झाली होती त्यावेळी त्या मंडळीचा पाळक येशूचा अर्धा भाऊ याकोब प्रे कृ १५:१४-१६ मध्ये पेत्राच्या अहवालावर पुष्टी देतो. या घटनेने आमोसच्या वक्तव्याची पूर्तता झाली असा अर्थ काढू नये. आमोस ९:१२,१५ ची पूर्तता प्रभूच्या दिवशी होईल. मशीहाच्या द्वितीय आगमनाविषयी आमोस बोलत आहे हे लक्षात घ्यावे. त्यावेळी मशीहा दाविदाच्या सिंहासनावर बसणार आहे (यशया ९:७).

रूपरेषा

(I) राष्ट्राचा न्याय. १:१-२:१६

(II) इस्राएलांचा धिक्कार. ३:१-६:१४

(अ) बेजबाबदार जीवनाचे पाप. ३:१-१५.

(ब) मूर्तिपूजेचे पाप. ४:१-१३.

(क) नीतिमूल्यांच्या उल्लंघनाचे पाप. ५:१-६:१४.

(III) न्याय व पुनरुद्धाराचे दृष्टांत. ७:१-९:१५

(अ) देव वाचवील. ७:१-६.

(ब) देव वाचवणार नाही. ७:७-९:१०.

(१) ओळंब्याचा दृष्टांत. ७:७-९.

(२) ऐतिहासिक मध्यंतर. ७:१०-१७.

(३) फळांच्या टोपलीचा दृष्टांत. ८:१-१४.

(४) वेदीचा दृष्टांत. ९:१-१०.

(५) देव पुनरुद्धार करील. ९:११-१५.

प्रकरण ३१

ओबद्या

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ४

लेखक व काळ

ओबद्या या नावाचा अर्थ "प्रभूचा सेवक." जुन्या करारातील हे सर्वात लहान पुस्तक. या लेखकाविषयी या पुस्तकात काही माहिती मिळत नाही. तो वारंवार यहूदा, यरुशलेम व सीयोनचा उल्लेख करीत असल्याने तो दक्षिण यहूदाचा आहे असे दिसते. तो बहुधा एलीया व अलीशाचा समकालीन दिसतो. लिखाणाचा काळ शोधणेही अवघड आहे. वचन १४-१४ वरून अदोम्यांच्या हल्ल्यानंतर लवकरच ते लिहिले असावे. त्या काळी यरुशलेमावर महत्त्वाचे चार हल्ले झाले.

(१) मिसरचा राजा शीशक ख्रि पू ९२५, रहाबामाच्या राजवटीत (१ राजे १४:२५, २६; २ इतिहास१२).

(२) पलिष्टी व अरबांचा हल्ला, ख्रि पू ८४८- ख्रि पू ८४१ मध्ये यहूदाचा राजा यहोरामच्या राजवटीत (२इतिहास २१:८-२०).

(३) उत्तर राज्य इस्राएलचा राजा यहोआशने ख्रि पू ७९० मध्ये (२ राजे १४; २ इतिहास २५.)

(४) बाबेलचा राजा नबुखद्नेसरने यरुशलेमचा ख्रि पू ५८६ मध्ये पाडाव केला. यातील दुसऱ्या हल्ल्याविषयी आमोस बोलत आहे असे दिसून येते.

पार्श्वभूमी

अदोमी लोकांचे मूळ एसाव होय. रिबेकाच्या उदरात असताना पासूनच एसाव याकोबाशी (नंतरचे त्याचे नाव इस्राएल) झगडत होता. एसाव म्हणजे "केसाळ" त्यालाच "अदोम" म्हणत. त्याचा अर्थ "तांबडा." त्याने तांबड्या वरणासाठी आपला ज्येष्ठत्वाचा हक्क विकला होता (उत्पत्ती २५:२२-३०). कनानी स्त्रियांशी विवाह करून त्याने देवाच्या कराराच्या अभिवचनांचा अनादर केला होता. पुढे त्याने इश्माएलच्या कन्येशी विवाह केला होता (उत्पत्ती २६:३४; २८:९). तो घराबाहेर भटकायचा. अखेर आपला आशीर्वाद गमावल्यावर तो भटक्याच बनला (उत्पत्ती २५:२७; २७:३८-४०). मृत समुद्राच्या खडकाळ प्रांतात त्याची वस्ती होती. त्यांना अदोमी म्हणत. १००x४० मैलांचा त्यांचा परिसर होता. आफ्रिका, युरोप व आशियास जोडणारा महामार्ग त्यांच्या प्रांतातून जात होता. रिबेकाच्या उदरात भांडणातून हीच ती दोन राष्ट्रे इस्राएल व अदोम. हे फार जुनाट शत्रू. जेव्हा इस्राएल राष्ट्र मिसऱ्यांच्या गुलामीतून बाहेर पडले होते तेव्हा अदोमने आपला भाऊ याकोब म्हणजे इस्राएलांना आपल्या प्रांतातून जाऊ दिले नाही (गणना २०:१४-२१). तरीही अदोमाला दयाळूपणे वागवावे अशी देवाची इस्राएलांना आज्ञा होती (अनुवाद २३:७,८).

ओबद्याला देवाचा दृष्टांत झाला व अदोम्यांना त्यांचा गुन्हा निदर्शनास आणून देऊन इस्राएलांना अशी वागणूक दिल्याबद्दल त्यांचा विध्वंस करण्याचा संदेश देण्याचे काम त्याला देण्यात आले.

अदोम्यांनी शौलाला विरोध केला होता (ख्रि पू १०४३ - ख्रि पू १०११). दावीद (ख्रि पू १०११-ख्रि पू ९७१) व शलमोनाच्या राजवटीत त्यांचा पराभव झाला होता. त्यांनी यहोशाफाटाशी लढाई केली (ख्रि पू ८७३- ख्रि पू ८४८). यहोरामविरुद्ध बंड केले (ख्रि पू ८५३- ख्रि पू ८४१). यहूदाच्या अमस्याने पुन्हा त्याला जिंकले (ख्रि पू ७९६- ख्रि पू ७६७). पण आहाजाच्या राजवटीत पुन्हा त्यांनी आपले स्वतंत्र राज्य परत मिळवले (ख्रि पू ७३५- ख्रि पू ७१५). नंतर

अदोमाला अश्शूरने व मग बाबेलने अंकित केले. ख्रि पू ५व्या शतकात त्यांना त्याच्याच प्रांतातून शत्रुंनी हाकलून दिले. मग ते पॅलेस्ताइनच्या दक्षिणेत येऊन राहिले. त्यांनाच इदोमी संबोधायचे. हेरोद राजा इदोमीच होता. रोमच्या राजवटीत ख्रि पू ३७ मध्ये तो यहूदाचा राजा झाला. पर्यायाने एसाव याकोबाचे शत्रुत्व चालूच राहिले व येशू बाळाच्या हत्येच्या त्याने कपटी प्रयत्न केला (मत्तय १:१६-१८). पुढे इदोम्यांनी यरुशलेमशी मैत्री साधून रोमविरुद्ध बंड केले. मग यहूद्यांसोबत इदोम्यांचा पण इसवी सन ७० मध्ये पाडाव झाला.

ख्रि पू ५८६ मध्ये जेव्हा बाबेलने यहूद्यांचा पाडाव करून यरुशलेम व देवाचे मंदिर उध्वस्त केले तेव्हा या अदोम्यांनी त्यांचा उपहास केला होता. पण इ स ७०साली बचावाच्या प्रयत्नात असताना मात्र ते मारले गेले. त्यानंतर त्यांचे नावही ऐकिवात नाही. ओबद्याच्या भाकिताप्रमाणे ते कायमचे नष्ट झाले (व १०). वचन १८ प्रमाणे एसावाच्या घराण्यातून एकही उरला नाही.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

पुढील दोन परस्परांशी निगडीत मुद्द्यांसाठी हे पुस्तक उत्पत्ती १२:१-३ चा अभ्यास करण्यास भाग पाडते.
(अ) इस्राएलांना शिव्याशाप दिल्यामुळे देवाकडून अदोमावर आलेला देवाचा न्याय. तो यहूदाला स्पष्टपणे कळवला. प्रभूच्या दिवशी अदोम्यांचा न्याय होईल अशी यहूदाला हमी दिली (व १५). गर्व केल्याबद्दल व यहूदाच्या पतनात सहभागी झाल्याबद्दल त्यांचा न्याय झाला.
(ब) यहूदाचा पुनरुद्धार. अदोम्यांच्या प्रांताचाही त्यात समावेश असणार (व १९-२१; यशया ११:१४). ओबद्याच्या आशीर्वादित, पलिष्टी व अरबांच्या हल्ल्याने (१-१५ वचने), अदोमच्या नजीकच्या विनाशाची परिपूर्ती आहेच (२ इतिहास २१:८-२०). आणि पुढे इ स ७० मधील न्यायाची परिपूर्ती व अदोमच्या प्रांतावर इस्राएल ताबा मिळवतील याची परिपूर्ती होणार हे दाखवले आहे (व. १५-२१).

रूपरेषा

(I) देवाचा न्याय. १-१४

(अ) अदोमास शासन. १-९

(ब) अदोमचा गुन्हा. १०-१४

(II) राष्ट्रांवरील देवाचा न्याय. १५,१६.

(III) देव इस्राएलांचा उद्धार करणार. १७-२१

प्रकरण ३२ # योना

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ५

लेखक व काळ

योना या नावाचा अर्थ "कबुतर." कबुतराचे गुण आहेत की ते आपले घरटे कधी मोडत नाही, आपल्या जोडीला कधी सोडत नाही आणि ते रडते व कण्हते. पवित्र आत्म्याला कबुतराची उपमा वापरतात आणि पवित्र आत्म्याचे हेच गुण आहेत. संपूर्ण पुस्तकात योना स्वत:ला तृतीय पुरुषी कर्ता वापरतो. असे लिखाण त्या काळी प्रचलित होते. त्यातील सर्व वर्णन तो योनाच आहे याला पुष्टी देते. अशीच सुरुवात होशेय, योएल, मीखा, सफन्या, हाग्गय व जखऱ्या करतात.

२ राजे १४:२५ नुसार योना हा गथ जवळील गथ हेफेरचा होता. २ रा यराबामच्या भरभराटीच्या राजवटीत ख्रि पू ७९३-ख्रि पू ७५८ मध्ये तो होता. आमोसपूर्वी तो या उत्तर राज्यात संदेष्टा होऊन गेला. "गालीलातून संदेष्टा उद्भवत नाही." हे योहान ७:५२ मधील परूश्यांचे उद्गार साफ चूक आहेत. कारण योना गालीली होता. यहूदी आख्यायिका सांगतात की ज्याला एलीयाने मृतातून जिवंत केले त्या सारफथ येथील विधवेचा योना हा पुत्र होता. १ राजे १७:८-२४.

पार्श्वभूमी

आमोसच्या पार्श्वभूमीवर उत्तर राज्याच्या इस्राएलच्या दहा वंशाचा हा संदेष्टा होता. त्या काळी लोकांना शांती व भरभराट लाभली होती. सिरीया व अश्शूर दुर्बल होत गेल्याने २ रा यराबाम याला आपल्या सीमा रुंदावता आल्या. त्या दावीद व शलमोनाच्या काळी जितक्या दूरवर पसरल्या होत्या तेथवर त्या पसरल्या (२राजे १४:२३-२७).

मात्र आध्यात्मिक दृष्ट्या हा काळ दारिद्र्याचा होता. मूर्तिपूजेचे धार्मिक विधिसंस्कार वाढतच चालले होते. कोठेही न्याय उरला नव्हता. युद्धापासून मिळालेली शांतता व सधनता यामुळे ते आध्यात्मिक व नैतिक बाबतीत कफल्लक बनले होते. म्हणून ख्रि पू ७२२ मध्ये अश्शूरच्या बंदीवासात पाठवून त्याच्या विध्वंसाने देव त्यांचा न्याय करणार होता. ख्रि पू ७६३ मध्ये सूर्यग्रहण व ख्रि पू ७६५ ते ख्रि पू ७५९ मध्ये मरी पाठवून योनाचा संदेश ऐकायला देवाने निनवेकरांच्या मनाची तयारी केली होती.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

निनवेला संदेश देण्यासाठी योनाला देवाने पाचारण केले होते. पण अश्शूर हा इस्राएल व यहूदाचा क्रूर व कुप्रसिद्ध शत्रू असल्याने त्याची राजधानी निनवेला जाण्यास योनाने नकार दिला त्याविषयी हे कथानक आहे. निम्रोदने बांधलेले निनवे हे विदेशी नगर या पुस्तकाचा मध्यवर्ती विषय आहे. निम्रोद हा नोहाचा पणतू होता (उत्पत्ती १०:६-१२). योनाच्या भेटीनंतर सुमारे १५० वर्षांनी ख्रि पू ६१२ मध्ये हे महानगर धुळीस मिळाले (नहूम १:१). राजकीय दृष्ट्या इस्राएलांना अश्शूरचा तिरस्कार वाटे. ते देवाच्या कराराचे आशीर्वादित लोक म्हणून स्वत:ला आध्यात्मिक दृष्ट्या फार थोर समजायचे. म्हणून योनाचे हटवादी धोरण या पुस्तकात आपण पाहातो, इतके की देवाने दिलेला मिशनरी सेवेचा आदेश देखील तो पाळू इच्छित नाही. योनाला निनवेस पाठवण्यामागे देवाचा हाच उद्देश होता की एका अनोळखी व्यक्तीने संदेश दिल्याने ते नगर पश्चात्ताप करील. पण अनेक संदेष्टे पाठवूनही इस्राएलाने मात्र पश्चात्ताप केला नव्हता.

लवकरच देव त्याला धडा शिकवतो की केवळ कराराच्या लोकांवर नव्हे तर संपूर्ण निर्मितीवर देवाची प्रीती असते (४:२,१०,११).

देवाचे सार्वभौम नियंत्रण व राज्य संपूर्ण निर्मितीवर व मानवजातीवर असल्याचे हे पुस्तक दाखवते. त्याच्याद्वारे निर्मिती साकार झाली (१:९). त्याच्या सर्व आज्ञांना ती प्रतिसाद देते (१:४,१७; २:१०; ४:६,७). परूश्यांनी कठीण अंत:करण करून पश्चात्ताप न केल्याचे दर्शवण्यासाठी येशूने निनवेचे उदाहरण दिले (मत्तय १२:३८-४१ लूक ११:२९-३२). नाराज संदेष्ट्याच्या त्रोटक संदेशानेही निनवेच्या लोकांनी पश्चात्ताप केला. पण सर्वश्रेष्ठ संदेष्टा जो येशू , त्याचा संदेश ऐकूनही परूश्यांनी पश्चात्ताप केला नाही. तो तर आपण देव व मशीहा असल्याचे पुरावे सतत समोर ठेवत होता. योना इस्राएलांचे दर्शक आहे. त्यांना देवाने आपले साक्षी होण्यासाठी निवडले आहे (यशया ४३:१०-१२;४४:८).पण त्यांनी त्याची इच्छा झुगारून बंडच पुकारले (निर्गम३२:१-४; शास्ते २:११-१९; यहेज्केल ६;१-५; मार्क ७:६-९). तरीही देवाने त्यांना कित्येक शतके बंदीवासातूनही जतन करून त्याचे वचन घोषित करण्याचे काम करण्यासाठी राखले (यिर्मया ३०:११;३१:३५-३७; होशेय ३:३-५; प्रकटी ७:१-८;१४:१-३).

विशेष विचार

कोणीही कितीही या पुस्तकातील चमत्कारांवर प्रश्न उभे केले, तरीही ही ऐतिहासिक घटना म्हणूनच या पुस्तकाकडे पाहणे उचित ठरेल; कारण येशूने स्वत: या सत्यघटनेचा उल्लेख करून पुष्टी दिली आहे.

रूपरेषा

(I) देवाच्या इच्छेपासून पलायन. १:१-१७

(अ) योनाचा आज्ञा व त्याचे पलायन. १:१-३

(ब) योनाचा पाठपुरावा. १:३-१६

(क) योनाचे जतन. १:१७

(II) देवाच्या इच्छेच्या अधीन. २:१-१०

(अ) योनाची असहायता. २:१-३

(ब) योनाची प्रार्थना. २:४-७

(क) योनाचा पश्चात्ताप. २-८,९

(ड) योनाची सुटका. २:१०

(III) देवाच्या इच्छेची परिपूर्तता. ३:१-१०

(अ) नव्याने सेवा. ३:१,२

(ब) योनाचे आज्ञापालन. ३:३,४

(क) नगर पश्चात्ताप करते.३:५-९

(ड) देव कडक धोरण सोडून देतो. ३:१०

(IV) देवाच्या इच्छेवर आक्षेप किंवा प्रश्न. ४:१-११

(अ) संदेष्टा नाखूश. ४:१-५

(ब) संदेष्ट्याची कानउघाडणी. ४:६-११

प्रकरण ३३

मीखा

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ६

लेखक व काळ

ज्या मीखाला देवाचे वचन प्राप्त झाले तोच या पुस्तकाचा लेखक आहे. मीखाया या नावाचे हे लघुरूप आहे. या नावाचा अर्थ "प्रभुसमान कोण आहे?" म्हणूनच मीखा हा शब्द प्रयोग वापरतो, "तुझ्यासमान देव कोण आहे?" त्याच्या घराण्याची या पुस्तकात काहीच माहिती मिळत नाही. पण या नावावरून तो देवभीरू घरातला दिसतो. यहूदाच्या डोंगरउतरणीवरील मोरष्टी गावात त्याचे मूळ सापडते. गथजवळ यहूदा व पलिष्ट्यांच्या सीमेवर यरुशलेमपासून सुमारे २५ मैलांवर हे गाव आहे. आमोसप्रमाणेच तोही एक गावकरी आहे. राजकारण व धर्मकारण यापासून अलिप्त आहे. पण देवाने त्याला राजपुत्रांना व लोकांना संदेश देण्यासाठी निवडले आहे (३:८.)

मीखा हे भाकित योथाम (ख्रि पू ७५० ते ख्रि पू ७३१), आहाज (ख्रि पू ७३१ ते ख्रि पू ७१५) व हिज्कीया (ख्रि पू ७१५ ते ख्रि पू ६९०) या राजांच्या राजवटीत करत आहे. सामाजिक अन्याय व धार्मिक भ्रष्टाचाराचे हे लेखी आरोपपत्र यशया, होशेय व आमोसच्या विषयांची पुनरावृत्ती करते. आहाजाचे व हिज्कीयाचे सुधारणा करण्यापूर्वीचे गुण या पुस्तकात ठळक दिसतात (२ राजे १६:१०-१८;२ इतिहास२९; ३१:१). शोमरोनचा जवळ येऊन ठेपलेल्या विनाशाचा उल्लेख (१:६), हे पुस्तक ख्रि पू ७२२ पूर्वी म्हणजे ख्रि पू ७३५ ते ख्रि पू ७१० च्या दरम्यान लिहिले असावे असे सूचित करते.

पार्श्वभूमी

मीखाच्या सेवाकालात अश्शूरकडून उत्तर राज्य इस्राएलचा ख्रि पू ७२२ मध्ये पाडाव होणार असल्याने मीखाच्या संदेशात फक्त दक्षिण राज्य यहूदाच्या राजांचाच उल्लेख आढळतो. इस्राएलला क्वचित प्रसंगीच त्याच्याकडून वचन प्राप्त झाले (१:५-७). ज्या दक्षिण राज्यात तो राहात होता त्याकडेच प्रामुख्याने त्याचा रोख आहे. आर्थिक भरभराट व परराष्ट्रीयांच्या आक्रमणापासून शांती यामुळे २ रा यराबाम याची कारकीर्द उठून दिसते (ख्रि पू ७९३ ते ख्रि पू ७५३). त्या काळात इस्राएल व यहूदा यांच्या सीमांवर वरचढीसाठी स्पर्धा होती (२राजे १४:२३-२७). सिरीया व इस्राएलने यहूदावर चढाई केली होती. त्यावेळी अल्प काळासाठी आहाजाला बंदीवान करून नेले होते (२ इतिहास २८:५-१६, यशया ७:१,२). अश्शूरने इस्राएल व सिरीयाला नामशेष केल्यावर हिज्कीया या भल्या राजाने अश्शूरवरील निष्ठा सोडून दिली होती. त्यामुळे त्यांचा राजा सन्हेद्रीब याने ख्रि पू ७०१ मध्ये यहूदाला वेढा घातला (२ राजे अध्याय १८,१९; २ इतिहास अध्याय ३२). तेव्हा देवाने आपला दूत पाठवून यहूदाची सुटका केली (२ इतिहास ३२:२१). यहूदाला खऱ्या भक्तीस उद्युक्त करण्यासाठी देवाने हिज्कीयाचा उपयोग करून घेतला.

उज्जीया आपल्या भरभराटीच्या राजवटीनंतर ख्रि पू ७३९ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर त्याचा पुत्र योथामने त्याचीच धोरणे पुढे चालू ठेवली. पण काही मूर्तिपूजा बंद करण्यात तो अपयशी ठरला. बाह्यस्वरूपी भरभराट हा माजलेल्या सामाजिक व धार्मिक भ्रष्टतेचा वरकरणी देखावा होता. पुनरुत्पादनाचे कनानी दैवत बाल याची वाढती पूजा जुन्या कराराच्या अर्पण पद्धतींशी एकजीव होऊन गेली होती. आहाजाच्या राजवटीत ती फोफावली होती (२ इतिहास २८:१-४.) शोमरोन उद्ध्वस्त झाल्यावर हजारो निर्वासित यहूदा प्रांतात घुसले. त्यांच्या सोबत त्यांनी आपला खोटा

धर्महो आणला. मीखाने होशेयप्रमाणे हा विषय हाताळला. या वैयक्तिक व सामाजिक मूल्यांशी केलेल्या फितुरीला त्याने कडक शब्दात कानउघाडणी करून बोचरा इशारा दिला (७:५,६). अश्शूर एक वर्चस्वी सत्ता असल्याने यहूदाला सतत त्याची दहशत वाटे पण देवावर भरवसा नसे. म्हणूनच मीखाने भाकित केले होते की इस्राएलचा अश्शूरने पाडाव केल्यानंतर पुढे येणारी बाबेलची सत्ता यहूदाचा पाडाव करील (४:१०). अशाप्रकारे आमोसच्या संदेश इस्राएलांसाठी तर मीखाच्या संदेश यहूद्यांसाठी होता.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

मुख्यत: सतत अधर्माचाच पाठपुरावा करणाऱ्या लोकांना मीखाने न्यायाचा संदेश घोषित केला. कोर्टात कायद्याच्या भाषेत खटला चालवावा, तसा मीखाने आपला संदेश सादर केला (१:२;६:१,२). "ऐका" अशी साद घालून त्याने आपल्या तिन्ही संदेशांचा आरंभ केला आहे (१:२; ३:१; ६:१). पहिल्या भाषणात तो नाशाकडून आशेकडे जातो. नाशाचे कारण त्यांनी सीनायवर दिलेले देवाचे नियमशास्त्र मोडले आहे. आशा यासाठी की देव त्यांच्या पूर्वजांशी केलेला करार न बदलता त्याच्याशी ठाम आहे (७:२०). एक तृतीयांश पुस्तक लोकांच्या पापाला लक्ष करते. दुसरा एक तृतीयांश भाग देवाच्या येणाऱ्या शिक्षेवर लक्ष केंद्रित करतो. तर तिसरा भाग विश्वासू राहिलेल्यांसाठी असलेल्या न्यायानंतरच्या आशेवर प्रकाश पाडतो. यावरून पुस्तकाचा मुख्य विषय पापांसाठी असलेला देवाचा न्याय व त्यासोबत आपल्या कराराच्या वचनांशी असलेली देवाची न बदलणारी बांधिलकी हा आहे. पुढील दोन गोष्टींची देवाने सांगड घेतलेली दिसते.

(१) पापांबद्दल न्याय करण्यात सातत्य.

(२) त्याच्या अवशिष्ट लोकांसंबंधी त्याचे निष्ठेने समर्पण व बांधिलकी.

त्यामुळे विश्वावर सार्वभौम नियंत्रण असणाऱ्या देवाच्या स्वभावाचे श्रोत्यांना स्पष्ट प्रकटीकरण होते. आपल्या दैवी हस्तक्षेपाने देव दोन गोष्टी करणार आहे. देव पाप्यांचा न्याय करील व पश्चात्ताप करणाऱ्यांना आशीर्वाद देईल.

विशेष विचार

मीखा ४:१-३ व यशया २:२४ वरून कोण कोणाचा संदर्भ देतो असा प्रश्न उभा राहातो. याचे उत्तर देणे कठीण आहे. कारण दोन्ही संदेष्टे परस्परानजीकच्या काळात होते. एकाच काळात संदेश देत होते. त्यामुळे हे साम्य आपण समजू शकतो. देवाने खरे तर एकच संदेश दोन्ही संदेष्ट्यांकडून वदवून घेतला. ४:१ मधील "शेवटचे दिवस" हा शब्दप्रयोग ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाच्या व १००० वर्षांचे राज्य सुरू होण्यासंदर्भात आहे.

रूपरेषा

(I) न्याय व सुटकेसाठी देव एकत्र आणतो. १:२-२:१३

(अ) शोमरोन व यहुदाला शासन. १:२-१६.

(ब) छळणाऱ्यांचा न्याय. २:१-५.

(क) खोट्या संदेष्ट्यांच्या धिक्कार. २:६-११.

(ड) सुटकेचे अभिवचन. २:१२,१३.

(II) देव सत्ताधिशांचा न्याय करतो व सुटकेसाठी धावून येतो. ३:१-५:१५

(अ) तत्कालीन पुढारी अपराधी आहे. ३:१-१२

(ब) आगामी पुढारी मुक्ती देऊन पुनरुद्धार करील. ४:१-५:१५

(III) देव लेखी आरोप करतो व अखेर मुक्ती देतो. ६:१-७:२०

(अ) दोषारोप व विलापाच्या संदेश. ६:१-७:६

(ब) विश्वास व विजयाचा संदेश. ७:७-२०

प्रकरण ३४

नहूम

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ७

लेखक व काळ

अश्शूरची राजधानी निनवेला उद्देशून देवाचा संदेश सांगणारा संदेष्टा नहूम. नावावरून अर्थ "सांत्वन" किंवा "दु:खपरिहार." यहोवा सांत्वन देतो या शब्दप्रयोगाचे नहेम्या हे लघुरूप आहे. संदेष्ट्यांच्या पुस्तकात त्या संदेष्ट्यांचा जीवनवृत्तांत देणे हा उद्देश नसतो. त्यांचा संदेश देणे एवढेच उद्दिष्ट असते. त्यामुळे या संदेष्ट्याची वैयक्तिक माहिती या पुस्तकात आढळत नाही. तो "एल्कोशकर" होता एवढेच समजते (१:१). हे त्याचे जन्मस्थान किंवा सेवेचे स्थान असू शकते. तेच आज "अल- कोश" नावे इराकमध्ये आहे. त्यावरून ख्रि पू ७२२ मध्ये अश्शूरांनी नेमलेल्या बंदीवानांच्या संतानापैकी तो असावा असा निष्कर्ष निघतो. कफर्णहूम हे नहूमचे गाव यहूदाच्या दक्षिण भागात आहे (१:१५). ते त्याचे जन्मस्थान होते की तो तेथला रहिवासी होता माहीत नाही.

त्याच्या प्रस्तावनेत कोणत्याही राजाचा उल्लेख नसला तरी त्याच्या भाकितावरून ऐतिहासिक तपशील लक्षात येतो. निनवेच्या न्यायाचे वर्णन या संदेशात आहे. त्यामुळे बलशाली राष्ट्राचे चित्र डोळयांसमोर उभे राहाते. त्यावरून हा ख्रि पू ६१२ मध्ये झालेल्या त्यांच्या पतनापूर्वीचा काळ असल्याचे स्पष्ट होते. ख्रि पू ६२६ मध्ये अशुर्बनिपालच्या मृत्युपूर्वी अश्शूरचा वेगाने ऱ्हास झाल्यानंतरचा हा काळ दिसतो. नोआमोनचा ख्रि पू ६२३ मध्ये अशुर्बनिपालच्या हस्ते झालेल्या पतनाचा नहूम उल्लेख करतो. त्यालाच थोबेस असेही संबोधले जाते (३:८-१०). ती घटना त्यांच्या समक्ष नुकतीच घडली आहे. १० वर्षांनंतर ते प्रज्ज्वलित झाल्याचा उल्लेख नाही. यावरून ख्रि पू ७ व्या शतकाचा तो मध्य असावा. म्हणजे यहूदाच्या मनश्शे राजाच्या राजवटीचा तो काळ असावा (२ राजे २१:१-१२; ख्रि पू ६४२).

पार्श्वभूमी

योनाच्या संदेशावरून निनवेने केलेल्या पश्चात्तापानंतर १०० वर्षे उलटून गेली आहेत. निनवे पुन्हा मूर्तिपूजा, हिंसा व उर्मटपणाकडे वळली आहे (३:१-४). अश्शूरने सत्तेचा कळस गाठला होता. यरुशलेमपाशी सन्हेद्रीबकडून पराभव झाल्यानंतर (ख्रि पू ७०१) ते सावरले होते (यशया३७:३६-३८). त्याच्या सीमा मिसरला जाऊन भिडल्या होत्या. एसर हद्दोनने नुकतेच शोमरोन व गालील जिंकून तेथील बंदीवानांचे स्थलांतर करुन त्यांच्या जागी आपले लोक वसवले होते (ख्रि पू ६७०; २ राजे १७:२४; एज्रा ४:२). सिरीया व पॅलेस्ताईन दुर्बल झाले होते पण देवाने बाबेलचा राजा नबुखद्नेसर कडून निनवेला त्याचे अंकित केले होते (ख्रि पू ६१०). व देवाने भाकित केल्याप्रमाणे अश्शूरचा नाश झाला.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

सुमारे १०० वर्षांपूर्वी योनाने दिलेल्या संदेशाशी नहूमचे पुस्तक सांगड घालते. देवाने इशारा केल्याप्रमाणे होणारा न्याय देवाने प्रस्थापित केल्याविषयी योनाचा संदेश होता. तर देवाच्या न्यायाची आगामी काळात अंमलबजावणी होणार असल्याचे वर्णन नहूम करतो. आपल्या नगराला जराही कोणी इजा करू शकणार नाही असा निनवेला गर्व होता. कारण त्याची तटबंदी १००' उंच, १५०' रुंद व ६०' खोल होती. पण नहूमने जोरदार हे सत्य मांडले की सार्वभौम

देव (१ :२-५) त्याचे नियम मोडणाऱ्यांचा बदला घेईल (१:८,१४;३:५-७). ज्या देवाने अधर्माबद्दल न्याय आणून सूड घेतला तोच मुक्तिदाता देखील आहे. विश्वासी जनांवर तो प्रीतीचा वर्षाव करतो (१:७,१२,१३,१५;२:२). या भाकिताने अश्शूरला भिणाऱ्या सर्वांना व यहूदाला समाधान मिळाले. नहूमने भाकित केले की निनवेचा महापुराने नाश होईल (१:८) आणि नेमके असेच घडले. तैग्रीस नदी दुथडी भरून वाहिली व निनवेची तटबंदी अशी पडली की बाबेलचे सैन्य सहज आत घुसले. नहूमने भाकित केले होते की हे नगर लपेल (३:११) आणि खरोखर ख्रि पू ६१२ मधील विनाशानंतर इ. स . १८४२ पर्यंत त्याचे अवशेषही सापडले नव्हते. अश्शूरची क्रूर दुष्कृत्ये व मूर्तिपूजेबद्दलचा देवाकडील न्याय हे पुस्तक जाहीर करते.

रूपरेषा

(I) निनवेचा नाश जाहीर. १:१-१५

(अ) देवाचे सामर्थ्य. १:२-८

(ब) देव शासन सांगतो. १:९-१५

(II) निनवेच्या नाशाचा तपशील. २:१-१३

(अ) नगरावर हल्ला. २:१-१०

(ब) नगरातील अपकीर्ती. २:११-१३

(III) निनवेच्या विनाशाचा आग्रह. ३:१-१९

(अ) पहिला आरोप. ३:१-३

(ब) दुसरा आरोप. ३:४-७

(क) तिसरा आरोप. ३:८-१९

प्रकरण ३५

हबक्कूक

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ८

लेखक व काळ

हबक्कूक या नावाचा अर्थ "अलिंगन देणारा." यातील संदेश वाचून झाल्यावर हे नाव सार्थ असल्याचे लक्षात येते. कारण आपल्या लोकांविषयी देवाची योजना समजली नसली तरी हा संदेष्टा देवाला अलिंगन देताना दिसतो. या पुस्तकात उल्लेखलेली त्याच्याविषयीची माहिती फक्त आपल्याला उपलब्ध होते. त्या काळचा तो सर्वपरिचित संदेष्टा असल्याचे पुस्तकाच्या नावावरूनच समजते. यिर्मया, यहेज्केल, दानीएल व सफन्याचा तो समकालीन होता.

ख्रि पू ६१२मध्ये नबुखद्नेसरने सैन्य निनवेतून कूच करण्यापूर्वीचा १:६ मधील उल्लेख दाखवतो की तो हारानातून ख्रि पू ६०९ मध्ये व मग कार्कमिश मधून ख्रि पू ६०५ मध्ये यरुशलेमास आला होता. हबक्कूकचा करुण विलाप १:२-४ लागलाच योशियाच्या मृत्युनंतरचा काळ दाखवतो. म्हणजे ख्रि पू ६०९ मध्ये या देवभीरू राजाने केलेल्या सर्व सुधारणा (२ राजे २३) त्याचा पुत्र यहोयाकीमने त्वरेने झुगारून दिल्याचे लक्षात येते (यिर्मया २२:१३-१९).

पार्श्वभूमी

अश्शूरने साम्राज्य अस्तास जाताना व बाबेलचा राजा नबोपलेसर आणि त्याचा पुत्र नबुखद्नेसर यांच्या राजवटीत त्यांचे जागतिक साम्राज्य उदयास येताना हबक्कूकने संदेश दिला. ख्रि पू ६२६ मध्ये नबोपलेसर सत्तेवर येताच त्याने उत्तर दक्षिण आपला प्रभाव पाडण्यास आरंभ केला. तर नबुखद्नेसरच्या नेतृत्वाखाली त्याच्या सान्याने निनवे धुळीस मिळवले. तेव्हा अश्शूरच्या राजास प्रथम हारानात व मग कार्कामिश मध्ये आश्रय घेणे भाग पडले. तेव्हा नबुखद्नेसरने त्याचा पाठलाग करून प्रथम हारान ख्रि पू ६०९ मध्ये व कार्कामिश ख्रि पू ६०६ मध्ये हस्तगत केले.

मिसरचा राजा नखो पलायन करणाऱ्या अश्शूरच्या राजाच्या मदतीला ख्रि पू ६०९ मध्ये यहूदातून कूच करीत जाताना मगिद्दो येथे यहूदाचा राजा योशीया याने त्याला अटकाव केला (२ इतिहास ३५:२०). त्या लढाईत योशीया मारला गेला व त्याचे तीन राजपुत्र नातवाच्या हाती सापडले. यापूर्वी मंदिरात मिळालेल्या नियमशास्त्राच्या प्रतीमुळे (ख्रि पू ६२२) योशियाने यहूदात महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणल्या होत्या (२ राजे अध्याय २२,२३). आपला बाप आमोन व आजोबा मनश्शे यांनी सुरू केलेल्या मूर्तिपूजेच्या चालीरीतींचा नायनाट केला होता (२ राजे २१:११-१३,२०-२२). पण योशीयाच्या मृत्युनंतरच राष्ट्राने लागलीच आपला भ्रष्ट मार्ग धरला (यिर्मया २२:१३-१९). त्यामुळे देव मौन धरीत आहे पण दंडात्मक कारवाई का करीत नाही असा हबक्कूक प्रश्न करताना दिसतो (१:२-४) व आपल्या कराराच्या लोकांना शुद्ध करावे अशी विनंती करतो.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

आरंभीची वचने आमोस व मीखा प्रमाणे ऐतिहासिक परिस्थिती उघड करतात. त्या भूमीतून न्यायाचे तर उच्चाटनच झाले होते. दुष्टता व हिंसा बोकाळली होती. कोणाचा वचक राहिला नव्हता. अशा काळ्या काळात देवाने हस्तक्षेप करावा म्हणून हा संदेष्टा आरोळी करतो (१:२-४). त्यावर देवाने प्रतिसाद दिला की यहूद्यांचा न्याय करायला देव त्यांच्यावर खास्द्यांना पाठवील (१:५-११). त्यामुळे हबक्कूकला प्रश्न पडतो की देवाने आपल्या लोकांना शुद्ध

करून त्यांचे धार्मिक बाबतीत पुनरुज्जीवन का केले नाही? खास्द्यांचा वापर त्यांच्यापेक्षा अधिक धार्मिक असलेल्या राष्ट्राचा न्याय करायला देव कसा काय करू शकतो (१:१२-२:१)? त्याला देवाचे हे उत्तर होते की देव खास्द्यांचाही न्याय करील (२:२-२०). पण एवढ्यावरच हबक्कूकचे ईश्वरज्ञानाबाबत समाधान झाले नाही तर उलट त्याच्या प्रश्नांची धार अधिकच तीक्ष्ण होते. अधर्माला असलेल्या देवाच्या न्यायी प्रतिसादाबद्दल आरोळी करण्याचे त्याच्या मनात नव्हते. तर आपल्या कराराच्या लोकांची बाजू घेऊन देव त्यांचा का बदला घेत नाही हा त्याचा मुख्य मुद्दा होता (१:१३). ईयोबाप्रमाणे हा संदेष्टा देवाशी वाद घालतो. या अनुभवातून जाताना त्याला देवाच्या सार्वभौमत्वाचे खोल ज्ञान होते व देवावरील त्याचा विश्वास दृढ होतो (ईयोब ४५:५,६; यशया ५५:८,९). शेवटी हबक्कूकला कळून चुकते की देवाने वर्षाव केलेल्या क्षणभंगुर आशीर्वादांसाठी देवाची आराधना करायची नसते तर देव जो काही आहे त्यासाठी त्याची उपासना करायची असते (३:१७-१९).

महत्त्वाचा विचार

सर्वांच्या जीवनातील मूलभूत प्रश्नांचे हबक्कूक प्रतिनिधित्व करतोय. त्यातून देवाचे स्वभावगुण व इतिहासातील त्याचे सार्वभौमत्व याचे योग्य ज्ञान रचले जावे म्हणून महत्त्वाची मूलभूत उत्तरे देतो. त्याच्या संदेशाचा गाभा देवावर विश्वास ठेवण्यास केलेले पाचारण हा आहे. "धार्मिक तर आपल्या विश्वासाने वाचेल" (२:४). हा महत्त्वाचा संदर्भ नव्या करारात इब्री लोकांच्या पत्रात आला आहे. इब्री १०:३८ मध्ये विश्वासी व्यक्तीने संकटक्लेशातून जाताना विश्वासात भक्कम राहाण्याची गरज स्पष्ट केली आहे. पौलही रोम १:१७ व गलती ३:११ मध्ये या संदर्भात बोलतो.
तेथे विश्वासाने नीतिमान ठरले जाण्याचा सिद्धांत प्रामुख्याने मांडलेला दिसतो. विश्वास ही एकदाच करण्याची कृती नसून ती जीवनशैली आहे. देव खऱ्या विश्वासी व्यक्तीला ती नीतिमान असल्याचे जाहीर करतो. ही व्यक्ती आयुष्यभर चिकाटीच्या विश्वासाने जगण्याची सवयच लावून घेते (कलसै१:२२,२३; इब्री ३:१२,१४). सार्वभौम देवावर ती व्यक्ती असा विश्वास ठेवते की तो नेहमी योग्य तेच करतो.

रूपरेषा

(I) प्रस्तावना. १:१

(II) संदेष्ट्याचा पेच. १:२-२:२०

- (अ) पहिली तक्रार. १:२-४
- (ब) देवाचा पहिला प्रतिसाद. १:५-११
- (क) त्याची दुसरी तक्रार. १:१२-२:२
- (ड) देवाचा दुसरा प्रतिसाद. २:२-२०

(III) संदेष्ट्याची प्रार्थना. ३:१-१९

- (अ) देवाच्या दयेसाठी विनवणी. ३:१,२
- (ब) देवाच्या सामर्थ्यासाठी स्तुती. ३:३-१५
- (क) देवाच्या पुरेपणाचे अभिवचन. ३:१६-१९

प्रकरण ३६

सफन्या

लहान संदेष्ट्यांची पुस्तके – क्र ९

लेखक व काळ

सफन्या या नावाचा अर्थ "देव लपवतो"(२:३). त्याची वंशावळ हिज्कीया राजाच्या चार पिढ्या मागे जाते (ख्रि पू ७१५- ख्रि पू ६८६). त्याच्याठायी राजरक्त होते. राजवंशाने त्याच्या संदेशाकडे कान दिला. योशीयाच्या राजवटीत त्याने संदेश दिला (ख्रि पू ६४०-ख्रि पू ६०९). नैतिक व आध्यात्मिक तपशील या पुस्तकात दिला आहे (१:४-६;३:१-७). त्यावरून तो योशीयाच्या सुधारणांपूर्वीचा काळ दिसतो. तेव्हा यहूदात अधर्म व मूर्तिपूजा चालूच होती. ख्रि पू ६२८ मध्ये योशियाने बाल दैवतांच्या मूर्ती पाडून टाकल्या होत्या. खोट्या संदेष्ट्यांच्या अस्थी भस्म केल्या होत्या व कोरीव मूर्त्या फोडून टाकल्या होत्या (२ इतिहास ३४:३-७). ख्रि पू ६२२ मध्ये नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला (२ इतिहास ३४:८-३५:१९) तेव्हा सफन्या ख्रि पू ६३५ ते ख्रि पू ६२५ मध्ये संदेश देत असावा. तो यिर्मयाच्या समकालीन होता.

पार्श्वभूमी

राजकीय दृष्ट्या पाहिले तर अश्शूरच्या हातची जागतिक सत्ता बाबेलकडे गेली होती त्यामुळे निनवेची यहूदावरील पकड ढिली पडली होती. ५० वर्षात प्रथमच यहूदाला स्वातंत्र्य प्राप्त झाले होते. ते टिकवून ठेवण्याची योशीयालाही उत्कट इच्छा झाल्यानेच पलायन करणाऱ्या अश्शूरच्या मदतीला मिसर ख्रि पू ६०९ मध्ये निघाला तेव्हा हस्तक्षेप करून त्याला मनाई करण्याची त्याला इच्छा झाली यात शंकाच नाही (२ इतिहास ३५:२०-२७).
हिज्कीयाचा पुत्र मनश्शेची ४० वर्षांची तर त्याचा नातू आमोनची २ वर्षांची राजवट अधर्म, दुष्टता व भ्रष्टाचाराची होती (२ राजे २१;२ इतिहास ३३). योशीयाची आरंभीची राजवट त्याच्या बापापासून आलेल्या अधर्माचीच होती (२ राजे २३:४). ख्रि पू ६२२ मध्ये प्रभूच्या मंदिराची डागडुजी करताना मुख्य याजक हिल्कियाला नियमशास्त्राचा ग्रंथ सापडला (२ राजे २२:२८). तो वाचल्यावर योशीयाने पुढाकार घेऊन प्रचंड धर्मसुधारणा केल्या (२ राजे २३). महासंजीवनापूर्वी अगदी शेवटच्या घटनेला सफन्याने संदेश दिला. त्याचा प्रचंड प्रभाव नंतर योशीयाने केलेल्या सुधारणांवर पडला. तरीही योशीयाच्या ५५ वर्षांपूर्वीच्या अधम राजामुळे झालेल्या दुष्परिणामांमधून यहूदाचे राज्य सावरू शकले नाही. योशीयाच्या सुधारणांना फार उशीर झाला होता आणि त्या फार काळ टिकल्याही नाहीत.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

प्रभूच्या दिवसाविषयीच्या सफन्याच्या संदेशाने यहूदाला इशारा दिला की शेवटचे दिवस जवळ आले आहेत. तसेच नबुखद्नेसरच्या चढाईने (ख्रि पू ६०५-५८६) यहूदावरील दैवी न्याय लवकरच सुरू होणार आहेत (१:४-१३). हे दिवस दानीएलाच्या ७० व्या सप्तकाकडेही दृष्टिक्षेप टाकतात (१:१८,३:८). इतर संदेष्ट्यांच्या तुलनेत "प्रभूचा दिवस" हा शब्दप्रयोग हा संदेष्टा अधिक वेळा वापरतो व तो दिवस जवळ आल्याचे सूचित करतो (१:७). तो दिवस क्रोधाचा, संकटांचा, क्लेशाचा, भ्रष्टतेचा, विध्वंसाचा, उदासीनतेचा, मेघांचा, घनदाट अंध:काराचा, कर्ण्यांचा व गजराचा असणार आहे (१:१५,१६,१८). दैवी क्रोधावरचे हे भाष्य करतानाच हा संदेष्टा देवाला प्राप्त करण्याची खटपट करण्यास उत्तेजन देतो शिवाय तो न्याय चालू असतानाही त्या देवाकडे आसरा मिळण्याची आशा देतो (२:३). आणि

कालांतराने अवशिष्टांनी विश्वास ठेवल्याने त्यांना प्राप्त होणाऱ्या तारणाची घोषणा करतो (२:७;३:९-२०).

काही विचार

तो यहूदाच्या पापांबद्दल उघडपणे दोषारोप ठेवतो व जवळ येऊन ठेपलेल्या न्यायाविषयी इशारा देतो (३:९). हे वचन समजून घेण्यासाठी हा संपूर्ण उतारा ऱ्हदय व जीवनाच्या शुद्धीकरणाविषयी असल्याचे लक्षात घ्यावे. वचन ३:१३ पण वाचा. तेथे अंतर्यामातील पापांच्या शुद्धीशी मुखाने बोलण्याचा संबंध दर्शवला आहे (यशया ६:५). पापापासूनचे शुद्धीकरण मुखातून बोलले जाते (मत्तय १२:३४). मुखातून खोट्या देवतांचे नावही काढून टाकले जाते (होशेय २२:१७). कोणत्याही एका बोली भाषेशी याचा संबंध नाही हे लक्षात घ्यावे.

रूपरेषा

(I) प्रस्तावना. १:१

(II) देवाचा न्याय. १:२-३:८

- (अ) संपूर्ण भूतलावर. १:२,३
- (ब) यहूदावर. १:४-२:३
- (क) सभोवतालच्या राष्ट्रांवर. २:४-१५
    - (१) पलिष्टी २:४-७
    - (२) कूश २:१२
    - (३) अश्शूर २:१३-१५
    - (४) यरुशलेम ३:१-७
    - (५) सर्व राष्ट्रांवर ३:८

(III) देवाचे आशीर्वाद. ३:९-२०

- (अ) राष्ट्रांवर. ३:९,१०
- (ब) यहूदावर. ३:११-२०

प्रकरण ३७

हाग्गय

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र १०

लेखक व काळ

"हाग्गय" चा अर्थ उत्सवमूर्ती. हाग्गय सणाच्या दिवशी जन्मला असे म्हणतात. ओबद्यानंतरचे हे दुसरे छोटे पुस्तक. इब्री १२:२६ मध्ये त्याचा उल्लेख आहे. त्याच्या या छोट्या संदेशाखेरीज त्याची काहीच माहिती उपलब्ध नाही. एज्रा ५:१ व ६:१४ मध्ये जखऱ्यासोबत त्याचा ओझरता उल्लेख आहे. एज्रामधील निर्वासितांच्या यादीत त्याचे नाव दिसत नाही. त्याचा वंश, कूळ, घराणे , त्याचा व्यवसाय याविषयी इतिहास काहीच नोंद देत नाही. हाग्गय २:३ वरून त्यानेही शलमोनाच्या मंदिराचे वैभव पाहिले होते हे सूचित होते. त्यामुळे हे पुस्तक लिहिताना त्याचे वय ७० असावे असे दिसते. त्याच्या संदेशाच्या तारखेविषयी काहीच मतभेद नाहीत. त्याच्या चार भाकितांचे प्रसंग स्पष्ट नमूद केले आहेत (१:१;२:१; २:१०;२:२०). हे प्रसंग दारयावेश हायस्तस्पस राजाच्या कारकीर्दीच्या (ख्रि पू ५२१- ख्रि पू ४८०) दुसऱ्या वर्षी घडले आहेत (ख्रि पू ५२०). हाग्गय जरुब्बाबेल सोबत यरुशलेमास ख्रि पू ५३८ मध्ये परतला असावा.

पार्श्वभूमी

पारसाचा राजा कोरेशाने ख्रि पू ५३८ मध्ये (एज्रा १:१-४) इस्राएलांनी बाबेलमधून आपल्या मायभूमीस जरुब्बाबेल व मुख्य याजक यहोशवाच्या नेतृत्वाखाली परतावे असा जाहीरनामा काढला (एज्रा ३:२). सुमारे ५०००० यहूदी त्यांच्यासोबत ख्रि पू ५३६ मध्ये परतले. त्यांनी मंदिराच्या पुनर्बांधणीस सुरुवात केली (एज्रा ३:१-४:५). शेजारील राष्ट्रांकडून त्यांना विरोध झाला व यहूद्यांनी तटस्थ धोरण स्वीकारल्यामुळे काम बंद करावे लागले (एज्रा ४:१-२४). १६ वर्षांनी लोकांची मने उत्तेजित करण्यासाठी देवाने हाग्गय व जखऱ्याची निवड केली.
(१) मंदिराची पुनर्बांधणी करायची तर होतीच पण
(२) त्यांनी आपल्या आध्यात्मिक प्राधान्यांना योग्य क्रम द्यायचा होता (एज्रा ५:१-६:२२).
याचा परिणाम असा झाला की पुढे चार वर्षात मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले (ख्रि पू ५१६,एज्रा ६:१५).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

मंदिराची पुनर्बांधणी हा मुख्य विषय आहे. ख्रि पू ५८६ मध्ये नबुखद्नेसरने ते धुळीस मिळवल्यापासून ते तसेच पडीक होते. देवाकडून हाग्गयला पाच संदेश प्राप्त झाले. नव्याने परिश्रमपूर्वक मंदिराची पुनर्बांधणी करण्यास हाग्गयने लोकांना उत्तेजन दिले. दुष्काळ व नापिकता आध्यात्मिक प्राधान्यांचा क्रम चुकल्याने येते हे त्याने लोकांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे लोकांना प्रेरणा मिळाली (१:११). पण हाग्गयच्या मते मंदिराची पुनर्बांधणी होणे हा शेवट नव्हता. मंदिर देवाच्या निवासस्थानाचे प्रतीक होते. त्याच्या निवडलेल्यांना त्याचे सान्निध्य प्रकट करण्याचे ते स्थान होते. नबुखद्नेसर मंदिराचा विध्वंस करणार असल्याने देवाचे तेथे वसत असलेले गौरव आधीच तेथून निघून गेले होते (यहेज्केल अध्याय ८-११). संदेष्ट्यांना वाटत होते की मंदिराची पुनर्बांधणी केल्यास देवाचे सान्निध्य परत येऊन त्यात वसणार होते. ह्या ऐतिहासिक घटनेच्या संदर्भ घेऊन हाग्गय प्रकटीकरण करतो की (२:७) हे सर्वोच्च गौरव आता थेट मशीहाच्या १००० वर्षांच्या मंदिरातच येणार. महान शांती (२:९); भरभराट (२:१९); दैवी राजसत्ता (२:२१,२२) व राष्ट्रीय आशीर्वाद १००० वर्षांच्या राज्यात देव देणार. या अभिवचनाने त्याने लोकांना उत्तेजित केले.

महत्त्वाचा विचार

(१) "राष्ट्रातील निवडक वस्तू"(२:७) व "रुपे माझे आहे, सोने माझे आहे " (२:९) या शब्दप्रयोगांवर विचार करताना येथे अखेर मशीहा जो मुक्तिदाता याच्याच मालकीची सर्व राष्ट्रे आहेत, हे लक्षात घ्यावे.

(२) पुरातन रब्बी व प्रारंभीचे मंडळी "गौरव" चा उल्लेख करताना मशीहा या व्यक्तीच्या संदर्भात आहे असे मानतात. (यशया ४०:५; ६०:१; लूक २:३२.)

रूपरेषा

(I) अवज्ञेबद्दल कानउघाडणी. १:१-११

२ रे वर्ष - ६ वा महिना - एक तारीख

(II) अवशिष्ट लोक प्रतिसाद देऊन पुनर्बांधणी करतात. १:१२-१५

२ रे वर्ष - ६ वा महिना -२४ तारीख

(III) देवाच्या गौरवाचे पुनरागमन. २:१-९

२ रे वर्ष - ७ वा महिना - २१ तारीख

(IV) धार्मिक प्रश्न. २:१०-१९

२ रे वर्ष - ९ वा महिना -२४ तारीख

(V) प्रभूचे राज्य. २:२०-२३

२ रे वर्ष - ९ वा महिना - २४ तारीख

प्रकरण ३८

जखऱ्या

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र ११

लेखक व काळ

यहूदी व ख्रिस्ती आख्यायिकांनुसार जखऱ्याच या पुस्तकाचा लेखक आहे. त्याच्या नावाचा अर्थ "प्रभू स्मरण करतो" असा आहे. यशया खालोखाल मशीहाविषयीची भाकिते देणारे जुन्या करारातील हे दुसरे पुस्तक आहे. यिर्मया व यहेज्केल प्रमाणे जखऱ्या देखील याजक होता (नहेम्या १२:१२-१६). आख्यायिकेनुसार १२० लोकांच्या महा सभास्थानाच्या धर्मसभेचा सदस्य होता. मुळात नहेम्याने तिची स्थापना केली होती आणि एज्राने अध्यक्षपद सोपवले होते. पुढे हीच धर्मसभा इस्राएल राष्ट्रावर सत्ता चालवणाऱ्या वडिलांचे मंडळ बनली व सन्हेद्रीन नावाने ओळखली जाऊ लागली.

जखऱ्याचा जन्म बाबेलात झाला होता. तो आपले आजोबा इद्दोसोबत जरुब्बाबेल व मुख्य याजक यहोशवाच्या नेतृत्वाखाली यरुशलेमास बाबेलातून प्रथम परतणाऱ्या यहुद्यांच्या समुहाबरोबर परतला होता (नहेम्या१२:४). त्याच्या आजोबांच्या नावासोबत त्याचा वारंवार उल्लेख आढळतो (एज्रा ५:१;६:१४;नहेम्या १२:१६). यावरून लक्षात येते की त्याचा बाप बरख्याचा जखऱ्याच्या बालपणीच मृत्यू झाला असेल. त्यामुळे आपल्या पित्याच्या जागी याजकाचे स्थान घेऊ शकला नसेल.

जखऱ्याची सुरुवातीची वचने ख्रि पू ५२० मधील आहेत. ते दारायवेशचे दुसरे वर्ष होते (१:१). सम्राट कोरेशचा मृत्यू झाल्यानंतर ख्रि पू ५३० ते ख्रि पू ५२१ कम्बायसेस सम्राट झाला व त्याने मिसर हस्तगत केले. त्याला पुत्रसंतान नसल्याने त्याने आत्महत्या केली तेव्हा बंड करून दारायवेश सत्तेवर आला. जखऱ्या हा हाग्गयच्या समकालीन होता.

त्याच्यानंतर दोन वर्षांनी तो संदेश देऊ लागला. (हाग्गयच्या प्रस्तावना वाचा.) जखऱ्या २:४ मध्ये त्याला "तरुण" म्हटले आहे . त्याचा सेवाकाल किती हे सांगता येणार नाही. शेवटच्या तारखेनुसार (७:१) पहिल्या संदेशानंतर हा दुसरा संदेश त्याला प्राप्त झाला. हाग्गय व त्याच्या संदेशात साम्य आढळते. ९-१४ अध्याय त्याला सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात प्राप्त झालेले संदेश आहेत. भाषाशैलीतील फरक व ग्रीस साम्राज्याचा उल्लेख यावरून ख्रि पू ४८० ते ख्रि पू ४७० दरम्यान म्हणजे दारायवेशनंतर आणि ज्या अर्तहशस्त राजाने एस्तेरचा राणी करून घेतले त्या राजाच्या राजवटीत म्हणजे ख्रि पू ४८६ ते ख्रि पू ४६४ या काळात ते लिहिले गेले असे स्पष्ट होते. मत्तय २३:३५ नुसार मंदिर व वेदीच्या मधल्या भागात यापूर्वीच्या ज्या जखऱ्याला दगडमार करून मारण्यात आले (२ इतिहास २४:२०,२१) तशीच या जखऱ्याचीही हत्या करण्यात आली.

पार्श्वभूमी

जखऱ्या व हाग्गय समकालीन असल्याने दोघांची पार्श्वभूमी एकच आहे. हाग्गयची प्रस्तावन वाचा. ख्रि पू ५३८ मध्ये पारसच्या कोरेश सम्राटाने इस्राएल बंदीवानांना आपल्या मायभूमीत परतण्यास मुक्त केले (एज्रा १:१-४). तेव्हा ५००० यहूदी यरुशलेमास परतले. लागलीच त्यांनी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू केले (एज्रा ३:१-४:५). पण शेजार

राष्ट्रांकडून होणारा बाह्यत: विरोध व अलिप्ततेच्या अंतर्गत समस्यांमुळे काम स्थगित करावे लागले (एज्रा ४:२४). सोळा वर्षांनंतर (एज्रा ५:१,२) देवाने जखऱ्या व हाग्गय यांच्यावर लोकांना प्रेरणा देऊन मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण करून घेण्याची कामगिरी सोपवली. त्याचा परिणाम असा झाला की चार वर्षांनी जीर्णोद्धार करण्याचे काम पूर्ण झाले (एज्रा ६:१५).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

लोकांच्या तटस्थतेला आव्हान देऊन मंदिराचा जीर्णोद्धार करण्यास त्यांना चेतना देण्याचे काम जखऱ्या व हाग्गय दोघांनी मिळून केले. हाग्गयच्या संदेशात लोकांची तटस्थ वृत्ती, पाप व देवावरील विश्वासाचा अभाव याविषयी कानउघाडणी केली आहे. संजीवन सुरू होण्यास त्याचा खूपच फायदा झाला. तर जखऱ्याच्या संदेशामुळे संजीवनास बळकटी येऊन टिकून राहण्यासाठी उपयोग झाला. म्हणून तो आपल्या संदेशात लोकांना पश्चात्तापास पाचारण करून भावी आशीर्वादाची हमी देणारी अभिवचने देतो. मंदिराच्या जीर्णोद्धारास प्रोत्साहन देताना एक दिवस मशीहा त्यात वस्ती करण्यास येणार आहे हा मुद्दा त्याने दृष्टीसमोर ठेवला. लोक केवळ त्या काळासाठी मंदिराची पुनर्बांधणी करत नव्हते तर अंत:करणात भावी मशीहाची आशा बाळगून काम करत होते. तेव्हा विदेश्यांच्या सत्तेत अंकित राहून पिचत असणाऱ्या लोकांना त्याने उत्तेजित केले (१:८-१२). देवाला अजूनही कराराची आठवण असून तो त्यांचा उद्धार करून आशीर्वाद देणार असल्याचे सत्य तो त्यांना सांगतो. त्यामुळे "प्रभू स्मरतो " या अर्थाने या पुस्तकाचे शीर्षक योग्यच आहे. हेच त्याच्या संदेशांचे बीज आहे .

हे संदेश त्या काळच्या त्याच्या श्रोत्यांना व भावी काळालाही लागू आहेत. त्याचा प्रत्येक संदेश ऐतिहासिक घटनेच्या नोंदींने सुरू होतो व मग मशीहाच्या द्वितीयागमनाकडे वळतो. त्यात तो सांगतो की मशीहा परत मंदिरात वसेल व या भूतलावर आपले राज्य प्रस्थापित करील. आपल्या श्रोत्यांच्या लक्षात आणून देतो की मशीहाची त्यांच्याशी बांधिलकी आहे व ती दीर्घकालीन आहे. ते यामुळे त्याची वचने त्यांना व भावी काळच्या देवाच्या निवडलेल्या अवशिष्ट लोकांसाठी उत्तम असून आनंद व समाधान देणारी होती.

जुन्या करारातील हे पुस्तक शेवटच्या काळाविषयी व मशीहाविषयी खूप काही सांगते. इस्राएलांचे सांत्वन करण्यास तो गौरवाने येणार या मुद्द्यांवर तो लक्ष केंद्रित करतो (१::१३,१७). हे पुस्तक पुष्कळ दृष्टांत, संदेश, चिन्हे, भाकिते, स्वर्गीय देखावे, देवाची वाणी यांनी भरलेले आहे. तसेच पश्चात्ताप, दैवी देखभाल, तारण व पवित्र जीवन हे व्यावहारिक मुद्दे हाताळते. लागलीच म्हणजे ४०० वर्षे थेट बाप्तिस्मा करणारा योहान येईपर्यंत देवाचे संदेश प्राप्त होणार नसल्याने मौनाचा काळा काळ येणार होता. म्हणून देवाने जखऱ्याद्वारे अगदी विपुल, संपन्न, समृद्ध अशी भावी काळाविषयीची बहारदार वचने दिली यासाठी की त्या ४०० वर्षांच्या काळात विश्वासी अवशिष्ट लोकांचे जतन व्हावे.

काही महत्त्वाचे विचार

(१) खूप महत्त्वाचे विषय आहेत पण समजायला अवघड असलेली दोन भाकिते पाहू या. ११:८ मध्ये म्हटले आहे की "उत्तम मेंढपाळाने तीन मेंढपाळ एका महिन्यात कापून टाकले." त्या काळच्या यहूद्यांना हा संदर्भ लक्षात येईल असा परिचित असल्याने पुढे स्पष्टीकरण दिलेले नाही. पूर्वापार याचा परिचित अर्थ असा आहे की हे तीन पुढारी क्रमाने इस्राएलचे याजक, वडील व शास्त्री आहेत. येशूनेही भूतलावरील आपल्या सेवाकालात प्रारंभापासून इस्राएलांचे

धर्मपुढारी म्हणजे याजक, शास्त्री व परूश्यांची त्यांच्या ढोंगीपणाबद्दल कानउघाडणी केलेली दिसते. उदा. मत्तय २३. जिव्हारी लागतील असे त्यांनी येशूवर आरोप करून त्याला आपले मानले नाही व त्याचा धिक्कार केला (योहान १:११) म्हणून त्यांचा कडक न्याय झाला व अखेर इ स ७० साली ते संपूर्ण राष्ट्रच उध्वस्त झाले. येशूच्या पहिल्या आगमनाच्या वेळीही त्यांना आपला संदेष्टा, याजक किंवा राजा नव्हता.

(२) १३:६ मध्ये कोणाच्या " बाहुंच्या खालच्या जखमांविषयी" उल्लेख आहे? कोणी येशूच्या जखमांनी या वचनांचा संदर्भ लावतात पण मागण्या पुढच्या वचनांचा संदर्भ घेतला तर आपण संदेष्टा असल्याचे येशूने कधी नाकारले नाही की आपण शेतकरी असल्याचा कधी दावा केला नाही. किंवा त्याच्या इष्टमित्रांच्या घरी त्याला कधी घाय झाले नाहीत. अर्थात हे तर खोट्या संदेष्ट्याच्या संदर्भात म्हटले आहे (१३:४,५). मूर्तिपूजा करीत असता त्याला घायाळ करण्यात आले आहे. मशीहाच्या राज्यात प्रभूसाठी लोक एवढे आवेशी असतील की मूर्तिपूजक लोक आपल्या घायांवरून पटवणारी आपली ओळख लपवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतील. पण त्यांच्या अंगावरील व्रणच त्यांची ओळख पटवणारे पुरावे असतील.

रूपरेषा

(I) पश्चात्तापास पाचारण. १:१-१:६

(II) जखऱ्याचे रात्रीचे ८ दृष्टांत. १:७-६:१५

- (१) मेंदीच्या झुडपातील मनुष्य. १:७-१७
- (२) चार शृंगार व चार लोहार. १:१८-२१
- (३) हाती ओळंबा असलेला मनुष्य. २:१-१३
- (४) मुख्य याजकाचे शुद्धीकरण. ३:१-१०
- (५) सोन्याचा दीपवृक्ष व जैतुनाची दोन झाडे. ४:१-१४
- (६) उडता पट. ५:१-४
- (७) टोकरीतील (एफा) स्त्री. ५:१-११
- (८) चार रथ. ६:१-८
- (९) पुरवणी - मुख्य याजक यहोशवाला प्रतिकात्मक मुकुट. ६:९-१

(III) जखऱ्याचे चार संदेश. ७:१-८:२३

- (१) उपासाचा प्रश्न. ७:१-३
- (२) चार प्रतिसाद. ७:४-८:२३
  - (अ) चुकीच्या हेतुबद्दल दटावून ७:४-७
  - (ब) पश्चात्ताप आवश्यक ७:८-१४
  - (क) मेहरबानीने उद्धार ८:१-१७
  - (ड) उपास मेजवानीच बनतो ८:१८-२३

(IV) जखऱ्याचे दोन भार. ९:१-१४:२१

(१) पहिल्या आगमनसमयी मशीहाचा धिक्कार. ९:१-११:२७

(२) दुसऱ्या आगमनसमयी मशीहाचा स्वीकार. १२:१-१४:२१

प्रकरण ३९

मलाखी

लहान संदेष्ट्यांची पुस्तके - क्र १२

लेखक व काळ

मलाखीच या पुस्तकाचा लेखक आहे. लहान संदेश देणाऱ्यांपैकी हा शेवटचा संदेष्टा. ऐतिहासिक व संदेशाच्या दृष्टीने देव जुन्या कराराची अस्सल ग्रंथसंहिता बंदिस्त करत आहे. हा संदेष्टा देखील इतर अनेक संदेष्ट्यांप्रमाणेच आपली पार्श्वभूमी देत नाही. तरीही प्रस्तावनेत ऐतिहासिक उल्लेखाद्वारे तो आपली ओळख पटवतो. ऐतिहासिक आख्यायिकेनुसार मलाखी देखील महा सभास्थानाच्या धर्मसभेचा सदस्य होता. त्यांनीच संपूर्ण जुन्या कराराचे संकलन व जतन केले.

पुस्तकाचा आशय लक्षात घेता ख्रि पू ४३३ ते ख्रि पू ४२४ मध्ये जेव्हा नहेम्या पारसास परतला त्या काळात हे पुस्तक लिहिले असे स्पष्ट होते (नहेम्या ५:४;१३:९). ख्रि पू ५१६ मध्ये मंदिराच्या डागडुजीचे काम पूर्ण झाले होते (एज्रा ६:१३-१५). दुसऱ्यांदा बांधलेल्या या मंदिरात अर्पणे होत होती (१:७ -१०;३:९). पुढे बरीच वर्षे गेल्यावर याजक फार आत्मसंतुष्ट बनून भ्रष्ट झाले (१:६-२:९). मलाखी देत असलेल्या प्रांताधिकाऱ्याच्या संदर्भावरून (१:८) नहेम्या पारसास परतला तेव्हा यहूदा पारसाचा अंकितच होता (१३:९). त्याने नियमशास्त्रावर भर दिल्याचे पाहता (४:४) एज्रा व नहेम्याप्रमाणेच त्यानेही धर्मशास्त्रावर लक्ष केंद्रित केले होते असे दिसते (एज्रा ७:१०,१४, २५,२६; नहेम्या ८:१८).

इतरही चिंताग्रस्त प्रश्नांचा भार त्यांनी वाटून घेतला होता. त्या म्हणजे विदेशी स्त्रियांनी आंतरविवाह (२:११-१५; एज्रा ९:१०; नहेम्या २३:२३-२७), दशांश देणे (३:८-१०; नहेम्या १३:१०-१४) आणि सामाजिक अत्याचार व अन्याय (३:५; नहेम्या ५:१-१३) ख्रि पू ४४५ मध्ये तटबंदीची पुनर्बांधणी करून नहेम्या ख्रि पू ४३३ मध्ये पारसास परतला व पुन्हा ख्रि पू ४२४ मध्ये यरुशलेमास आला व मलाखीने वर्णन केलेल्या पापांचा समाचार घेतला (नहेम्या १३:६). यावरून स्पष्ट होते की नहेम्याच्या मधल्या गैरहजेरीच्या काळात मलाखीने हे पुस्तक लिहिले. जखऱ्या व हाग्गय यांनी संदेश देऊन १०० वर्षे उलटली होती. प्रकटीकरण २ व ३ अध्यायात ख्रिस्त मंडळीच्या अवस्थेविषयी आपल्या मनातील विचार प्रकट करतो तर येथे मलाखीद्वारे देव इस्राएल राष्ट्राविषयी आपल्या मनातील विचार प्रकट करीत आहे.

पार्श्वभूमी

बाबेलमधून प्रथम फक्त ५०००० यहूदीच यरुशलेमास परतले होते (ख्रि पू ५३८ - ख्रि पू ५३९). जरुब्बाबेलच्या नेतृत्वाखाली मंदिराची पुनर्बांधणी झाली होती (ख्रि पू ५१६). नव्याने पुन्हा अर्पणे सुरू झाली होती. आता ख्रि पू ४५८ मध्ये एज्रा यहूद्यांचा दुसरा ताफा घेऊन यरुशलेमास परतला. त्यामागोमाग ख्रि पू ४४५ मध्ये नहेम्या यरुशलेमास परतला. मायभूमीत येऊन १०० वर्षे पूर्ण होतात न होतात तोच यहूद्यांचे धर्मविधी सुरळीत सुरू झाले होते. याविषयी व देवाच्या त्यांच्यावरील महान प्रीतीविषयी आता त्यांनी आपली अंत:करणे निर्दयपणे कठोर व कठीण केली होती. व देवाच्या नियमशास्त्रापासून याजक व सर्व लोक फार दूर दूर बहकून गेले होते. यासाठी दोष देऊन त्यांना दटावले व

लोकांवर लेखी आरोप करून त्यांना पश्चात्तापास पाचारण केले. जेव्हा नहेम्या ख्रि पू ४२४ मध्ये पारसहून दुसऱ्या वेळेस परत आला तेव्हा याजकीय कामातील अधर्मांबद्दल, शब्बाथाचे उल्लंघन केल्याबद्दल व विदेशी स्त्रियांशी विवाह करता यावा म्हणून विवाहाच्या पत्नीला बेकायदेशीरपणे घटस्फोट घेतल्याबद्दल नहेम्याने लोकांचा कडक समाचार घेतला (नहेम्या १३).

अब्राहामापासून आतापर्यंत सुमारे २००० वर्षे लोटली होती. पण अजून अब्राहाम व दाविदाशी केलेल्या कराराची व नव्या कराराची अंमलबजावणी झाली नव्हती. इस्राएलांच्या इतिहासांत काही गोष्टी ठळकपणे इशारा करीत होत्या. उदा. यहोशवा, दावीद व योशीया सोडल्यास देवाची मेहरबानी होण्याच्या सर्व सुसंधी यहूद्यांनी गमावल्या होत्या. आता बंदीवासातून परतल्याला १०० वर्षे उलटला होती तरी परिस्थिती तशीच होती. ज्या कारणांनी अश्शूर व बाबेलकडून ते पूर्णपणे उद्ध्वस्त झाले होते, तोच अधर्माने पुन्हा वाढत्या प्रमाणात करत होते व त्यात ते खोल बुडून गेले होते. विशेष म्हणजे ज्या मशीहाची ते वाट पाहात होते, तो अजून आला नव्हता. किंवा त्याच्या येण्याची नजीकच्या काळात त्यांना काही चिन्हेही दिसत नव्हती. म्हणून मलाखीने जुन्या करारातील हा कळसाचा संदेश दिला. इस्राएलांनी चालू ठेवलेल्या पापांबद्दल देवाचा न्याय येणार, भावी काळी एक दिवस यहूदी पश्चात्ताप करतील तेव्हा मशीहा प्रकट होईल व नव्या कराराच्या अभिवचनांची पूर्तता होईल यावर त्याने संदेश दिला व याविषयीची अभिवचने लिहून ठेवली. पुढची ४०० वर्षे दैवी मौनाची होती. मलाखीचा दोषारोपाचा, न्यायाचा व दंडाज्ञेचा संदेश त्यांच्या कानात घुमत होता. दुसरा संदेष्टा उदय पावेपर्यंत हीच परिस्थिती कायम होती. तो संदेष्टा म्हणजे बाप्तिस्मा करणारा योहान घोषणेचे करीत आला की "पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचे राज्य जवळ आले आहे" (मत्तय ३:२).

आणि मशीहा आला.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानविषयक मुद्दे

या पुस्तकात देवाने इस्राएलांची केलेल्या कराराची पुनरावृत्ती आढळते (२:४,५,८,१०,१४;३:१). ते देवाशी अविश्वासू राहिले तरी देवाचे त्यांच्यावर असलेले प्रेम व विवाहाप्रमाणे असलेले त्याचे अतूट नाते याविषयीच्या लिखाणाने तो पुस्तकाची सुरुवात करतो (१:२-५). देवाची त्याच्या लोकांवरील प्रीतीची व्याप्ती या पुस्तकात दाखवली आहे. यापूर्वीच्या संदेष्ट्यांनी अखेरची मुक्ती घेऊन येणाऱ्या मशीहाविषयी व दीर्घकालीन अभिवचनांविषयी स्पष्ट अभिवचने दिली होती. आता हाग्गय व जखऱ्या यांनी नुकत्याच दिलेल्या अभिवचनांनी लोकांना उत्तेजन दिले होते.

पण लोक व त्यांचे पुढारी तर अधिकच दृढनिश्चयी व आत्मसंतुष्ट बनले होते. त्यांनी समज करून घेतला होता की हे प्रीतीचे नातेसंबंध नित्याच्या धर्मविधी संस्कारांनी जतन करता येतील, त्यामुळे व्यवहारात आपण कसेही आचरण केले तरी काही फरक पडणार नाही. पण देव अशी अपेक्षा मुळीच करत नव्हता. प्रभुच्या आगमनाची आठवण करून देत हा संदेष्टा याजकांची (१:६-२:९) व लोकांची (२:१०-१६) कडक शब्दात कानउघाडणी करतो. ते तर मशीहाची वाट पाहात होते (३:१). पण मशीहा त्यांना न्यायाच्या भट्टीतून नेऊन शुद्ध व पवित्र बनवणार होता (३:२,३). बाह्यत: त्यांनी नियमशास्त्रानुसार आचरण करायचे होतेच पण ते अंतर्यामातही स्वीकारायचे होते (मत्तय२३:२३). मलाखीने भ्रष्टतेवर, दुष्टतेवर व खोट्या सुरक्षितेवर हल्ला चढवला आहे. म्हणूनच त्यांचा ढोंगीपणा, धर्मत्याग, तडजोड करणे, घटस्फोट, खोटी उपासना व उद्धटपणा याबद्दल देव न्याय करणार असल्याचे तो निदर्शनास आणून देतो.

मलाखी आरोप करून, प्रश्नोत्तर पद्धत वापरून हा संदेश देत आहे. देवाने आपल्या लोकांवरील आरोपांना नेहमीच उपहासाने प्रश्न केले (१:२,६,७; २:१७; ३:७,८,१३). तर काही वेळा हा संदेष्टाच देवाच्या बाजूने कोर्टात खटला चालवल्याप्रमाणे भाषा वापरतो व लोकांचे टीकात्मक बोलणे त्यांच्या निदर्शनास आणून देतो (१:६, ८,९; २:१०, १५;३:२). याजकांनी व लोकांनी स्वेच्छेने केलेल्या पापांसाठी मलाखी त्यांच्यावर सहा वेळा तरी आरोप करतो.
(१) त्यांनी देवाचे प्रेम धिक्कारले (१:२-५).
(२) देवाला साजेसा त्याचा आदरसन्मान न करणे (१:६-२:९).
(३) देवाच्या विश्वसनीयतेचा धिक्कार करणे (२:१०-१६).
(४) देवाच्या नीतिमत्तेची चुकीची व्याख्या करणे (२:१७-३:५).
(५) देवाच्या संपत्तीचे भांडार लुटणे (३:६-१२).
(६) देवाच्या कृपेची निंदा करणे (३:१३-१५).

मलाखी देवाच्या न्यायाचे तीन स्तर सांगतो.
(अ) याजकाचा न्याय २:१-९.
(ब) राष्ट्राचा न्याय ३:१-६.
(क) अवशिष्टांची न्याय ३:१६-४:६.

काही महत्त्वाचे विचार

एलीया या नावाचा अर्थ, "प्रभूचा महान व भयंकर दिवस येण्यापूर्वी येणारा" (४:५). बाप्तिस्मा करणारा योहान आला तेव्हाचे भाकित पूर्ण झाले का? की भावी काळी पूर्ण व्हायचे राहिले आहे? एलीया पुन्हा देहधारी होणार आहे का? यावर नेहमी वाद चालतो. मलाखीचे भाकित बाप्तिस्मा करणाऱ्या योहानासंबंधी आहे असे म्हणणे अधिक योग्य ठरेल. ते अक्षरश: एलीयाचे अवतरणे होण्याविषयी नाही. लूक १:१७ मध्ये देवदूत म्हणतो, "तो एलीयाच्या आत्म्याने व सामर्थ्याने त्याच्यापुढे चालले." तर योहान १:२१ मध्ये योहान स्वत: म्हणतो, "मी एलीया नाही." त्यामुळे बाप्तिस्मा करणारा योहान एलीयासारखा होता. त्याच्या ठायी एलीयासारखा "आत्मा व सामर्थ्य" होते. बाह्यत: तो दयाळू, मान्यता पावलेला, स्वतंत्र जीवन जाणारा, पाश नसलेला होता. यहूद्यांनी जर मशीहाचा स्वीकार करायचा असेल तर त्याने एलीयाप्रमाणे मशीहाविषयी बोलायला हवे होते (मत्तय ११:१४; १७:९-१३). जर त्यांनी राजा मशीहाचा धिक्कार केला तर भावी काळी देव एलीयासारखा दुसरा संदेष्टा पाठवणार होता. तोच आपण प्रकटी ११:१-१९ मधील दोघांपैकी एक साक्षीदार पाहातो.

रूपरेषा

(I) इस्राएलांवर पापांबद्दल उघड दोषारोप. १:१-२:१६

(अ) इस्राएलांवरील देवाच्या प्रीतीचे स्मरण. २:१-५

(ब) याजकांची कानउघाडणी. १:६-२:९.

(१) देवाच्या वेदीचा अनादर. १:६-१४

(२) देवाच्या गौरवाचा अनादर. २:१

(३) देवाच्या नियमशास्त्राचा अनादर २:४-९

(II) इस्राएलांवरील न्याय व आशीर्वादाची घोषणा. २:७-४:६

(अ) निरोप्याचे आगमन. २:१७-३:५

(ब) पश्चात्तापास आवाहन. ३:६-१२

(क) इस्राएलांचे देवाविरुद्ध टीकास्त्र. ३:१३-१५

(ड) अवशिष्ट विश्वासी जनाचे सांत्वन. ३:१६-४:६

भाग दुसरा

प्रकरण १.   जुना करार ते नवा करार मधला काळ : सुमारे ४०० वर्षे

देवाचा मौनाचा काळ

या ४०० वर्षात देवाने संदेष्टे पाठवले नाहीत, त्याची वाणी झाली नाही. देवाचे दर्शन किंवा दृष्टांत झाला नाही की देवाकडून काही आवाज झाला नाही. मात्र ऐतिहासिक घटनांमध्ये देवाचा हात कार्यरत होता.

(I) मेदी व पारसाचे जागतिक साम्राज्य ख्रि पू ५३९ ते ख्रि पू ३३२ होते. यहूदी त्यांचे अंकित होते. यहूद्यांनी यरुशलेमास जाऊन मंदिराचा जीर्णोद्धार करावा असे त्यांनी फर्मान काढले होते. त्यानुसार बरेच यहूदी लोक मायभूमीत परतले होते. जुन्या कराराची अस्सल ग्रंथसंहिता लिहून पूर्ण झाल्यावर सुमारे १०० वर्षे इस्राएल पारसाचे अंकित राहिले होते. त्यांनी मुख्य याजकाला यरुशलेमावर नागरी अधिकार दिले होते. सरकारी हस्तक्षेपाशिवाय यहूदी लोक आपले धर्मविधी संस्कार करत होते.

(II) ग्रीक साम्राज्य - ख्रि पू ३३४ - ख्रि पू ३३१ दरम्यान जगज्जेता शिकंदर (अॅलेक्झांडर) याने ३ रा दारयावेश या सम्राटाचा पाडाव केला आणि ख्रि पू ३३२ पासून इस्राएलांवर ग्रीक साम्राज्याचा अंमल सुरू झाला. शिकंदरने इस्राएलांना यहूदी नियम पाळण्याची मुभा दिली व शब्बाथ वर्षी कर भरण्यात सूट दिली. आपल्या ताब्यातील मुलुखात हेल्लेणी मतप्रणाली सुरू करण्यावर त्याने भर दिला. ग्रीक भाषा व विचासरणीने जगात ऐक्य घडवून आणण्याचा त्याचा प्रयत्न होता. त्याचे हे धोरण त्याच्या नंतरच्या सत्ताधीशांनीही चालू ठेवले. हे धोरण बाल दैवताइतकेच यहूदी धर्माला धोकादायक होते. कारण ग्रीक जीवनप्रणाली खूप आकर्षक, उच्चभ्रू व मानवांसाठी रोचक असली तरी अत्यंत देवहीन होती.

शिकंदरच्या मृत्युनंतर सम्राटाच्या गादीवर हक्क सांगणाऱ्यांमध्ये कलह होऊन साम्राज्यांची चार शकले पडली. त्याचे तपशीलवार भाकित दानीएल अध्याय ७ व ८ मध्ये आहे (दानी ८:२२; ११:४).

(१) सेल्युकस घराण्याच्या वाट्याला सिरीया व पॅलेस्ताइन (२) टॉलेमीच्या घराण्याला मिसर (३) लिसिमॅकस घराण्याला आशिया मायनर (४) कसॅंडर घराण्याच्या वाट्याला मासेदोनीया आले.

१ ला टॉलेमी याने इस्राएलांवर ताबा मिळवला. सिरीयाच्या १ ल्या सेल्युकसने त्याच्याशी केलेल्या करारामुळे टोलेमी व सेल्युकस घराण्यात कायम संघर्ष होत राहिला (दानीएल ११:५). टोलेमी घराण्याने ख्रि पू ३०१-१९८ पर्यंत राज्य केले. दानीएल ११:६-१२ मधील ग्रीकांचा इतिहास तंतोतंत असाच घडला. त्यावेळी टोलेमींच्या राजवटीखाली यहूद्यांची आर्थिक गळचेपी होत असूनही यहुद्यांना धार्मिक स्वातंत्र्य होते.

ख्रि पू १९८ मध्ये ३ रा अंत्युखियस या सम्राटाने ५ वा टोलेमी याचा पाडाव केला आणि पॅलेस्ताइनवर कबजा मिळवला हे दानीएल ११:१३-१६ प्रमाणे तंतोतंत घडले. यहूदी सेल्युकसच्या अधिपत्याखाली ख्रि पू १४३ पर्यंत होते.

हे दानीएल ११:१७-३५ प्रमाणे घडले. ४ था अंत्युखियसच्या अधिपत्याखाली ख्रि पू १७५ ते ख्रि पू १६४ पर्यंत असता यहूद्यांचे धार्मिक विधिसंस्कार थांबवण्यात आले. ख्रि पू १७० मध्ये त्याने मंदिर भ्रष्ट केले व लुटले. ख्रि पू १६७ मध्ये अंत्युखियसने हेल्लेणी मतप्रणाली रूढ केली आणि यहूद्यांना त्यांचे धर्मशास्त्र व विधिसंस्कार पाळण्यास मनाई केली. शब्बाथ पाळणे, सणवार, अर्पणे, यज्ञ व बालकांच्या सुंता हे सर्व पाळण्यास मनाई केली. "तोरा" म्हटलेल्या नियमशास्त्राच्या प्रतींचा विध्वंस करण्यात आला. मूर्तींना अर्पणे करण्यासाठी वेद्या बांधण्यात आल्या. अशुद्ध पशुंचा यज्ञ करण्यास यहूद्यांवर जबरदस्ती करण्यात आली. डुकराचे मांस खाण्याची सक्ती करण्यात आली. या पहिल्या हुकुमशहाने यहूद्यांचा त्यांच्या धर्मविश्वासासाठी छळ केला. हे सर्व दानीएल ८:९-१४; २३-२५; ११:२१-३५ या भाकितांप्रमाणे तंतोतंत घडले.

तेव्हा मत्तय व त्याच्या पाच पुत्रांनी अंत्युखियससविरुद्ध बंड पुकारले. त्याला मक्काबी क्रांती किंवा मक्काबी बंड असे म्हणतात. ख्रि पू १६६ ते ख्रि पू १४२ अथक लढा दिल्यानंतर यहूद्यांना सिरियापासून स्वातंत्र्य प्राप्त झाले कारण रोमचा सेल्युकस वरील दबाव वाढत चालला होता. मक्काबींनी हस्मोनियन घराण्याची स्थापना केली व याजकाचे मुख्य कार्यालय हस्तगत केले. खरे तर ते सादोक घराण्यातले नव्हते (गणना २५:१०-१३ यहेज्केल ४०:४६; ४८:११). आणि त्यांनी लागलीच यापूर्वी त्यांनी धिक्कारलेली हेल्लेणी मतप्रणाली आता अंगिकारली आणि ग्रीकांचा पगडा ख्रि पू १४२ - ख्रि पू ६३ पर्यंत राहिला. हस्मोनियन घराणे ख्रि पू ६३ मध्ये संपुष्टात आले. त्यावेळी मुख्य याजक व दुसरा अरिस्टॅब्युलस आणि हायकॅन्स यांच्यामधील संघर्षात रोमच्या पोम्पियो या सेनापतीने हस्तक्षेप केला आणि इस्राएलची भूमी रोमच्या सत्तेखाली आली. हे देखील दानीएल २:४० व ७:७ नुसार घडले. सतत अशांत असलेल्या या प्रांतावर रोमच्या सम्राटाने हेरोदाला यहूदाचा राजा केले. तो जन्माने इदुमी होता म्हणजेच अदोमी म्हणजेच एसावाच्या वंशाचा होता. पण पूर्णपणे ग्रीक - रोमन दृष्टिकोन असणारा होता. त्याने पॅलेस्ताइनवर ख्रि पू ३७ - ख्रि पू ४ पर्यंत राज्य केले. जेव्हा येशू जन्मला तेव्हा तो "यहूद्यांचा राजा " होता.

यहूद्यांचा विस्तार

(१) पूर्वेतिहास पाहता शौल, दावीद व शलमोनाच्या एकसंघ इस्राएलावरील राजवटीनंतर राष्ट्रांची दोन शकले पडली. १० वंशाचे उत्तर राज्य इस्राएल आणि बन्यामिन व यहूदा या दोन वंशांचे दक्षिण राज्य यहूदा. २ राजे १७ व्या अध्यायानुसार ख्रि पू ७२२ मध्ये देवाचा न्याय ओढवून घेऊन उत्तर राज्य इस्राएल अश्शूरच्या बंदीवासात जाऊन परागंदा झाले. त्याच वाटेने यहूदाही भटकले व ख्रि पू ५८६ मध्ये तेही बाबेलच्या बंदीवासात गेले व त्यांचीही पांगापांग झाली. बाबेलच्या बंदीवासानंतर कोरेशाने त्यांनी मायदेशी जावे असा जाहीरनामा काढूनही बहुतेक यहूदी मायदेशी परतले नाहीत. ते बाबेलात व इतरत्र स्थायिक झाले. ते पारसाचे गुलाम म्हणून राहिले नाहीत, पण स्वतंत्र राष्ट्र म्हणूनही राहिले नाहीत. त्यामुळे ग्रीक व रोमन साम्राज्यातही त्यांचे भौगोलिक स्थलांतर चालूच राहिले. इ स पहिल्या शतकापर्यंत यहूदी लोक भूमध्य प्रदेशात सर्वत्र पांगले. इस्राएलांचे बहुसंख्य लोक जुन्या कराराचे नव्या करारात स्थलांतर होईपर्यंत पॅलेस्ताइनबाहेरच राहत होते.

(२) शास्त्री व रब्बी - अज्ञानामुळे व तोराचे आज्ञापालन न केल्यामुळे आपल्याला बंदीवास घडला या विश्वासाने बंदीवासातील यहूदी जुन्या कराराचा अभ्यास करू लागले. शास्त्री वचनाच्या अभ्यासात अधिकृतरित्या पारंगत समजले जाऊ लागले. तर रब्बी लोक शास्त्र्यांनी शिकवलेले धर्मशास्त्र इस्राएल जनांस शिकवू लागले.

(३) सिनेगॉग (सभास्थान) - ख्रि पू ५८६ मध्ये मंदिराचा नाश झाल्यानंतर यहूद्यांना भक्तिस्थान राहिले नाही त्यामुळे पांगलेले यहूदी जेथे जातील तेथे कमीत कमी १० कुटुंबे असल्यास भक्तिसाठी सभास्थान बांधून तेथे भक्तिसाठी जमू लागले. ते एक किलोमीटर अंतराच्या परिसरातील लोकांसाठी एक असे बांधले जात असे. बहुसंख्य यहूदी पॅलेस्ताइनला परतले नव्हते. म्हणून पॅलेस्ताइनबाहेर पुष्कळ सभास्थाने प्रस्थापित झालेली आढळतात. जरुब्बाबेलने जरी ख्रि पू ५१६ मध्ये मंदिराची पुनर्बांधणी केली तरी ही सभास्थाने चालूच राहिली.

(४) ख्रि पू ३३० पासून ग्रीक भाषा सक्तीची केल्याने सर्वत्र ग्रीक बोलले जाऊ लागले. ख्रि पू २५० मध्ये टोलेमी फिलाडेल्फसने ७२ विद्वानांना एकत्र आणून जुन्या कराराचे ७२ वर्षात ग्रीकमध्ये भाषांतर केले. सत्तरीच्या या अंकासाठी त्या भाषांतराला "सेप्च्युॲजिन्ट " हे लॅटिन नाव देण्यात आले. ईजिप्त व अलेक्झांड्रिया मध्ये हे ग्रीक भाषांतर मोठ्या प्रमाणात वाचले जाई.

(५) परूशी - हेल्लेणी मतप्रणालीपासून आपली मायभूमी मुक्त करावी म्हणून मक्काबींशी जडून असणाऱ्या "पवित्र जनांच्या" धर्मगटाला "परूशी " संबोधले जाऊ लागले. मक्काबींनी जेव्हा हेल्लेणी मतप्रणालीशी हातमिळवणी केली तेव्हा हा गट त्यांच्यापासून विभक्त झाला. कारण ते तर कायदेशीर प्रस्थापित धर्मरूढीचे होते. परुशांनी नियमशास्त्राचे स्पष्टीकरण केले. त्यात कडक रीतीने तोंडी नियम भरपूर होते. त्यांनी यहूद्यांना हे मानवी नियम पाळणे बंधनकारक केले. ते अल्पसंख्यांक असूनही पॅलेस्ताईनमधील बहुसंख्य लोकांची त्यांनी मर्जी संपादली होती. पण देवाच्या नियमांपेक्षा मानवी नियमांवर त्यांचा अधिक भर होता व ते त्यांचे कडक पालन करत होते.

(६) सदूकी - मुख्य याजक सादोकच्या नावावरून त्यांनी हे नाव धारण केले होते. ते हेल्लेणी मतप्रणालीचे होते. ते मंदिराची देखभाल करणारे, मंदिराचे कामकाज पाहणारे व धोरणे ठेवणारे होते. त्यांनी जुन्या कराराला मान्यता दिली नाही. खरे तर शेवटचा संदेष्टा मलाखी हयात असतानाच देवाने १२० लोकांच्या महाधर्म सभेद्वारा जुना कराराची अस्सल ग्रंथसंहिता मान्य करून बंदिस्त केली होती. पुनरुत्थानाचा सिद्धांत, आत्म्यांचे जग, नियमशास्त्राचे मानवी नियम ते मानत नव्हते. एका अर्थाने ते खोटे शिक्षक होते. येशूने त्यांच्या कूटप्रश्नांना मार्मिक उत्तरे दिली होती.

(७) दीपांचा सण - मक्काबींनी विजय संपादला तेव्हा त्यांनी मंदिराचे शुद्धीकरण केले व सर्व विधी सुरू केले. त्याच वेळी दीपांचा सण सुरू केला.

प्रकरण २ शुभवर्तमानांची प्रस्तावना

शुभवर्तमान या शब्दांचा मूळ अर्थ "देवाची गोष्ट" / "उत्तम गोष्ट" किंवा "उत्तम बातमी." प्रचलित अर्थ होईल की महत्त्वाच्या घटनेचा उत्तम अहवाल. संपूर्ण इतिहासात घडलेल्या महत्त्वाच्या घटना म्हणजे नासरेथकर येशूचे जीवन, यज्ञार्पणाचे मरण, पुनरुत्थान व स्वर्गारोहण. येशूचे चरित्र सादर करणे हा शुभवर्तमाने लिहिण्यामागचा उद्देश नाही. तर योहान २०:३०; २१:२५ ही वचने तो उद्देश स्पष्ट करतात. त्याच्या जन्माचा वृत्तांत सोडल्यास त्याच्या आरंभीच्या ३० वर्षांच्या जीवनाचा ते अतिशय अल्प वृत्तांत देतात. पुढे येशूने ३ वर्षे लोकसेवा केली पण शुभवर्तमाने त्याच्या जीवनातील अखेरच्या घटनांवरच अधिक प्रकाश टाकतात. उदा. योहान १२-२० अध्याय. यात अचूक ऐतिहासिक नोंदी आहेत व येशूच्या जीवन वृत्तांताचा महत्त्वाचा तपशील दिला आहे. तरी त्यामागील मूळ उद्देश धर्म विश्वासाचे ज्ञान होऊन क्षमाप्राप्ती मिळणे हा आहे (योहान २०:३१). येशूचे जीवन व सेवा याविषयी अधिकृत उत्तरे त्यात सापडतात. त्यामुळे विश्वासी जनांची आपल्या विश्वासाच्या सत्यतेविषयीची खात्री दृढ होते (लूक १:४).

जरी पुष्कळ शुभवर्तमानांची लिखाणे उपलब्ध होती, तरी मंडळीने प्रारंभीच्या काळापासून बायबलच्या ईश्वरप्रेरित लिखाणात मत्तय, मार्क, लूक, योहान याच चार शुभवर्तमानांचा समावेश केला. प्रत्येक शुभवर्तमानाचा स्वतंत्र दृष्टिकोन आहे. योहानाच्या तुलनेत मत्तय, मार्क व लूक यांचा समान दृष्टिकोन आहे. म्हणून त्या तीन शुभवर्तमानांना "सिनॉप्टिक" म्हणजे "समदृष्टी धारक" असे संबोधतात. उदा. ही तीन शुभवर्तमाने येशूच्या गालीलातील सेवेवर लक्ष केंद्रित करतात तर योहान यहूदातील सेवेवर लक्ष केंद्रित करतो. ही तीन शुभवर्तमाने खूप दाखले सांगतात तर योहान एकही दाखल्याची नोंद करीत नाही. चारही शुभवर्तमानकार दोन सामाईक बाबींची नोंद करतात. येशूचे पाण्यावरून चालणे आणि ५००० ना भोजन. त्या पवित्र आठवड्यापूर्वी घडल्या आहेत. त्यांच्या लिखाणातील हा फरक परस्परांविरुद्ध नसून परस्परांस पूरक आहे. प्रत्येक शुभवर्तमान वेगवेगळा श्रोतृवर्ग समोर ठेऊन लिहिले आहे. चारही शुभवर्तमाने एकत्र केल्यास येशूविषयीच्या साक्षीचे संपूर्ण चित्र साकार होते.

(१) मत्तयाचे शुभवर्तमान यहूदी लोक समोर ठेवून लिहिले आहे. इस्राएल लोक दीर्घकाळ ज्या मशीहाची व हक्काच्या राज्याची वाट पाहात होते त्या येशू नासरेथकराला तो सादर करतो. लूकपेक्षा वेगळी असलेली त्याने दिलेली वंशावळ, येशू दाविदाच्या घराण्यातला असल्याने भावी राजा असल्याचे सिद्ध करते. संपूर्ण मत्तयात जुन्या कराराचे भरपूर संदर्भ आहेत. ते येशूच्या जीवनात व सेवेत जुन्या करारातील मशीहासंबंधी पूर्ण झालेल्या भाकितांवर प्रकाश टाकतात. केवळ मत्तय "स्वर्गाचे राज्य " हा शब्दप्रयोग वापरतो. देवाच्या राज्याविषयी पहिल्या शतकात बायबलचा आधार नसलेली चुकीची कल्पना लोकांमध्ये रूढ होती म्हणून तो "देवाचे राज्य " हा शब्दप्रयोग वापरणे टाळतो. यहूदी ख्रिस्ती लोकांचा विश्वास दृढ व्हावा म्हणून मत्तयाने हे शुभवर्तमान लिहिले. यहूद्यांमध्ये सुवार्ताप्रसार करण्याचे ते उत्तम हत्यार आहे.

(२) मार्काने विदेशी श्रोते म्हणजे विशेषत: रोमी लोक समोर ठेऊन हे शुभवर्तमान लिहिले. "लागलीच," "मग" असे वरचेवर येणारे शब्द हे शुभवर्तमान कृतिदर्शक असल्याचे दर्शवतात व कथानक धावते ठेवतात. मार्काने येशू "सेवक”

म्हणून वठवला आहे (मार्क १०:४५). अनेकांच्या पापांसाठी दु:खसहन करायला तो आला. व्यावहारिक व कृतीशील रोमी लोकांना मार्काचा हा शीघ्रगतीचा वृत्तांत प्रभावित करणारा आहे.

(३) लूकाने अधिक विस्तृत गटासाठी, विशेषत: सुशिक्षित, सुसंस्कृत ग्रीकांना उद्देशून लिहिले. तो खूप उच्च ग्रीक भाषा वापरतो. तो काळजीपूर्वक संशोधन करून अचूक इतिहास लिहिणाऱ्यांपैकी आहे (लूक १:१-४). मानवांच्या गरजांची व आशा अपेक्षांची तो उत्तरे देतो. येशू हा "मनुष्याचा पुत्र"आहे असे रेखाटताना तो २६ वेळा हे संबोधन वापरतो. त्याचा मुख्य विषय "येशू हरवलेले शोधावयास आला" हा आहे (लूक ९:५६; १९:१०).

(४) शेवटचे योहानाचे शुभवर्तमान येशूच्या देवत्वावर जोर देते. ५:१८; ८:५८; १०:३० -३३; १४:९. विश्वासी जनांचा विश्वास दृढ व्हावा म्हणून तो लिहीत असताना अविश्वासी जनांस ख्रिस्तावर विश्वास ठेवण्यास तो विनवणी करतो. त्याच्या लिखाणाचा उद्देश तो स्पष्टच सांगतो की, "येशू ख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा व त्याच्या नावाने तुम्हाला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे म्हणून हे लिहिले आहे."

चारही शुभवर्तमाने एकत्र केल्यास देव-मानव येशू नासरेथकरचे संपूर्ण चित्र तयार होते. त्याच्याठायी पूर्ण मानवत्व व पूर्ण देवत्व वसते म्हणून तो जगासाठी योग्य असा कोकरा ठरतो व त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांचा तो प्रभू बनतो.

प्रकरण ३ चारही शुभवर्तमानांचा सुसंगत अभ्यास

भाग पहिला: शुभवर्तमान लिहिण्याचा उद्देश व येशू कोण आहे याची पार्श्वभूमी
लूक १:१-४; योहान २०:३०-३१; १-१-१८; मत्तय १:१-१७; लूक ३:२३-३८

भाग दुसरा: बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे जीवन
लूक १:१-८०

भाग तिसरा: येशूचे बालपण
मत्तय १:१८-२५; लूक २:१-३९ मत्तय २:१-२३; लूक २:४०-५२

भाग चौथा: बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाची सार्वजनिक सेवा
मत्तय ३:१-१२;मार्क १:१-८; लूक ३:१-१८

भाग पाचवा: योहानाच्या सेवेची समाप्ती व ख्रिस्ताच्या सेवेची विशेषत: यहुदीयात सुरुवात
मत्तय ३:१३-१७;४:१-१२; मार्क १:९-१४; लूक ३:१८-२३;४:१-१३; योहान १:१९-४:४५

भाग ६वा: (अ) गालीलात येशूची सेवा; घरात विरोध; नवीन ठाणे
मत्तय ४:१७-२५;८:२-४; १४-१७;९:१-१७;१२:१-२१; मार्क १:१४-३:१२; लूक ४:१४-६:११; योहान ४:४६-५:४७

(ब) बारा जणांची नेमणूक व डोंगरावरील प्रवचन - मत्तय ५:१-७:२९; मार्क३:१-१९; लूक ६:१२-४९

(क) वाढती लोकप्रियता व पश्चात्तापावर जोर - मत्तय ८:१,५-१३;११:२-३०; लूक ७:१-५०

(ड) यहूदी धर्मपुढाऱ्यांकडून पहिला विरोध - मत्तय १२:२२-५०; मार्क ३:२०-३५; लूक ८:१-२१.

(इ) देवराज्याच्या रहस्याविषयीचे दाखले - (समुद्र किनाऱ्यावरील लोकसमुदायास)
मत्तय १३:१-५२; मार्क ४:१-३४; लूक ८:४-१८

(फ) विरोध चालूच - मत्तय १३:५३-५८; ८:१८,२३-३४;९:१८-३४; मार्क ४:३५-६:६; लूक ८:२२-५६.

(ग) गालीलातील शेवटची फेरी - मत्तय ९:३५-११:१; १४:१-१२ मार्क ६:६-३०; लूक ९:१-१०

भाग सातवा: गालीलच्या आसपासच्या प्रांतांत ख्रिस्ताची सेवा

(अ) जीवनाच्या भाकरीवरून शिकवण - मत्तय १४:१३-३६; मार्क ६;३१-५६; लूक ९:१०-१७; योहान ६:१-७१

(ब) परूशी, सदूकी व हेरोदीयांच्या खमीराविषयी शिकवण - मत्तय १५:१-१६:१२; मार्क ७:१-८:२६; योहान ७:१.

(क) मशीहासंबंधी पक्की शिकवण - मत्तय १६;१३-१७:१३; मार्क ८:२७-९:१३; लूक ९:१८-३६.

(ख) इतरांविषयीच्या जबाबदारीवर शिकवण - मत्तय १७:१४-१८:३५; मार्क ९:१४-५०; लूक ९:३७-५०.

(ग) मंडपाच्या सणासाठी यरुशलेमास प्रवास - मत्तय ८:१९-२२; लूक ९:५१-६२; योहान ७:२-१०.

भाग आठवा: पुढे ख्रिस्ताची यहुदीयात सेवा

(अ) मंडपाच्या सणात शिकवण - योहान ७:११-५९

(ब) प्रीतीने सेवा व प्रार्थना करण्याविषयी खाजगी शिकवण - लूक १०:१-११:१३

(क) शास्त्री परूश्यांशी दुसरा वाद - लूक ११:१-१३:२१.

(ड) समर्पणाच्या सणात शिकवण - योहान ९:१-१०:३९.

भाग नववा: पिरीया व आसपासच्या प्रांतांत ख्रिस्ताची सेवा

(अ) ख्रिस्ती शिष्यत्वाची मूलतत्त्वे - लूक १३:२२-१७:१०; योहान १०:४०-४२.

(ब) लाजाराला उठवणे व शोमरोन व गालीलातून फेरी - योहान ११:१-५४; लूक १७:११-३७.

(क) यरुशलेमाच्या शेवटच्या प्रवासात असताना शिकवण - मत्तय १९:१-२०-३४; मार्क १०:१-५२; लूक १८:१-१९:२८.

भाग १० वा: ख्रिस्ताचे इस्राएलांस औपचारिकरीत्या सादर होणे व त्याची संघर्षात परिणती

(अ) विजयोत्सवाने प्रवेश व अंजिराचे झाड - मत्तय २६:६-१३; २१:१-२२; मार्क१४:३-९; ११:१-२६; लूक १९:२९-४८; योहान ११:५५-१२:५०

(ब) धर्मपुढाऱ्यांचे ख्रिस्ताच्या अधिकारास आव्हान - मत्तय २१:२३-२२:४०; मार्क ११:२७-१२:३४; लूक २०:१-४०.

(क) शत्रुंच्या आव्हानास ख्रिस्ताचा प्रतिसाद - मत्तय २२:४१-२३:३९; मार्क १२:३५-४४; लूक २०:४१-२१:४.

भाग अकरावा: पूर्वतयारीसाठी ख्रिस्ताचे मृत्युविषयी भविष्य

(अ) जैतुनाच्या डोंगरावरील प्रवचन - मंदीराविषयी व ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाविषयी भविष्य - मत्तय २४:१-२५:४६; मार्क १३:१-३७; लूक २१:५-३६

(ब) धरून देण्याची तजवीज - मत्तय२६:१-१६; मार्क१४:१-११; लूक २१:३७-२२:६

(क) शेवटचे भोजन - मत्तय २६:१७-२९; मार्क १४:१२-२५; लूक २२:७-२० योहान १३:१-३८; १ करिंथ ११-२३-२६.

(ड) माडीवरील खोलीतील भाषण व प्रार्थना व गेथशेमानेकडे प्रयाण - योहान १४:१-१८:१; मत्तय २६:३०-४६; मार्क १४:२६-४२; लूक २२:३९-४६

भाग बारावा: ख्रिस्ताचे मरण

(अ) धरून देणे व अटक - मत्तय२६:४७-५६; मार्क १४:४३-५२; लूक २२:४७-५३; योहान १८:२-१२.

(ब) चौकशी

(१) हन्नापुढे - योहान १८:१३-२४;
(२) कयफा व सन्हेद्रीनपुढे चौकशी - मत्तय २६:५७-६८; मार्क १४:५३-६५; लूक २२:५४;
(३) पेत्राचे नाकारणे - मत्तय२६:६९-७५; मार्क १४:६६-७२; लूक २२:५५-६५; योहान १८:२५-२७
(४) तिसरी चौकशी सन्हेद्रीनपुढे -मत्तय २७:१ मार्क१५:१,०; लूक २२:६६-७१
(५) यहुदाची आत्महत्या - प्रे कृ १:१८-१९; मत्तय २७:३-१०
(६) पिलातापुढे चौकशी - मत्तय २७:२,११-१४; मार्क १५:१-५; लूक २३:१-५; योहान १८:२८-३६.
(७) हेरेदापुढे चौकशी - लूक २३:६-१२
(८) पुन्हा पिलातासमोर चौकशी - मत्तय२७:१५-२६; मार्क १५:६-१५; लूक २३:१३-२५; योहान १८:३९-१९:१६.

(क) वधस्तंभी खिळणे - मत्तय २७:२७-५६; मार्क १५:१६-४१; लूक २३:१६-४९; योहान १९:१७-३०

(ड) पुरणे - मत्तय २७:५७-६६; मार्क १५:४२-४७; लूक २३:५०-५६; योहान १९:३१-४२.

भाग तेरावा: ख्रिस्ताचे पुनरुत्थान व स्वर्गारोहण

(अ) रिकामी कबर - मत्तय २८:१-८; मार्क १६:१-८; लूक २४:१-१२; योहान २०:१-१०;

(ब) पुनरुत्थित ख्रिस्ताने दिलेली दर्शने

(१) मरीया मग्दालीया - मार्क १६:९-११; योहान २०:११-१८

(२) इतर स्त्रियांना दर्शन- मत्तय २८:९-१०
(३) सैनिकांची यहूदी अधिकाऱ्यांना बातमी - मत्तय २८:११-१५
(४) अम्माऊसच्या वाटेवरील दोन शिष्यांना दर्शन - मार्क१६:१२,१३; लूक २४:१३-३२
(५) दोन शिष्यांची इतरांना बातमी - (१ करिंथ १५:५) लूक २४:२३-३५
(६) जमलेल्या १० शिष्यांना दर्शन - मार्क १६:१४; लूक २४:३६-४३; योहान २० १९-२५
(७) जमलेल्या ११ शिष्यांना दर्शन - १ करिंथ १५:५; योहान २०:२६-३१
(८) मासे धरायला गेलेल्या ७ शिष्यांना दर्शन - योहान २१:१-२५
(९) गालीलात ११ शिष्यांना दर्शन - १ करिंथ १५:६; मत्तय २८:१६-२०; मार्क १६:१५-१८
(१०) येशूचा अर्धा भाऊ याकोबाला दर्शन - १ करिंथ १५:७
(११) यरुशलेमातील शिष्यांना दर्शन - प्रे कृ १:३-८; लूक २४: ४४-४९

(क) येशूचे स्वर्गारोहण - प्रे कृ १:९-१२; मार्क १६:१९-२०; लूक २४:५०-५३

ख्रिस्ताच्या जीवनावर एक दृष्टिक्षेप

ख्रि पू ६- ख्रिपू ४ -------जन्म

ख्रि पू ८---------------यरुशलेमात पहिला वल्हांडण सण

ख्रि पू २७-------------बाप्तिस्मा

ख्रि पू ३०--------------मरण व स्वर्गारोहण

ख्रिस्ताने सेवाकालात पाळलेले वल्हांडण सण - ख्रि पू २७; ख्रि पू २८; ख्रि पू २९; ख्रि पू ३० वल्हांडणात वधस्तंभी.

प्रकरण ४

मत्तयकृत शुभवर्तमान

लेखक व काळ

मत्तय या शब्दांचा अर्थ "प्रभुचे दान." त्याचे दुसरे नाव होते लेवी (९:९). तो जकातदार होता येशूला अनुसरण्यासाठी त्याने सर्व काही सोडले होते (लूक ५:२७,२८). बारा प्रेषितांपैकी तो एक होता (१०:३, मार्क ३:१८; लूक ६:१५; प्रे कृ १:१३). आपल्याच शुभवर्तमानात तो स्वत:चा "जकातदार" असा स्पष्ट उल्लेख करतो. येथे मत्तयाची नम्रताच दिसते. बाकी वचनात कोठेही त्याच्या नावाला जकातदार विशेषण जोडल्याचे आढळत नाही. त्याचे भूतकाळातील पापी जीवन रेखाटताना पुष्कळ सुवार्तावादी त्याचे लेवी हे नाव वापरतात. मत्तयच या पुस्तकाचा लेखक आहे. त्यानेच हे पुस्तक लिहिल्याचे पहिल्या मडळीने निर्विवादपणे मान्य केले होते. उपलब्ध लिखित पुराव्यांवरून इ स ७० साली मंदिराचा विध्वंस होण्यापूर्वी सुमारे इ स ५० साली ते प्रथम लिहिण्यात आले असे मानतात.

पार्श्वभूमी

मत्तयाच्या शुभवर्तमानाला एक लक्षणीय यहूदी स्वाद आहे. आरंभीच्या वंशावळीतूनच तो दरवळतो. ती आपल्याला अब्राहामापर्यंत मागे नेते. याउलट लूक ख्रिस्ताला मानवजातीचा मुक्तिदाता म्हणून रेखाटतो त्यामुळे तो आपल्याला आदामापर्यंत मागे नेतो. मत्तयाचा उद्देश थोडा संकुचित आहे. तो ख्रिस्ताला इस्राएलाचा मशीहा व राजा म्हणून प्रदर्शित करतो. जुन्या कराराचे सुमारे ६० हून अधिक संदर्भ तो देतो व ख्रिस्तामध्ये त्या अभिवचनांची पूर्तता झाल्याचे सिद्ध करतो. त्याचा श्रोतृवर्ग यहूदी असल्याचे अनेक पुरावे सापडतात. कारण यहूदी चालीरीतींचे तो स्पष्टीकरण देत बसत नाही. इतर शुभवर्तमाने ते देतात. उदा. (मार्क ७:३; योहान १९:४०). तो वारंवार येशूला "दाविदाचा पुत्र " असे संबोधतो (१:१; ९:२७ ...). देवाच्या नावाच्या उल्लेखाविषयी यहूदी संवेदनशीलता जपण्यासाठी इतरांप्रमाणे "देवाचे राज्य" न वापरता "स्वर्गाचे राज्य" हा शब्दप्रयोग तो वापरतो. सर्व पुस्तकांचा प्रमुख विषय मूलत: जुन्या करारात असून इस्राएलांच्या मशीहाची अपेक्षेने वाट पाहाण्यावर प्रकाश टाकतो.

मत्तय जी ग्रीक भाषा वापरतो त्यावरून पॅलेस्ताइनचा यहूदी इतरत्रच्या हेल्लेणी यहुद्यांना लिहीत आहे असे वाटते. तो वर्णन करत असलेल्या अनेक घटनांचा तो स्वत: प्रत्यक्ष साक्षी आहे. नासरेथकर येशूची कृत्ये व त्याचे बोल यांचा तो प्रत्यक्ष साक्षी आहे. ज्या मशीहाची यहूदी राष्ट्र दीर्घकाल पासून वाट पाहात आले आहे, तोच येशू आहे हे प्रदर्शित करणे हा त्याचा उद्देश स्पष्ट दिसतो. अभिवचनातील मशीहा आणि इतिहासातील प्रत्यक्ष ख्रिस्त या दोहोत सांगड घालताना या संदर्भ वचनांची तो यथोचित रचना करतो. ह्या मध्यवर्ती मुद्यापासून मत्तय मुळीच ढळत नाही. येशूच्या मशीहाविषयीच्या दाव्यांना तो जुन्या करारातील भाकितांचे पुरावे देऊन पुष्कळ घटनांच्या तपशीलांचे आधार देतो (२:१७,१८; ४:१३-१५; १३:३५; २१ :४,५; २७:९,१०).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

येशूला मशीहा, यहूद्यांचा राजा म्हणून सादर करताना जुन्या करारातील अभिवचनांविषयीची त्याची रुची संपूर्ण शुभवर्तमानात दिसते. मत्तयाचा "स्वर्गाचे राज्य " हा शब्दप्रयोग मत्तयाच्या सहीशिक्क्याप्रमाणे केवळ या पुस्तकात ३२ वेळा आलेला दिसतो. सुरुवातीलाच वंशावळ देऊन ख्रिस्त इस्राएलांचा राजा असल्याचा लिखित ऐवज पुरवून

शिफारस केली आहे आणि उरलेले पुस्तक हा मुद्दा पूर्णत्वास नेते. ख्रिस्त राजवंशातील वारस असल्याचे मत्तय सिद्ध करतो. येणाऱ्या राजाविषयी जुन्या करारातील डझनाहून अधिक भाकिते पूर्ण झाल्याचे तो प्रत्यक्षात मांडतो. ख्रिस्ताला प्रस्थापित राजेशाही हक्क असल्याचे तो पुराव्यामागून पुरावे देतो. या पुस्तकातील इतर सर्व ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे या मुद्याभोवती फिरतात.

मत्तय येशूच्या पाच महत्त्वाच्या प्रवचनांची नोंद देतो. डोंगरावरील प्रवचन(मत्तय ५-७); प्रेषितांना कामगिरीवर पाठवतानाचे प्रवचन (अध्याय१०); देवाच्या राज्याविषयीचे दाखले (अध्याय१३); विश्वासी व्यक्तींचे बालकासमान असण्याविषयीचे प्रवचन (अध्याय १८); आणि द्वितीयागमना विषयीचे प्रवचन ((अध्याय२४,२५).
प्रत्येक प्रवचनाचा समारोप करताना "येशूने आपले बोलणे समाप्त केल्यावर " अशा अर्थाचा शब्दप्रयोग केल्याचे आढळते. (७:१, ११:१-----इ.) त्यावरून नवीन कथानक सुरू झाल्याचे संकेत दिले आहेत. १-४ अध्यायातील सुरुवातीच्या घटनांचे प्रदीर्घ प्रास्ताविक वर्णन व अखेर थोडक्यात केलेला समारोप (२८:१६-२०), याच्यामध्ये असणाऱ्या सर्व अध्यायांचे सहज असे पाच भाग पडलेले दिसतात; प्रवचन व त्याला जोडून असलेले कथानक. काही अभ्यासक तर या पाच विभागांची जुन्या करारातील मोशेच्या पाच पुस्तकांशी सांगड घालतात.

ख्रिस्त व परूश्यांमधील संघर्ष हा एक मुद्दा मत्तय समोर आणतो. पण आपल्या यहूदी श्रोत्यांना समजावे म्हणून त्यांच्या चुकांवर तो प्रकाश टाकतो. त्यामागे त्याचा स्वत:चा कोणताच वैयक्तिक स्वार्थ नाही. म्हणूनच तो परूशी व जकातदार हा दाखला नमूद करणे टाळतो. खरे तर तो दाखला त्याला प्रकाश झोतात आणण्यास अधिक उपयोगी पडला असता. मत्तय सदुक्यांचा पण सर्वाधिक उल्लेख करतो. सतत परूशी व सदूकी यांचे नकारात्मक चित्र रेखाटून इशारा दिला आहे. त्यांचे सिद्धांतांचे शिक्षण खमीराप्रमाणे पसरणारे असून टाळायलाच हवे होते (१६:११,१२). या दोन्ही गटांचे सिद्धांत विषयक मतभेद होते तरी ख्रिस्ताच्या विरोधात ते हेव्याने एकत्र आले होते.

ख्रिस्ताला संपूर्ण इस्राएलात धिक्कारणाऱ्यांचा ते अर्क होते. इस्राएलांच्या मशीहाचा धिक्कार हा देखील सतत चर्चेचा मुद्दा दिसतो. इतर शुभवर्तमानांच्या तुलनेत येथे सर्वाधिक प्रकर्षाने येशूवरील हल्ल्यांचे वर्णन आढळते. इतर सुवार्तावादींच्या तुलनेत बाळ येशूचे मिसरास पलायन ते वधस्तंभाच्या दृश्यापर्यंत ख्रिस्ताच्या धिक्काराचे चित्र मत्तयच अधिक सुस्पष्ट रेखाटतो. उदा. वधस्तंभाविषयी मत्तयाने दिलेल्या अहवालात चोर पश्चात्ताप करताना दिसत नाही; कोणी मित्र परिवार किंवा प्रियजन वधस्तंभाच्या पायथ्याशी दिसत नाहीत. त्याच्या मृत्युसमयी खुद्द देवही त्याचा त्याग करतो.(२७:४६). नकाराचे हे सावट कथानकातून अजिबात दूर केलेले दिसत नाही. तरीही एक दिवस विजयी राजा म्हणून स्वर्गातून "मेघांवर बसून त्याचे गौरवाने पुनरागमन होणार" असल्याचे चित्र तो उभे करतो (२४:३०).

महत्त्वाचे विचार

मत्तय पाच प्रवचने सादर करीत असला तरी तो कालक्रमाने घटना देत नाही. तो स्वैर घटनांच्या नोंदी देतो. तो विस्तृत दृष्टिकोन व विषय हाताळताना काळाच्या बंधनांमध्ये अडकत नाही. भविष्यात्मक शास्त्रभागात विशेषत: जैतुन डोंगरावरील प्रवचनात येशूने यरुशलेमच्या इ स ७० सालच्या विनाशाची भाकिते केली आहेत. येशूच्या २४:३४ मधील उद्गारांचा अर्थ काही लोक असा लावतात की या सर्व गोष्टींची प्रत्यक्षात नव्हे पण रोमच्या साम्राज्यात पूर्तता झाली आहे. पण चुकीच्या पद्धती वापरून अर्थ लावण्यात केलेली ही अत्यंत घोडचूक आहे. या शास्त्रलेखांकडे

व्याकरणाच्या, ऐतिहासिक व सिद्धांतांच्या दृष्टिकोनातून पाहायला हवे. मग ही भाकिते भावी काळच्या घटनांची असल्याचे स्पष्ट होते.

रूपरेषा

(I) राजाचे आगमन - १:१-४:२५.

(अ) राजाचा जन्म १:१-२:२३

(ब) त्याचे समाज सेवेत आगमन ३:१-४:२५.

(II) राजाचा अधिकार - ५:१-९:३८

(अ) पहिले प्रवचन: डोंगरावरील प्रवचन ५:१-७:२९

(ब) कथानक पहिले: चमत्कारांची अधिकृतता ८:१-९:३८

(III) राजाचा कार्यक्रम १०:१-१२:५०

(अ) दुसरे प्रवचन: बारा प्रेषितांना कामगिरीवर पाठवणे १०:१-४२

(ब) कथानक दुसरे: राजाचे ध्येय: ११:१-१२:५०

(IV) राजाचे शत्रू: १३:१-१७:२७

(अ) तिसरे प्रवचन: देवराज्याच्या विषयक दाखले: १३:१-५२

(ब) कथानक

(क) राज्याचा संघर्ष १३:५३-१७:२७

(V) राजाचे व्यवस्थापन: १८:१-२३:३९

(अ) चौथे प्रवचन: विश्वासी व्यक्तीचे बालकासमान असणे १८:१-३५

(ब) कथानक चौथे: यरुशलेमातील सेवा १९:१-२३:३९

(VI) राजाचे प्रायश्चित्ताचे बदलीचे मरण: २४:१-२८:१५

(अ) प्रवचन पाचवे: जैतुन डोंगरावरील प्रवचन २४:१-२५:४६

(ब) कथानक पाचवे: वधस्तंभीचे मरण व पुनरुत्थान: २६:१-२८:१५

(VII) राजाने सोपवलेले काम: २८:१६-२०

प्रकरण ५

मार्ककृत शुभवर्तमान

लेखक व काळ

या मार्कची ओळख "तो योहान ज्याला मार्कही म्हणत" अशा शब्दात केलेली दिसते (प्रे कृ १२:१२,२५; १५:३७,३९). पेत्र जेव्हा तुरुंगातून सुटला तेव्हा मार्क योहानाच्या आईच्या घरी गेला होता (प्रे कृ १२:१२). तो बर्णबाचा भाऊबंद होता (कलसै ४:१०). पौलाच्या पहिल्या सुवार्तफेरीत तो पौल व बर्णबासोबत गेला होता (प्रे कृ १२:२५; १३:५). परंतु पिर्गा येथे तो त्यांना मध्येच सोडून यरुशलेमास निघून गेला (प्रे कृ १३:१३). जेव्हा दुसऱ्या मिशनरी फेरीच्या वेळेस मार्काला सोबत घेऊन जाण्याची बर्णबाने इच्छा दर्शवली तेव्हा पौलाने या गोष्टींला नकार दिला. या कारणाने झालेल्या संघर्षामुळे पौल व बर्णबा विभक्त झाले (प्रे कृ १५:३८-४०).

आरंभी धरसोड करणाऱ्ा मार्क पुढे दृढ व प्रगल्भ झालेला दिसतो हे त्याने प्रेषित पौलालाही सिद्ध करून दाखवले. कलसैकरांस लिहिलेल्या पत्रात मार्क योहान आल्यास त्याचा स्वीकार करण्याची सूचना पौलाने दिली आहे (कलसै ४:१०). तर फिलेमोन २४ मध्ये तो मार्काला आपला सोबती म्हणून संबोधतो. पुढे तो तीमथ्याला सांगतो की "मार्काला सोबत घेऊन ये, तो मला सेवेसाठी उपयोगी आहे" (२ तीमथ्य ४:११).

सेवेस उपयोगी पडेल इतकी मार्क योहानाची तयारी करून घेण्यामागे पेत्राचे भरपूर कष्ट आहेत. त्याचे मार्काशी घनिष्ट संबंध होते याचा पुरावा म्हणजे तो मार्काला "माझा मुलगा मार्क" असे संबोधतो (१ पेत्र ५:१३). पेत्र स्वत: दृढ नव्हता. तरुणपणी तो धरसोड करणारा अस्थिर मनाचा होता. त्यामुळे या तरुणाला बलशाली व प्रगल्भ करताना त्याच्यावर पेत्राचा चांगलाच प्रभाव पडला असेल; म्हणूनच देवाने ज्या कामास त्याला पाचारण केले होते. त्यासाठी लागणारे सामर्थ्य व प्रगल्भता त्याला प्राप्त होऊ शकली.

पत्रांप्रमाणे शुभवर्तमानांचे लेखक स्वत:च्या नावाचा उल्लेख करत नाहीत. आरंभीच्या मंडळीच्या वडिलांचे एकमत होते की हे शुभवर्तमान मार्कनेच लिहिले आहे. तो इटलीत असताना रोमच्या ख्रिस्ती विश्वासी लोकांसाठी त्याने ते लिहिले. पेत्र ख्रिस्ताविषयी जी घोषणा करत होता ते सर्व मार्कने या शुभवर्तमानात नमूद केले आहे. इस ५० च्या दरम्यान ते लिहिण्यात आले.

पार्श्वभूमी

विदेशी रोमी ख्रिस्ती विश्वासी लोकांसाठी मार्कने हे शुभवर्तमान लिहिले. जेथे अरेमीक भाषेतील वाक्ये आहेत तेथे तो आपल्या वाचकांसाठी त्यांचे भाषांतर करतो (३:१७; ५:४; ७:११,३४; १०:४६; १४:३६; १५:२२,३४). तर काही प्रसंगी ग्रीकऐवजी तो लॅटिन शब्द वापरतो (५:९; ६:२७;१२:१५, ४२;१५:१६,३९). तो रोमी पद्धतीनुसार वेळा नमूद करतो (६:४८; १३:३५;). अगदी काळजीपूर्वक तो यहूदी चालीरीतींचे स्पष्टीकरण करतो (७:३,४;१४:१२; १५:४२). मत्तय व लूकाप्रमाणे वंशावळ देणे तो टाळतो. तो जुन्या करारातील फारसे संदर्भ देत नाही. तसेच यहूदी वाचकाला रोचक वाटतील अशा गोष्टींचा तो समावेश करत नाही. उदा. शास्त्री परुशांवरील टीका तो देत नाही सदूकी हा उल्लेख तर १२:१८ मध्ये एकदाच आला आहे. १५:२१ मध्ये शिमोन कुरेनेकरचा उल्लेख रूफचा बाप असा करतो. तो

रोमच्या मंडळीचा सर्व परिचित सदस्य होता. हे सर्व लक्षात घेता ते रोमच्या विश्वासी लोकांसाठी लिहिले आहे हे स्पष्ट होते.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

दु:खसहन करणारा देवाचा सेवक असा तो येशूला सादर करतो (१०:४५). तो येशूच्या कृत्यांवर म्हणजे त्याची सेवा व यज्ञार्पणावर लक्ष केंद्रित करतो. त्याची शिकवण, मोठी प्रवचने फारशी देत नाही. तर त्याच्या शिकवणीचे सार सांगतो. येशूचे पूर्वज, वंशावळ, जन्म या सर्व नोंदी गाळून अरण्यात बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाकडून बाप्तिस्मा घेऊन येशूने सामाजिक सेवेला सुरुवात केल्याच्या वृत्तांताने सुरुवात करतो. ख्रिस्ताच्या मानवी भावनांवर सर्वांपेक्षा अधिक जोर देऊन तो येशूचे मानवत्व प्रदर्शित करतो (१:४१;३:५;६:३४;८:१२;९:३६). मानव म्हणून त्याच्या मर्यादा (४:३८; ११:१२; १३:३२) व देवाच्या पुत्राची मानवी बाजू ठळकपणे तपशीलवार देतो (७:३३,३४;८:१२;९:३६;०:१३-१६).

काही विचार

मार्काचे शुभवर्तमान वाचताना तीन प्रमुख प्रश्न समोर उभे राहतात.

(१) लूक व मत्तयाच्या शुभवर्तमानांशी मार्काचा काय संबंध लागतो?
(२) शेवटच्या काळाविषयीच्या शास्त्रभागांचा अर्थ कसा लावायचा?
(३) १६ व्या अध्यायातील शेवटची वचने मूळ शुभवर्तमानात होती का?

तिन्ही शुभवर्तमाने वाचताना काही साम्य व भेद लक्षात येतात. येशूचे जीवन, सेवा व शिकवण याविषयी तिघांचे दृष्टिकोन भिन्न आहेत.

पुढील मुद्दे लक्षात घ्यावेत -

(१) १९ व्या शतकापर्यंत मत्तयाचे शुभवर्तमान प्रथम लिहिले गेल्याचे मंडळीने मानत आली आहे. हे वाचून त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कोणी कोणाचे पाहून किंवा कुठून तरी संकलन करून लिखाण केलेले नाही.
(२) मत्तय येशूसोबत असून प्रत्यक्ष साक्षी होता तो मार्काच्या लिखाणाचा पुराव्यासाठी आधार घेणे शक्यच नाही.
(३) फारसे साम्य भेद नाहीत. जे फरक दिसतात ते भाषेमुळे शब्दार्थांचे फरक आहेत.
(४) ऐतिहासिक घटना त्यांनी कालानुक्रमाने दिल्या आहेत.
(५) मार्काने सारांशाने लिखाण केल्याने काही फरक आढळतील.
(६) ६:४५-८:२६ मार्क लिहितो तर लूक गाळतो. यावरून मार्काचे लिखाण लूकाने पाहिलेले दिसत नाही हे स्पष्ट आहे.
(७) जर्मन वगैरे भाषेत काही लिखाण आहे याचे ऐतिहासिक पुरावे किंवा हस्तलिखित उपलब्ध नाही.
(८) मार्क व लूक पौलाचे सोबती होते (फिलेमोन २४). आरंभीच्या काळात मार्काच्या आईच्या घरी ते सगळेच भेटत असत (प्रे कृ १२:१२). पौल कैसराच्या तुरुंगवासात असताना लूक व मत्तय भेटले असतील पण म्हणून लिखाणासाठी ते परस्परांवर अवलंबून होते असा निष्कर्ष काढता येत नाही.

खरे तर या तिन्ही शुभवर्तमानात ताळमेळ बसवण्याचा प्रश्नच उद्धवत नाही. ते लिखाणासाठी परस्परांवर अवलंबून होते याला टीकाकार पुरावे देऊ शकत नाहीत त्यामुळे याविषयी स्पष्टीकरण करण्याची गरजच नाही. पूर्वापार हेच मान्य करण्यात आले आहे की शुभवर्तमाने प्रत्येकाने स्वतंत्रपणे ईश्वरी प्रेरणेने लिहिली व पवित्र आत्म्याने त्यांना चालवले तसे नेमके तेच व तसेच त्यांनी आपल्या लेखनशैलीच लिहिले. २ पेत्र १:२० हा एकच दृष्टिकोन उरतो.

मार्क मत्तय व लूकाशी समांतर असून मार्क बरेच लहान पुस्तक आहे. तिघांच्या समान घटनांचा काळ सारखाच आहे त्यात विसंगती नाही.

(९) १६ व्या अध्यायातील कंसातील ९-२० वचने मार्काच्या मूळ प्रतीत नाहीत. ग्रंथसंहिता करणाऱ्या महासंघाने ती नंतर घातली याचे कारण ८वे वचन "--- त्या भयभीत झाल्या होत्या " या वाक्याने करून पुनरुत्थित येशूविषयीच्या आदरयुक्त भयाचा परिणाम त्या विदेशी विश्वासीयांवर तसाच कोरला जावा ही दक्षता मार्काने बाळगली आहे . पण पुढे घडलेल्या महत्वपूर्ण घटना सारांशाने त्यांच्या समोर मांडाव्यात व पुस्तकाचा समारोप झाल्याचे दिसावे या उद्देशाने ही ९-२० वचने घातली. मात्र त्यांनी ईश्वरप्रेरित वचनाबाहेरील एकही नोंद केलेली नाही. सर्व नोंदी धर्मशास्त्रातील नोदींशी सुसंगत असल्याने आक्षेपार्ह काहीही नाही व या घटना विदेशी विश्वासी लोकांना माहीत असणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन ही वचने वाचावीत.

रूपरेषा

(I) अरण्यातील वाणी: १:१-१३

(II) गालीलात व सभोवतालच्या प्रांतांतून सेवेला सुरुवात: १:१४-७:२३

(III) विविध विदेश्यांच्या प्रांतात सेवेचा विस्तार: ७:२४-९:५०

(IV) सेवेची समाप्ती: यरुशलेमच्या वाटेवर - १०:१-५२

(V) यरुशलेमातील सेवेची पूर्तता: ११:१-१६:२०

प्रकरण ६

लूककृत शुभवर्तमान

लेखक व काळ

लूक हेल्लेणी होता. कलसै ४:११ ,१४ मध्ये याला पुष्टी मिळते. लूक एकटाच विदेशी लोकांमधून आलेला असून बायबलमध्ये त्याचे लूककृत शुभवर्तमान व प्रेषितांची कृत्ये ही महत्त्वाची दोन पुस्तके आहेत. लुकाविषयी फारच कमी माहिती उपलब्ध आहे. त्याने कोठेही स्वत:विषयी वैयक्तिक तपशील दिलेला नाही की त्याची नक्की पार्श्वभूमी माहीत नाही. तो अंत्युखियाचा रहिवासी असावा असा इतिहासकार निष्कर्ष काढतात. प्रे कृ मधील बराच वृत्तांत अंत्युखियाभोवती केंद्रित आहे (अध्याय ११,१३,१४,१५,१८). निदान प्रेषित पौलाच्या मासेदोनीयाच्या दृष्टांतापासून (प्रे कृ १६:९,१०) ते थेट पौल रक्तसाक्षी होईपर्यंत तो त्याचा सोबती होता (२ तीम ४:११). कलसै ४:१४ मध्ये तो वैद्य होता अशी नोंद आहे. येशूच्या रोगनिवारणाच्या घटनांकडे तो वैद्यकीय रुचीतून पाहात असल्याचे स्पष्ट दिसते (४:३८-४०;५:१५-२५;६:१७-१९;७:११-१५;८:४३-४७; ४९-५६; ९:२,६,११;१३:११-१३;१४:२-४;१७:१२-१४;२२:५०,५१). लूकाच्या काळात एक विशिष्ट अशी वैद्यकीय परिभाषा नव्हती. त्यामुळे या विषयावर विश्लेषण करताना इतर शुभवर्तमानांपेक्षा त्याची भाषा वेगळी दिसत नाही.

प्रेषितांची कृत्ये व लूककृत शुभवर्तमान सलग एकाच समयी क्रमाने लिहिली गेली (लूक १:१-४; प्रे कृ १:१). ती दोन्ही पुस्तके थियफिल महाराजास उद्देशून आहेत. येशूच्या जन्मापासून ते पहिल्या ख्रिस्ती मंडळीचा पायाभूत धावता इतिहास देत पौल रोमच्या नजरकैदेत असेपर्यंतच्या घटना तो सांगतो (प्रे कृ २८:३०,३१) व प्रे कृ ची सांगता करतो . यावरून पौल रोमच्या बंदीवासात असताना म्हणजे साधारण इस ६०-६२ दरम्यान लूकाने ही पुस्तके दोन ग्रंथस्वरूपात लिहिली हे स्पष्ट होते. ७० साली होणाऱ्या यरुशलेमच्या नाशाचे येशूने केलेले भाकित त्याने लिहून ठेवले (१९:४२-४४;२१:२०-२४). पण ते भाकित पूर्ण झाल्याची नोंद तो दोन्ही पुस्तकात देत नाही. पण ही भाकिते पूर्ण होणार असल्याचे तो सुचवतो (प्रे कृ ११:२८). म्हणजे त्याने ही पुस्तके यरुशलेमवरील रोमच्या हल्ल्यानंतर नक्कीच लिहिली नसून त्यापूर्वी लिहिली आहेत. तसेच इ स ६४ मध्ये नीरोच्या राजवटीत सुरू झालेल्या छळाची नोंद प्रेषितांच्या कृत्यात आढळत नाही.

पार्श्वभूमी

थियफिल या नावाचा अर्थ "देवावर प्रेम करणारा." “थियफिला महाराज" या संबोधनावरून तो विख्यात उच्चपदस्थ रोमी असावा. "कैसराच्या घरातील" तारण पावलेल्यांपैकी एक असावा (फिलीपै ४:२२). अर्थात केवळ ह्या एका व्यक्तीत नव्हे तर अधिक विस्तृत श्रोत्यांमध्ये काम होण्याचा दृष्टिकोन ठेऊन लूक लिहीत आहे यात वादच नाही. दिलेल्या वृत्तांताचे आपण प्रत्यक्ष साक्षी नसल्याचे तर प्रत्यक्ष साक्षीदारांकडून माहिती घेतल्याचे तो प्रथमच सांगून टाकतो. जरी क्रमवार वृत्तांत देण्याचा त्याचा उद्देश असला तरी तो अगदी काटेकोरपणे तसे करताना दिसत नाही. जरी त्याने प्रथम साक्षीदारांकडून माहिती घेऊन लिखाण केले तरी ते ईश्वरी प्रेरणेनेच आपली भाषाशैली व शब्दरचना वापरून पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली लिहिले हे लक्षात ठेवावे. म्हणूनच त्याचे लिखाण अचूक आहे (१:३).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

भरपूर वाचन करणारा तो विद्वान आहे. इतिहासकाराप्रमाणे घटनांचे संशोधन करून पुराव्यांनी जोड देऊन त्याने तपशीलवार मांडणी केली आहे. आपल्या लिखाणाला साहित्याचा साज चढवायला तो अनेक स्तोत्रांचा वापर करतो (१:४६-५५;६८-७९; २:१४; २९-३२; ३४-३५). तो येशूजन्माच्या संबंधित घटनांचा तपशील देतो. जखऱ्याला दर्शन, योहानाचा जन्म, मरीयेला दर्शन, येशूचा जन्म, गव्हाणी, मेंढपाळांना दर्शन, शिमोन व हन्नेला दर्शन (अध्याय १ व २). विदेशी, इस्राएलांकडून कायम तुच्छ लेखले जाणारे, शोमरोनी, स्त्रिया, मुले, जकातदार व पापी यांच्यासाठी येशूला असणारा कळवळा हा लूकाचा मध्यवर्ती विषय आहे. तो जकातदारांविषयी नेहमी सकारात्मक बोलताना दिसतो (३:१२; ५:२७; ७:२९; १५:१; १८:१०-१३; १९:२). तरी प्रतिष्ठांच्या तारणाकडे तो दुर्लक्ष करीत नाही. उदा.२३: ५०-५३. समाजाने टाकलेल्यांची ख्रिस्त कशी सेवा करतो, हा विचार येशूच्या सामाजिक सवेतून ते वधस्तंभावरील त्याचे अर्पण व उद्गारांतून तो स्पष्ट करतो. तो महान वैद्य, लोकांच्या शारीरिक व आत्मिक गरजांविषयी किती संवेदनशील होता ते हा वैद्य लूक दाखवून देतो (५:३१; ३२;१५:४-७; १९:१०). आरंभापासूनच तो स्त्रियांचे महत्त्व प्रकर्षाने मांडताना दिसतो. अलिशिबा, मरीया, हन्नेपासून अखेर पहाटे पुनरुत्थित ख्रिस्ताच्या कबरेपाशी असणाऱ्या स्त्रिया तो सादर करतो. येशूच्या सेवाकार्यातील त्यांचे मध्यवर्ती स्थान तो रेखाटतो (७:१२-१५; ३७-५०; ८:२,३; ४३-४८; १०:३८-४२; १३:११-१३; २१:२-४; २३:२७-२९; ४९,५५,५६). देवाच्या सान्निध्यात माणसाला वाटणारे भय (१:१२), क्षमा (३:३,५:२०-२५; ६:३७; ७:४१-५०; ११:४;१२-१०; १७:३-४; २३:३४; २४:४७); आनंद (१:१४); दैवी सत्यांचे रहस्य (२:१८); पवित्र आत्म्याची भूमिका(१:१५,३५,४१,६७; २:२५-२७; ३:१,१६,२२; ४:१,१४,१८; १०:२१; ११:१३; १२:१०-१२); यरुशलेमचे मंदिर (१:९-२२; २:२७-३८; ४६-४९; ४:९-१३; १८:१०-१४; १९:४५-४८; २०:१ -२१:१६; ३७,३८; २४:५३), येशूच्या प्रार्थना असे अनेक पैलू तो उचलून सांगतो. ९:५१ पासून येशूच्या यरुशलेमातील अखेरच्या प्रवासावर लक्ष केंद्रित करतो. लूकाचे लिखाण लक्षणीय आहे. तो त्याच्या या पुस्तकाचा गाभा आहे. कारण येशू यरुशलेमेप्रत कशी वाटचाल करतो याचे तो वर्णन करतो; कारण याच उद्देशाने तो भूतलावर आला होता (९:२२,२३; १७:२५; १८:३१-३३; २४:२५,२६,४६). तो कशालाच भीत नव्हता. पाप्यांचे तारण हेच त्याचे एकमेव काम होते.

काही महत्त्वाचे विषय

यहुद्यांना परिचित असलेल्या स्थानकांचे नामनिर्देश करून वाचकांचे भौगोलिक ज्ञान सखोल असल्याचे तो दर्शवतो. हिब्रू ऐवजी तो ग्रीक परिभाषा वापरतो. कालवरी ऐवजी गुलगुथा, अब्बा, रब्बी, होसान्ना या शब्दांऐवजी तो ग्रीक भाषेतील समानार्थी शब्द वापरतो. जुन्या कराराचे थेट संदर्भ न देता देवाच्या मुखातील उद्गार असल्याप्रमाणे सांगतो. (२:२३,२४; ३:४-८; १०-१२; १८-१९; ७:२७; १०:२७; १८:२०; १९:४६; २०:१७,१८,३७,४२,४३; २२:३७). येशूच्या शुभवर्तमानाकडे संपूर्ण जगाला तो पाचारण करतो. मनुष्याचा पुत्र, इस्राएलांनी धिक्कारलेली, जगासाठी देण्यात आलेला असे तो येशूचे वर्णन करतो. येशूद्वारे शोमरोनी, हेल्लेणी व टाकलेल्यांना कशी कृपा प्राप्त झाली ते कथन करतो. "विदेश्यांचा प्रेषित" जो पौल त्याची जवळची सोबत लाभल्याने तो अशा महत्त्वाच्या मुद्द्यांवर अचूक भर देतो (रोम११:१३). लूकाचे सिद्धांत प्रेषितांची कृत्ये या पुस्तकाशी तंतोतंत जुळतात. पण लूक स्वत:ची भाषाशैली वापरतो. पौलाचा मध्यवर्ती सिद्धांत "नीतिमान विश्वासाने वाचेल" हाच होता तर लूक विश्वासाने नीतिमान ठरल्याचे

अनेक वृत्तांत सादर करतो. उदा. परूशी व जकातदार (१८:९-१४), उधळया पुत्र (१५:११-३२); शिमोनाच्या घरची घटना (७:३६-५०), जक्कयचे तारण (१९:१-१०).

रूपरेषा

(I) ख्रिस्ताच्या सेवेचा आरंभ - १:१-४-१३

(II) गालीलात सेवा - ४:१४-९:५०

(III) यरुशलेमास प्रवास - ९:५१-१९:२७

(IV) पवित्र आठवडा - १९:२८-२३:५६

रविवार १९:२८-४४
सोमवार १९:४५-४८
मंगळवार २०:१-२१:३८
बुधवार २२:१-६
गुरुवार २२:७-५३
शुक्रवार २२:५४-२३:५५
शब्बाथ २३:५६

(V) येशूच्या सेवेचा कळस - २४:१-५३

पुनरुत्थान २४:१-१२
अम्माऊसच्या वाटेवर २४:१३-४५
स्वर्गारोहण ४६-५३

प्रकरण ७

योहानकृत शुभवर्तमान

लेखक व काळ

लेखक म्हणून योहान आपले नाव नमूद करीत नसला तरी आरंभीच्या मंडळीने योहानच या पुस्तकाचा लेखक असल्याचे मान्य केले होते. इ स १३०-२०० मध्ये इरेनिअस हा मंडळीचा वडील होता. तो इ.स. ७० ते १६० मधील पॉलिकार्पचा शिष्य होता. आणि पॉलिकार्प हा प्रेषित योहानाचा शिष्य होता. पॉलिकार्पच्या अधिकृत साक्षीवरून इरेनियसही साक्ष देतो की योहानानेच हे पुस्तक लिहिले आहे. आशिया मायनरमध्ये वृद्धापकाळी इफिसच्या आपल्या घरी राहात असताना त्याने हे शुभवर्तमान लिहिले. सर्वच मंडळयांची खात्री होती की हे योहानानेच लिहिले आहे. इ स १५०-२१५ मधील ॲलेक्झांड्रियाचा क्लेमेंट म्हणतो की, इतर शुभवर्तमानांमधील घटनांमधील सत्यांची योहानाला उत्तम माहिती होती आणि पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने त्याने हे "आध्यात्मिक शुभवर्तमान" लिहिले. आरंभीच्या मंडळीच्या मजबूत परंपरा हे या शुभवर्तमानाचे महत्त्वाचे अंतर्गत गुणवैशिष्ट्य आहे. इतर तीन शुभवर्तमानात योहानाचा २० वेळा उल्लेख आला आहे. पण या शुभवर्तमानात स्वत:चे थेट नाव न देता "ज्याच्यावर येशूची प्रीती होती" अशा शब्दात तो स्वत:चा उल्लेख करतो (१३:२३; १९:२६; २०:२; २१:७,२०). इतर शिष्यांची भूमिका वठवताना तो त्यांचा आवर्जून नामउल्लेख करतो पण स्वत:चा नामउल्लेख टाळतो यावरून येशूशी आलेल्या घनिष्ठ संबंधांतून त्याच्या ठायी मुरलेली नम्रता व्यक्त होते. त्याचे नाव व्यक्त करण्याची गरज नव्हती कारण तोच लेखक असल्याचे सर्वश्रुत होते. तरी २० व २१ अध्यायातील स्पष्टीकरण "ज्याच्यावर येशूची प्रीती होती" ह्या शब्दप्रयोगाला अधिक धार आणते. या शुभवर्तमानांची रचना वेगळीच आहे, तरीही मंडळीने हे ईश्वरप्रेरित लिखाण म्हणून स्वीकारले आणि पुढे लिहिण्यात आलेले ॲपॉक्रिफा व खोट्या प्रेषितांची लिखाणे एकमताने धिक्कारली. योहान व त्याचा मोठा भाऊ याकोब यांना "जब्दीचे पुत्र" (प्रे कृ १२:२, मत्तय १०:२-४) म्हणून संबोधले असून येशू त्यांना "गर्जनेचा पुत्र "म्हणून संबोधतो (मार्क ३:१७). योहान प्रेषित होता (लूक ६:१२-१६). तो पेत्र, याकोब व योहान या येशूच्या तीन निकटवर्तीयांपैकी एक होता. त्यांनी येशूचे जगातील जीवन जवळून न्याहाळले (१ योहान १:१-४). ख्रिस्ताच्या स्वर्गारोहणानंतर योहान यरुशलेमच्या मंडळीचा आधारस्तंभ बनला (गलती २:९). त्याने पेत्राबरोबर सेवा केली.

यरुशलेमच्या विनाशापूर्वी तीन पत्रे व प्रकटीकरण लिहिण्यापूर्वी इ स८० ते इ.स ९० दरम्यान त्याने हे शुभवर्तमान लिहिले. त्यानंतर रोमने त्याला पात्म बेटावर नजरकैदेत ठेवले. येशूच्या सेवेच्या साक्षीनंतर सुमारे ५० वर्षांनी वृद्धापकाळी त्याने हे लिखाण केले.

पार्श्वभूमी व या शुभवर्तमानांची वैशिष्ट्ये

(१) इतर तीन शुभवर्तमानात प्रकाश न टाकलेल्या घटना तो देतो.

(२) इतर तीन शुभवर्तमानांच्या लिखाणाला पुष्टी देणारे लिखाण तो करतो व त्यांचे लिखाण समजायला त्यामुळे मदत होते. उदा. तो येशूच्या गालीलातील सेवेने सुरुवात करतो; ते त्यापूर्वी सुरू झालेल्या सेवेने सुरुवात करतात. (मत्तय ४:१२, मार्क१:१४). यहूदामधील सेवेपूर्वीचा योहान तपशील देतो (अध्याय३); शोमरोनातील अंमलदाराची सेवा

(अध्याय ४). मार्क ६:४५ मध्ये ५००० ना जेवण दिल्यानंतर येशू शिष्यांना गालील समुद्र ओलांडून बेथसैदात का नेतो याची योहान कारणमीमांसा करतो. येशूने भोजन बहुगुणित केल्याने लोक त्याला राजा करू पाहात होते आणि त्यांच्या चुकीच्या हेतुमुळे येशू त्यांना टाळत होता (६:२६).

(३) योहान ईश्वर विज्ञानाच्या दृष्टिकोनातून लिखाण करतो. उदा. १:१-१८ मध्ये तो खूप खोल ज्ञान देतो. कथानकाला पोषक असे खूप उपदेशपर लिखाण तो करतो (३:३-१७). पवित्र आत्म्याविषयी तो सखोल शिक्षण देतो (१४:१६,१७, २६; १६:७-१४). जरी तीन शुभवर्तमाने लक्षात घेऊन त्याने लिखाण केले तरी तो त्यांच्या माहितीवर अवलंबून नाही. तर उलट पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने तो आपल्या आठवणी जागवून प्रत्यक्ष साक्षी लिहितो (१:१४; १९:३५; २१:२४). तो येशूच्या देवत्वाचा, दु:खसहनाचा व पुनरुत्थानाचाही साक्षी आहे.

आपल्या लिखाणाचा उद्देशही तो २०:३०,३१ मध्ये नमूद करतो. "---असा विश्वास धरावा---जीवनप्राप्ती व्हावी— म्हणून ही वर्णिली आहेत." म्हणजे लिखाणाचा दुहेरी हेतू आहे. (१) सुवार्ताप्रसार (२) क्षमाप्राप्ती. विश्वास हा शब्द या शुभवर्तमानात १०० वेळा आला आहे. म्हणून ते सुवार्ताप्रचारात्मक वाटते. विश्वास ठेवण्याची कारणे तो वाचकांपुढे मांडतो व त्याचा परिणाम सार्वकालिक जीवन प्राप्त होणे असेल ही खात्री पटवतो (१:१२). क्षमाप्राप्तीचा हेतू सुवार्ताप्रसाराशी निगडित आहे. योहान आपल्या वाचकांची खात्री करून देतो की येशू हा देहधारी होऊन आलेला देवमानव आहे. भाकितांनुसार आलेल्या ख्रिस्त जो मशीहा या व्यक्तीच्या ठायी दैवी स्वभाव व मानवी स्वभाव यांची अचूक व परिपूर्ण गुंफण झाली होती (१:४१;३:१६;४:२५,२६; ८:५८). पुरावादाखल त्याने आठ चिन्हे शुभवर्तमानात गुंफली आहेत. ती येशूवरील विश्वासाकडे घेऊन जातात व विश्वासाला मजबुती देतात.

पुस्तकाच्या अर्ध्या भागात सात चमत्कार आहेत. त्यातून ख्रिस्ताचे व्यक्तीदर्शन घडते व ख्रिस्तावर विश्वास निर्माण होतो. (१) पाण्याचा द्राक्षारस-२:१-११. (२) शताधिपतीच्या मुलास आरोग्य - ४:४६-५४. (३) पंगूला आरोग्य - ५:१-१८. (४) लोकसमुदायाला भोजन - ६:१-१५. (५) येशूचे पाण्यावरून चालणे - ६:१६-२१. (६) अंधाला दृष्टी - ९:१-४१. (७) लाजाराला मेलेल्यातून उठवणे - ११:१-५७. (८) आठवे पुनरुत्थानानंतरचे चिन्ह म्हणजे चमत्काराने माशांचा घोळका जाळ्यात सापडणे - २१:६-११.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

सुवार्ता प्रसारात्मक व क्षमाप्राप्ती हा उद्देश असतानाच सर्वसामान्य संदेश २०:३१ मध्ये सापडतो. तो म्हणजे "येशूख्रिस्त हा देवाचा पुत्र आहे." त्यामुळे संपूर्ण पुस्तकाचा गाभा येशू ही व्यक्ती व त्याचे कार्य हा आहे. " चिन्ह" "विश्वास" व "जीवन" हे तीन महत्त्वपूर्ण शब्द आहेत. विविध पद्धतीने हे शब्द पुस्तकात आलेले दिसतात. त्यातून तारणाचा उद्देश प्रकट होतो.ते तारण फक्त ख्रिस्ताठायीच असल्याचे स्पष्ट होते (१:१-१८; १ योहान १:१-४; योहान ६:३५; ४८; १०:७,९; १०:११-१४; ११:२५; १४:६; १७:३).येशू देऊ करीत असलेल्या तारणाला मानवाचे विविध प्रतिसाद पण तो दाखवून देतो.

विशेष मुद्दे

- शुभवर्तमान पुढील तीन बाबींवर प्रकाश टाकते - (१) येशू शब्द आहे व तोच मशीहा व देवाचा पुत्र आहे. (२) तो मानवजातीला तारणाचे दान देतो. (३) कोणी ते दान स्वीकारतात तर कोणी ते दान धिक्कारतात.
- विरुद्ध अर्थी जोड्यांचा वापर करून तो मुख्य कल्पनेला पुष्टी देणारे काही उपमुद्दे स्पष्ट करतो. (१) मरण – जीवन (२) प्रकाश - अंधार (३) प्रीती - द्वेष (४) वरून - जगातून. याद्वारे विश्वास ठेवणाऱ्यांना तो येशू ही व्यक्ती व त्याचे कार्य याविषयी व्यापक माहिती पुरवतो व त्याच्यावर विश्वास ठेवण्याची निकड सांगतो (१:४,५,१२,१३; ३:१६-२१; १२:४४-४६; १५:१७-२०).
- "मी आहे" हा दावा करणारी सात विधाने तो देतो (१) जीवनाची भाकर - ६:३५. (२) जगाचा प्रकाश- ८:१२. (३) तारणाचे दार - १०:७,९. (४) उत्तम मेंढपाळ - १०:११,१४. (५) पुनरुत्थान व जीवन -११:२५. (६) मार्ग, सत्य व जीवन १४:६. (७) खरा द्राक्षवेल - १५:१-५.

महत्त्वाचे विचार

या शुभवर्तमानाला सखोल अर्थ आहे . ते आध्यात्मिक गोष्टींचा उलगडा करते. महत्त्वाचे सिद्धांत व तत्त्वे सांगते. या पुस्तकाचे मनन करून अभ्यास करावा. अत्यंत प्रीतीने पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली संपन्न असा आत्मिक खजिना ते उकलून देते (१४:१६;१६:१३). पवित्र आत्माच सर्व शिकवतो, मार्गदर्शन करतो व सत्ये उलगडून सांगतो. तीन शुभवर्तमाने व या शुभवर्तमानाचा कालावधी नीट लक्षात घ्यावा. उदा. १३:२ मधील शेवटच्या भोजनाचा समय. गुरुवारी संध्याकाळी वल्हांडणाचा भोजन करून येशू शुक्रवारी वधस्तंभी गेला. तर योहान १८:२८ मध्ये नोंद आहे की आपणाला विटाळ होऊ नये व वल्हांडणाचे भोजन करता यावे म्हणून यहूदी लोक स्वत: पिलाताच्या कचेरीत गेले नाहीत. याचा अर्थ शिष्यांनी गुरुवारी वल्हांडणाचे भोजन केले होते पण यहुद्यांनी केले नव्हते. १९:१४ नुसार येशूची चौकशी व त्याला वधस्तंभी खिळणे या घटना वल्हांडणाच्या यहुद्यांच्या तयारीच्या दिवशी झाल्या. यहुद्यांच्या वल्हांडणाच्या भोजनानंतर नव्हे. त्यामुळे येशू हा मानवांसाठी जगाचे पापहरण करणारा कोकरा म्हणून वधस्तंभी मारला जात असता यहूदी लोक प्रत्यक्षात त्यांचा वल्हांडणाचा कोकरा मारत होते (१९:१४). मग प्रश्न पडतो की शिष्यांनी गुरुवारी वल्हांडणाचे भोजन का केले? उत्तर असे आहे की, उत्तरेकडील गालीलकर व सर्व यहूदी सूर्योदय ते सूर्योदय असा दिवस मोजत असत. तर दक्षिणेकडील यरुशलेम व परिसरातील यहूदी व बहुसंख्येने असलेले सदूकी सूर्यास्त ते सूर्यास्त असा दिवस मोजत असत. यहुदाखेरीज येशूचे सर्व शिष्य गालीलातील म्हणजे उत्तर भागातील होते. त्यामुळे येशू व शिष्यांचे वल्हांडणाचे भोजन गुरुवार संपत असता झाले तर यहुद्यांचे शुक्रवारी झाले.

पण याचे बरेच फायदे असत. जोडून दोन दिवसात विभागून वल्हांडण साजरा होत असल्याने यज्ञांचे योग्य नियोजन करता येऊन एकाच वेळी सर्वांची गर्दी होऊन गोंधळ टाळता येत असे. ही वेळेची तफावत लक्षात घेतल्यास नोंदींमध्ये विसंगती दिसत नाही. येशू व शिष्यांचा वल्हांडण गुरुवारी सूर्योदयाला सुरू झाला व शुक्रवारी सूर्योदयाला संपला. तर सदूकी व इतरांचा वल्हांडण गुरुवारी सूर्यास्ताला सुरू झाला व शुक्रवारी सूर्यास्ताला संपला. यातून देवाची मुक्तीची योजना साकार झाली. येशूने रीतसर नियमशास्त्राचे पालन करून वल्हांडणाचे भोजन केले व वल्हांडणाच्या दिवशीच आपले अर्पणही केले. त्याने उच्चारलेला प्रत्येक शब्द व प्रत्येक कृती दैवी नियंत्रणाने झाली. त्याच्या विरुद्ध उच्चारलेल्या शब्दांवरही सार्वभौम देवाचेच नियंत्रण होते (११:४९-५२; १९:११).

रूपरेषा

(I) देवाच्या पुत्राचे देहधारी होणे - १:१-१८

(II) देवाच्या पुत्राचे सादर होणे - १:१९-४:५४

(III) देवाच्या पुत्राला विरोध - ५:१-१२:५०

(IV) देवाचा पुत्र शिष्यांची तयारी करून घेतो - १३:१-१७:२६

(V) देवाच्या पुत्राचा वध - १८:१ १९:३७

(VI) देवाच्या पुत्राचे पुनरुत्थान - १९:३८-२१:२३

(VII) समारोप - २१:२४,२५

प्रकरण ८

प्रेषितांची कृत्ये

प्रस्तावना

'कृत्ये' हा शब्द थोरांची कृत्ये या अर्थाने वापरला जात असे. म्हणून प्रेषितांची कृत्ये हे नाव दिल्याने प्रामुख्याने प्रेषित पेत्र १-१२ अध्यायात व प्रेषित पौल प्रामुख्याने १३-२८ अध्यायात इतर प्रेषितांसह थोर कृत्ये करताना दिसतात. खरे तर "प्रेषितांद्वारे पवित्र आत्म्याची कृत्ये" असे शीर्षक अधिक संयुक्तिक ठरेल. कारण त्याचे सार्वभौम, देखरेखीखाली चाललेले काम कोणत्याही मानवापेक्षा अतिशय महत्त्वाचे होते. पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने नियंत्रणाने व सामर्थ्याने सेवा होत होती. त्यामुळे मंडळी बलवान बनली, संख्येने वाढली, आध्यात्मिक सामर्थ्याने भरली आणि तिचा प्रभाव पडला.

लेखक व काळ

जरी लूक या पुस्तकाचा लेखक असल्याचा उल्लेख या पुस्तकात नसला तरी लुकाचे शुभवर्तमान थियफिला महाराजांस त्याने लिहिले असल्याने व प्रेषितांची कृत्ये ही सुद्धा थियफिला महाराजांस लिहिल्याने पहिल्या मंडळीने व इतिहासकारांनीही एकमताने मान्य केले आहे की हे पुस्तक लुकानेच लिहिले आहे. लूक पौलाचा उत्तम मित्र, प्रवासात सोबती व वैयक्तिक डॉक्टर होता. तो बारकाईने संशोधन करणारा, अचूक नोंदी ठेवणारा इतिहासकार होता. रोमी कायदेकानू व त्यांच्या रीतिरिवाजांचे, तसेच आशिया मायनर, पॅलेस्ताईन व इटलीचे त्याला बारकाईने भौगोलिक ज्ञान होते. तो लेखी पुरावेही सादर करतो (१५:२३-२९; २३:२६-३०). त्याने पेत्र, योहान व यरुशलेमातील इतर काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. मंडळीच्या आरंभीच्या काळाची माहिती देऊ शकणाऱ्या व्यक्ती म्हणजे फिलिप्प व त्याच्या कन्या, यांची पौल कैसराच्या तुरुंगात असताना मुलाखत घेण्याची त्याला भरपूर संधी मिळाली. आम्ही/ आमचे असे प्रथमपुरूषी अनेकवचनी सर्वनाम वारंवार वापरून प्रेषितांच्या कृत्यांमधील घटनांचे आपण प्रत्यक्ष साक्षी असल्याची तो ग्वाही देतो (१६:१०-१७; २०:५-२१:१८; २७:१-२८:१६). त्याने इ स ६०-६२ च्या दरम्यान हे पुस्तक लिहिले. याचे प्रमुख कारण म्हणजे अगदी घाईने थोडक्यात त्याने पुस्तकाचा समारोप केलेला दिसतो. जर तो प्रेषितांच्या कृत्याचे अर्धे अध्याय पौलाच्या सेवेच्या वृत्तांतासाठी खर्च करतो तर त्याने त्या चौकशीची व त्याच्या मरणाची नोंद दिली असती. इ स ६२ मध्ये यरुशलेमच्या मंडळीचा प्रमुख याकोब रक्तसाक्षी झाला होता. इ स ६४ मध्ये नीरोच्या हस्ते छळ होत होता. इ स ७० मध्ये यरुशलेमचा पाडाव झाला होता. पण या आज्ञेविषयी कोणत्याच नोंदी तो देत नाही. यावरून त्याने इ स ६०-६२ दरम्यानच हे पुस्तक लिहिले याला पुष्टी मिळते.

पार्श्वभूमी

लूक शुभवर्तमानात येशूचा क्रमवार वृत्तांत दिल्यावर त्यापुढील नोंदी तो या पुस्तकात क्रमवार चालू ठेवतो व येशू आरंभीच्या मंडळीद्वारे कोणत्या कार्याची अंमलबजावणी करून घेतो ते सांगतो. येशूच्या स्वर्गारोहणाने सुरुवात करून पेंटेकॉस्टच्या दिवशी झालेला मंडळीचा जन्म ते पौलाचे रोममध्ये शिक्षण या नोंदी देतो. सुवार्ताप्रसार कसा झाला व मंडळी कशी वाढत गेली हे तो सांगतो. सुवार्तेला झालेला कळसाचा विरोधही तो मांडतो.

थिओफिलस या नावाचा अर्थ "देवावर प्रेम करणारा." तो विश्वासी होता व लूक त्याला बोध करत होता की तो विदेशी असून त्याचे परिवर्तन व्हावे म्हणून तो प्रयत्नात होता ते ठाऊक नाही. त्याचा "थियफिल महाराज," असा तो उल्लेख करतो यावरून तो महत्त्वाच्या हुद्द्यावरील वरिष्ठ रोमी व्यक्ती असावा असे दिसते (२४:३; २६:२५).

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानांचे मुद्दे

पहिल्या मंडळीचा प्रथमच लिहिलेला हा इतिहास आहे. मत्तय २८:१९,२० मध्ये येशूने दिलेल्या महाआज्ञेला या मंडळीने पुढाकार घेऊन दिलेल्या प्रतिसादाची ही नोंद आहे. मंडळी अस्तित्वात आल्यापासूनचा पहिल्या तीस वर्षांची ही माहिती आहे. नव्या करारात इतरत्र ती उपलब्ध नाही. त्यात सिद्धांतांच्या उहापोह केलेला नाही. पण प्रेषितांची कृत्ये या मुद्द्यांवर जोर देते की ज्या मशीहाची दीर्घकाळ इस्राएल लोक वाट पाहत होते तो नासरेथकर येशू आहे आणि शुभवर्तमान केवळ यहुद्यांसाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी आहे. ते पवित्र आत्म्याच्या कार्यावर भर देऊन तसा ५० हून अधिक वेळा उल्लेख करते. जुन्या कराराचे योएल, स्तोत्रे व यशया मधून बरेच संदर्भ दिलेले आढळतात. प्रेषितांची कृत्ये येशूच्या सेवेनंतर एकदम प्रेषितांच्या सेवेच्या नोंदी देऊन, जुन्या कराराचा काळ संपवून नवा करार सादर करून, देवाच्या साक्षीदाखल असलेल्या इस्राएल राष्ट्राऐवजी देवाचे साक्षीचे लोक म्हणून यहूदी व विदेश्यांनी बनलेल्या मंडळीला सादर करून कलाटणी देतात. इब्री लोकांस पत्राचे पुस्तक जुन्या कराराच्या ईश्वरविज्ञानाऐवजी नव्या कराराचे सिद्धांत मांडून कलाटणी देते. प्रेषितांची कृत्ये मंडळीच्या जीवनातील नव्या कराराच्या प्रत्यक्षातील कार्यांचे वर्णन करतात.

रूपरेषा

(I) प्रस्तावना - १:१-८

(II) यरुशलेमात साक्ष - १:९-८:३

(III) यहूदा व शोमरोनाला साक्ष - ८:४-१२:२५

(IV) पृथ्वीच्या शेवटपर्यंत साक्ष - १३:१-२८:३१

(अ) पौलाची पहिली मिशनरी फेरी
(ब) यरुशलेम धर्मसभा -१५:१-३५
(क) पौलाची दुसरी मिशनरी फेरी - १५:३६-१८:२२
(ड) पौलाची तिसरी मिशनरी फेरी - १८:२३-२१:१६
(ई) पौलाची यरुशलेम व कैसरीयातील चौकशी - २१:१७-२६:२२
(फ) पौलाचे रोमला प्रयाण - २७:१-२८:३१.

प्रकरण ९

पौलाचे रोमकरांस पत्र

लेखक व काळ

रोम ही रोमच्या साम्राज्यांची राजधानी होती. तेथील मंडळीला पौलाने हे पत्र लिहिले. पौलाचे हिब्रू नाव शौल व ग्रीक नाव पौल होते. तो बन्यामीन वंशाचा असून (फिलिपै ३:५), रोमचा नागरिक होता (प्रे कृ १६:३७). ख्रिस्ताच्या जन्माच्या वेळी तो तार्स येथे जन्मला (प्रे कृ ९:११). हे एक महत्त्वाचे नगर होते. आताच्या तुर्कस्थानात आशिया मायनरमध्ये रोमच्या किल्किया प्रांतात हे नगर होते. गमलीएल या रब्बींच्या हाताखाली त्याच्या आयुष्याचे आरंभीचे दिवस धर्मशास्त्र शिकवण्यात गेले होते (प्रे कृ २२:३). त्याच्या बापाप्रमाणे तो परूशी होता ((प्रे कृ २३:६). परूशी हा यहुद्यांचा कर्मठ गट होता (फिलिपै ३:५). इ स ३३-३४ दरम्यान दिमिष्काच्या वाटेवर त्याचे परिवर्तन झाले होते. ख्रिस्ती लोकांना पकडून तुरुंगात टाकण्याच्या कामासाठी तो त्या वाटेने चालला होता. परिवर्तन होताच त्याने सुवार्तेची घोषणा करायला सुरुवात केली (प्रे कृ ९:२०). दिमिष्कातून तो जिवानिशी सुटला (प्रे कृ ९:२३-२५; २ करिंथ ११:३२-३३). मृत समुद्राच्या पूर्वेस व अरबस्तानातील नबॅस्टियनच्या दक्षिणेला असलेल्या अरण्यात त्याने तीन वर्षे घालवली (गलती १:१७,१८). तेथे त्याला बहुतेक सर्व सिद्धांतांचे थेट खुद्द प्रभूकडून प्रकटीकरण झाले (गलती १:११,१२).

संपूर्ण रोम साम्राज्यात ख्रिस्ती विश्वासाचा फैलाव करण्याची जबाबदारी कोणाही व्यक्तीऐवजी पौलानेच पार पाडली. एके काळी ज्याने सुवार्तेचा विध्वंस करण्याची खूप खटपट केली त्या पौलाने आता सुवार्ताप्रसारासाठी अथक परिश्रम घेतले व मध्य जगतात त्याने तीन मिशनरी फेऱ्या केल्या (प्रे कृ २६:९). यरुशलेमातील गरीब मंडळीसाठी दान घेऊन तो तेथे परत आला तेव्हा तेथील काही यहुद्यांनी त्याच्यावर खोटे दोषारोप केले (प्रे कृ २१:२७-२९). क्रोधविष्ट जमावाने त्याला बेदम मारहाण केली (प्रे कृ २१:३०,३१) व रोमी लोकांनी त्याला अटक केली. जरी फेलिक्स, फेस्त व हेरोद अग्रिपा यांना त्याच्या ठायी अजिबात दोष आढळला नाही तरी यहूदी पुढाऱ्यांच्या दबावामुळे त्यांनी पौलाला रोमच्या कोठडीत डांबले. दोन वर्षांनी त्याने आपला रोमी नागरिकत्वाचा हक्क निदर्शनास आणून दिला आणि आपला खटला कैसरापुढे चालवण्यात यावा असा दावा केला (प्रे कृ अध्याय २७,२८). मधील जीवघेणा प्रवास केला. त्यामध्ये दोन आठवडे विध्वंसक समुद्र तुफानाशी सामना केला. त्यावेळी गलबत फुटण्याच्या प्रसंगाशी मुकाबला केला व तो रोमला पोहंचला. अल्पकाळ त्याला सेवेसाठी मोकळीकता दिली आणि पुन्हा अटक झाली व इ स ६५-६७ दरम्यान रोममध्ये तो रक्तसाक्षी झाला (२ तीमथ्य ४:६). तेथे तो म्हणतो, “माझे अर्पण होत आहे, माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे.”

जरी शारीरिकदृष्ट्या त्याचे फार प्रभावी व्यक्तिमत्व नव्हते (२ करिंथ १०:१०; गलती ४:१४), तरी पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने तो अंतर्यामी फार बलवान होता (फिलिपै ४:१३) व मंडळीला तो अत्यंत प्रिय होता. देवाने त्याला सिद्ध करून दाखवले की त्याची प्रत्येक गरज पुरवायला त्याला देवाची कृपा पुरे आहे (२करिंथ १२:९,१०). ख्रिस्ताच्या या थोर सेवकाला यशस्वीपणे आपली आध्यात्मिक धाव पूर्ण करायला देवाने समर्थ केले (२ तीमथ्य ४:७).

पौलाने हे पत्र करिंथमधून लिहिल्याचे फिबीच्या संदर्भावरून लक्षात येते (रोम १६:१, किंख्रिया हे करिंथचे बंदर होते).

गायस (रोम१६:२३) आणि एरास्त (रोम१६:२३) हे सर्व करिंथच्या मंडळीचे होते असे सूचित होते. पौलाने तिसऱ्या सुवार्ताफेरीच्या अखेरीस हे पत्र बहुधा इ स ५६मध्ये यरुशलेमच्या मंडळीतील गरीबांसाठी दान घेऊन पॅलेस्ताइनला जाण्याची तयारी करत असताना लिहिले (रोम १५:२२). रोममधील विश्वासीयांकडे हे पत्र सुपूर्त करण्याची मोठी जबाबदारी फिबीवर सोपवण्यात आली होती (१६:१,२).

पार्श्वभूमी

रोम हे रोमी साम्राज्याचे अत्यंत महत्त्वाचे राजधानीचे नगर होते. ख्रि पू ७५३ मध्ये ते उभारण्यात आले. पण नव्या करारातच त्याचा प्रथम उल्लेख आला आहे. ते तैबर नदीकाठी वसले असून भूमध्य समुद्रापासून ते १५ मैलांवर आहे. ऑस्टियाच्या जवळपास नवीन बंदर बांधले जाईपर्यंत प्युतिओली हे सुमारे १५० मैलांवरील रोमचे प्रमुख बंदर होते. पौलाच्या काळात या नगराची लोकसंख्या दहा लाखांहून अधिक होती. त्यापैकी बहुसंख्य लोक गुलाम होते. सम्राटाचा राजवाडा, सर्कशीचे स्टेडियम, सार्वजनिक चावडीचा चौक अशा भव्य इमारतींचा रोमला फार अभिमान होता.पण असंख्य गुलामांच्या झोपडपट्टीमुळे त्यांना कलंक लागला होता.आख्यायिका सांगतात की नीरोच्या राजवटीत (इ स ५४-६८) ऑस्टियाच्या वाटेवर रोमच्या बाहेर पौल रक्तसाक्षी झाला.

पेंटेकॉस्टच्या दिवशी तारण पावलेल्यांपैकी काही लोकांनी कदाचित रोमच्या मंडळीची स्थापना केली असेल (२:१०). रोमच्या मंडळीला भेट देण्याची पौलाची तीव्र इच्छा होती, पण ती पूर्ण होण्यात नेहमी अटकाव झाला (१:१३). देवाच्या तरतुदीनुसार पौल रोमच्या मंडळीला भेट देऊ शकला नाही म्हणूनच सुवार्ता प्रसाराच्या ईश्वरप्रेरित सिद्धांताचा हा उत्कृष्ट नमुना जगाला दिला गेला.

रोमकरांना पत्र लिहिण्यामागे पौलाचा मूळ उद्देश हाच होता की ज्या विश्वासीयांना प्रेषितांकडून मुळीच शिकवण मिळाली नव्हती, त्यांना कृपेच्या सुवार्तेची महान सत्ये शिकवावीत.जी मंडळी त्याला व्यक्तिश: ओळखत नव्हती, त्यांची या पत्राद्वारे पौलाशी ओळख झाली. पण अनेक कारणांसाठी त्यांना लवकर भेटण्याची तो आशा बाळगून होता: त्या विश्वासीयांची वृद्धी करण्यासाठी (१:११); त्यांना सुवार्ता सांगण्यासाठी (१:१५), रोमच्या ख्रिस्ती लोकांना जाणून घेण्यासाठी, म्हणजे त्यांच्याकडून पौलाला उत्तेजन मिळेल (१:१२, १५:३२), त्याच्यासाठी त्यांनी प्रार्थना करावी (१५:३०), आणि त्याने स्पेनला सेवेला जाण्याच्या आयोजनात त्याला मदत करावी (१५:२८).

इतर पत्रांप्रमाणे पौलाचे हे पत्र नाही (१ले व २ रे करिंथ, गलती). मार्गभ्रष्ट ईश्वरज्ञान दुरुस्त करणे किंवा दवहीन जीवनशैलीसाठी कानउघाडणी करणे हा त्याचा उद्देश नव्हता. रोमच्या मंडळीला सिद्धांतांचे सखोल ज्ञान होते पण सर्वच मंडळयांप्रमाणे त्याही मंडळीला या पत्रात दिलेले समृद्ध सिद्धांत शिकवण्याची व त्यात दिलेले व्यावहारिक बोध करण्याची गरज होती.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

रोमकरास पत्राचे प्राथमिक काम सिद्धांतांचे आहे. त्यात फारशी ऐतिहासिक माहिती सापडत नाही. जुन्या करारातील अब्राहाम (अध्याय ४), दावीद (४:६-८), आदाम (५:१२-२१), सारा (९:९), रिबेका (९:१०), याकोब व एसाव (९:१०-१३) व फारो (९:१७) अशा परिचित व्यक्तींची उदाहरणे देतो. इस्राएलाच्या इतिहासाची थोडक्यात आठवण

करून देतो (अध्याय९-११). तर १६ वा अध्याय पहिल्या शतकातील मंडळीच्या लोकांचा स्वभाव व चारित्र्य कसे होते याचे ओझरते दर्शन घडवतो.

रोमकरांस पत्राचा सर्वात मात करणारा मुद्दा म्हणजे देवाकडून प्राप्त होणारी नीतिमत्ता : हे गौरवी सत्य म्हणजे अपराधी व शिक्षेला पात्र असणाऱ्या पाप्यांना केवळ ख्रिस्तावरील विश्वासाने व कृपेने देव नीतिमान ठरवतो. १ ते ११ अध्याय त्या सिद्धांताविषयी ईश्वरी विज्ञानाची तत्त्वे शिकवतात, तर १२-१६ अध्याय प्रत्येक विश्वासी व्यक्तीच्या व संपूर्ण मंडळीच्या जीवनात त्या शिकवणीची अंमलबजावणी करण्यासाठी व्यवहारातील बाह्यवर्तनाचा तपशील देतात. आध्यात्मिक पुढारपणाच्या तत्त्वांचा समावेश काही ईश्वरी विज्ञानाच्या विशिष्ट विषयांमध्ये केला आहे (१:८-१५). देवाचा पापी मानवजातीवरील क्रोध (१:१८-३२); दैवी न्यायाची तत्त्वे (२:१-१६); पापाची सार्वत्रिकता (३:९-२०); केवळ विश्वासानेच नीतिमान ठरले जाण्याविषयीचा उलगडा व समर्थन (३:२१-४:२५); तारणाची सुरक्षितता (५:१-११); आदामाच्या पापाची अनुवंशिकता (५:१२-२१); पवित्रीकरण (अध्याय ६-८); देवाच्या सार्वभौमत्वाने निवड (अध्याय ९); देवाची इस्राएलांसाठी असलेली योजना (अध्याय११); आत्मिक वरदान् व व्यावहारिक देवभीरूता (अध्याय१२); मानवी शासनसंस्थेसंदर्भात विश्वासी व्यक्तीची जबाबदारी (अध्याय१३); व ख्रिस्ती स्वातंत्र्याचे तत्त्व (१४:१-१५:१२). नव्या करारातील मूलभूत उच्चस्तरीय सिद्धांतांवर या पुस्तकात काम केलेले असल्याने काही शास्त्रभाग समजायला अवघड असणे सहाजिक आहे.

रूपरेषा

(I) अभिवादन व प्रस्तावना: १:१-१५

(II) विषय: १:१६,१७

(III) दंडाज्ञा: देवाच्या नीतिमत्तेची आवश्यकता १:१८-३:२०

(अ) विदेश्यांची अनीती १:१८-३२;
(ब) यहुद्यांची अनीती २:१-३:८
(क) मानवजातीची अनीती ३:९-२०

(IV) नीतिमान ठरले जाणे: देवाच्या नीतिमत्त्वाची तरतूद ३:२१-५:२१

(अ) नीतिमत्त्वाचा उगम ३:२१-३१
(ब) नीतिमत्त्वाचे उदाहरण ४:१-२५
(क) नीतिमत्त्वातील आशीर्वाद ५:१-११
(ड) नीतिमत्त्व खाती मांडणे ५:१२-२१

(V) पवित्रीकरण: देवाच्या नीतिमत्त्वाचे प्रात्यक्षिक ६:१-८:२९

(VI) पुनरुद्धार: इस्राएलांनी देवाच्या नीतिमत्त्वाचा स्वीकार करणे ९:१-११:३६

(Vll) लागूकरण: देवाच्या नीतिमत्त्वाने वर्तन १२:१-१५:१३

(Vlll) समारोप, अभिवादन व आशीर्वाद १५:१४-१६:२७

प्रकरण १० # पौलाचे करिंथकरांस पहिले पत्र

लेखक व काळ

करिंथ येथील मंडळीला हे पत्र लिहिल्याने त्या मंडळीचे या पत्राला शीर्षक दिले आहे. पौल अधिकृत लेखक असल्याचे तेव्हाच्या मंडळयांनीही मान्य केले होते व त्याचे भरपूर पुरावेही देता येतात (१:१,१३; ३:४-६; ४:१५; १६:२१). इफिसमधून इ.स.५५ मध्ये पौलाची तिसरी सुवार्ताफेरी चालू असता हे पत्र लिहिल्याचे लक्षात येते (१६:८,९,१९). आपले इफिसातील तीन वर्षांचे वास्तव्य इ.स. ५५च्या पेंटेकॉस्टपर्यंत (१६:८) इफिसात पूर्ण करण्याची पौलाची इच्छा होती (प्रे कृ २०:३१). मग इ.स.५५-५६च्या हिवाळयात त्याला करिंथात जायला हवे होते (१६:६; प्रे कृ २०:२).

पार्श्वभूमी

दक्षिण ग्रीसमध्ये अखया प्रांतातील अथेन्स पासून ४५ मैलांवर करिंथ होते. दोन आखाते जोडणाऱ्या ग्रीसच्या संयोगभूमीच्या मध्यावर करिंथ उंच पठारावर होते. कित्येक शतकांपासून जवळचा मार्ग म्हणून या प्रांतातून प्रवाशांची मोठ्या प्रमाणात जा ये होत असे. त्यामुळे केवळ ग्रीकांसाठीच नव्हे तर उत्तर आफ्रिका, आशिया मायनर, इटली व भूमध्य समुद्राच्या आसपासच्या प्रांतांसाठीही ते व्यापाराचे मोठे शहर होते. नीरो सम्राटाने पहिल्या शतकात बांधायला घेतलेला कालवा १९व्या शतकाच्या अखेरीस पूर्ण झाला. संयोगभूमीच्या क्रीडास्पर्धा व ऑलिंपिक क्रीडास्पर्धांचे आयोजन करिंथात होत असल्याने येथे कमालीची वर्दळ असे. त्यात तेथील मूर्तिपूजक संस्कृतीमुळे करिंथ नैतिक दृष्ट्या इतके भ्रष्ट होते की ते भ्रष्टाचाराचे व नैतिक अध:पतनाचे प्रतीक बनले होते. ६:९-१० मध्ये पौल तेथील काही पापांची यादी देतो. करिंथच्या मंडळीत अशा पापातून बाहेर पडलेले विश्वासी लोक होते. खेदाची गोष्ट अशी होती की यातील काही भयानक पापे मंडळीतील काही सभासदांमध्ये अजूनही चालू होती.विदेशी मूर्तिपूजक देखील ज्याला निंद्य मानीत अशी पापे ते करत होते (५:१). करिंथचे एक वैशिष्ट्य म्हणजे२००० फूट उंचावर असलेले ॲफ्रोडाइट या ग्रीक प्रेमदेवतेचे मंदिर. तेथे रोज संध्याकाळी १००० योगिनी म्हणजेच धर्मकांडातून वेश्याकर्म करणाऱ्या देवदासी परदेशी पर्यटक पुरुषांसाठी लैंगिक कृत्ये व पूजाअर्चेची कामे करीत.

पौलाने दुसऱ्या सुवार्ताफेरीत करिंथच्या मंडळीची स्थापना केली (प्रे कृ १८:१). सभास्थानातून त्याने सेवेला आरंभ केला. तेथे त्याला प्रिस्किल्ला व अक्विल्ला या यहूदी दांपत्याची सोबत लाभली. त्यांचा व्यवसायही सारखाच होता. ते काही काळ एकत्र राहिले. पुढे त्यांना सीला व तीमथी येऊन मिळाले व पौलाने अधिक जोमाने सभास्थानात सुवार्तेची घोषणा करायला सुरूवात केली. जेव्हा बहुतेक यहुद्यांनी सुवार्तेचा धिक्कार केला तेव्हा त्यांनी सभास्थान सोडले. पण तोवर सभास्थानाचा प्रमुख क्रिस्प व त्याच्या परिवाराचे व पुष्कळ करिंथकरांचे परिवर्तन झाले होते (प्रे कृ १८:५-८).

दीड वर्षांहून अधिक काळ करिंथात सेवा केल्यावर (प्रे कृ १८:११), काही यहूदी पुढाऱ्यांनी पौलाला रोमच्या सुभेदारासमोर उभे केले; पण त्याच्यावरील आरोप नागरी नसून केवळ धार्मिक बाबतीत असल्याने सुभेदार गल्लिओने खटला रद्द केला. लवकरच मग पौल प्रिस्क्किल्ला व अक्विल्लाला सोबत घेऊन इफिसास गेला. तेथून तो इस्राएलला परतला (१८-२२). करिंथची मंडळी ज्या संस्कृतीतून आली होती तिचा पूर्ण बिमोड करू न शकल्याने करिंथच्या

मंडळीत फुटी होत्या व त्यांच्यातून दैहिकता व अप्रौढता व्यक्त होत होती. अनेक दाने लाभलेल्या अपोल्लोने काही काळ मंडळीत सेवा केल्यावर त्याच्या समर्थकांचा एक गट प्रस्थापित झाला. ते मंडळीतील इतरांशी फारसा संबंध ठेवत नसत. दुसरा एक गट स्थापन झाला. तो पौलाशी एकनिष्ठ होता. आणखी एक गट होता, तो आपणाला पेत्राचे समजत होता, तर एक गट स्वत:ला ख्रिस्ताचे समजणारा होता (१:१०-१३;३:१-९). करिंथच्या मंडळीची आणखी एक गंभीर समस्या होती की ती जगिक असून सभोवतालच्या संस्कृतीशी काडीमोड घ्यायला तयार नव्हती. बहुतेक विश्वासी जन आपल्या जुनाट,अनैतिक व मूर्तिपूजक मार्गापासून सातत्याने विभक्त राहू शकत नव्हते. त्यामुळे या बाबतीत त्यांची सुधारणूक करायला, अवज्ञा करणाऱ्या व पश्चात्ताप न केलेल्या सदस्यांशी सहभागिता तोडण्याची विश्वासी जनांना आज्ञा द्यायला व उलट अशा सदस्यांना मंडळीतून बहिष्कृत करायला त्यांना हे पत्र लिहिणे पौलाला अत्यावश्यक होते (५:९-१३).

हे ईश्वरप्रेरित पत्र लिहिण्यापूर्वी पोलाने दुसरा एक पत्रव्यवहार केला होता (५:९); त्या पत्राचे स्वरूप देखील साधारण असेच होते. त्या पत्राची प्रत सापडलीच नसल्याने त्याला "गहाळ झालेले पत्र" म्हणतात. १ करिंथ नंतर आणखी एका ग्रंथसंहितेत नसलेल्या पत्राला "गंभीर पत्र" म्हणतात (२ करिंथ २:४).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

या पुस्तकात मुख्यत्वेकरून सिद्धांतांपेक्षा वर्तन सुधारण्यावर अधिक जोर दिला आहे. अर्थात पाप व नीतिमत्त्वाशी संबंधित अशा अनेक सिद्धांतांवर पौल उहापोह करतो. अनेकदा चुकीचे वर्तन चुकीच्या विश्वासामुळे घडत असते. उदा. लैंगिक पापे व घटस्फोट ही कुटुंब व विवाह संबंधातील देवाच्या योजनेची अवज्ञा केल्यामुळे घडतात (७:१-४०). देवाच्या पवित्रतेची ओळख होण्यातूनच योग्य उपासना उदय पावते (३ :१७). हीच मंडळीची आत्मिक ओळख असते (१२:१२-२७) व आपण त्यामुळेच प्रभुभोजनाच्या शुद्ध सहभागितेचा उपभोग घेतो (११:१७-३४). विश्वासी जनांनी आपली वरदाने ओळखून त्यांचा सराव केला नाही तर मंडळी विश्वासात प्रभावीपणे वृद्धी पावणार नाही (१२:१-१४:४०). अर्थात पुनरुत्थानाचा सिद्धांत अतिशय महत्त्वाचा आहे. त्याला कमी लेखून चालणार नाही. कारण जर मृतांचे पुनरुत्थान नाही तर ख्रिस्त मेलेल्यांतून उठवला गेला नाही. आणि ख्रिस्त मेलेल्यांतून उठवला गेला नाही तर सुवार्तेची घोषणा व्यर्थ आणि विश्वासही व्यर्थ (१५:१३,१४).

या मुद्द्यांशिवाय पौल विश्वासी जनांच्या न्यायावरही थोडक्यात विचार मांडतो. ते व्यवस्थित समजून घेतल्यास देवभीरू जीवनासाठी योग्य ती स्फूर्ती मिळेल (३:१३-१५). मूर्ती व खोटी दैवते याविषयी योग्य शिक्षण दिले आहे. त्यामुळे मूर्तीला अर्पिलेले मांस खाण्यासारख्या विषयावर सर्वसामान्य अपरिपक्व करिंथकर व्यक्तीला प्रौढपणे विचार करण्यास मदत होणार होती (८:१-११:१). वरदानांचा योग्य वापर करावा व देवाविषयीच्या सर्व गोष्टींचे योग्य ज्ञान असावे व ते खरेपणाने व्यक्त केले जावे अशी आज्ञाच होती (१३:१-१३).

म्हणून पौल वधस्तंभ, दैवी ज्ञान व मानवी ज्ञान, आत्म्याचे प्रकाश पाडण्याचे काम, ऐहिकता, सार्वकालिक प्रतिफळ तारणाने परिवर्तन, पवित्रीकरण, ख्रिस्ताचा स्वभाव, ख्रिस्ताशी जडले जाणे, स्त्रीची देवानुसार भूमिका, विवाह आणि घटस्फोट, पवित्र आत्म्यात बाप्तिस्मा, त्याची वस्ती व वरदाने, मंडळीचे एका शरीरातील ऐक्य, प्रीतीचा ईश्वरी सिद्धांतानुसार अर्थ आणि पुनरुत्थानाचा सिद्धांत हे विषय हाताळतो. ही सर्व सत्ये देवभीरू वर्तनाचा पाया घालतात.

विचार करण्यासारखे मुद्दे

(१) १२-१४ अध्यायांमधील चमत्कार व अद्भुते करण्याच्या वरदानांचा अर्थ लावताना मतभेद होतात. अन्यभाषा व चिन्हे चमत्कारांच्या वरदानांबाबत हे विशेष आढळते. पुष्कळांना वाटते की सर्व वरदाने कायमस्वरूपी आहेत.जेव्हा पूर्णतेचे आगमन होईल तेव्हाच संदेश देण्याचे व विद्येचे दान समाप्त होईल (१३:१०). तेव्हाच अन्य भाषेचे दान समाप्त होईल (१३:८). जे आजही अन्यभाषा व चिन्हे चमत्काराचे दान मंडळीत जतन करतात त्यांचा विश्वास आहे की प्रेषितांनी नव्या कराराच्या काळात ही दाने वापरली तशीच त्याच सामर्थ्याने आजही वापरली जावीत.
तर दुसरा गट वचनांचा सांगोपांग अभ्यास करून पुरावे देतो की त्या काळात नवा करार लिहून पूर्ण होण्याचे काम चालू होते त्यामुळे लिखित स्वरूपात जुन्या कराराशी सांगड घालून ते लोकापुढे ठेवण्यात आले नव्हते. त्यामुळे जुन्या कराराचा देवाशी व देवाच्या योजनेशी येशूचा संबंध व त्याची व प्रेषितांचीही अधिकृतता दर्शवण्यासाठी चमत्कार व अन्यभाषेचा वापर झाला व पुढे त्याच प्रकारे वापर होणे थांबले.

(२) घटस्फोट हा विषयही ७ व्या अध्यायात हाताळला आहे. त्याचा योग्य अर्थ समजून घेऊन अभ्यास करावा.

(३) १५:२२ चा विपर्यास करून आदामामुळे सर्व मानवजात पापी झाली म्हणून ख्रिस्तामुळे सर्व मानवजातीचे तारण सरसकट होईल असा अर्थ लावणे घोडचूक आहे. तारण वैयक्तिकपणे जो विश्वास ठेवील त्याचेच होईल अशी वचनात भरपूर शिकवण आहे (रोम १:१६,१७; ३:२२,२८; ४:५; योहान ५:२४ ; ३:१६; गलती ३:२६-२८; ४:७). विश्वास न ठेवणाऱ्यास दंड होईल असे हे पुस्तक शिकवते (५:२९; १०:२८; २५:४१,४६).

(४) १५:२९ हे वचन मृतांना तारण होण्याची संधी मिळते या मताला पुष्टी देणारे नाही. मेलेल्या व्यक्तीसाठी दुसऱ्या जिवंत व्यक्तीने बाप्तिस्मा घेतल्याने त्या मृत व्यक्तीचे तारण होत नाही, कारण तारण होण्याशी बाप्तिस्म्याचा काहीही संबंध नाही (इफिस २:८). ख्रिस्ताला स्वीकारल्यामुळे विश्वासाचे व साक्षीचे जीवन जगत असल्याचे बाह्यचिन्ह बाप्तिस्मा होय. अशी साक्ष मागे ठेऊन काही विश्वासी लोक प्रभुघरी गेले होते. येथे पौलाचा मुद्दा आहे की येशू पुनरुत्थित झाला आहे म्हणूनच त्यांचे अनुकरण करून महान आशेमुळे कित्येक लोक ख्रिस्ताकडे येत आहेत.

रूपरेषा

(I) प्रस्तावना: पवित्र जनांचे पाचारण व त्यांना होणारे फायदे

(II) मंडळीतील फुटी १:१०-४:२१

(अ) ऐक्याची गरज १:१०-३:२३

(ब) सेवकवृत्तीची गरज ४:१-२१

(III) मंडळीतील अनैतिकता ५:१-६:२०

(IV) मंडळीतील विवाह ७:१-४०

(V) मंडळीतील स्वातंत्र्य ८:१-११:१

(VI) मंडळीतील उपासना ११:२-१४:४०

(अ) मंडळीतील पुरूष व स्त्रियांच्या भूमिका ११:२-१६

(ब) प्रभुभोजन ११:१७-३४

(क) आत्मिक वरदाने १२:१-१४:४०

(VII) मंडळीची आशा : १५:१-५८

(VIII) मंडळीला बोध १६:१-२४

(अ) कारभारीपण १६:१-४

(ब) वैयक्तिक योजना व अभिवादन १६:५-२४

प्रकरण ११

पौलाचे करिंथकरांस दुसरे पत्र

लेखक व काळ

पौलाचे हे करिंथकरांना लिहिलेले दुसरे पत्र. इ. स. ५१ च्या जुलै महिन्यात गल्लियो अखया प्रांताचा नुकताच सुभेदार झाला असता (प्रे कृ १८:१२) पौलाची करिंथात त्याच्यापुढे चौकशी झाली (प्रे कृ १८:१२-१७). मग सुमारे इ. स. ५२ मध्ये त्याने करिंथ सोडले व तो पॅलेस्ताइनला गेला (१८:१८). अशा प्रकारे त्याची दुसरी सुवार्ता फेरी संपली. पुढे सुमारे इ. स. ५२ मध्ये तिसऱ्या सुवार्ता फेरीच्या वेळी तो इफिसात परतला. तेथे त्याने अडीच वर्षे सेवा केली (प्रे कृ १९:८-१०). या काळाच्या अखेरीस इफिसातून त्याने इ. स. ५५ च्या सुमारास पहिले पत्र लिहिले (१ करिंथ १६:८); तर इफिस सोडल्यावर त्याने २ रे पत्र इ.स. ५५-५६ च्या दरम्यान लिहिले असे स्पष्ट होते.

पार्श्वभूमी

करिंथ या व्यापारी नगराशी पौलाचा २ऱ्या फेरीपासून संबंध आला (१८:१-१८). तेथे त्याने त्यांच्यामध्ये दीड वर्षे सेवा केली (प्रे कृ १८:११). नगर सोडल्यावर तेथील मंडळीतील अनैतिकतेबद्दल त्याच्या कानी आले तेव्हा लिहिलेले पत्र (१ करिंथ ५:९) हरवल्यामुळे पापाबद्दल कानउघाडणी करण्यासाठी हे पत्र लिहिले. इफिसात सेवा करत असताना त्यांच्यामधील फुटींविषयीचे वर्तमान त्याच्या कानी आले (१ करिंथ १:११). त्यात करिंथकरांनी पौलाला पत्र लिहिले (१ करिंथ ७:१) व काही बाबतीत स्पष्टीकरण मागितले म्हणून पहिले करिंथ हे पत्र लिहिले. इफिसातील वास्तव्य वाढवून त्याने तीमथ्याला करिंथात पाठवले (१करिंथ ४:१७;१६:१०-११). मग तीमथ्याकडून त्याला अस्वस्थ करून टाकणारी खोट्या संदेष्ट्यांविषयीची बातमी आली (११:१३).
स्वत:ला खोटे शिक्षण देता येण्यास व्यासपीठ तयार करण्यासाठी ते पौलाच्या चारित्र्यावर हल्ले करू लागले. दुरात्म्यांचा सिद्धांत शिकवण्यात यशस्वी होण्यासाठी लोकांना प्रथम पौलाविरुद्ध पटवणे त्यांना गरजेचे होते.
इफिसातील काम तात्पुरते बाजूला ठेऊन पौल लागलीच करिंथास गेला. ही भेट यातनादायी झाली (२:१). कारण ती पौलाच्या मते यशस्वी झाली नाही. करिंथातील कोणाएका व्यक्तीने उघडपणे पौलाचा अपमान केला. बहुधा तो खोटा संदेष्टाच असावा (२:५-८,१०;७:१२). त्याच्या वतीने बोलायला कोणी करिंथकर सचोटीने उभा राहिला नाही; उलट त्याच्याकडून शिफारसी मागू लागले (१:२३). शेवटी ते ताळ्यावर येतील या आशेने पौल इफिसास परतला. तेथून पौलाने ते "गंभीर पत्र " लिहिले (२:४) व तीतासोबत ते करिंथला पाठवले (७:५-१६). मग देमेत्रियच्या ठिणगीमुळे दंगा झाल्यावर इफिस सोडून (प्रे कृ १९:२३-२०:१) पौल तीताला भेटायला त्रोवसास गेला (२:१२-१३). तरी पौलास करिंथकरांनी त्या गंभीर पत्राला कसा प्रतिसाद दिला हे ऐकण्याची उत्कंठा लागली होती.
देवाने दार उघडूनही त्याला तेथे सेवा करता आली नव्हती (२:१२;७:५). म्हणून तीताचा शोध घेत तो मासेदोनीयास गेला. तीताच्या भेटीत त्याला बातमी कळली की बहुतेक करिंथकरांनी पौलाविरुद्ध बंड केल्याबद्दल पश्चात्ताप केला आहे; तेव्हा पौलाला मोठा दिलासा मिळून आनंद झाला (७:७). पण दबलेली बंडखोर वृत्ती केव्हाही स्फोटक बनू शकते ही सुज्ञ जाणीव ठेऊन पौलाने करिंथकरांस बहुधा फिलिपै मधून हे पत्र लिहिले (११:९; फिलिपै ४:१५;). त्यांनी पश्चात्ताप केल्याबद्दल जरी त्याने आनंद व दिलासा व्यक्त केला, तरी तो प्रामुख्याने आपल्या प्रेषितपणाचे समर्थन करतो (१-७ अध्याय). ८ व ९ अध्यायात यरुशलेमातील गरीब मंडळीसाठी दान गोळा करण्याची तयारी करण्यास

त्यांना उत्तेजन देतो. आणि १०-१३ अध्यायात खोट्या शिक्षकाची कानउघाडणी करतो. मग लिहिल्याप्रमाणे तो करिंथला गेला (१२:१४; १३:१,२). त्याची ही तिसरी भेट यशस्वी झाल्याचे दिसते.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानाचे मुद्दे

प्रेषितांची कृत्ये व १ करिंथमध्ये पौलाने करिंथास ज्या प्रकारे हाताळले त्याबद्दल २ रे करिंथ प्रशंसा करते. पौलाचा जीवनक्रमही समोर ठेवते. जरी हे पत्र त्याच्या शिफारसींवरच हल्यांसाठी लिहिले असले तरी ते महत्त्वाच्या भरपूर विषयांवर सिद्धांतांची शिकवण देते. देवपिता दयाळू सांत्वनदाता असल्याचे (१:३;७:६); निर्माणकर्ता असल्याचे (४:६); येशूला मरणातून उठवणारा असल्याचे (४:१४;१३:४); तोच विश्वासीयांना पुनरुत्थित करणार असल्याचे चित्र रंगवते (१:९).

येशू ख्रिस्ताने दु: ख सोसले (१:५); पित्याची अभिवचने त्याने पूर्ण केली (१:२०); त्याला प्रभू म्हणून घोषित केले (४:५); त्याने देवाचे गौरव प्रदर्शित केले (४:६); तो विश्वासी जनांसाठी मानवी देह धारण करून दरिद्री झाला (८:९; फिलिपै २:५-८). हे पत्र पवित्र आत्म्याची देव म्हणून ओळख करून देते (३:१७,१८) आणि तो विश्वासी जनांच्या तारणाचा विसार व हमी असल्याचे सांगते (१:२२; ५:५). सैतानाची ओळख या "युगाचे दैवत "अशी करून देते (४:४;१ योहान ५:१९). तो फसवणूक करणारा आहे (११:१४); लबाड दुरात्मे व मानवांचा तो पुढारी असल्याचे सांगते(११:१५). शेवटच्या काळात विश्वासीयांचे गौरवीकरण (४:१६-५:८) व न्याय (५:१०) याविषयी बोलते. तारणाच्या योजनेतील देवाच्या सार्वभौमत्वाचे गौरवी सत्य हा एक विषय आहे (५:१४-२१); तर ७:९,१० मध्ये देव देऊ करत असलेल्या तारणाला मानवाचा खरा पश्चात्ताप हा प्रतिसाद मांडला आहे. कोणत्याही इतर शास्त्रभागांपेक्षा २ करिंथ ख्रिस्ताचे प्रायश्चित्ताचे बदलीचे मरण अत्यंत स्पष्ट व संक्षिप्त सारांशात सादर करते. (५:२१; यशया ५३). मंडळीतील मिशन कार्याची व्याख्या देताना समेटाची घोषणा करायला सुचवते (५:१८-२०). नव्या कराराचे स्वरूप पूर्ण उलगडून सांगते (३:६-१६).

रूपरेषा

(I) पौलाचे अभिवादन १:१-११

(II) पौलाची सेवा १:१२-७:१६ - त्याच्या योजना; त्याच्या सेवेचे स्वरूप; करिंथकरांना बोध.

(III) पौलाचा निधी ८:१-९:१५ - दान देण्याची पद्धत, दानाचा हेतू, दानाची प्रक्रिया, देण्याचे अभिवचन.

(IV) पौलाचे प्रेषितपण १०:१-१२:१३ - त्याची अधिकृतता, प्रेषिताचे वर्तन, त्याचे दु:खसहन, त्याची शिफारस

(V) पौलाच्या भेटी १२:१४-१३:१४ - पौलाचा नि: स्वार्थीपणा, पौलाचा इशारा, पौलाचा आशीर्वाद.

प्रकरण १२

पौलाचे गलतीकरांस पत्र

लेखक व काळ

गलतीया म्हणजे आताचे आशिया मायनर मधील तुर्कस्थान. तेथे या मंडळया होत्या. एकापेक्षा अधिक मंडळयांचा उल्लेख असलेले केवळ हे एकच पत्र आहे. पौल या पत्राचा लेखक आहे. गलतीयापासून जवळच असलेल्या किलिकिया प्रांतातील तार्स येथला पौल होता. प्रसिद्ध रब्बी गमलीएल याच्या हाताखाली त्याला जुन्या कराराचे व रब्बी परंपरांचे शिक्षण मिळाले (प्रे कृ २२:३). कर्मठ परूशी गटाचा तो सदस्य होता (प्रे कृ२३:६). पहिल्या शतकातील यहूदी मतानुसारींमधला तो एक उगवता तारा होता.

ख्रिस्ती लोकांचा छळ करण्यासाठी यरुशलेमहून दिमिष्काच्या वाटेवर असताना अचानक पौलाला पुनरुत्थित गौरवी ख्रिस्ताचे दर्शन झाले आणि त्याच्या जीवनाला अचानक कलाटणी मिळाली (प्रे कृ ९). त्या नाट्यमय सामन्यानंतर ख्रिस्ती धर्मविश्वासाचा कडवा छळ करणारा पौल त्या विश्वासाचा महान मिशनरी झाला. त्याच्या तीन मिशनरी फेऱ्या व रोमची भेट यामुळे केवळ पॅलेस्ताइन पुरता ख्रिस्ती विश्वासी यहुद्यांचा छोटासा गट न राहाता संपूर्ण साम्राज्यासाठी ती एक अभूतपूर्व घटना ठरली. त्याच्या १३ पत्रांपैकी गलतीकरांस पत्र त्याच्या सहकाऱ्यांना किंवा विदेश्यांच्या मंडळीला उद्देशून लिहिले आहे. पौलाविषयी अधिक माहिती रोमकरांस पत्राच्या प्रस्तावनेत मिळेल. प्रे कृ १५व्या अध्यायातील इ स ४९ मधील यरुशलेमेच्या धर्मसभेच्या बैठकीनंतर लागलेच त्याने हे पत्र लिहिलेले दिसते.

पार्श्वभूमी

गलतीया मधील रहिवासी तिसऱ्या शतकात गॉल म्हणजे सध्याच्या फ्रान्समधून स्थलांतरित झालेले होते. ख्रि. पू. १८९ मध्ये रोमी लोकांनी गलतीया प्रांत हस्तगत केला पण ख्रि पू २५पर्यंत त्यांना काही प्रमाणात स्वातंत्र्य दिले. पौलाने दक्षिण गलतीयात अंत्युखिया, इकुन्या, लुस्त्र व दर्बे येथे मंडळया स्थापल्या. ही नगरे गलतीया प्रांतात मोडत होती. तरी त्यात मूळ गलती मानववंशाचे लोक नव्हते. ती नगरे रोमने गलतीया प्रांतास जोडली होती. उत्तर गलतीया मधील विरळ वस्तीच्या नगरात पौलाने मंडळी स्थापल्याचे दिसत नाही. मूळ कोणाला पत्र लिहिले हे समजत नाही.

प्रेषितांच्या कृत्यात किंवा गलतीकराच्या पत्रात उत्तर नगरांचा उल्लेख करत नसल्याने हे पत्र त्याने दक्षिणेकडील गलतीकरांस लिहिले असा निष्कर्ष निघतो. ज्या मंडळयांचा पौल उल्लेख करतो, त्या यरुशलेम धर्मसभेची बैठक होण्यापूर्वीच पौलाने स्थापल्या होत्या. अंत्युखिया (प्रे कृ १३:१४,१५), इकुन्या (१३:५१-१४:७), लुस्त्र (१४:८-१९), दर्बे (१४:२०-२१), प्रे कृ १६:६ वरून पौल उत्तरेकडील मूळच्या गलतीकरांना धर्मसभेच्या बैठकीपर्यंत नक्कीच भेटला नव्हता.

जे यहुदीय मतानुसारी खोटे शिक्षक विश्वासाने नीतिमान ठरले जाण्याच्या नव्या कराराच्या केंद्रभूत सिद्धांताला कमी लेखत होते, त्यांना तोंड देता यावे म्हणून गलतीकरांना पौलाने हे पत्र लिहिले. यरुशलेमच्या धर्मसभेने तातडीने पाठवलेल्या जाहीरनाम्याकडे दुर्लक्ष करून, त्यांनी अशी खोटी शिकवण पसरवली की विदेश्यांनी प्रथम यहूदी धर्म स्वीकारावा आणि ख्रिस्ती होण्यापूर्वी प्रथम सर्व नियमशास्त्राचे पालन करावे (१:७; ४:१७,२१; ५:२-१२;६:१२,१३). त्या भयंकर पाखंडी मताला गलतीकरांनी उघड कबुली देण्याची तयारी दाखवल्याचे पाहून धक्का बसलेल्या पौलाने

विश्वासाने नीतिमान ठरले जाण्याच्या तत्त्वाचे समर्थन करण्यास व या मंडळ्यांना या अत्यावश्यक सिद्धांताचा धिक्कार केल्यास होणारे परिणाम सांगून इशारा देण्यास हे पत्र लिहिले. या एकाच पत्रात पौलाने वाचकांबाबत प्रशंसोद्गार काढले नाहीत यावरून हेच प्रतिबिंबित होते की त्याने अत्यंत तातडीने, नीतिमान ठरले जाण्याच्या सिद्धांताचे समर्थन करण्यासाठी व ही घोडचूक निदर्शनाला आणून देण्यासाठी घाई केली.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

हे पत्र पौलाची पार्श्वभूमी देते (अध्याय १,२). अरबस्तानातील त्याचे तीन वर्षांचे वास्तव्य (१: १७,१८), प्रेषितांच्या कृत्यात तो उल्लेख नाही; अरबस्तानातील वास्तव्यानंतर पेत्राशी १५ दिवसांची भेट (१:१८,१९), त्याची यरुशलेमच्या धर्मसभेसोबत बैठक (२:१-१०) व त्याने पेत्राची केलेली कानउघाडणी हा (२:११-२१) गलतीकराच्या पत्राचा प्रमुख विषय आहे, विश्वासाने नीतिमान ठरले जाणे. शुभवर्तमानाचे जणु काळीजच असलेल्या ह्या सिद्धांताचे दोन विभागात पौल समर्थन करतो. ईश्वरविज्ञानाच्या दृष्टिकोनातून (अध्याय ३,४); आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून (अध्याय ५,६). तो प्रेषित म्हणून पण आपल्या पदाचे समर्थन करतो (अध्याय १,२). कारण खोटे शिक्षक आपलेच म्हणणे लोकांनी ऐकून घ्यावे म्हणून पौलाच्या पात्रतेला कमी लेखू पाहात होते. नियमशास्त्र नीतिमान ठरवायला असमर्थ आहे हा रोमकरास पत्राचा विषय येथेही हाताळला आहे (२:१६; रोम ३:२०). विश्वासी नियमशास्त्राला मेले आहेत (२:१९; रोम ७:४); विश्वासी व्यक्ती ख्रिस्ताबरोबर वधस्तंभाला खिळलेली आहे (२:२०; रोम ६:६); अब्राहाम विश्वासाने नीतिमान ठरला (३:६,रोम ४:३); विश्वासी जन अब्राहामाचे पुत्र आहेत (३:७, रोम ४:१०,११); म्हणून ते आशीर्वादित आहेत (३:९, रोम ४:२३,२४); नियमशास्त्र तारण नव्हे तर देवाचा क्रोध आणते (३:१०; रोम ४:१५); नीतिमान विश्वासाने वाचेल (३:११, रोम १:१७); पाप विश्वव्यापी आहे (३:२२; रोम ११:३२); आत्मिक दृष्ट्या विश्वासी जनांचा ख्रिस्तात बाप्तिस्मा झाला आहे (३:२७, रोम ६:३); देवाची आत्मिक मुले म्हणून विश्वासी जनांचे दत्तकपण (४:५-७, रोम ८:१४-१७); प्रीती नियमशास्त्र पूर्ण करते (५:१४, रोम १३:८-१०); आत्म्याने चालण्याचे महत्त्व (५:१६, रोम ८:४); देहाचा आत्म्याबरोबर लढा (५:१७, रोम ७: २३,२५) आणि विश्वासी जनांनी परस्परांची ओझी वाहण्याचे महत्त्व (६:२, रोम १५:१) हे सर्व मुद्दे या पत्रात चर्चिले आहेत.

विशेष विचाराचे मुद्दे

(१) २:१-१० पौलाची ही भेट प्रे कृ १५ मधील यरुशलेमच्या धर्मसभेची की प्रे कृ ११:२७-३० ची भेट याविषयी वाद घातला जातो. पण तो ११व्या अध्यायातील भेटीविषयी बोलत नाही कारण तेव्हा तो अधिकृत प्रेषितीय कामाला लागला नव्हता.

(२) ३:२७ वचनाचा विपर्यास करून तारणासाठी बाप्तिस्म्याची गरज आहे असे खोटे शिक्षण दिले जाते. पण येथे पौल बाप्तिस्म्याचे रूपक वापरून विश्वासी व्यक्ती तारणाने आत्मिक रित्या ख्रिस्ताच्या मरणाशी व पुनरुत्थानाशी कशा प्रकारे संयुक्त होते याचे स्पष्टीकरण करत आहे (रोम ६:३-५; १ करिंथ ६:१७). देवपित्याच्या दृष्टीला आपण ख्रिस्ताला परिधान केल्याप्रमाणे दिसतो. व्यावहारिक रीतीने आपल्या वागणुकीतून आपण लोकांसमोर ख्रिस्त दाखवला पाहिजे (रोम १३:१४).

(३) ३:२८ चा विपर्यास करून काही लोक अधिकार व अधीनता याबाबत स्त्री व पुरुषाच्या भूमिकेत गल्लत करतात. देवाने ख्रिस्ती जनांमध्ये वांशिक, सामाजिक, लैंगिक भेद ठेवले आहेत हे येथे नाकारलेले नाही. पण देवापुढे ते आत्मिक बाबतीत असमान आहेत असे येथे अजिबात सूचित केलेले नाही. तसेच मंडळीत, समाजात व कुटुंबात देवाने मस्तकत्वाची व अधीनतेची जी भूमिका लावून दिली आहे तीच प्रत्येकाने निभावायची आहे. येशू स्वत: पित्यासमान आहे तरी देहधारीपणाच्या भूमिकेत तो पित्याच्या पूर्ण अधीन आहे (फिलीपै २:५-८).

(४) ५:४ चा विपर्यास करून काही लोक विश्वासी जन तारण गमवू शकतात असे मत मांडतात. येथे हे स्पष्ट केले आहे की नियमशास्त्राच्या पालनाने नीतिमान ठरण्याचा केलेला कोणताही प्रयत्न म्हणजे केवळ कृपेने व केवळ विश्वासाने तारण होते हे नाकारण्यासारखे आहे. एकदा तारणाच्या कृपेचे सत्य समजल्यानंतर ते ख्रिस्ताकडे पाठ फिरवल्यासारखे आहे (इब्री ६:४-६). आणि नियमशास्त्राने नीतिमान ठरू पाहाणारे ख्रिस्तापासून विभक्त झाले आहेत व तारणातील सर्व आशीर्वाद गमावून बसले आहेत. त्यांनी केलेला हा सुवार्तेचा व ख्रिस्ताचा त्याग हेच दर्शवतो की त्यांचे खऱ्या अर्थाने तारणच झाले नव्हते (१ योहान २:१९; लूक ८:१३,१४).

(५) ६:१६ मधील देवाचे इस्राएल हे अनुवंशिकतेने असलेले यहूदी ख्रिस्ती व अब्राहामाप्रमाणे विश्वासाने नीतिमान ठरलेले विदेशांमधून तारण पावलेले; अशा सर्वांना अब्राहामाच्या संतानात म्हणजे देवाच्या इस्राएल लोकांमध्ये गणले आहे.

रूपरेषा

(I) वैयक्तिक : १:१-२: २१ नीतिमान ठरले जाण्याचे शिक्षण देणारा शिक्षक

(अ) प्रेषिताचा निषेध १:१-९
(ब) प्रेषिताचा अधिकार १-१० -२:१०
(क) प्रेषिताचा दृढ विश्वास २:११-२१

(II) सैद्धांतिक : नीतिमान ठरले जाण्याची तत्त्वे ३:१-४:३१

(अ) गलतीकरांचा अनुभव ३:१-५
(ब) अब्राहामाचे आशीर्वाद ३:६-९
(क) नियमशास्त्राचा शाप ३:१०-१४
(ड) कराराचे अभिवचन ३:१५-१८
(ई) नियमशास्त्राचा हेतू ३:१९-२९
(फ) विश्वासीयांचे पुत्रत्व ४:१- ७
(ग) विधिसंस्कारांची व्यर्थता ४:८-२०
(ह) वचनातून उदाहरण ४:२१-३१

(III) व्यावहारिक : नीतिमान ठरले जाण्यातील सुसंधी ५:१-६:१८

(अ) विधिसंस्कार रुढीपरंपरांपासून सुटका ५:१-६

(ब) कायदेकानूंपासून सुटका ५:७-१२

(क) आत्मिक स्वातंत्र्य ५:१३-२६

(ड) आत्मिक बंधनातून सुटका ६:१-१०

(इ) समारोप ६:११-१८

प्रकरण १३

पौलाचे इफिसकरांस पत्र

लेखक व काळ

इफिस ही रोम प्रांताच्या आशिया मायनरची राजधानी होती. हे पत्र इफिसातून पुढे आशिया मायनरमधील सर्व मंडळयांसाठी फिरते पत्र होते. ते इ.स. ६०-६२ मध्ये रोमच्या तुरुंगातून पौलाने लिहिले होते (प्रे कृ २८:१६-३१). म्हणून त्याला फिलिपै, कलसै व फिलेमोन या पत्रांसोबत नेहमी तुरुंगातील पत्र असे संबोधले जाते. ते तुखिकच्या हस्ते कलसै व फिलेमोन या पत्रांसोबत पाठवण्यात आले (इफिस ६:२१,२२, कलसै ४:७,८).

पार्श्वभूमी

प्रथम प्रिस्किल्ला व अक्विल्ला या दांपत्याकडून इफिसात सुवार्ता आली. हे अनेक वरदाने लाभलेले दांपत्य होते (प्रे कृ १८:२६). पौलाने दुसऱ्या सुवार्ता फेरीच्या वेळी त्यांना तेथे ठेवले होते (प्रे कृ १८:१८,१९). हे नगर एजियन समुद्राच्या पूर्वेला केस्टर नदीच्या मुखाशी वसले होते. अर्तमी किंवा डायना देवीचे जगातील सात आश्चर्यांपैकी हे एक भव्य मंदिर होते. ते महत्त्वाचे राजकीय, शैक्षणिक व व्यापारी केंद्र होते. मिसराचे ॲलेक्झांड्रिया व दक्षिण आशिया मायनर मधील पिसिदियाचे अंत्युखिया या नगरांच्या तोडीचे इफिस शहर होते. प्रिस्किल्ला अक्विल्लाने सुरू केलेली ही नवोदित मंडळी पौलाने तिसऱ्या सुवार्ताफेरीच्या वेळी स्थिर केली (प्रे कृ १९). त्याने तीन वर्षे त्या मंडळीचे मेषपालत्व केले. पौलानंतर तीमथ्याने तेथे सुमारे अडीच वर्षे पाळकपण केले व हुमनाय व अलेक्झांडर या खोटे शिक्षण देणाऱ्या मंडळीतील वडीलपदावर असणाऱ्यांना प्रथम ताकीद दिली. त्यांच्यामुळे इफिसच्या मंडळीला वादग्रस्त कहाण्या व अनंत वंशावळयांचा रोग जडला होता (१ तीम.१:४). विवाहास मना करणे, काही अन्नपदार्थ खाण्यास मनाई करणे अशा वचनबाह्य गोष्टी ते शिकवत होते (१ तीम. ४:३). स्वत:ला वचन नीट समजले नसताना मोठ्या आत्मविश्वासाने ते या चुकीच्या गोष्टी शिकवत होते (१ तीम. १:७). " त्यामुळे विश्वासातली देवासंबंधी रचना न होता वाद मात्र उत्पन्न होत होते" (१ तीम १:४). तीस वर्षांनंतर देवाने प्रेषित योहानाद्वारे या मंडळीला उद्देशून सांगितले की त्यांनी देवावरील पहिली प्रीती सोडली आहे (प्रकटी २:१-७).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

पहिले तीन अध्याय सैद्धांतिक असून नव्या कराराच्या सिद्धांतांवर जोर देतात, तर शेवटचे तीन अध्याय व्यावहारिक असून ख्रिस्ती वर्तनावर प्रकाश टाकतात. सर्वसाधारणत: हे पत्र उत्तेजनपर व बोध करणारे आहे. ख्रिस्तामध्ये प्राप्त होणारे अमर्याद आशीर्वाद ते सांगते; आणि त्या आशीर्वादांसाठी उपकार मानायला लावते; एवढेच नव्हे तर त्या सर्व आशीर्वादांना साजेसे वर्तन करायला लावते. ख्रिस्ताकडून महान आशीर्वाद प्राप्त होऊनही ख्रिस्ती व्यक्तीला सैतानाकडून मोह येतातच व ती आत्मसंतुष्ट, स्वसमाधानी बनते. म्हणूनच ६व्या अध्यायात विश्वासीयांना देवाच्या वचनाद्वारे व त्याच्या आत्म्याद्वारे संपूर्ण शस्त्रसामग्री पुरवली आहे. (६:१०-१७). तर १८ व्या वचनात सतत दक्ष राहून प्रार्थनेत राहण्याची गरज सांगितली आहे.

मंडळीचे रहस्य हा या पत्राचा प्रमुख विषय आहे. म्हणजे यापूर्वी हे सत्य प्रकट केलेले नाही; ते हे की "परराष्ट्रीय ख्रिस्ताच्या ठायी सुवार्तेच्या योगाने वतनबंधू व एकशरीर आणि अभिवचनाचे वाटेकरी आहेत" (३:६). हे रहस्य जुन्या

कराराच्या संतांपासून पूर्णपणे गुप्त ठेवण्यात आले होते (३:५,९). सर्व विश्वासी जन ख्रिस्त जो मशीहा त्याच्याठायी देवपित्यासमोर त्याची मुले म्हणून समसमान आहेत, सार्वकालिक स्वर्गीय राज्याचे नागरिक आहेत, अद्भुत सत्य आहे की या युगाच्या विश्वासी जनांसाठीच हे मंडळीचे सत्य उपलब्ध आहे. मंडळीचे हे रहस्य सांगताना ही ख्रिस्ताची वधू असल्याचे पौल सांगतो (५:३२; प्रकटी २१:९).

दुसरे महत्त्वाचे सत्य जोरदार मांडले आहे की, ख्रिस्ताची जगातील सध्याचे आत्मिक शरीर ही सार्वत्रिक मंडळी लक्षणीय असून देवाच्या लोकांविषयीचे हे सत्यही यापूर्वी प्रकट केले नव्हते. मंडळीचे हे वर्णन म्हणजे ही एक संस्था नसून जिवंत अवयवांची त्यात जडणघडण केलेली असून ते अवयव स्वतंत्रपणे आपापली जबाबदारी पार पाडतात व ते सर्व अवयव परस्परांशी जडलेले असतात. ख्रिस्त त्या शरीराचे मस्तक व पवित्र आत्मा त्या शरीराचे जीवनी रक्त आहे. विविध आत्मिक वरदानांचा वापर प्रत्येक सदस्य सचोटीने करतो. ती वरदाने पवित्र आत्मा आपल्या सार्वभौमत्वाने विलक्षण रीतीने त्याच्या इच्छेनुसार प्रत्येक विश्वासी व्यक्तीला वाटून देतो.

इतर महत्त्वाचे विषय म्हणजे विश्वासीयांना मिळणारी पूर्ण आशीर्वादांची संपत्ती. देवाच्या कृपेची समृद्धी (१:७), ख्रिस्ताची अगाध समृद्धी (३:८), त्याच्या ऐश्वर्याची समृद्धी (३:१६). पौल विश्वासी जनांना बोध करतो की, "देवाच्या सर्व परिपूर्णतेइतके परिपूर्ण व्हा" (३:१९). "देवाच्या पुत्रावरील विश्वासाच्या व तत्संबंधी परिपूर्ण ज्ञानाच्या एकत्वाप्रत, प्रौढ मनुष्यपणाप्रत, ख्रिस्ताची पूर्णता प्राप्त व्हावी " (४:१३), "पवित्र आत्म्याने पूर्ण व्हा" (५:१८). ख्रिस्तामधील संपन्नता त्याच्या कृपेवर आधारित आहे (१:२;६:७;२:७). ही संपन्नता म्हणजे त्याची शांती (१:२), त्याची इच्छा (१:५), त्याचा संतोष व हेतू (१:९), त्याचे गौरव (१:१२,१४), त्याचे पाचारण व वारसत्व (१:१८), त्याचा पराक्रम व बल (१:१९, ६:१०), त्याची प्रीती (२:४), त्याची हस्तकृती (२:१०), त्याचा पवित्र आत्मा (३:१६), त्याचा त्याग व यज्ञ (५:२), त्याची शस्त्रसामुग्री (६:११,१३).

विशेष विचार

वचन २:८ नुसार तारणासाठी विश्वास हे सुद्धा देवाचे दान आहे.

रूपरेषा

(I) अभिवादन. १:१-२

(II) देवाचा मंडळीविषयी हेतू. १:३-३:१३

(अ) युगारंभापूर्वीची पित्याची योजना १:३-६
(ब) ख्रिस्तामध्ये मुक्ती १:६-१०
(क) ख्रिस्तामध्ये वारसत्व व पवित्र आत्म्याचे काम १:११-१४
(ड) ख्रिस्तामधील साधनसंपत्ती १:१५-२३
(इ) ख्रिस्तामधील नवीन जीवन २:१-१०
(फ) ख्रिस्तामधील ऐक्य २:११-३:१३

(III) मंडळीसाठी देवाची पूर्णता. ३:१४-२१

(IV) मंडळीत विश्वासूपणे जगण्याची देवाची योजना. ४:१-६

(V) देवाचा पुत्र मंडळीची बांधणी करतो. ४:७-१६

(VI) मंडळीच्या सदस्यांसाठी देवाची तत्वे व नमुना. ४:१७-३२

(VII) मंडळीतील विश्वासूपणाचा देवाचा दर्जा. ५:१-२१

(VIII) देवाचा अधिकाऱ्यांसाठी दर्जा व मंडळीतील अधीनता. ५:२२-६:९

(अ) पती पत्नी

(ब) आईबाप व मुले

(क) मालक व धनी

(IX) देवाची आपल्या मुलांच्या लढ्यासाठी तरतूद. ६:१०-१७

(X) मंडळीत प्रार्थनेसाठी देवाचे आव्हान. ६:१८-२०

(XI) आशीर्वाद. ६:२१-२४

प्रकरण १४

पौलाचे फिलिपैकरांस पत्र

लेखक व काळ

ज्या ग्रीक नगराचे नाव फिलिपै होते तेथे ही मंडळी होती. मासेदोनियातील ही पहिली मंडळी पौलाने स्थापली. तिला पौलाने रोमच्या पहिल्या तुरुंगवासात इ स ६०-६२ दरम्यान हे पत्र लिहिले. फिलिपै १:१३, १४; ४:२२ वरून ते स्पष्ट होते. जेथे सम्राट राहात होता तेथेच तो तुरुंग होता. तेथे तो सैनिकांच्या नजरकैदेत होता (प्रे कृ २८:१६). त्याला लोक भेटू शकत होते (प्रे कृ २८:३१; इफिस ६:१८-२०; कलसै ४:२-४). तो योग्य न्याय मिळेल अशी खात्री बाळगत होता (१:२५; २:२४; फिलेमोन २२). त्याने ते इफिसातूनही लिहिले नाही कारण तो तेथे तुरुंगात नव्हता.

पार्श्वभूमी

फिलिपैच्या सभोवती भरपूर पाण्याचे झरे होते. जगज्जेता अलेक्झांडरच्या बापाने फिलिपने हे नगर वसवले असल्याने त्याचे नाव या नगराला दिले होते. त्याच्या आजूबाजूस असलेल्या सोन्याच्या खाणींच्या आकर्षणामुळे त्याने हे नगर ख्रि. पू. ४ थ्या शतकात हस्तगत केले होते. ख्रि पू दुसऱ्या शतकात ते मासेदोनियातील रोम प्रांतात गणले गेले होते. ख्रि पू ४२ मधील लढाईत ते रोमी लोकांची वसाहत बनले (प्रे कृ १६:१२). त्यांना रोमी कायदे लागू होते, करातून त्यांना सूट होती व रहिवाशांना रोमी नागरिकत्व लागू होते (प्रे कृ १६:२१). त्यांची बोली भाषा लॅटिन होती. रोमी चालीरीती ते पाळत होते. इटली प्रमाणे त्यांची शासनव्यवस्था होती. हे साम्य तुम्ही प्रे कृ व फिलिपैच्या पुस्तकात पाहू शकता.

स्वर्गीय नागरिकत्वाचे पौलाने केलेले वर्णन यथार्थ आहे (३:२०); कारण फिलिपैकरांना आपण रोमी असल्याचा फार अभिमान वाटायचा (प्रे कृ १६:२१). फिलिपैकरांची राजवाड्यातील सैनिकांशी व कैसराच्या घरच्यांशीही ओळख असावी (४:२२). पौलाच्या दुसऱ्या सुवार्ताफेरीच्या वेळी फिलिपैची ही युरोपातील पहिली मंडळी स्थापण्यात आली (प्रे कृ १६:१२-४०). तेथे अत्यल्प संख्येने यहूदी राहात होते. कारण सभास्थान बांधण्यासाठी लागणारी दहा कुटुंबे किंवा १० कुटुंब प्रमुख पुरुष तेथे नव्हते, म्हणूनच स्त्रिया नदीकाठी प्रार्थनेला जमलेल्या दिसतात (प्रे कृ १६:१३). पौलाने त्यांना सुवार्ता सांगितली आणि जांभळी वस्त्रे विकणारी एक श्रीमंत व्यापारी स्त्री लुदिया ही ख्रिस्ती विश्वासात आली (१६:१४,१५). तिच्या घरातच फिलिपैची पहिली मंडळी प्रथम जमू लागली. लागलीच सैतान एका भविष्य कथन करणाऱ्या भूत लागलेल्या गुलाम मुलीद्वारे कार्यरत झालाच. तिने आपल्याविषयी साक्ष देणे पौलाला योग्य न वाटल्याने त्याने तिच्यातील भूत काढून टाकले व त्यामुळे आपली मिळकत बुडाल्याचे पाहून तिचा मालक संतापला. त्याने पौल व सीला यांना नगराच्या न्यायाधीशापुढे उभे केले. व रोमी परंपरांना आचारण्यास अयोग्य गोष्टी ते शिकवत असल्याचा त्यांच्यावर आरोप करून लोकांना त्यांच्या विरोधात भडकवले. अखेर त्यांना फटके मारून बंदीशाळेत टाकण्यात आले (प्रे कृ १६:१६-२४).

त्याच रात्री भूकंप होऊन चमत्काराने त्यांची बंधने तुटली. त्यामुळे त्या बंदीवासाच्या नायकाचे आत्मिक नेत्र उघडले. त्याने व त्याच्या घराण्याने सुवार्ता ऐकून ख्रिस्ताचा स्वीकार केला (१६:२५-३४). दुसऱ्या दिवशी सुभेदाराच्या लक्षात आले की आपण त्यांना बेकायदा मारहाण केली आहे. तेव्हा त्यांनी त्यांना फिलिपै सोडून जाण्यास सांगितले. तिसऱ्या सुवार्ताफेरीच्या वेळी पौलाने आरंभी व शेवटी अशी दोन वेळा फिलिपैस भेट दिली (२ करिंथ ८:१-५; प्रे कृ २०:६). त्यानंतर ४-५ वर्षांनी रोमच्या कैदेत असता त्या मंडळीचे एक मंडळ त्याला भेटायला आले. त्यांनी पौलाला खूप मदत

केली होती (४:१५,१६). त्याच्या गरजा पुरवल्या होत्या (२ करिंथ ८:१-४). तो तुरुंगात असल्याचे समजल्यावर त्यांनी त्याला आणखी दान पाठवले (४:१०). एपफ्रदीतालाही त्याच्या मदतीला पाठवले. दर्दैवाने तोच तिथे आजारी पडला म्हणून पौलाने त्याला परत फिलिपैला पाठवून दिले (२:२५-२७) व त्याच्यासोबत फिलिपैकरांना हे पत्र पाठवले.

हे पत्र लिहिण्याची कारणे:

१. फिलिपैकरांनी पाठवलेल्या दानाबद्दल त्यांचे आभार मानणे (४:१०-१८).
२. एपफ्रदीतला तो का परत पाठवत आहे हे त्यांना कळवायचे होते. म्हणजे पौलाला त्याची सेवा असमाधानकारक वाटली असा त्यांचा गैरसमज होऊ नये (२:२५,२६).
३. रोममधील त्याची परिस्थिती त्यांना कळवायची होती (१:१२-२६).
४. ऐक्यासाठी त्यांना बोध करायचा होता (२:१,२; ४:२).
५. खोट्या शिक्षकांबद्दल त्यांना इशारा द्यायचा होता (३:१-४:१).
६. ईश्वरविज्ञानाचे व ऐतिहासिक विषय.

या पत्रात पौलाच्या जीवनाची क्षणचित्रे दिसतात. ख्रिस्ताचे नम्र होणे व गौरवीकरण याचे उत्कृष्ट वर्णन आढळते (२: ५-११). ख्रिस्ताविषयी खोल व महत्त्वाची शिकवण आढळते. ख्रिस्ताच्या प्रतिमेचे होणे या आत्मिक वृद्धीवर बोलताना त्याच्या स्वत:च्या जीवनाविषयी त्याची ती तळमळ असल्याचे समजते (३:१२-१४). तुरुंगवासात असूनही संपूर्ण पत्रात आनंदाचे सूर उमटलेले आपण पाहातो (१:४,१८,२५,२६; २:२,१६-१८,२८; ३:१,३; ४:१,४,१०).

रूपरेषा

(I) अभिवादन. १:१-११

(II) पौलाची अवस्था. १:१२-२६

(III) पौलाचा बोध. १:२७-२:१८

(अ) छळातही ठाम राहा.
(ब) नम्रपणे ऐक्य राखा.
(क) ख्रिस्ताचे उदाहरण स्मरणात ठेवा.
(ड) अंधकारमय जगात प्रकाश द्या.

(IV) पौलाची तळमळ. २:१९-३०

(अ) तीमथ्य
(ब) एपफ्रदीत

(V) पौलाचा इशारा. ३:१-४:१

(Vl) पौलाची गंभीर ताकीद. ४:२-९

(Vll) पौलाचे आभारप्रदर्शन. ४:१०-२०

(Vll) पौलाचा निरोप. ४:२१-२३

प्रकरण १५

पौलाचे कलसैकरांस पत्र

लेखक व काळ

कलसै नावाच्या नगरातील मंडळीला पौलाने हे इ स. ६०-६२ दरम्यान पत्र लिहिले. नजीकच्या मंडळयामध्येही वाचायला द्यायचे असल्याने ते फिरते पत्र होते. तेव्हा पौल रोमच्या तुरुंगात होता (४:३,१०, १८). या पत्रात व फिलेमोनाच्या पत्रातील व्यक्तींची नावेही सारखीच असल्याने ही दोन्ही पत्रे एकाच लेखकाने एकाच वेळी लिहिली याला पुष्टी मिळते.

पार्श्वभूमी

कलसै हे आशियातील रोम प्रांतातल्या फ्रुगियामधील नगर होते. प्रकटीकरणातील सात मंडळयांच्या आसपास इफिसच्या पूर्वेला १०० मैलांवर होते. लायकस नदीकाठावरील खोऱ्यात वसले होते. एका बाजूला ८००० फूट उंचीचा कॅडमस डोंगर होता. ख्रि पू ५व्या शतकात पारसच्या साम्राज्यात ते भरभराटीला आले होते. अहेश्वरोश राजाने या नगरातून कूच केले होते. काळी लोकर व रंगासाठी ते प्रसिद्ध होते. ते चारही दिशांना जाणाऱ्या महामार्गावर मोक्याच्या जागी होते. तेथे जरी विदेशी लोकसंख्या अधिक होती, तरी यहुद्यांचीही भरपूर वसाहत होती. त्यामुळे या मंडळीत यहूदी व विदेशी विश्वासीयांचा भरणा होता. म्हणून तेथे यहुद्यांचे कायदेकानूंचे व विदेश्यांच्या गूढवादाचे खोटे शिक्षण शिरले होते. पौलाच्या इफिसातील तीन वर्षांच्या सेवेदरम्यान कलसैची मंडळी सुरू झाली (प्रे कृ १९). तिची स्थापना पौलाने केली नव्हती कारण तो तेथे गेलाच नव्हता. तिची स्थापना एपफ्रासने केली होती (१:५-७;२:१). इफिस भेटीतच एपफ्रास प्रभुकडे आला होता. घरी परतल्यावर त्याने ही मंडळी सुरू केली. तेथे अज्ञेयवादाचे भयंकर धोकादायक खोटे शिक्षण शिरले होते. त्यात देव चांगला आहे आणि जग माया व वाईट आहे असे सांगून येशू हा देवापासून आलेल्यांच्या मालिकेतील एक असून देवापेक्षा कमी प्रतीचा आहे. त्यामुळे तारणासाठी वचनापेक्षाही अधिक प्रकाश देणारे गूढ प्राप्त होण्याची गरज आहे असे ते म्हणत होते आणि ख्रिस्ताचे मानवत्वही नाकारत होते. तसेच कलसैतील पाखंडी लोक, जुन्या करारात दिलेले नियमशास्त्रातील नियम, शब्बाथ, सण व विधिसंस्कारांचे पालन करण्याचाही आग्रह धरत होते. दुतांच्या उपासनेला व गूढ अनुभवांना ते मान्यता देत होते. एपफ्रासला या खोट्या शिक्षणाविषयी इतकी चिंता वाटली की त्याने कलसै ते रोमच्या ज्या तुरुंगात पौल होता तेथवर प्रवास केला (४:१२,१३). तुखिकच्या हस्ते हे पत्र पाठवले (४:७- ९). या खोट्या शिक्षणाबद्दल कानउघाडणी करण्यासाठी हे पत्र लिहिले. तुखिक त्यावेळी अनेसीमला त्याच्या धन्याकडे घेऊन गेला. फिलेमोन कलसैच्या मंडळीचा सभासद होता.

ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

येशूचे देवत्व -१:१५-२०; समेट - १:२०-२३; मुक्ती - १:१३,१४; २:१३,१४; ३:९-११; निवडीचा सिद्धांत - ३:१२; क्षमा -३:१३ आणि मंडळीचे स्वरूप -१:१८,२४,२५; २:१९; ३:११,१५.
अध्याय २ मध्ये पाखंडी शिक्षणाचा धिक्कार केला आहे.

१. वचन ३:१५ मधील 'प्रथम जन्मलेला ' याचा अर्थ - उच्च हुद्द्यावरचा. कारण -

(I) ख्रिस्त ' प्रथम जन्मलेला' आणि 'एकुलता एक ' असा दोन्ही एकाच वेळी असू शकत नाही.
(II) प्रथम जन्मलेला अनेकांमधला पहिला असतो. पण येथे निर्मिती हा शब्द एकवचनी वापरला आहे. त्यामुळे हा अर्थ लागू पडत नाही.
(III) पौलच ख्रिस्ताला निर्मिती म्हणू लागला तर तोच पाखंडी ठरेल.
(IV) येशू एकाच वेळी निर्मिती आणि निर्माता असू शकत नाही. येथे असा अर्थ आहे की ख्रिस्त आदी असल्याने संपूर्ण निर्मितीवर त्याचे हक्काचे वारसत्व आहे (इब्री १:२;प्रकटी ५:१-७,१३). तो निर्मितीपूर्वी अस्तित्वात आहे आणि अत्युच्च स्थानी आहे.

रूपरेषा

(I) वैयक्तिक : १-१-१४ ; पौलाचे अभिवादन; आभार ; प्रार्थना

(II) सैद्धांतिक सूचना. १:१५-२:१३
ख्रिस्ताच्या देवत्वाविषयी; पौलाच्या सेवेविषयी; खोट्या तत्वज्ञानाविषयी.

(III) व्यावहारिक बोध. ३:१-४:१८
ख्रिस्ती वर्तन, ख्रिस्ती कुटुंब; ख्रिस्ती बोलणे, ख्रिस्ती मित्र.

गौरवी ख्रिस्त

“आम्ही स्वत: कोणतीही गोष्ट आपण होऊनच ठरवण्यास समर्थ आहोत असे नव्हे, तर आमच्या अंगची पात्रता देवाकडून आलेली आहे” २ करिंथ ३:५.

आपल्याला सर्व त्याच्यापासून पुरेसे प्राप्त होते, हे या वचनाचे एक महत्त्वाचे सत्य आहे. या वचनाचा दावा आहे की जीवनाच्या सर्व बाबींसाठी व देवभीरूतेसाठी ख्रिस्त पूर्णपणे पुरेसा आहे (२ पेत्र १:३,४). तो निर्मितीसाठी (कलसै १:१६,१७), तारणासाठी (इब्री १०:१०-१२), पवित्रीकरणासाठी (इफिस ५:२६-२७) व गौरवीकरणासाठी पुरेसा आहे (रोम ८:३०). तो इतका परिपूर्ण आहे की त्याच्याठायी मुळीच दोष, डाग, पापाचा कलंक, अशुद्धता, लबाडी, फसवणूक, भ्रष्टता, चूक किंवा अपूर्णता नाही (१ पेत्र १:१८-२०). तो इतका पूर्ण आहे की त्याच्या तोडीचा कोणी देवच नाही (यशया ४५:५). तो एकुलता एक पुत्र आहे (योहान १:१४-१८). त्याच्या ठायी ज्ञानाचे व बुद्धीचे सर्व ठेवे आहेत (कलसै २:३). देवत्वाची सर्व पूर्णता त्याच्या ठायी वसते (कलसै २:९). तो सर्व गोष्टींचा वारीस आहे (इब्री १:२). त्याने सर्व काही निर्माण केले व सर्व काही त्याच्यामध्ये, त्याच्याद्वारे व त्याच्यासाठी उत्पन्न झाले (कलसै १:१६). त्याच्यामध्ये सर्व काही अस्तित्वात आहे (कलसै १:१७; इब्री १:३). तो देवाचे तंतोतंत प्रतिरूप आहे (इब्री १:३). देव व मानव यामध्ये तो एकच मध्यस्थ आहे. तो प्रकाश देणारा सूर्य आहे, आरोग्य देणारा वैद्य आहे, अग्निचा संरक्षक कोट आहे, सांत्वनदाता मित्र आहे, संपन्न करणारा मोती आहे, आधार देणारे तारू आहे, प्रचंड दबावाखाली असताना बल देणारा खडक आहे. तो वैभवी पित्याच्या उजवीकडे बसला आहे (इब्री १:३;८:१). तो

देवदूतांहून श्रेष्ठ आहे (इब्री १:४-१४). मोशेपेक्षा, अहरोनापेक्षा, यहोशवा, मल्कीसदेकापेक्षा सर्व संदेष्ट्यांपेक्षा श्रेष्ठ आहे. सैतानापेक्षा महान आहे तर मरणापेक्षा बलवान आहे (१ करिंथ १५:५५). त्याला आरंभ नाही, शेवट नाही, तो देवाचा निष्कलंक कोकरा आहे. तो आपली शांती (इफिस २:१४), आशा (१ तीम १:१), आपला सत्य, जिवंत मार्ग (योहान १४:६), इस्राएलाचे बल (१ शमुवेल १५:२९), दाविदाचा अंकुर व संतान, प्रभाततारा, विश्वासू व सत्य, आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा (इब्री १२:१,२), आपल्या तारणाचा कप्तान (इब्री २:१०). तो अजिंक्य व निवडलेला (यशया ४२:१), तो आपण पत्करलेल्या मार्गाचा प्रमुख याजक व प्रेषित आहे (इब्री ३:१), तो धर्मशील सेवक आहे (यशया ५३:११). तो सेनाधीश प्रभू, मुक्तिदाता, इस्राएलाचा पवित्र तो, संपूर्ण पृथ्वीचा देव (यशया ५४:५). तो क्लेशांनी व्यापलेला (यशया ५३:३), प्रकाश, मनुष्याचा पुत्र, द्राक्षवेल, जीवनाचे दार जीवनाची भाकर व तो माझा देव व माझा प्रभू आहे. तो संदेष्टा, याजक व राजा आहे. तो आमचा शब्बाथाचा विसावा आहे (इब्री ४:९). आमची नीतिमत्ता आहे. तो अद्भुत मंत्री, समर्थ देव, सनातन पिता, शांतीचा अधिपती आहे (यशया ९:६). तो आमचा मुख्य मेंढपाळ आहे. तो सैन्यांचा देव, राष्ट्रांचा देव, यहुदाचा सिंह, जिवंत शब्द, तारणाचा खडक, सार्वकालिक आत्मा, पुराणपुरुष, निर्माता व सांत्वनदाता, मशीहा व थोर "मी आहे " आहे.

प्रकरण १६

थेस्सलनीकाकरांस पहिले पत्र

लेखक व काळ

हे मंडळीशी संपर्क साधणारे थेस्सलनीकाच्या मंडळीला पौलाने लिहिलेले पहिले धर्मशास्त्रसंमत पत्र. या मंडळीची स्थापना झाली तेव्हा दुसऱ्या सुवार्ता फेरीत तीमथ्य व सीला हे त्याचे सोबती होते (३:२,६ प्रे कृ १७:१-९). आम्ही, आपण असे शब्द त्यांचा पौलाला असलेला पाठिंबा दर्शवतात. पौलच या पत्राचा अधिकृत लेखक आहे. या मंडळीशी पौलाची जवळीक असल्याचे खूप तपशील सापडतात. हे पहिले पत्र इ स ५१ मध्ये लिहिले.

पार्श्वभूमी

थेस्सलनीका हे आताचे सलोनीका. एजियन समुद्राच्या उत्तर भागात आहे. ख्रि पू १६८ मध्ये हे नगर मासेदोनीयाची राजधानी झाले. ते "स्वायत्त नगर " असून त्यांच्या नागरिकांची तेथे रोम साम्राज्याच्या अधिकाराखाली शासन व्यवस्था होती (प्रे कृ १७:६). ते पूर्व पश्चिम महामार्गावर वसले असल्याने मासेदोनीयाच्या व्यापारी व राजकीय कारभाराच्या दृष्टीने त्या नगराला महत्त्व प्राप्त झाले होते व तिला "मासेदोनीयाची माता" असे संबोधले जात होते.

पौलाच्या काळात तेथील लोकसंख्या दोन लाख होती. इ स ५० मध्ये पौल दुसऱ्या सुवार्ताफेरीच्या वेळी फिलिपैवरून अंफिपोलीस मार्गे अपोल्लोनीयाहून थेस्सलनीकास आला (प्रे कृ १६:१-१८:२२). त्याच्या पद्धतीप्रमाणे त्याने सभास्थानाचा शोध घेतला व स्थानिक यहुद्यांना सुवार्ता सांगितली. ख्रिस्त हा वचनाप्रमाणे येणारा खरा मशीहा असल्याचे पटवून देण्यासाठी जुन्या करारातून ख्रिस्ताचे मरण व पुनरुत्थानाचे पुरावे देऊन त्याने त्या यहुद्यांशी संवाद साधला. कित्येक यहूदी व भक्तिमान हेल्लेणी लोकांचा मोठा समुदाय व बऱ्याच श्रेष्ठ स्त्रियांचे परिवर्तन झाले. त्यात यासोन, गायस, अरिस्तार्ख व सकूंद हे नवीन विश्वासी होते. त्यांची सेवा इतकी प्रभावी झाली की यहुद्यांनी पौलावर व त्याच्या गटावर कारवाई करून त्यांना नगराबाहेर घालवून दिले. म्हणून ते दक्षिणेकडे बिरूयास गेले. तेथेही पौलाला तसाच अनुभव आला. लोकांचे परिवर्तन झाले की विरोध आलाच. त्यामुळे पौलाला विश्वासी जनांनी तेथूनही पाठवून दिले. तीमथ्य व सीला बिरूयात राहिले आणि पौल अथेन्सला निघाला. पुढे ते पौलाला अथेन्समध्ये येऊन मिळाले (१७:१-१६ ; १ थेस्स ३:१,२). मग तीमथ्याला थेस्सलनीकाला पाठवले. मग सीला अथेन्सहून फिलिपैला गेला तर पौल एकटाच करिंथला गेला (प्रे कृ १८:१). मग तीमथ्य व सीला पौलाला करिंथला येऊन मिळाले (१८:५). तीमथ्याने मंडळीविषयी दिलेल्या उत्तम अहवालाबद्दल त्याने १ थेस्सलनी हे पत्र लिहिले.

हे पत्र लिहिण्याची अनेक कारणे होती. ज्या कळपाला तो सोडून आला होता, त्याच्याविषयीच्या चिंतेत ती कारणे सापडतात. त्याचे काही उद्देश स्पष्ट दिसतात.

(१) मंडळीला उत्तेजन देणे (१:२-१०).
(२) खोट्या आरोपांचे खंडन करणे (२:१-१२).
(३) छळातून जाणाऱ्या कळपाचे सांत्वन करणे (२:१३-१६).
(४) त्यांच्या विश्वासाबद्दल त्याला वाटणारा आनंद व्यक्त करणे (२:१७-३:१३).

(५) नैतिक शुद्धतेच्या महत्त्वाचे त्यांना स्मरण करून देणे (४:१-८).
(६) सुस्त जीवनशैलीविषयी त्यांना दोष देणे (४:९-१२).
(७) भविष्यात घडणाऱ्या घटनांविषयी चुकीचे समज (४:१३-५:११).
(८) कळपात अंतर्गत कलह टाळणे (५:१२-१५).
(९) मूलभूत ख्रिस्ती जीवनशैलीसाठी या कळपाला बोध करणे (५:१६-२२).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

ह्या दोन्ही पत्रांना "शेवटल्या काळाविषयीची पत्रे" असे संबोधतात. तरी ती मोठ्या प्रमाणात मंडळीवर लक्ष केंद्रित करत असल्याने त्यांना मंडळीची पत्रे संबोधणे अधिक योग्य ठरेल. पाच महत्त्वाच्या मुद्द्यांची गुंफण या पत्रात केली असल्याचे आढळते.
(१) प्रेषितांची कृत्ये व १ थेस्सलनीतील ऐतिहासिक संबंधाची ख्रिस्ती धर्मविश्वासाशी सांगड घातली आहे.
(२) सुदृढपणे वाढलेल्या ख्रिस्ती महामंडळीचे चित्रण केले आहे.
(३) पाळकाचा विषय मेंढपाळाचे उदाहरण घेऊन त्यांची कामे व मनोवृत्ती कशी असावी ते दाखवून हाताळला आहे.
(४) शेवटल्या काळाचा विषय हाताळताना मंडळीच्या महान आशेवर प्रकाश टाकला आहे.
(५) सुवार्तेची घोषणा व मंडळीरोपणावर जोर देऊन मिशनकार्याचे शिक्षण दिले आहे.

(१) देवाचा क्रोध - १:१०, ५:९
(२) ख्रिस्ताचे पुनरागमन - २:१९;३:१३;४:१५;५:२३
(३) मंडळीचे लोकांतरण - ४:१३-१८
(४) प्रभूचा दिवस याचा अर्थ व समय - (५:१-११). हे विषय महत्वाचे आहेत.

रूपरेषा

(I) अभिवादन १:१

(II) पौलाचे वैयक्तिक विचार १:२-३:१३

(अ) मंडळीसाठी आभार १:२-१०
(ब) मंडळीला आठवणी करून देणे २:१-१६
(क) मंडळीविषयी चिंता २:१७-३:१३

(III) पौलाच्या व्यावहारिक सूचना ४:१-५:२२

(अ) नैतिक शुद्धतेविषयी ४:१-८
(ब) शिस्तबद्ध जीवनाविषयी ४:९-१२
(क) मरण व पुनरुत्थान ४:१३-१८
(ड) पवित्रीकरणाचे जीवन व प्रभूचा दिवस ५:१-११
(इ) मंडळीतील परस्परसंबंध ५: १२-१५
(फ) मूलभूत ख्रिस्ती जीवनाची शिकवण ५:१६-२२

(IV) पौलाचा आशीर्वाद ५:२३,२४

(V) पौलाचा शेवटचा बोध ५:२५-२८

प्रकरण १७

थेस्सलनीकाकरांस दुसरे पत्र

लेखक व काळ

थेस्सलनीच्या विश्वासी जनांशी सहभागिता साधण्यास पौलाने त्यांना हे दुसरे पत्र लिहिले. सीला व तीमथ्याचाही मंडळी स्थापण्यात पौलाबरोबर सहभाग होता. हे पत्र लिहिताना ते तेथे हजर होते पण पत्राची शब्दरचना, सैद्धांतिक आशय व भाषाशैली ते एकट्या पौलाने लिहिले यालाच पुष्टी देतात. पौल करिंथात सीला व तीमथ्यासोबत असताना व पहिले पत्र लिहून काही महिने लोटताच इ. स. ५१-५२ च्या दरम्यान हे पत्र लिहिले (प्रे कृ १८:५).

पार्श्वभूमी

पहिले पत्र घेऊन जाणाऱ्याकडून पौलाला मिळालेल्या मंडळीच्या हालहवालावरून त्यांची आत्मिक वृद्धी होत होती व विस्तारही होत होता (१:३), पण दबाव व छळही वाढत होता. प्रभूविषयी खोट्या शिक्षणाचे बीज पेरले गेले होते, लोक बेशिस्तपणे वर्तन करत होते. म्हणून पौल आपल्या प्रिय कळपाला लिहीत आहे.

(१) ते छळामुळे निराश झाले होते व ते राखले जावेत म्हणून त्यांना प्रोत्साहनाची गरज होती.

(२) जे खोटे शिक्षक त्यांना प्रभूच्या द्वितीयागमनाविषयी भ्रमात पाडत होते त्यांच्याकडून त्यांची फसवणूक होत होती.

(३) दैवी आज्ञा पाळत नव्हते; विशेषत: काम करण्यास ते नकार देत होते. हे तीन विषय हाताळताना

(१) तो छळातून जाणाऱ्या विश्वासी जनांना सांत्वन देतो (१:३-१२).

(२) खोट्या शिकवणीमुळे घाबरलेल्यांची सुधारणुक करतो (२:१-१५). आणि

(३) अवज्ञा करणाऱ्या व बेशिस्त विश्वासी जनांची कानउघाडणी करतो (३:६-१५).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

पहिल्या दोन अध्यायात भविष्यांचा विषय हाताळला आहे कारण प्रभूच्या आगमनाच्या दिवसाविषयी खोटे शिक्षक गैरसमजुती पसरवत होते. (पौल उलगडा करतो की प्रभूचा दिवस येऊन गेला नाही व इतर काही घटना घडल्याशिवाय येणारही नाही.) तरीही हे पाळकीय पत्र म्हणणेच उचित ठरते. कारण मंडळीचे आरोग्य अथवा सुदृढता कशी राखावी, प्रभावी साक्ष कशी द्यावी, सखोल व सत्य भावी घटनांच्या भाकितांना प्रतिसाद कसा द्यावा व सत्याचे पालन कसे करावे यावर तो जोर देतो. ईश्वरविज्ञानाच्या विषयात शेवटच्या काळाविषयीच्या शिकवणीचे वर्चस्व आढळते (१;९). हे अत्यंत स्पष्ट विधान आहे (३:६-१५). मध्ये मंडळीतील शिस्तीवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यावर मत्तय १८:१५-२०; १ करिंथ ५:१-१३; गलती ६:१-५ व १ तीमथ्य५:१९,२० ही वचने विचारात घेऊन मनन केले पाहिजे.

रूपरेषा

(I) पौलाचे अभिवादन. १:१,२

(II) संकटांबद्दल पौलाकडून सांत्वन. १:३-१२

(अ) उत्तेजन देऊन - १:३,४

(ब) बोध करून -१:५-१२

(III) भाकितांविषयीच्या चुकीची दुरुस्ती. २:१-१७

(IV) पौलाची मंडळीविषयीची काळजी. ३:१-१५

(V) आशीर्वाद. ३:१६-१८

प्रकरण १८

तीमथ्याला पहिले पत्र

लेखक व काळ

विश्वासपुत्र तीमथ्याला लिहिलेल्या दोन ईश्वरप्रेरित पत्रातील हे पहिले पत्र. तीमथ्याच्या नावाचा अर्थ 'देवाचा आदर करणारा.' त्याची आई युनिके व त्याची आजी लोईस या धार्मिक यहूदी स्त्रिया प्रभू येशू ख्रिस्तावरील विश्वासात आल्या होत्या (२ तीम १:५). जुन्या कराराचे शिक्षण त्यांच्याकडून लहानपणापासून त्याला मिळाले होते. त्याचे वडील हेल्लेणी होते. पौल व तीमथ्याची भेट होईपर्यंत त्यांचे निधन झाले असेल. रोमी साम्राज्यात आधुनिक तुर्कस्थानातील गलतीया नगरातील लुस्त्र गावचा तो होता. पौलाने पहिल्या सुवार्तफेरीच्या वेळी लुस्त्रात असताना त्याला ख्रिस्ताकडे आणले होते यात वादच नाही (प्रे कृ १४:६-२३; १ करिंथ ४:१७; २ तीम १:२; १ तीम १:२,१८). जेव्हा दुसऱ्या सुवार्तफेरीच्या वेळी त्याने लुस्त्राला पुन्हा भेट दिली तेव्हा पौलाने आपला सोबती म्हणून त्याची निवड केली (प्रे कृ १६:१-३). तेव्हा तीमथ्य खूप लहान म्हणजे १५-२० दरम्यान त्याचे वय असेल. पुढे सुमारे १५ वर्षांनी पौल त्याला तरुण संबोधतो (४:१२). देवभीरू म्हणून त्याची ख्याती होती (प्रे कृ १६:२). पुढे आयुष्यभर बिरुयात सेवा करत तो पौलाचा शिष्य, मित्र व सोबतीचा सहकारी असा राहिला (प्रे कृ १७:१४). अथेन्स (प्रे कृ १७:१५); करिंथ (प्रे कृ १८:५;२ करिंथ १:१९) आणि यरुशलेम फेरीत (प्रे कृ २०:४) त्याने पौलाला सोबत दिली. रोममधील पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी तो पौलाबरोबर होता व पौलाच्या सुटकेनंतर फिलिपैला गेला (२:१९-२३). पौल सातत्याने अनेक पत्रांमधून त्याचा उल्लेख करतो. आपला प्रतिनिधी म्हणून पौल तीमथ्याला मंडळ्यांना भेट देण्यास सातत्याने पाठवत असे. हे पहिले पत्र त्याला आणखी एक काम सोपवत आहे. ते म्हणजे इफिसच्या मंडळीत पाळकीय सेवा करायची (१:३). इब्री १३:२३ वरून त्याला कोठेतरी अटक झाली व मग सुटकाही झाली.

लक्षात ठेवा:

(१) तीमथ्य व तीताला लिहिलेल्या पाळकीय पत्रांमधील घटना प्रेषितांच्या कृत्यातील घटनाक्रमांशी जुळत नाहीत कारण प्रेषितांच्या कृत्याच्या पुस्तकाचा समारोप पौलाच्या रोममधील पहिल्या तुरुंगवासाने होतो.
(२) जरी दुसऱ्या शतकातील अज्ञेयवाद व या पाळकीय पत्रातील पाखंडात साम्य वाटत असले तरी महत्त्वाचे भेदही आहेत. दुसऱ्या शतकासारखा अज्ञेयवाद पाळकीय पत्रांच्या काळात नव्हता, पण खोटे शिक्षक होते (१:३-७). आणि त्यांची शिकवण यहूदी कायदेकानूंवर आधारित होती (१:७; तीत १:१०,१४; ३:९).
(३) पाळकीय पत्रांमध्ये मंडळीला जी व्यवस्था लावून दिलेली दिसते, ती पौलाने संस्थापित केलेल्या व्यवस्थेशी सदृश आहे (प्रे कृ १४:२३, फिलिपै १:१).
(४) पौलाचे सिद्धांत पाळकीय पत्रात केंद्रस्थानी दिसतात. सर्व शास्त्रलेख ईश्वरप्रेरित आहेत (२ तीमथ्य३:१५-१७); निवडीचा सिद्धांत (२ तीम १:९; तीत १:१,२); तारण (तीत ३:५-७); ख्रिस्ताचे देवत्त्व (तीत २:१३); ख्रिस्ताची मध्यस्थाची सेवा (२:५); ख्रिस्ताने बदलीच्या मरणाने केलेले प्रायश्चित्त (२:६).
(५) ही पाळकीय पत्रे असल्याने इतर पत्रांपेक्षा निराळी भाषा वापरणे त्याला गरजेचे होते.

पौलाऐवजी कोणा धार्मिक व्यक्तीने ही पत्रे लिहिली असे कोणी भाष्य केले तर ते योग्य ठरू शकत नाही. कारण
(१) आरंभीची मंडळी असले लिखाण मान्य करत नव्हती. असे खरोखर घडले असते तर अशा लबाडीचा त्यांनी उघड पडदाफाश केला असता (२ थेस्सलनी२:१,२; ३:१७).
(२) या पत्रांमधील आशय एकच आहे वेगळा नाही.
(३) दुसरा कोणी पौलाचे शब्द कसा लिहील (१:१३,१५)?
(४) स्वत: फसवा असणारा दुसरा कोणी फसवणाऱ्यांना इशारा देणारे शब्द कसा लिहील (२ तीमथ्य३:१३; तीत १:१०)?

रोममधील पहिल्या तुरुंगवासातून सुटका होताच इ स ६२-६४ च्या दरम्यान त्याने १ तीमथ्य व तीताला पत्र लिहिले असे पुरावे स्पष्ट सापडतात. तसेच २ तीमथ्य रोमच्या दुसऱ्या तुरुंगवासात असताना इ स ६६-६७ दरम्यान अगदी मृत्युपूर्वी लिहिलेले दिसते.

पार्श्वभूमी

रोमच्या पहिल्या तुरुंगवासातून सुटताच पौलाने यापूर्वी जेथे सेवा केली होती त्या नगरांना व इफिसलाही भेट दिली. इफिसच्या मंडळीत उद्भवलेल्या खोट्या शिक्षणासारख्या व इतर समस्या सोडवण्यासाठी तीमथ्याला तेथे ठेवले (१:३-७;४:१-३;६:३-५). भक्तीत अव्यवस्था होती (२:१५); गुणवत्तापात्र पुढाऱ्यांची गरज होती (३:१-१४); जगिकता होती (६:६-१९). पौल पुढे मासेदोनीयास गेला व तेथून मंडळीतील वरील कामांची अंमलबजावणी करण्यासाठी मदत करण्याकरता त्याने हे पत्र लिहिले (३:१४,१५).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

१ तीमथ्य मध्ये पौल तीमथ्याला पाळकासाठी आवश्यक अशा व्यावहारिक सूचना देतो (३:१४,१५). पौलाच्या सैद्धांतिक शिक्षणात तीमथ्य पारंगत असल्याने त्याबाबत त्याला सूचना देण्याची गरज नव्हती. तरीही या पत्रात पुष्कळ महत्त्वाची सैद्धांतिक सत्ये आढळतात - नियमांची योग्य कार्यवाही (१:५-११); तारण (१:१४-१६;२:४-६); देवाचे गुणविशेष (१:१७); पतन (२:१३,१४); ख्रिस्ताचे व्यक्तित्व (३:१६;६:१५,१६); निवड (६:१२); ख्रिस्ताचे द्वितीयागमन (६:१४,१५).

विशेष विचार

(१) वचन १:३ - अन्य शिक्षण याचा मूळ भाषेत अर्थ ‘दुसऱ्या प्रकारची शिकवण देणे.’ प्रेषितांच्या शिकवणीशिवाय दुसरी शिकवण खोटे शिक्षक देत होते (६:३,४; प्रे कृ २:४२; गलती १:६,७) ही शिकवण तारणाच्या सुवार्तेची होती. म्हणजे ते धन्यवादित देवाची गौरवी सुवार्ता सांगत नव्हते (१:११).

(२) अनंत वंशावळया (१:४). म्हणजे यहूदीवादातील आख्यायिका व कल्पनाविलासाच्या कथा (१:७; तीत १:१४), रूपके व जुन्या करारातील वंशावळयांच्या बनावट, विपर्यास करून सांगितलेल्या गोष्टी. ते दुरात्म्यांचे सिद्धांत होते (४:१). त्यात देवाच्या सत्यांची खोटी भूमिका वठवलेली असे.

(३) त्यांस मी सैतानाच्या स्वाधीन केले आहे (१:२०). मंडळीतील खोट्या शिक्षकांचा प्रभाव थांबवण्यासाठी त्यांना देवाच्या लोकांच्या संरक्षणापासून विभक्त केले. त्यामुळे ते देवाच्या आशीर्वादित वातावरणात नव्हते तर सैतानाच्या नियंत्रणाखाली होते. देवाने असे होऊ देण्यामागे हेतू हा होता की त्यांना खऱ्या अर्थाने तारणाच्या विश्वासाचा उलगडा व्हावा, त्यांनी नम्रतेने देवावर अवलंबून राहावे, इतरांना बलवान बनवावे व देवाला स्तुती अर्पावी (लूक २२: ३१-३३; २ करिंथ १२:१-१०; ईयोब १:१-२२; प्रकटी ७:९-१५; मत्तय ४:१-११). काहींना देव न्यायासाठीही सैतानाच्या हवाली करतो; उदा. शौलराजा (१ शमुवेल १६:१२-१६;२८:४-२०); यहूदा (योहान १३:२७); करिंथातील मंडळीचा सभासद (१ करिंथ ५:१-५).

(४) स्त्रियाच्या भूमिकेविषयी शिकवण - (२:९-१५). मंडळीतील स्त्रिया अशुद्ध व स्वकेंद्रित जीवन जगत होत्या (५:६; ११-१५; २ तीम ३:६). आराधनेतही त्यांच्या वर्तनाने अडथळा होत होता. तीमथ्याने ही समस्या सोडवायची होती. त्यांनी व्यवस्थित वेशभूषा व केशभूषा करायची होती. देवाचा अपमान होणारे कोणतेही वर्तन करायचे नव्हते. आपल्या शरीर वासनांवर नियंत्रण ठेवायचे होते. मौल्यवान दागिन्यांनी त्यांचे प्रभुवर लक्ष केंद्रित न होता स्वत:वरच होत असे. गरीब स्त्रियांना त्यांच्याकडे पाहून हेवा वाटत असे. आपल्या संपत्तीचे प्रदर्शन करून त्यांनी प्रभूच्या उपासनेपासून लोकांचे लक्ष विचलित करायचे नव्हते तर नीतीने वागायचे होते. मंडळीत स्त्रियांनी शिक्षण घ्यायचे होते. यहूदी नव्हे तर ग्रीक संस्कृतीत स्त्रियांना दुय्यम दर्जा असल्याने त्यांना ख्रिस्ती झाल्यामुळे मिळालेल्या स्वातंत्र्याचा मंडळीत त्या गैरवापर करू लागल्या. स्त्रियांनी अधीनतेने स्वस्थचित्ताने शिकायचे होते. म्हणजे मंडळीला शिकवायचे नाही व पाळक, वडील यांच्या अधीन राहायचे होते. परवानगी देत नाही म्हणजे कोणीही आपल्या मनाला येईल तसे वागू देणार नाही. २:१२ मध्ये पाळकाची व त्याच्या शिकवण्याची भूमिका स्त्रीने आपल्या हाती घ्यायची नाही. कोणत्याही प्रकारे पुरुषांचा अधिकार स्त्रियांनी मंडळीत गाजवायचा नाही. स्त्रीची सोबत राहून मदत देण्याची भूमिका देवाने उत्पत्तीत आरंभापासूनच लावून दिली (२:१३); तिने पतीच्या नेतृत्वाखाली व संरक्षणाखाली राहायचे आहे.२:१५ मध्ये 'तिचे तारण होईल,' संदर्भ लक्षात घेऊन राखणे, बरे करणे, मुक्त करणे. मुले प्रसवण्याने तिचे सर्वकालासाठी तारण होईल असे नाही. ते नव्या कराराच्या शिकवणीशी सुसंगत नाही, कारण तारण केवळ कृपेने, विश्वासाने ख्रिस्ताद्वारेच होते (रोम ३:१९,२०) व ते अखेरपर्यंत राखले जातात (रोम ८: ३१-३९). येथे शिकवण आहे की एका स्त्रीने मानवजातीला पापात पाडले आता स्त्रीच देवभीरू मुले वाढवून तो कलंक पुसू शकते. स्त्रीचे मुलांशी घनिष्ठ नाते असते व तिच्या प्रभावाने त्यांच्या जीवनात जबाबदारपणे हे काम करण्याची तिला महान संधी असते. बापापेक्षा तीच मुलांसोबत जास्त वेळ घालवते.

रूपरेषा

(I) अभिवादन १:१,२

(II) खोट्या शिक्षणाविषयी सूचना. १:३-२०

(अ) इफिसचे खोटे शिक्षण. १:३-११
(ब) पौलाचा खरा सिद्धांत. १२-१७
(क) तीमथ्याला बोध. १८-२०

(III) मंडळीसंबंधात सूचना. २:१-३:१६

(अ) प्रार्थनेचे महत्त्व.२:१-८

(ब) स्त्रीची भूमिका. ९-१५

(क) पुढाऱ्यांची गुणवत्ता. ३:१-१३

(ड) पौलाच्या पत्राचे कारण. ३:१४-१६

(IV) खोट्या शिक्षकांविषयी सूचना

(अ) खोट्या शिक्षकांचे वर्णन. ४:१-५;

(ब) खऱ्या शिक्षकांचे वर्णन. ६-१६

(V) पाळकीय जबाबदारीविषयी सूचना. ५:१-६:२

(अ) पापात असणाऱ्या सदस्याविषयीची जबाबदारी. ५:१-२

(ब) विधवांची जबाबदारी. ३-१६

(क) वडिलांची जबाबदारी. १७-२५

(ड) गुलामांची जबाबदारी. ६:१,२

(VI) देवाच्या माणसासंबंधी जबाबदारी. ६:३-२१

(अ) खोटे शिक्षक. ६:३-५

(ब) संपत्तीवर प्रेम. ६-१०

(क) देवाच्या माणसाची योग्य प्रेरणा व चारित्र्य. ११-१६

(ड) संपत्तीचा योग्य विनियोग. १७-१९

(इ) सत्य योग्य प्रकारे हाताळणे. २०,२१

प्रकरण १९ # तीमथ्याला दुसरे पत्र

लेखक व काळ

आपला विश्वासपुत्र तीमथ्याला पौलाने लिहिलेले हे दुसरे पत्र. तीमथ्यची माहिती १ तीमथ्याच्या प्रस्तावनेत वाचा. इ स ६७ मध्ये ते लिहिल्याचा वृत्तांत १ तीमथ्य मध्ये दिला आहे.

पार्श्वभूमी

सेवेसाठी अगदी अल्प काळाकरता पौलाची पहिल्या तुरुंगवासातून सुटका झाली असता त्याने १ तीमथ्य व तीत ही पत्रे लिहिली. नीरोने ख्रिस्ती लोकांचा तीव्र छळ सुरू केला असताना त्याला पुन्हा तुरुंगवास घडला असताना, त्याने २ तीमथ्य हे पत्र लिहिले. यावेळी त्याला सुटकेची आशा वाटत नव्हती (४:६-८). पहिल्या वेळी तो घरातील नजरकैदेत होता. तेव्हा लोकांशी संपर्क ठेवून सेवा करण्याची त्याला मुभा होती (प्रे कृ २८:१६-३१). पुढे ५-६ वर्षांनंतर म्हणजे ६६-६७ साली तो थंड अंधारकोठडीत (४:१३) व बेड्यांमध्ये होता (२:९), आणि सुटकेचीही आशा नव्हती (४:६). छळाच्या भयापोटी त्याच्या सर्व प्रियजनांपासून तो दूर केला गेला होता (१:१५; ४:९-१२,१६), लवकरच होणाऱ्या मृत्युदंडाची वाट पाहात होता. शेवटची भेट द्यायला तो तीमथ्याला रोमला येण्याची विनंती करतो (४:९,२१). तीमथ्याला पौलाच्या मरणापूर्वी तेथे जाणे शक्य झाले की नाही ते माहीत नाही. आख्यायिकेनुसार पौलाची तुरुंगातून सुटका झाली नाही व त्याने म्हटल्याप्रमाणे त्याला रक्तसाक्ष्याचे मरण आले (४:६).

या पत्रात आपला शेवट जवळ आल्याचे ओळखून पौल आपल्या अप्रेषितीय सेवेचा झगा तीमथ्याला देतो (२:२), आणि आपल्या सेवेत विश्वासू राहाण्याचा त्याला बोध करतो (१:६). सत्य सैद्धांतिक शिक्षण धरून राहायला (१:१३,१४); चूक टाळायला (२:१५-१८), शुभवर्तमानासाठी छळ स्वीकारायला (२:३,४; ३:१०-१२), वचनावर दृढ विश्वास ठेवायला व निर्धाराने मागे न पाहाता ते शिकवायला त्याला उत्तेजन देतो (३:१५-४:५).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

तीमथ्य आत्मिक दृष्ट्या दुर्बल होईल अशी भीती वाटण्याजोगे पौलाकडे काहीतरी कारण असावे. तीमथ्याने पौलाचे काम पुढे चालू ठेवायचे असल्याने पौलाला ही फार मोठी काळजी होती (२:२). पौलाला इतकी का चिंता वाटत असावी याविषयी वचनात कोठे उल्लेख नाही. तरी पत्रातच जे काही लिहिले त्यावरून पुरावा सापडतो. ही चिंता स्पष्ट दिसते. उदा. मिळालेले कृपादान प्रदीप्त कर (१:६), भित्रेपणाऐवजी सामर्थ्य, प्रीती व अनुशासनाच्या आत्म्याने भर (१:७), देवाची व पौलाची लाज धरू नये, तर स्वेच्छेने सुवार्तेसाठी दु:खसहन कर (१:८) व सत्याला धरून राहा (१:१३,१४). मंडळीच्या व छळाच्या दडपणाखाली असता पौल त्याला (१) बलवान राहायला (२:११), (२) वचनाची घोषणा करायला (४:२) पाचारण करतो. थोड्याफार प्रशंसनीय गोष्टी तो सांगत असला तरी पुष्कळ बोध करतो तेव्हा सुमारे २५ तरी आज्ञा देतो. पौलाने त्याला सिद्धांतांचे उत्तम शिक्षण दिले असल्याने त्याविषयी तो फारसा बोध करत नाही. तरी जाताजाता कृपेने तारण (१:९,१०;२:१०), ख्रिस्ताचे व्यक्तित्व (२:८;४:१,८), धीर (२:११-१३), संपूर्ण शास्त्रलेख ईश्वरप्रेरित आहे (३:१६,१७) अशा महत्त्वाच्या तत्त्वांना तो स्पर्श करतो.

रूपरेषा

(I) अभिवादन व आभार. १:१-५

(II) देवाच्या माणसाचा धीर. १:६-१८

(अ) प्रोत्साहन. १:६-११

(ब) पौल व अनेसीफरची उदाहरणे. १:१२-१८.

(III) देवाच्या माणसाचे नमुने २:१-२६ - पौल, सैनिक, मल्लयुद्ध करणारा, शेतकरी, येशू, कामकरी, पात्र, सेवक.

(IV) देवाच्या माणसावरील संकटे. ३: १-१७

(१) विरोधाशी सामना

(२) विरोध पराभूत

(V) देवाच्या माणसाची शिकवण. ४:१-५

(VI) समारोपाचे उद्गार. ४:६-१८

(१) पौलाचा विजय

(२) पौलाच्या गरजा

(VII) पौलाचा निरोप. ४:१९-२२

पौलाच्या रोममधील दोन तुरुंगवासांची तुलना

पहिला तुरुंगवास

प्रे कृ २८- तुरुंगातील पत्रे लिहिली; यहुद्यांचा राजद्रोह व पाखंडाचा आरोप; स्थानिकांचा तुरळक छळ (साल ६०-६३) ; भाड्याच्या घरात सुस्थितीत वास्तव्य (प्रे कृ २८:३०,३१); पुष्कळ प्रियजन भेटू शकले; ख्रिस्ती साक्ष देण्याची भरपूर संधी उपलब्ध; सुटका होऊन स्वातंत्र्य मिळण्याची आशा.

दुसरा तुरुंगवास

२ तीमथ्य लिहिले; रोमने छळ केला व रोमचा गुन्हेगार म्हणून कैदेत ठेवले; ६४-६८ सालात नीरोच्या राजवटीत छळ; थंड अंधारकोठडीत दुरावस्था; एकटेपण (केवळ लूकाची सोबत); साक्ष दोण्याच्या संधीस बंधने; मरणदंड अपेक्षित.

प्रकरण २० # तीताला पत्र

लेखक व काळ

पौलाचा हाही एक विश्वासपुत्र. त्याला इ स ६२-६४ दरम्यान लिहिलेले हे पत्र. पहिल्या व दुसऱ्या तुरुंगवासाच्या मधल्या काळात मासेदोनियातील मंडळयांमध्ये सेवा करताना करिंथ किंवा निकपलीसमधून ते लिहिले (३:१२). तीमथ्याप्रमाणेच तीताने पौलासोबत दुसऱ्या व तिसऱ्या सुवार्ता फेरीत काम केले होते (२ तीम १:२) ; तीत पौलाचा प्रिय शिष्य बनला होता (१:४); सुवार्ता कार्यातील सहकारी झाला होता (२ करिंथ ८:२३). २ तीम ४:१० मध्ये पौलाने त्याचा शेवटचा उल्लेख केला आहे. त्यावरून तो दालमातीयास सेवेला गेला होता, तेच आताचे युगोस्लाव्हीया. जेना व अपोल्लो यांनी हे पत्र त्याला सुपूर्त केले (३:१३).

पार्श्वभूमी

तीत हेल्लेणी असावा (गलती २:३). पौलाच्या पहिल्या मिशनरी फेरीत पौलाला तो भेटला व प्रभूकडे आला असावा (१:४). नंतर पौलाबरोबर काही काळ त्याने क्रेत बेटावर सेवा केली आणि मग तेथील सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी त्याला तेथेच ठेवण्यात आले (१:५). तेथे मार्गदर्शन करण्यास अर्तमास व तुखिक आल्यावर तीताने पौलास ग्रीसच्या आखया प्रांतातील निकपलिस नगरात येऊन मिळावे व हिवाळयात तेथे राहावे अशी पौलाची इच्छा होती (३:१२).

तिसऱ्या सुवार्तफिरीत करिंथातील सेवेतील सहभागामुळे २ करिंथमध्ये त्याचा ९ वेळा उल्लेख आहे. तेथे पौल त्याला 'माझा बंधू' (२:१३), 'माझा साथी व सहकारी' (८:२३) म्हणून संबोधतो. हा तरुण वडील मंडळीतील यहुदीय मतानुसारी व खोट्या शिक्षकांविषयी परिचित होता. ते आग्रह धरत होते की सर्व ख्रिस्ती, यहूदी व विदेशी मोशेचे नियमशास्त्र पाळण्यास बांधील आहेत. पुष्कळ वर्षांपूर्वी या पाखंडी मताचा विषय घेऊन यरुशलेम धर्मसभेस पौल व सीलाबरोबर तीतही गेला होता (प्रे कृ १५; गलती २:१-५).

भूमध्य समुद्रातील क्रेत हे १६०x३५ मैलांचे एक प्रचंड बेट एजीयन समुद्राच्या दक्षिणेस आहे. रोमच्या प्रवासात असताना पौलाची तेथे धावती भेट झाली होती (प्रे कृ २७:७-९,१२,१३,२१). तेथे तो सेवेला गेला व तीताला तेथील काम चालू ठेवण्यास तेथे ठेवले, तर तीमथ्याला इफिसात ठेवले (१ तीमथ्य१:३) व तो मासेदोनीयात गेला. तीताने लिहिलेल्या पत्राला किंवा क्रेताच्या अहवालाला पौलाने दिलेले हे उत्तर आहे.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

तीमथ्याला लिहिलेल्या दोन पत्रांप्रमाणेच पौल या तरुण पाळकाला वैयक्तिक उत्तेजन व मसलत देत आहे. तो उत्तम प्रशिक्षित, विश्वासू असून जेथे तो सेवा करत होता तेथे त्याला सतत देवहीन मनुष्यांकडून विरोध झाला होता. तीताने हे उत्तेजनाचे शब्द व मसलत क्रेतातील मंडळयांमध्ये तो जे वडील नेमणार होता, त्यांना हस्तांतरित करायची होती (१:५). रोमकरांस पत्र व गलतीकरांस पत्रांप्रमाणे सिद्धांतांचे स्पष्टीकरण किंवा समर्थन हे पुस्तक करत नाही. तीताच्या ईश्वरविज्ञानाच्या आकलनाविषयी पौलाला दृढ विश्वास असल्याने त्याने एवढी महत्त्वाची सेवा त्याच्यावर सोपवली होती हाच त्याच्या सैद्धांतिक ज्ञानाचा पुरावा होता. खोटे शिक्षक व यहुदीय मतानुसारी यांच्याविषयी या पत्रात फक्त

इशारा आहे. सैद्धांतिक चुकांची दुरुस्ती केलेली नाही. तेथील मंडळीचे बहुतेक सदस्यही सैद्धांतिक ज्ञानात भक्कम असल्याची पौलाची खात्री होती. यात पुढील सिद्धांतांचा अंतर्भाव आहे:
(१) विश्वासीयांची देवाच्या सार्वभौमत्वाने निवड (१:१,२).
(२) त्याची तारणदायी कृपा (२:११,३:५).
(३) ख्रिस्ताचे देवत्व व द्वितीयागमन (२:१३).
(४) ख्रिस्ताचे प्रायश्चित्ताचे बदलीचे मरण (२:१४).
(५) पवित्र आत्म्याद्वारे विश्वासी व्यक्तीचे पुनरुज्जीवन व नवीनीकरण (३:५).

देव व ख्रिस्त यांना सतत तारणारा असे संबोधले आहे. २:११-१४ मध्ये तारणाची योजना प्रकर्षाने मांडली आहे. यावरून क्रेतातील मंडळ्या सुवार्ताप्रसारात सज्ज व प्रभावी होण्यास तयार होत होत्या असे सूचित होते. या तयारीसाठी विश्वासीयांचे काळजीपूर्वक मेषपालत्व करणाऱ्या पुढाऱ्यांची गरज होतीच. शिवाय त्यांनी आपल्या मूर्तिपूजक शेजारपाजाऱ्यांना सुवार्ता सांगण्यास या विश्वासी जनांना सज्ज करायचे होते. कारण क्रेतीय लोकांची लबाड, दुष्ट पशु, आळशी पोटपोशे अशी ख्याती होती (१:१२). अशा लोकांमध्ये काम करताना त्यांनी सुवार्ता ऐकून घ्यावी म्हणून सुवार्ताप्रसार करण्यापूर्वी विश्वासी जनांनी आपली नैतिकता, प्रीती, नि:स्वार्थीपणा, देवभीरूता अशी निर्विवाद धार्मिक साक्ष त्यांच्यासमोर ठेवायची होती (२:२-१४). त्यांनी १:१०-१६ मधील खोट्या शिक्षकांच्या अगदी विरुद्ध असायला हवे होते. सत्ताधीश व अधिकाऱ्यांशी आणि अविश्वासीयांशी त्यांचे वर्तन कसे आहे हे देखील महत्त्वाचे होते (३:१-८). सत्कर्मे; विश्वास व सैद्धांतिक शिक्षणात व तारणाच्या ज्ञानात ते सखोल व दृढ असायला हवे होते.

महत्त्वाचे मुद्दे

मुले विश्वास ठेवणारी १:६ - येथे मुलांना तारणाचा विश्वास असावा व तो त्यांच्या वर्तनात प्रतिबिंबित व्हावा असा अर्थ आहे. हे घरातील मोठ्या मुलांना उद्देशून म्हटले आहे.

धन्य आशा २:१३ - येशूचे द्वितीयागमन व पुनरुत्थान (रोम ८:२२-२३; १ करिंथ १५:५१-५८; फिलिपै ३:२०,२१; १ थेस्स ४:१३-१८; १ योहान ३:२,३) आणि गौरवासह ख्रिस्ताबरोबर पवित्र जनांनी राज्य करणे. त्यावेळी पापाच्या अस्तित्वापासूनच आपली सुटका होणार.

रूपरेषा

(I) अभिवादन. १:१-४

(II) प्रभावी सुवार्ताप्रसारास गरजेच्या बाबी. १:५-३:११

(अ) पुढाऱ्यांना - १:५-१६

(ब) मंडळीला - २:१-१५

(क) जगाला - ३:१-११

(III) निष्कर्ष. ३:१२-१४

(IV) आशीर्वाद. ३:१५

प्रकरण २१ फिलेमोनाला पत्र

ज्या फिलेमोनाला पौलाने हे पत्र लिहिले, तो कलसैच्या मंडळीचा होता (कलसै ४:९). ही मंडळी त्याच्या घरात जमत होती. हे पत्र त्याला, त्याच्या कुटुंबियांना व मंडळीलाही लिहिले होते. फिलीपैकरांस पत्र, इफिसकरांस पत्र व कलसैकरांस लिहिलेल्या पत्रांसोबतच हे पत्रही तुरुंगातून लिहिले आहे. यासोबतच लिहिण्यात आलेल्या (इ स ६०-६२, वचन १ व १६) कलसैकरांस पत्राशी या पत्राचा संबंध दिसतो. पौलाचा जीवनवृत्तांत जाणून घेण्यासाठी रोमकरांस पत्राची रूपरेषा वाचावी. हे पत्र कोठून कसे पाठवण्यात आले हे जाणून घेण्यासाठी इफिस व फिलिपैकरांस पत्राची प्रस्तावना वाचावी.

पार्श्वभूमी

बहुधा इफिसातील पौलाच्या सेवेत बऱ्याच वर्षांपूर्वी फिलेमोनाचे तारण झाले असावे (व.१९). त्याचे घर प्रशस्त असून तो सधन असावा (व. २). त्याच्या मालकीचा निदान एक तरी गुलाम असावा. त्याचे नाव अनेसीम, याचा अर्थ "उपयुक्त."

फिलेमोनचे काही पैसे चोरून पसार झाला तेव्हा अनेसीम तारण पावलेला नव्हता (व. १८).असंख्य गुलाम अशा प्रकारे रोमला पळून जायचे. कोणत्याच वर्गात गणले न गेलेल्या अशा असंख्य गुलामांची साम्राज्याच्या राजधानीच्या शहरात मोठी लोकसंख्या होती. तपशील दिलेला नसला तरी पौलाच्या संपर्कात आल्याने अनेसीमचे तारण झाले हे नक्की. लवकरच पौल या पळून आलेल्या गुलामावर नितांत प्रेम करू लागला (व. १२,१६). अनेसीमला रोममध्ये ठेवावे अशी त्याची इच्छा होती (व.१३). तो पौलाला तुरुंगात मोलाची सेवा देत होता (व. ११). पण फिलेमोनाकडून पळून येण्याने त्याने रोमचा कायदा मोडला होता व धन्याच्या संपत्तीत अफरातफरही केली होती. ह्या गोष्टी ठीकठाक करणे पौलाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते, म्हणून त्याला पुन्हा कलसैत पाठवण्याचा त्याने निर्णय घेतला. गुलामांच्या धरपकडीमुळे अनेसीमसाठी हे धोक्याचे होते म्हणून पत्र घेऊन कलसैला जाणाऱ्या तुखिकसोबत पौलाने त्याला पाठवले (कलसै ४:७-९). अनेसीमसोबत पौलाने हे सुरेख पत्र पाठवले. त्यात अनेसीमला क्षमा करून ख्रिस्तात बंधू म्हणून त्याला स्वीकारावे अशी त्याला विनंती केली (व.१५-१७).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

प्रारंभीच्या मंडळीचे त्या काळातील गुलामगिरीच्या पद्धतीशी कसे संबंध होते याविषयीचा ऐतिहासिक दृष्टिकोन हे पत्र देते. रोमी साम्राज्यात गुलामगिरी विस्तृत प्रमाणात होती. एक तृतीयांश लोकसंख्या गुलामांची होती व समाजाने ती मान्य केली होती. गुलाम वैद्य, संगीतकार, शिक्षक, कलाकार, ग्रंथपाल, लेखपाल देखील होते. म्हणजे सर्व प्रकारची कामे गुलाम करायचे. त्याला मोफत सेवेचे ग्रहण लागलेले होते. गुलामांना व्यक्ती म्हणून वागवले जात नव्हते तर त्यांच्या मालकाच्या हातातील ते साधन होते. त्यांची खरेदी- विक्री अदलाबदल केली जायची, त्यांना वतन समजले जायचे, धन्याचे कर्ज फेडण्यासाठी पकडून ठेवले जायचे. त्यांच्या मालकांना त्यांना वाटेल तशी शिक्षा करण्याचा अधिकार होता. कधी कधी तर अगदी क्षुल्लक कारणासाठी मालक अमानुष शिक्षा करीत असे. नव्या कराराच्या काळापर्यंत गुलामगिरीचे स्वरूप बदलू लागले होते. समाधानी गुलाम अधिक फलदायी ठरत असल्याचे लक्षात आल्यावर मालक अधिक मृदू वागणूक देत असत. कित्येक मालक आपल्या गुलामाला आपल्या व्यवसायाची कौशल्ये शिकवत असत. काही मालक व गुलाम घनिष्ठ मित्र बनले होते. त्यांना कायद्याचे हक्क नसल्याने रोमच्या

शासनाने २० साली आपल्यावरील गुन्ह्याच्या आरोपावर दावा लावण्याचा त्यांना अधिकार दिला. विकत घेतलेल्या गुलामांना स्वतंत्र होण्याचाही हक्क देण्यात आला. काही गुलाम तर आपल्या मालकाच्या हाताखाली व कृपाछत्राखाली आनंदाने फलदायी सेवा करत होते. कित्येक स्वतंत्र झालेल्या गुलामांपेक्षाही त्यांची परिस्थिती उत्तम असे कारण त्यांना पूर्ण पुरवठा केला जाऊन त्यांची व्यवस्थित काळजी घेतली जात असे. कित्येक स्वतंत्र झालेल्या गुलामांना दारिद्र्याशी सामना करावा लागत असे.

नवा करार कोठेही गुलामगिरीवर हल्ला चढवत नाही. तसे केले असते तर ते सरकारविरुद्ध बंड समजले जाऊन त्यांना क्रूरपणे दडपले असते आणि या सामाजिक सुधारणेच्या प्रयत्नात सुवार्तेच्या संदेशाविषयी लोकांचा गोंधळ उडाला असता. उलट ख्रिस्ती धर्मविश्वासामुळे गुलाम व मालकांच्या अंत:करणाचा बदल झाल्यामुळे, गुलामगिरीतील अधर्म कमी लेखला जाऊ लागला (व.१६; गल ३:२८; इफिस ६:९; कलसै ४:१; १ तीम ६:१,२). गुलामगिरीचा दुरुपयोग बायबलने नाहीसा केला. या पत्रात महत्त्वाचा मुद्दा प्रामुख्याने प्रकाशात आणला आहे तो म्हणजे क्षमाशीलता. नव्या करारात तो विशेष चर्चिला आहे (मत्तय ६:१२-१५; १८:२१-३५; इफिस ४:३२; कलसै ३:१३). येथे क्षमा हा शब्द न वापरता पौल क्षमेची बायबल आधारित व्याख्या देतो.

रूपरेषा

(I) अभिवादन. १-३

(II) क्षमा करणाऱ्याचे चारित्र्य. ४-७

(III) क्षमा करणाऱ्याची कृती. ८-१८

(IV) क्षमा करणाऱ्याचे हेतू. १९-२५

प्रकरण २२

इब्री लोकांस पत्र

लेखक व काळ

ह्या पत्राची शिकवण पूर्णपणे हिब्रू लोकांचा इतिहास व धर्माशी निगडित असल्याने आरंभापासूनच या पत्राला इब्री लोकांस पत्र असे शीर्षक दिले आहे. या पत्राचा लेखक निश्चितार्थाने माहीत नाही. अनेक विद्वान उदा. पौल, बर्णबा, सीला, अपोल्लो, लूक, फिलिप्प, प्रिस्किल्ला, अक्विल्ला रोमचा क्लेमेंट अशा अनेकांच्या नावांचा अंदाज केला जातो. पण पत्राची शब्दरचना, शैली व इतर गुणविशेष कोणा एकालाच लागू पडत नाहीत.२:३ नुसार लेखक ख्रिस्तापासून संदेश प्राप्त झाल्याचे प्रमाण पटवल्याचा दावा करतो. असा दावा तर फक्त पौलानेच गलती १:१२ मध्ये केला आहे. त्याने जुन्या कराराचे सर्व संदर्भ ग्रीक भाषेतून घेतले आहेत. अखेर पवित्र आत्मा तर या पुस्तकाचा लेखक आहेच (२ पेत्र १:२१). हे पत्र लिहिले असता लेवीय याजकत्व आणि अर्पणपद्धत चालू होती. ७० साली मंदिराचा विध्वंस करण्यात येण्यापूर्वी ते लिहिले असावे. नुकतीच तीमथ्याची तुरुंगवासातून सुटका करण्यात आली होती (१३:२३) आणि छळ बळावत चालला होता (१०:३२-३९; १२:४; १३:३). यावरून सुमारे इ स ६७-६९ दरम्यान ते लिहिण्यात आले असावे.

पार्श्वभूमी

लेवीय याजकत्व व अर्पणपद्धतीवर जोर देण्यात आलेला असून विदेश्यांचा अजिबात उल्लेख नाही यावरून इब्री समुदायास हे पत्र लिहिले आहे. ते मुळात ख्रिस्ती झालेले यहूदी आहेत. पण त्यात बरेच अविश्वासी यहूदी पण आहेत. ते तारणाच्या संदेशाकडे आकर्षित झाले होते पण त्यांनी विश्वासाने ख्रिस्ताला पूर्ण समर्पण केले नव्हते. (त्यांच्याविषयी अधिक माहिती शेवटी दिली आहे.) पुस्तकातील आशयावरून त्यांचा तीव्र छळ होत असल्याचे स्पष्ट होते (१०:३२-३९;१२:४) त्यामुळे कोणत्याही प्रकारे ख्रिस्ताशी साधर्म्य दाखवायला ते कचरत होते. ते ख्रिस्ताचे - देवाच्या पुत्राचे स्थान देवदूतांच्या खालच्या पातळीवर आणत होते. त्यांच्या समोर मृत समुद्राजवळच्या कुमराम या मशीही यहूदी जमातीचे उदाहरण होते. ते समाजापासून फुटले होते, नवा धर्म स्थापला होता आणि या सुधारित यहूदी धर्मात देवदुतांची उपासना करायला सुरुवात केली होती. एवढ्यावरच न थांबता ते दावा करत होते की मिखाएल दूताचा दर्जा येशूपेक्षाही श्रेष्ठ होता. म्हणूनच या बहकवणाऱ्या सिद्धांताची व्यर्थता दर्शवण्यासाठी येशू देवदुतांपेक्षा श्रेष्ठ असल्याचा विषय या पुस्तकात हाताळला आहे.

हे पत्र बहुधा पॅलेस्ताइन, ईजिप्त, इटली, आशिया मायनर व ग्रीसमधील मंडळ्यांना पाठवले. त्यातील इब्री जमातीच्या लोकांनी हे पत्र आपल्या सभोवतालच्या प्रदेशातील मंडळ्यांमधील यहूदी पार्श्वभूमी असलेल्यांसाठी त्या मंडळ्यांना पाठवले. त्या विश्वासीयांनी ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहिले नसावे. ज्यांनी "ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहिले " होते त्यांनी "विविध चिन्हे, अद्भुते व चमत्कारांनी प्रमाण पटवून" सांगितलेली सुवार्ता ऐकली होती (२:३,४). त्यामुळे हे पत्र ज्यांच्या हाती पडले त्या मंडळ्या यहूदा किंवा गालीलाबाहेरच्या होत्या. पण ख्रिस्ताचे प्रत्यक्ष साक्षी असलेल्यांच्या नंतरची ही पिढी होती. त्या नवशिक्षित किंवा शिक्षण प्राप्त न झालेल्या मंडळ्या नव्हत्या तरीही ("आतापर्यंत तुम्ही शिक्षक व्हायला हवे होता") काही लोकांना अजूनही निऱ्या दुधाचीच गरज वाटत होती (५:१२).

ज्या पिढीच्या लोकांना हे पत्र लिहिले होते त्यांनी यरूशलेमातील मंदिरात लेव्यांच्या यज्ञपद्धती पाळल्या होत्या. बंदीवासातील यहूदी मंदिराऐवजी सभास्थानांचा वापर करीत असले तरी मंदिरातील उपासनेचे त्यांना विलक्षण आकर्षण होते.काही जण नियमितपणे यरुशलेमेस सण पाळायला जायचे.म्हणून या पुस्तकात यहूदी धर्मविश्वासापुढे ख्रिस्ती विश्वास वरचढ असल्याचे, तसेच मंदिरात पुन्हा पुन्हा होणाऱ्या लेव्यांच्या अपुरेपण असलेल्या यज्ञपद्धतींपेक्षा ख्रिस्ताने एकदाच केलेले यज्ञार्पण सर्वोच्च असल्याचे दाखवून दिले आहे. ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय या पुस्तकाचा अचूक अर्थ समजून घेण्यासाठी लेवीयच्या पुस्तकाची जाण असणे आवश्यक आहे. कारण लेव्यांच्या याजकपद्धतीवर हे पुस्तक खोल विवेचन करते. देवाचे निवडलेले व कराराचे लोक असूनही इस्राएलांनी सतत पाप करून देवाच्या सहभागितेस व्यत्यय आणला होता. त्यामुळे देवाने आपल्या सार्वभौमत्वाने व कृपेने यज्ञपद्धती प्रस्थापित केली होती. ती पापी व्यक्तीच्या आंतरिक पश्चात्तापाचे व दैवी क्षमेचे प्रतिकात्मक चिन्ह होती. तरीही यज्ञार्पण करण्याची गरज सतत चालूच राहिली कारण लोकांकडून व याजकांकडून पाप होणे चालूच राहिले. मानवजातीची गरज होती ती परिपूर्ण याजक व परिपूर्ण यज्ञार्पणाची, ज्यामुळे एकदाच कायमचे पाप दूर होईल. तो परिपूर्ण याजक व ख्रिस्ताद्वारे परिपूर्ण अर्पण ही देवाने केलेली तरतूद आहे, हाच या पुस्तकाचा मुख्य संदेश आहे. या पुस्तकात मोशेला जुन्या करारात दिलेल्या न्यून व अपूर्ण तरतुदींची नव्या कराराने दिलेल्या श्रेष्ठ व अमर्याद तरतुदींशी तुलना केली आहे. ती तुलना परिपूर्ण मुख्य याजक मशीहा, देवाचा एकुलता एक पुत्र, येशू ख्रिस्त याच्याशी केली आहे. त्या "श्रेष्ठ" मध्ये श्रेष्ठ आशा, करार, अभिवचन, यज्ञ, देश, मूळ हेतू व पुनरुत्थान या तरतुदींचा समावेश आहे. जे नव्या कराराचे आहेत, ते पूर्णपणे नवीन व स्वर्गीय वातावरणात वसतात, ते स्वर्गीय तारणाऱ्याची उपासना करतात, स्वर्गीय यरुशलेमची वाट पाहातात, आणि त्यांची नावे स्वर्गात नोंद केलेली असतात.

नव्या कराराखाली असल्याने विश्वासी जन थेट देवापर्यंत जाऊ शकतात, धैर्याने देवाच्या आसनाजवळ जाऊ शकतात हा या पुस्तकाचा ईश्वरविज्ञानाचा प्रमुख विषय आहे (४:६; १०:२२). त्या व्यक्तीची दृष्टी देवाच्या सान्निध्यावर खिळलेली असून ती तारणाऱ्याला अनुसरत असते (६:१९,२०; १०:१९,२०). मूलभूत शिकवण निवास मंडपाच्या प्रतिकातून दिली आहे. ती अशी की नियमशास्त्राधीन असलेल्या विश्वासीयांना थेट देवाच्या सान्निध्यात जाता येत नव्हते (९:८), तर परम पवित्र स्थानाबाहेरच असायचे. ह्या पुस्तकाचा सारांश असा देता येईल - पापासाठी देवाने दिलेल्या परिपूर्ण अर्पणामुळे विश्वासी जनांना परिपूर्ण प्रमुख याजक मिळाला, ज्याच्या सेवेमुळे सर्व काही सरत नवे व नियमशास्त्राधीन राहाण्यापेक्षा उत्तम झाले.

हे पत्र सैद्धांतिक प्रबंधापेक्षाअधिक काही आहे. रोजच्या जीवनासाठी त्यात भरपूर व्यावहारिक लागूकरण आहे. (अध्याय १३). लेखक स्वत: या पत्राला "बोधवचन" म्हणून संबोधतो (१३:२२; प्रे कृ १३:१५). बोधवचन वाचकाला कृती करण्यास ढवळून काढते असे या पत्राच्या लिखाणात पदोपदी आढळते. हा बोध सहा प्रकारच्या इशाऱ्याने केला आहे:

"आम्ही ऐकलेल्या गोष्टींविषयी " बहकण्या संबंधात इशारा - २:१-४
"देवाच्या वाणी"वर विश्वास न ठेवण्याबाबत इशारा - ३:७-१४
ख्रिस्ताच्या मूलभूत तत्त्वांमध्ये दुर्बल होण्यासंबंधी इशारा - ५:११-६:२०
सत्याच्या ज्ञानाला तुच्छ लेखण्यासंदर्भात इशारा - १०:२६-३९

देवाच्या कृपेला कमी लेखण्यासंबंधी इशारा - १२:१५-१७
"बोलणाऱ्या" पासून परावृत्त होण्यासंबंधी इशारा - १२:२५-२९

या पुस्तकाचे आणकी एक महत्त्व म्हणजे जुन्या करारातील निवडक शास्त्रभागांवर केलेला उलगडा. देवाच्या वचनाचा उलगडा करण्यात लेखक पारंगत दिसतो. त्याची उदाहरणे शिक्षक व उपदेशकांसाठी सूचक आहेत.

१:१-२:४	स्तोत्र२; अनुवाद ३२; २ शमुवेल ७ चा उलगडा
२:५-८	स्तोत्र ८:४-६ चा उलगडा
३:१-४:१३	स्तोत्र ९५:७-११ चा उलगडा
४:१४-७:२८	स्तोत्र ११०:४ चा उलगडा
८:१-१०:१८	यिर्मया ३१:३१-३४ चा उलगडा
१०:३२-१२:३	हबक्कूक २:३-४ चा उलगडा
१२:४-१३	नीति ३:११,१२ चा उलगडा
१२:१८-२९	निर्गम १९,२० चा उलगडा

विचारात घेण्याचे मुद्दे

(१) या पुस्तकाचा योग्य अर्थ समजण्यासाठी प्रथम हे जाणून घेणे गरजेचे आहे की ते तीन लोकगटांना उद्देशून लिहिले आहे. (अ) विश्वासी (ब) बुद्धीने सुवार्ता समजलेले अविश्वासी (क) सुवार्तेकडे आकर्षित झालेले पण ख्रिस्ताविषयीच्या निर्णयापर्यंत आलेले नाहीत असे लोक. या लोकगटांविषयी जर आपण समजून घेऊ शकलो नाही तर उरलेल्या शास्त्रवचनांशी सुसंगत व अर्थपूर्ण अभ्यास करण्यात आपण अपयशी होऊ.

ज्या गटाला उद्देशून हे पत्र लिहिले, तो पहिला गट इब्री ख्रिस्ती लोकांचा होय. त्यांचे यहूदी बांधवच त्यांचा धिक्कार व छळ करत होते (१०:३२-३४). पण अजून कोणी रक्तसाक्षी झाला नव्हता (१२:४). त्यांचा प्रमुख याजक व मशीहा जो ख्रिस्त त्याच्यावरील निष्ठेबद्दल उत्तेजन देण्यासाठी त्यांना हे पत्र लिहिले आहे. तो अपरिपक्व विश्वासी जनांचा गट होता. ते चिन्हात्मक व आत्मिक सामर्थ्य नसलेल्या यहूदी धर्मरूढी व विधी परंपरांच्या गोष्टी धरून ठेवण्याच्या मोहात अडकलेले होते.

दुसऱ्या ज्या गटाला उद्देशून लिहिले, तो गट यहूदी अविश्वासीयांचा होय. त्यांना सुवार्तेच्या मूलभूत तत्त्वांविषयी खात्री पटली होती पण आपला वैयक्तिक तारणारा व प्रभू म्हणून त्यांनी अजून प्रभूवर विश्वास ठेवला नव्हता. त्यांनी विश्वासाचा बौद्धिक पाठपुरावा केला होता पण आत्मिक समर्पण केले नव्हते. त्यांना उद्देशून अशा प्रकारचे शास्त्रभाग आहेत: २:१-३; ६:४-६; १०:२६-२९ व १२:१५-१७.

तिसऱ्या ज्या गटाला उद्देशून लिहिले त्यांना सुवार्तेच्या सत्याची खात्री पटली नव्हती पण त्याविषयी थोडाफार उलगडा झाला होता. अशांसाठी ९वा अध्याय आहे. (वचने ११,१४,१५,२७,२८ पाहा).

(२) ६:१-४ या वचनातील " एकदा प्रकाशित झालेले" हा शब्दप्रयोग बहुधा ख्रिस्ती लोकांसंदर्भात वापरतात व जर ते "पतन पावले," "ते पुन्हा एकदा स्वत:साठी देवाच्या पुत्राला वधस्तंभी देत राहतात " यावरून तारण गमावले जाऊ शकते या विचाराला पुष्टी देतात . पण त्यांचे तारण झाल्याचा तेथे उल्लेखच नाही. किंवा पवित्र, नवा जन्म झालेले, धार्मिक किंवा पवित्र जन अशा वर्णनाचे शब्दही वापरलेले नाहीत. म्हणूनच कोणत्या लोकगटाचे आत्मिक वर्णन केले आहे हे अचूकपणे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. ही वाक्ये अविश्वासी जनांना उद्देशून आहेत. त्यांनी देवाचे तारणाविषयीचे तत्व ऐकले, त्या विश्वासाला मान्यताही दर्शवली पण खरा विश्वास ठेवला नाही. १० :२६ ही अशा अविश्वासी जनांसाठीच आहे.

रूपरेषा

(I) येशू ख्रिस्ताचे श्रेष्ठत्व. १:१-४:१३

(अ) श्रेष्ठ नाव : श्रेष्ठ जासूद १:४-२:१८

(ब) श्रेष्ठ संदेश : महान तारण, महान तारक (२:१-१८)

(क) मोशेपेक्षा श्रेष्ठ

(ड) श्रेष्ठ विसावा

(II) येशूचे श्रेष्ठ याजकत्व. ४:१४-७:२८

ख्रिस्त प्रमुख याजक, ख्रिस्ताला पूर्ण समर्पण करण्याचा बोध, ख्रिस्ताचे मलकीसदेकाप्रमाणे याजकत्व.

(III) येशूच्या याजकीय सेवेचे श्रेष्ठत्व. ८ :१-१०:१८

श्रेष्ठ कराराद्वारे, श्रेष्ठ पवित्र स्थानाद्वारे, श्रेष्ठ अर्पणाद्वारे.

(IV) विश्वासीयांना लाभलेल्या श्रेष्ठ संधी. १०:१९-१२:२९

तारणासाठी विश्वास, खोटा विश्वास, खरा विश्वास, विश्वास वीर, चिकाटीचा विश्वास.

(V) ख्रिस्ती वर्तनाचे श्रेष्ठत्व. १३:१-२१

इतरांशी संबंध, स्वत:शी संबंध, देवाशी संबंध, ताजा कलम.

प्रकरण २३ # याकोबाचे पत्र

लेखक व काळ

हे याकोबाने लिहिलेले पत्र आहे. हा याकोब जब्दीचा पुत्र, प्रेषित योहानाचा भाऊ नव्हे, कारण तो फार लवकर रक्तसाक्षी झाला (प्रे कृ १२:२). तर मार्क ६:३ व मत्तय १३:५५ नुसार येशूचे याकोब व यहूदा हे दोघे अर्धे भाऊ आहेत. या दोघांनी लिहिलेली पत्रे नव्या करारात आहेत. याकोबाचे पत्र व यहूदाचे पत्र. याकोबाने यापूर्वी येशूचा मशीहा म्हणून धिक्कार केला होता (योहान ७:५). पण नंतर विश्वास ठेवला (१करिंथ १५:७). येशूने त्याला पुनरुत्थानानंतर खास दर्शन दिले होते व तो ख्रिस्ती विश्वासी झाला होता. एवढेच नव्हे तर तो यरुशलेम मंडळीचा प्रमुख पुढारी झाला होता (प्रे कृ १२:१७; १५:१३; २१:१८; गलती २:१२). पेत्र व योहानाबरोबरच त्याला "मंडळीचा खांब" संबोधत होते (गलती २:९). त्याची भक्ती व धार्मिकता यामुळे त्याला नीतिमान म्हणत असत. पहिल्या शतकातील यहूदी इतिहासकाराच्या मते तो ६२ साली रक्तसाक्षी झाला. शिवाय याकोबाचे पत्र व प्रे कृ १५ मधील भाषाशैलीवरून त्यानेच हे पत्र लिहिल्याचे सिद्ध करणारे पुरावे मिळतात. आपण ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहिल्याच्या अधिकारवाणीने तो लिहितो. प्रेषितांच्या सोबतीचा अशी त्याची ओळख होती (गलती १:१९); व तो यरुशलेमच्या मंडळीचा पुढारी होता. ४४ साली झालेल्या प्रे कृ १२ मध्ये वर्णन केलेल्या गोंधळाचा परिणाम पाहून त्याने पांगलेल्या यहूदी ख्रिस्ती लोकांना उद्देशून हे पत्र लिहिले. ४९ सालच्या प्रे कृ १५ मध्ये नमूद केलेल्या धर्मसभेचा १२ व्या अध्यायात उल्लेख दिसत नाही. त्यामुळे याकोबाचे पत्र इ स ४४-४९ दरम्यान लिहिले असावे व ग्रंथसहितेत लवकरच घेतले असावे असे स्पष्ट होते.

पार्श्वभूमी

प्रे कृ ७ नुसार इ स ३१-३४ दरम्यान स्तेफनाच्या रक्तसाक्षी होण्याने पांगलेल्या यहूदी ख्रिस्ती लोकांना उद्देशून, पण विशेषत: प्रे कृ १२ नुसार ४४ साली पहिला हेरोद अग्रिपाच्या राजवटीत छळ होत असणाऱ्यांसाठी हे पत्र लिहिले. आपल्या वाचकांना या पत्रात लेखक १५ वेळा "बंधूंनो" असे संबोधतो. पहिल्या शतकातील यहुद्यांमध्ये ही गोष्ट प्रचलित होती. २:२ मध्ये तो "सभास्थान" हा शब्द वापरतो. जुन्या करारातील तो ४० संदर्भ व डोंगरावरील प्रवचनातील (मत्तय ५-७) २० तरी संदर्भ वापरतो.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

सुज्ञतेने जगण्याविषयी तो थेट व जहाल विधाने करतो. व्यावहारिक गोष्टींवर तो जोर देतो. पुस्तकी ज्ञानावर नव्हे तर देवभीरू वर्तनावर भर देतो. कोणतीही तडजोड न करता आपल्या वाचकाने देवाच्या वचनाचे पालन करावे ही त्याची तळमळ आहे. निसर्गाची तो निदान ३० तरी उदाहरणे वापरतो. उदा. समुद्राच्या लाटा (१:६); सरपटणारे प्राणी (३:७); आकाशाने पाऊस देणे (५:१८). त्याने जणु घराबाहेर बराच काळ घालवला असे वाटते. विश्वासाने नीतिमान ठरले जाण्यावरील पौलाच्या शिकवणीची तो प्रशंसा करतो व खऱ्या विश्वासाने आत्मिक विश्वासूपणा प्रदर्शित करण्यावर आपल्या शिकवणीतून तो भर देतो.

लक्षात घेण्याचे मुद्दे

विश्वास व कर्मांमधील परस्परसंबंध काय? २:१४-१६ - याकोब कर्मांवर तर पौल विश्वासावर जोर देतो का? आपला विश्वास जिवंत की मृत आहे याची पारख करताना सत्कर्मांची कसोटी करायची की, जे वर्तन देवाच्या वचनांचे पालन करण्याचे धार्मिक वर्तन करून दैवी स्वभावाचे दर्शन घडवते त्याची कसोटी लावायची यावर येथे उहापोह केला आहे (२:२२-२५). एखादी व्यक्ती कर्मांनी तारण पावते असे याकोबाला मुळीच म्हणायचे नाही. कारण त्याने १:१७,१८ मध्ये व पौलाने इफिस २:८,९ मध्ये तारण हे कृपेचे दान असल्याचे म्हटले आहे. पण एक दिखाऊ किंवा वरकरणी विश्वास असतो, तो मृत असतो, तो तारण करू शकत नाही (२:१४,१७,२०,२४,२६, मत्तय ३:७,८; ५:१६; ७:२१; १३:१८-२३; योहान ८:३०,३१; १५:६). याकोब यहुद्यांना उद्देशून लिहीत आहे (१:१). कारण त्यांनी यहूदी धर्मातील धर्मकृत्यांचा त्याग केला होता, पण या चुकीच्या कल्पनेला कवटाळले होते की धर्मकृत्ये व देवाच्या इच्छेचे पालन तारणासाठी गुणकारी नाहीत, त्यांची मुळीच गरज नाही. त्यामुळे त्यांनी विश्वासाला कमी लेखले होते व ते ख्रिस्ताविषयीच्या सत्यांना केवळ बौद्धिक मान्यता देत होते. त्यामुळे विश्वासाने तारण पावावे व तारणानंतर तो विश्वास व देवाची इच्छा आपल्या वर्तनातून व्यक्त करायची हीच शिकवण याकोब पौलाप्रमाणेच देत आहे. ते परस्परविरुद्ध नाहीत.

(२) ५:१३-१८ मधील आरोग्याचे अभिवचन आत्मिक की शारीरिक बाबतीत आहे? वचन १३ मध्ये "दुख भोगणे" छळ किंवा वाईट वागणूक दिली जाण्याविषयी आहे, देवाचे सांत्वन त्याला हवे आहे. (फिलीपै ४:६;१; पेत्र ५:७). त्याने स्तोत्रे गायची आहेत (वचन १४,१५). ही वचने आजारामुळे यातना व दु:ख सहन करणाऱ्यांविषयी आहेत. त्यांना "तेल लावून ' म्हणजे छळामुळे झालेल्या जखमांची मलमपट्टी करून, आजारावर वैद्यकीय उपचार करून मदत करण्याचे रूपक वापरले आहे. वडिलांनी त्या व्यक्तीला या प्रकारे उत्तेजन, सांत्वन, बल द्यायचे आहे, आजारातून वाचवायचे आहे. देवाने त्याला पश्चात्तापी अंत:करण द्यावे म्हणून मागायचे आहे. देव क्षमा करील. आत्मिक संकटात विश्वासी जनांनी परस्परांना कसे सावरायचे याचे हे चित्र आहे.

रूपरेषा

१. दु:खात धीराची कसोटी. १:२-१२

२. मोहात दोष देण्याची कसोटी. १:१३-१८

३. वचनाला प्रतिसाद देण्याची कसोटी. १:१९-२७

४. नि:पक्षपाती प्रीती करण्याची कसोटी. २:१-१३

५. धार्मिक कृत्ये करण्याची कसोटी. २:१४-२६

६. जिभेची कसोटी. ३:१-१२

७. सुज्ञ ज्ञानाची कसोटी. ३:१३-१८

८. जगिक लाड पुरवण्याची कसोटी. ४:१-१२

९. अवलंबून राहण्याची कसोटी. ४:१३-१७

१०. धीराने सहन करण्याची कसोटी. ५:१-११

११. सचोटीची कसोटी. ५:१२

१२. प्रार्थनाशीलतेची कसोटी. ५:१३-१८

१३. खऱ्या विश्वासाची कसोटी. ५:१९,२०.

प्रकरण २४ # पेत्राचे १ ले पत्र

लेखक व काळ

पेत्राचे हे पहिले ईश्वरप्रेरित पत्र. पेत्राच्या वडिलांचे नाव योहान होते (योहान १:४२). त्यांचा कोळयाचा व्यवसाय असून ते बेथसैदात राहात असत, पुढे कफर्णहूमात राहावयास गेले.आंन्द्रिया त्याचा भाऊ. त्याने शिमोनाला मशीहाकडे आणले (योहान १:४०-४२). तो विवाहित असून त्याची पत्नी सतत त्याच्यासोबत सेवेत होती (मार्क १:२९-३१; १ करिंथ ९:५). ख्रिस्ताने आपल्या सेवेच्या आरंभीच्या काळातच पेत्राला आपणास अनुसरण्याचे पाचारण केले (मार्क १:१६,१७), मग त्याची प्रेषित म्हणून नेमणूक केली (मत्तय १०:२; मार्क ३:१४-१६). येशूने त्याचे ग्रीक नाव पेत्र व अरेमिक नाव केफा ठेवले; दोन्हींचा अर्थ धोंडा किंवा खडक असा होतो (योहान १:४२). संपूर्ण शुभवर्तमानात येशू खास धडे देण्यासाठी पेत्राचा वापर करतो (मत्तय १०; १६:१३-२१; १७:१-९; २४:१-७; २६:३१-३३; योहान ६:६; २१:३-७; १५-१७). तो बारा शिष्यांच्या वतीने पुढाकार घेऊन त्यांचे व स्वत:चे विचार मांडताना दिसतो. त्याच्या सबलता व दुर्बलता शुभवर्तमानात व प्रेषितांच्या कृत्यात १-१२ अध्यायात रेखाटल्या आहेत.

येशूचे पुनरुत्थान व स्वर्गारोहणानंतर यहुदाची जागा भरून काढण्यास दुसऱ्याची नेमणूक करण्यात पेत्र पुढाकार घेताना दिसतो (प्रे कृ १:१५). पवित्र आत्म्याच्या आगमनानंतर (प्रे कृ. २:१-४), पेंटेकॉस्टच्या दिवसापासून तो शुभवर्तमानाची घोषणा करण्यात अग्रगण्य दिसतो (प्रे कृ २-१२). त्याने मंडळीच्या आरंभीच्या काळात लक्षणीय चमत्कार केले (प्रे कृ ३-९) आणि शोमरोनात (प्रे कृ ८) व विदेश्यांसाठी (प्रे कृ १०) सुवार्तेसाठी दार खुले केले. आख्यायिकांनुसार पेत्राला आपल्या पत्नीस वधस्तंभी देत असल्याचे पाहावे लागले. त्यावेळी तो तिला "प्रभूचे स्मरण कर" असे म्हणत उत्तेजन देत राहिला. जेव्हा त्याची वधस्तंभी जाण्याची वेळ आली तेव्हा त्याने उत्तर दिले की, “मी माझ्या प्रभूप्रमाणे वधस्तंभी जाण्यास पात्र नाही, मला उलटे टांगा” (इ स ६७-६८). आणि त्याला तसेच टांगून मारले.

प्रेषितांच्या कृत्यातील त्याच्या संदेशांत व या पत्रातील लिखाणात बरेच साम्य आढळते. उदा. बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला धोंडा कोनशिला झाला आहे (२:७,८; प्रे कृ ४:१०,११), ख्रिस्त तोंड न पाहाता न्याय करतो (१:७; प्रे कृ १०:३४). "नम्रतारूपी कमरबंद बांधा" असे पेत्र शिकवतो (५:५). तेव्हा प्रभूने कमरेला रुमाल बांधून शिष्यांचे पाय धुतल्याचे तो प्रतिध्वनित करतो (योहान १३:३-५). पत्रातील इतर अनेक विधाने येशूच्या तोंडच्या बोलांचे स्मरण करून देतात (४:१४,५:७,८). शिवाय लेखक आपण ख्रिस्ताच्या दु:खसहनाचे प्रत्यक्ष साक्षी असल्याचा दावा करतो (५:१;३:१८; ४:१). हे पत्र पेत्रानेच लिहिले याविषयी पहिल्या मंडळीपासून कोणाचाही आक्षेप नाही. उच्च शिक्षित नसूनही त्याने ग्रीकमध्ये कसे लिहिले यावरही मतभेद नाहीत कारण जुना करार ग्रीकमध्ये उपलब्ध असून लोक तो वाचत व जरी पेत्राची भाषा अरेमिक असली तरी पॅलेस्ताईनमध्ये सर्वत्र ग्रीक भाषा बोलली जात होती. त्यात पेत्राने पवित्र आत्म्याच्या अधिपत्याखाली हे लिखाण केले. सिल्वान त्याचा लेखनिक व हे पत्र पोचवणारा जासूद याच्या मदतीने तेव्हाच्या प्रथेप्रमाणे तोंडी सांगून लिहून घेतले, त्यामुळे शुद्धलेखनाच्या चुका राहिल्या नाहीत (५:१२; प्रे कृ १५:३२). शिवाय सिल्वान म्हणजेच सीला संदेश देणाराही होता. रोम शहर जळण्यापूर्वी इ स ६४-६५ दरम्यान जुलै मध्ये पेत्राने हे पत्र लिहिले.

पार्श्वभूमी
जेव्हा रोम शहर जळाले तेव्हा नीरो सम्राटाच्या बांधकामाच्या वेडापायीच त्याने ते जाळले असा रोमी जनतेचा विश्वास होता. नवे बांधकाम करण्यासाठी अस्तित्वात असलेले तो पाडून टाकीत असे. रोमी लोक उद्ध्वस्त झाले होते. नगरासोबत त्यांची संस्कृतीही खालावली होती. त्यांचे सर्व धार्मिक जीवन लयास गेले होते. त्याची भव्य मंदिरे, स्मारके, त्यांची कुलदैवतेही जळून खाक झाली होती. ज्या प्रचंड आगीचे ते बळी ठरले होते त्यापासून आपली दैवते आपल्याला वाचवू शकली नाहीत, असा या घटनेशी ते धार्मिक संबंध लावत होते. लोक निराश, असहाय व बेघर झाले होते. कित्येक त्यात ठार झाले होते. त्यांचे मन अतिशय बंडखोर बनले होते. हे नीरोच्या लक्षात आल्याने त्याने या शत्रुत्वाला नवी दिशा दिली. त्यासाठी बळीचा बकरा म्हणून त्याने ख्रिस्ती लोकांची निवड केली. त्यांचा आधीच द्वेष होत असे कारण ते यहुद्यांच्या जवळचे होते. शिवाय ख्रिस्ती रोमी संस्कृतीचे शत्रू असल्याचे ते मानत होते.

नीरोने लागलीच बातमी काढली की ख्रिस्ती लोकांनी ही आग लावली. त्यामुळे ख्रिस्ती लोकांचा छळ सुरू झाला. संपूर्ण रोमी साम्राज्यात तो वेगाने पसरला. पंत, गलतीया, कप्पदुकीया, आसिया व बिथुनीया पर्यंत छळाचे लोण पसरले. त्यांना पेत्र "पांगलेले" असे संबोधतो. ते बहुधा विदेशी लोक असावेत. हा सर्व भाग पौल व त्याच्या सहकाऱ्यांमुळे ख्रिस्ताकडे आला होता, पौलाच्या शिक्षणात दृढ झाला होता. आता दु:खसहनामुळे त्यांना सामर्थ्य पुरवण्याची गरज होती. म्हणून प्रेषित पेत्राने त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हे पत्र लिहिले.

हे पत्र लिहिताना पेत्र बाबेलात होता (५:१३) असे म्हणतो, कारण आपल्या लोकांना अधिक समस्या व धोका निर्माण होऊ नये म्हणून तो मंडळयांची नावे व स्वत:चेही स्थान गुप्त ठेवण्याकरता बाबेल हे सांकेतिक नाव वापरतो. आपला अंत होण्याच्या अल्पकाळ आधी तर पौल व याकोब रक्तसाक्षी झाल्यावर सुमारे दोन वर्षांनी त्याने हे पत्र लिहिले.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे
ज्या विश्वासी जनांना उद्देशून हे पत्र लिहिले, ते वाढत्या छळाला तोंड देत होते (१:६; २:१२, १९-२१; ३:९,१३-१८; ४:१,१२-१६,१९). या विरोधातही त्यांनी विजयाने कसे उभे राहावे हे त्यांना शिकवणे हा या पत्राचा हेतू आहे.
(१) आशा सोडायची नाही.
(२) कटुता ठेवायची नाही.
(३) प्रभूवर भरवसा ठेवायचा.
(४) त्याच्या द्वितीयागमनावर दृष्टी खिळवायची.
पेत्र आपल्या वाचकांवर हे ठसवू पाहात होता की जुलूम सहन करतानाही ख्रिस्ती व्यक्ती आज्ञापालनाचे, विजयी जीवन जगून या विरोध करणाऱ्या जगात खरे तर सुवार्ताप्रसार करू शकते (१:१४; २:१,१२,१५; ३:१-६,१३-१७; ४:२; ५:८,९).

सैतान व त्याच्या दुरात्म्यांच्या सामर्थ्याने शक्तिशाली झालेली जगरहाटी सतत विश्वासी जनांसमोर उघड होत राहाते. तिचा प्रयत्न असतो की मंडळीची निरागसता व अखंडतेची अपकीर्ती करावी. त्यासाठी त्या दुष्टात्म्यांनी अवलंबलेली एक पद्धत म्हणजे वचनाशी सुसंगत जीवन नसलेल्या ख्रिस्ती लोकांचा शोध घ्यायचा आणि त्यांना अविश्वासी जनांसमोर आणून मंडळी कशी ढोंगी आहे ते दाखवून द्यायचे. म्हणून ख्रिस्ती जनांनी पवित्र जीवनाच्या सामर्थ्याने

शत्रुंविरुद्ध उभे राहून टीकाकारांना गप्प करायला हवे. या पत्रात दोन सत्ये ओसंडून वाहाताना दिसतात. एक सकारात्मक आहे. त्यात ख्रिस्ती व्यक्तीवर वर्षाव करण्यात आलेले आशीर्वाद आहेत. त्यात तो ख्रिस्ती व्यक्तीची ओळख व ख्रिस्ताची ओळख असणे म्हणजे काय हे सांगताना एकामागून एक वरदाने व आशीर्वादांची यादी देतो. या आशीर्वादांच्या यादीतच दु:खसहनाचची यादी तो गुंफतो. ख्रिस्ती लोक इतके आशीर्वादांनी भरलेले असले तरी त्यांनी हे लक्षात ठेवावे की जग त्यांना अन्यायाने वागवणार. पण त्यांचे नागरिकत्व स्वर्गीय आहे आणि सैतानी शक्तीने भरलेल्या शत्रुंच्या या जगात ते परदेशी आहेत. त्यामुळे सारांशाने ख्रिस्ती जीवन म्हणजे विजयासाठी पाचारण व दु:खसहनाच्या मार्गाने गौरविले जाणे होय. त्यामुळे पेत्र या मूलभूत प्रश्नाचे उत्तर देतो की :

ख्रिस्ती व्यक्तीने शत्रुत्वाशी कसा मुकाबला करायचा? उत्तर आहे, ख्रिस्त जो आपला आदर्श, ज्याने विरोधातून जातानाही विजयी मनोवृत्ती राखली , त्याच्यावर लक्ष केंद्रित ठेवा.

ख्रिस्ती जीवनाविषयी पेत्र महत्त्वाच्या व्यावहारिक प्रश्नांची उत्तरे देतो.

(I) २:५-९ - देवाजवळ स्वत:साठी मध्यस्थी करण्यास ख्रिस्ती व्यक्तीला याजकपणाची गरज आहे का?
नव्या कराराच्या याजकत्वात पुढील वैशिष्ट्ये आहेत.
(१) हे याजकही देवाचे निवडलेले लोक आहेत (योहान १५:१६;निर्गम २८:१).
(२) याजक पापापासून शुद्ध होतात (तीत २:१४; लेवी ८).
(३) याजकांना सेवेसाठी वस्त्रे असतात (५:५; निर्ग २८:४२).
(४) सेवेसाठी याजकांची तयारी करून घेतात (गलती १:१६; १ तीम ३:६; लेवी ८:३३)
(५) याजकांना सेवेसाठी अभिषेक करतात (१ योहान २:२०,२७; लेवी ८)
(६) याजकांनी आज्ञापालन करायचे (२:४; लेवी १०:१).
(७) याजकांनी देवाच्या वचनाला मान द्यायचा (२:२; मलाखी २:७).
(८) याजकांनी देवासमागमे चालायचे (गलती ५:१६,२५; मलाखी २:६).
(९) याजकांनी पाप्यांना ताळ्यावर आणायचे (गलती ६:१; मलाखी २:६)
(१०) याजक देवाचे जासूद आहेत (मत्तय २८:१९,२०; मलाखी २:७).

त्यांनी देवाला अर्पणे करायची म्हणजे ख्रिस्तामुळे पवित्र आत्म्याच्या अधीन राहून वचनाच्या मार्गदर्शनाने देवाचा सन्मान करणारी कृत्ये करायची.
(१) देवाला आपल्या शारीरिक बलाचा यज्ञ करायचा (रोम १२:१,२).
(२) देवाचे स्तवन करायचे (इब्री १३:१५).
(३) सत्कर्मे करायची (इब्री १३:१६).
(४) आपले जे आहे ते वाटून घ्यायचे (इब्री १३:१६).
(५) लोकांना ख्रिस्ताच्या ओळखीत आणायचे (रोम १५:१६).
(६) इतरांच्या कल्याणार्थ आपल्या इच्छांचा त्याग करायचा (इफिस ५:२).
(७) प्रार्थना करायची (प्रकटी८:३).

सध्या मंडळी राजकीय याजकगण आहे, येशूच्या राजकीय याजकत्वाच्या अधीन आहे. राजकीय याजकत्व राजाचे असतेच पण ते राज्यही चालवते. ही गोष्ट ख्रिस्ताच्या भावी राज्यात पूर्ण होईल.

(II) २:१३-१७ - निधर्मी शासनव्यवस्था व नागरी अवज्ञा याबाबत ख्रिस्ती व्यक्तीचा दृष्टिकोन कसा असावा?

देवाच्या लोकांनी सर्व विरोधात, देवहीन निंदा करणाऱ्या समाजात नम्रपणे अधीनतेने राहावे. आपले नागरिकत्व स्वर्गीय आहे (फिलीपै ३:२०). आदराने व आज्ञाधारक वागण्याने देवाचे गौरव व मान होईल. केंद्रशासन, राज्यशासन, पोलीसखाते व न्यायसंस्थेचेही आज्ञापालन करावे. वचनाविरुद्ध नियम पाळू नये. ख्रिस्तामधील स्वातंत्र्य दुर्वर्तनाचा परवाना देत नाही.
२:१८:- समाजरचना कितीही कठोर असली तरी वरिष्ठांविरुद्ध देखील बंडाने वागायला ख्रिस्ती विश्वास परवानगी देत नाही.
१ करिंथ ७:२०-२४; इफिस ६:५-७; कलसै ३:२२-२५; निर्गम २१:२६,२७; लेवीय २५:३९-४३; अनुवाद २३:१५,१६

(III) ३:३,४ - ख्रिस्ती स्त्रीचे वर्तन कसे असावे?
पेत्र सर्वच बाह्य शोभेला मज्जाव करत नाही (१ तीम २:९). शीलाचा अनादर करण्यावर त्याचा आक्षेप आहे. प्रत्येक स्त्रीने आदरयुक्त ख्रिस्तासमान चारित्र्याचा पाठपुरावा करायला हवा. हे सौंदर्य शारीरिक सौंदर्याप्रमाणे नष्ट होत नाही. सर्वसामान्यपणे तिच्या प्रतिक्रिया देवासमक्ष नेहमी सौम्य असाव्यात.
३:१,२ - घरात आणि स्थानिक मंडळीत तसेच सामाजिक जीवनात ख्रिस्ती व्यक्तीने प्रभुसाठी आपली साक्ष राखावी व देवाने आखून दिल्याप्रमाणे अधीन राहावे. स्त्रिया पुरुषांपेक्षा कमी नाहीत. पण त्यांना दिलेल्या भूमिकेत त्यांनी ही अधीनता आपल्या मस्तकापुढे राखायची (१करिंथ ११:१-९; इफिस ५:२२; कलसै ३:१८; तीत २:४,५).
ख्रिस्तीतरांमध्ये स्त्रीला पुरुषापेक्षा कमी लेखले जात असे. अवज्ञा अविश्वासीयांसंदर्भात वापरली आहे तर आज्ञांकितपणा विश्वासीयांना उद्देशून वापरला आहे. विश्वासी व अविश्वासीयांच्या वैवाहिक जीवनात संघर्ष होत. पेत्र च्याख्रिस्ती स्त्रीला पतीला सोडून देण्याचा सल्ला देत नाही (१ करिंथ ७:१३-१६). पतीच्या अधीन राहून तिने पतीला शिकवण द्यायची आहे. तारण न पावलेल्या पतीवर चारित्र्यशीलतेने, सौम्यतेने, पतीचा आदर करून ममतेने, अधीनतेने वागणे हे त्याला प्रभुसाठी जिंकण्याचे महान हत्यार आहे. देवासमोर शुद्ध राहून त्याचा आदर करणे हे तिच्या वर्तनात पतीला सतत पाहायला मिळावे.

३:१९-२२- ख्रिस्ताने मरण व पुनरुत्थानाच्या दरम्यान आपल्या जिवंत आत्म्याने अधोलोकातील बंदिस्त आत्म्याकडे जाऊन त्यांना घोषित केले की तो मृत नसून विजयी झाला आहे. त्यांनी नोहाच्या काळात देवाच्या सहनशीलतेच्या हद्दीपलीकडचा अधर्म केला होता. देवविरोधी अधम कृत्ये व लैंगिक पापे करून जग अधमतेने व्यापून टाकत होते . इतके की १२० वर्षे नोहाने संदेश देऊनही त्या ८ व्यक्तींखेरीज कोणी वाचू शकले नाही (२ पेत्र २:४,५; यहूदा ६,७; उत्पत्ती ६:१-८). म्हणून अखेरच्या न्यायापर्यंत त्यांना देवाने तेथे बंदिस्त केले आहे. ते ८ लोक देवाच्या कृपेने जसे न्यायातून वाचले तसे ख्रिस्ताद्वारे तारणप्राप्ती होते. येथे बाप्तिस्म्याचे शिक्षण नसून तारवाप्रमाणे ख्रिस्तात न्यायापासून संरक्षण आहे हा मुद्दा तेथे आहे. विश्वास ठेवणाऱ्याच्या पापासाठी ख्रिस्ताचे बदलीचे मरण पाहून देव त्या व्यक्तीचा

स्वीकार करतो (प्रे कृ २:३०,३१; रोम १:४). जसा पाण्याचा न्याय तारवावर पडला तसा ख्रिस्तावर पापाचा न्याय पडला. जे ख्रिस्तामध्ये आहेत ते तारवातील लोकांप्रमाणे न्यायापासून वाचतात (रोम ६:१-४). नोहा पाण्याबाहेर ठेवून राखला गेला. बाकीचे सारे पाण्यात नाश पावले. तारवात असण्याने म्हणजे ख्रिस्तात असण्याने सार्वकालिक तारण आहे.

रूपरेषा

अभिवादन : १:१,२

(I) आपल्या महान तारणाचे स्मरण करा. १:३-२:१०

(अ) आपल्या भावी वतनाची हमी. १:३-१२

(ब) आपल्या भावी वतनाचे परिणाम. १:१३-२:१०

(II) लोकांसमोरील आपल्या आदर्शाचे स्मरण करा. २:११-४:६

(अ) अविश्वासीयांसमोर आपले वर्तन आदरणीय ठेवा.२:११-३:७

(ब) विश्वासीयांसमोर आपले वर्तन आदरणीय ठेवा. ३:८-१२

(क) दु:खसहनातही आदरणीय वर्तन ठेवा. ३:१३-४:६

(III) आपल्या प्रभूचे द्वितीयागमन होणार आहे याची आठवण ठेवा. ४:७ – ५:११

समारोप. ५:१२-१४

प्रकरण २५

पेत्राचे २ रे पत्र

लेखक व काळ

१:१ व ३:१ मध्ये पेत्र दावा करतो की तोच या पत्राचा लेखक आहे. १:१४ मध्ये प्रभूने त्याच्या मृत्युचे भाकीत केल्याचा तो उल्लेख करतो (योहान २१:१८,१९). १:१६-१८ मध्ये तो रूपांतराच्या डोंगरावरील अनुभवाची आठवण लिहितो (मत्तय १७:१-४). हे पत्र त्याने स्वत: किंवा सिल्वान खेरीज दुसऱ्या कोणाच्या तरी मदतीने लिहिल्याचे दिसते, त्यामुळे १ ल्या पत्रापेक्षा या पत्राच्या ग्रीक भाषाशैलीत थोडी तफावत जाणवते. पण त्यानेच हे पत्र लिहिल्याचे स्पष्ट दिसते.

पहिले पत्र दु:खसहनातून जाणाऱ्या ख्रिस्ती लोकांना लिहिले होते; तर दुसरे पत्र खोट्या शिक्षकांविषयी जागृत करण्यासाठी लिहिले आहे. दोन्ही पत्रांच्या भाषेत लक्षणीय साम्य दिसते. उदा. "कृपा व शांती विपुल असो" हे अभिवादन तसेच 'मौल्यवान' 'गुण,' काढून टाका,' 'साक्षी' हे शब्द दोन्ही पत्रात आहेत. तसेच प्रेषितांच्या कृत्याशीही या दोन्ही पत्रांचे साम्य दिसते.उदा. 'मिळाले'(मिळाले १:२; प्रे कृ १:१७); 'सुभक्ती'(१:३, ६,७; प्रे कृ ३:१२); 'अनीतीचे वेतन' (२:१३, १५; प्रे कृ १:८). दोन्ही पत्रे जुन्या करारातील घटनेविषयी लिहितात (२:५; १ पेत्र ३:१८-२०). पहिले पत्र छळातून जाणाऱ्या विश्वासीयांसाठी लिहिले असल्याने त्यांच्या उत्तेजनार्थ ख्रिस्ताचे आगमन लवकर होईल असे सांगून त्यांची दृढ आशा जागवली आहे. तर दुसऱ्या पत्रात निंदा करणाऱ्यांशी मुकाबला करताना ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनास विलंब लागल्याची कारणे दिली आहेत. नीरो इ स ६८ मध्ये मरण पावला व पेत्र त्याने केलेल्या छळात मरण पावला, त्यामुळे हे पत्र इ स ६७-६८ दरम्यान लिहिले असल्याचे संभवते; व ते आपणच लिहिल्याचा पेत्र १:१ मध्ये दावा करतो.

पार्श्वभूमी

पहिले पत्र पाठवण्याच्या काळापर्यंत खोट्या शिक्षकांनी आशिया मायनर मधील मंडळयांमध्ये घातलेल्या गोंधळाबद्दल पेत्र फारच चिंतातूर झाला होता. त्यांच्या अनैतिक जीवनशैली व पाखंडी मतप्रणालीने भविष्यात मंडळीचे अतोनात नुकसान होईल अशी पेत्राला भीती वाटत होती. म्हणून आपली अखेरची इच्छा व करार म्हणून तो आपल्या ख्रिस्तामधील प्रिय विश्वासी बंधूंना, ते सामोरे जात असलेल्या सैद्धांतिक धोक्यांबद्दल इशारा देत आहे (१:१३-१५). पहिल्या पत्राप्रमाणेच आपला ठावठिकाणा तो पत्रात देत नाही. तरी त्याने रोमच्या तुरुंगातून हे पत्र लिहिले असावे असे वाटते, कारण तो लवकरच वधस्तंभावर उलटे टांगलेल्या अवस्थेत मरणाला सामोरे जाणार होता. हे पत्र कोणाला उद्देशून लिहिले तेही पेत्र सांगत नाही. पण ज्यांना पहिले पत्र लिहिले त्यांनाच तो हे दुसरे पत्र लिहीत आहे.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

मंडळयांवर हल्ला करणाऱ्या खोट्या शिक्षकांना उघड करून त्यांचा हल्ला उधळून लावण्याच्या हेतूने पेत्र हे दुसरे पत्र

लिहीत आहे. त्या खोट्या शिक्षकांच्या फसवेगिरी व लबाड्यांपासून आपला कसा बचाव करावा याविषयी पेत्र बोध करत आहे. हे पत्र उत्तम प्रकारे खोट्या शिक्षकांना उघडे पाडते. पेत्र खोट्या शिक्षकांच्या विशिष्ट धर्म किंवा पंथ किंवा शिक्षण पद्धतीचा नामनिर्देश करत नाही; तर त्यांचे सर्वसामान्य वर्णन करून ते विनाशकारी पाखंड कसे शिकवतात याची माहिती देतो. ते ख्रिस्ताला धिक्कारतात व वचनाचा विपर्यास करतात. ते खऱ्या विश्वासाची अप्रतिष्ठा करतात. ते ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाची थट्टा करतात. त्यांचे खोटे शिक्षण उघड करीत असतानाच पेत्र त्यांची अनैतिकताही समोर आणण्याची काळजी घेतो. त्यांच्या सिद्धांतांपेक्षा त्यांच्या शीलाचेच तो तपशीलवार वर्णन करतो. सर्व दुष्टपणा हा खोल सिद्धांताचे नव्हे तर 'विध्वंसक पाखंडी' मताचे फलित असते (२:१).

पेत्र त्याच्या वाचकांना आपले ख्रिस्ती शील वृद्धिंगत करण्याचे आव्हान करतो (१:५-११). त्यात तो विश्वासीयांना तारणाची खात्री करून घेण्याचे अद्भुत शिक्षण देतो. त्याच्या वाचकांनी प्रेषितीय शिक्षणातील दैवी स्वभावाचा पाठपुरावा करावा अशी तो इच्छा करतो (१:१२-२१). पत्राच्या अखेरीस ख्रिस्ताच्या द्वितीय आगमनास होणाऱ्या विलंबाची तो कारणे देतो (३:१-१३). तीनच अध्यायात १५-१६ वेळा ज्ञान या अर्थाचा शब्द आला आहे. त्यावरून पेत्र या खोट्या शिक्षणावर प्राथमिक उपाय हाच सांगतो की खऱ्या सिद्धांतांच्या ज्ञानाने विश्वासी जनांनी भरावे. महत्त्वाचे म्हणजे देवाच्या वचनाचा उगम कोठून झाला याविषयी तो अचूक विधान करतो (१:२०,२१). तसेच जगाचा अग्निने नाश होणार (३:८-१३) हे अचूक विधान करतो आणि आपली पत्रेही पौलाच्या पत्रांप्रमाणेच ईश्वरप्रेरित असल्याचा दावा करतो (३:१५,१६). विशेष म्हणजे १:१९-२१ वचने २ तीमथ्य ३:१५-१७ मधील शिकवणीला पुष्टी देतात.

विचार करा

(१) वचन २:१ - सैतान नेहमी देवाच्या लोकांच्या गटात खोटे संदेष्टे पाठवून फसवणुकीचे काम करतो. ते आपणच आखलेली धर्ममतप्रणाली म्हणजे पाखंडी मते मांडून दुफळी माजवतात (१ करिंथ ११:१९; गलती ५:२०). "विध्वंसक" हा शब्द अखेरच्या न्यायातील विध्वंस सूचित करतो. त्यामुळे वचनाशी विसंगत असलेल्या शिक्षणाकडे आपण कानाडोळा करून ते चालू देऊ नये (२ थेस्स ३:१४; १ तीम ४:१-५; तीत ३:९-११). ते ख्रिस्ताचे सार्वभौम प्रभुत्व नाकारतात. त्याचा कुमारिकेपासून जन्म, देवत्व, त्याचे शरीराने पुनरुत्थान, द्वितीयागमन नाकारतात. ते आपले जीवन ख्रिस्ताच्या अधीन करीत नाहीत. "ज्या स्वामीने त्यांना विकत घेतले" हे रूपक पेत्र वापरतो. धनी गुलामाला विकत घेई व गुलाम धन्याला सर्वस्व मानीत असे. अनुवाद ३२:५,६ मध्ये देवाने इस्राएल राष्ट्राला विकत घेतले आहे तरी त्यांनी त्याला नाकारले असे तो म्हणतो. या रूपकाचा येथे अर्थ आहे. देवाच्या अधीन राहाण्याची आपली जबाबदारी खोट्या शिक्षकांनी धिक्कारली. वर स्वत:ला ख्रिस्ती म्हणवून ते ख्रिस्ताने आपल्याला विकत घेतल्याचे दर्शवत तर होतेच. उपहासाने येथे पेत्र त्यांचा हा दावा फेटाळून येणाऱ्या त्यांच्या विध्वंसाकडे इशारा करत आहे कारण **ते ख्रिस्ताचा दावा करतात पण त्याचे प्रभुत्व नाकारतात.**

(२) वचन २:१८- 'भ्रमात असणारे' हे वर्णन तारलेल्यांचे नाही; अपराधी भावनांनी, भग्न वैवाहिक जीवनाने, एकटेपण असणारे, पापाच्या परिणामांमुळे त्रस्त होऊन थकून गेलेले, देवाच्या साह्याने नव्याने सुरुवात करू इच्छिणारे हे लोक आहेत.

(३) वचन २१ - हे खोट्या शिक्षकांविषयी आहे. वचनाचे खरे शिक्षण घेतले पण त्यांच्या जीवनात त्यांनी ख्रिस्ताला धिक्कारल्याचे दिसते (इब्री १०: २६-३१). हे मंडळीतलेच खोटे शिक्षक मंडळी भ्रष्ट करत आहेत.

(४) वचन ३:९ - कोणाचा नाश होऊ नये अशी देवाची इच्छा आहे? निवडलेल्यांमधील कोणाचाही. कारण हा संपूर्ण शास्त्रभाग दुर्जनांच्या नाशाविषयी आहे. पश्चात्ताप न केलेले नाशालाच जातील.

रूपरेषा

अभिवादन १:१,२

(I) तुमच्या तारणाविषयी जाणून घ्या. १:३-११

(II) तुमच्या वचनांचे ज्ञान करून घ्या. १:१२-२१

(III) तुमचे विध्वंसक समजून घ्या. २:१-२२

(IV) तुमची भाकिते जाणून घ्या. ३:१-८

प्रकरण २६

योहानाचे १ ले पत्र

लेखक व काळ

योहानाने लिहिलेल्या तीन पत्रांतील हे सर्वांत मोठे पत्र. मंडळी स्थळ किंवा व्यक्तीचा नाम उल्लेख नसल्याने या पत्राला सर्वसाधारण पत्र म्हणतात. त्याला प्रस्तावना, अभिवादन किंवा समारोप असा पत्राचा साचा नसला तरी त्याचा आशय व सूर लक्षात घेता त्याला पत्र म्हणणेच उचित ठरते. तेव्हा प्रेषित योहान हयात होता, मंडळयांत सर्वांच्या परिचयाचा होता, तो अधिकारवाणीने आपल्या वाचकांना पूर्ण आज्ञापालनाचे आव्हान करत होता. तो वाचकांना व वाचक त्याला इतके परिचित होते. हे त्यानेच आपल्याला पत्र लिहिले असल्याबद्दल कोणालाही शंका नव्हती त्यामुळे योहानाला आपल्या नावाचा उल्लेख करायची गरजही वाटली नाही.

याकोब व योहान हे जब्दीचे पुत्र. येशूने त्यांचे नाव 'गर्जनेचे पुत्र' असे ठेवले होते (मार्क ३:१७;; मत्तय १०:२-४). पेत्र, याकोब व योहान येशूचे निकटवर्ती शिष्य होते (मत्तय १७:१). त्यामुळे योहान येशूच्या सेवेचा प्रत्यक्ष साक्षी होता. (१:१-४). योहानाचे शुभवर्तमान त्यानेच लिहिले. त्यात तो स्वत:चा उल्लेख 'ज्याच्यावर येशूची प्रीती होती' असा करतो. शेवटल्या भोजनाच्या वेळी येशूच्या उराशी टेकलेला असा त्याचा उल्लेख आहे (योहान १३:२३; १९:२६; २०:२; २१:७,२०). प्रकटीकरणाचे पुस्तक त्यानेच लिहिले (प्रकटी १:१).

या पुस्तकात ऐतिहासिक नोंद नसल्याने लिखाणाचा अचूक कालावधी सांगणे कठीण आहे. तरी पहिल्या शतकाअखेर ते लिहिले याबद्दल वाद नाही. योहान आपल्या वृद्धापकाळी आशिया मायनरमधील इफिसात राहून सेवेत व लिखाणकामात कार्यरत होता असे मंडळीच्या आख्यायिका सांगतात. 'माझ्या मुलांनो' (२:१,१८,२८) असे संबोधून वाचकांपेक्षा आपण वृद्ध असल्याचे तो स्पष्ट सूचित करतो. योहानाच्या शुभवर्तमानाचा सूरही असाच आहे. त्यामुळे शुभवर्तमानानंतर लगेच ही पत्रे लिहिल्याचे संकेत मिळतात. शिवाय अज्ञेयवादाला सुरुवात झाली तेव्हाच योहान लिखाणात कार्यरत असताना ते लिहिल्याचे त्यातील आशयावरून दिसते. दोमितीयनने ९५ साली छळ सुरू केला. त्याचा उल्लेख पत्रात नसल्याने इ स ९० -९५ दरम्यान ते लिहिल्याचे सूचित होते.

पार्श्वभूमी

जरी योहान तेव्हा फार वृद्ध होता तरी तो मंडळीच्या कामात जोमाने सहभागी होता. येशूचा भूतलावरील संपूर्ण सेवाकाल, मरण, पुनरुत्थान व स्वर्गारोहणाचा तो जवळचा प्रत्यक्ष साक्षी होता. त्यानंतर आशिया मायनरमध्ये राहून त्याने व्यापक सुवार्ताकार्य केले; नवीन मंडळयांची देखभाल केली व मोठ्या प्रमाणात लिखाणकाम केले. नव्या करारातील पाच पुस्तके लिहिली. त्याच्याशी थेट संबंध असलेल्या मंडळीच्या पपियास या वडीलाने त्याचे वर्णन ‘जिवंतपणे वास्तव्यास असणारी वाणी ' असे केले आहे. या शेवटच्या प्रेषिताची मंडळीतील साक्ष मंडळयांमध्ये अत्युच्च अधिकृत मानली जात होती. त्याच्या तोंडून येशूविषयी प्रथम दर्शनी साक्ष ऐकायला लोक सतत अतिशय उत्सुक असत.

इफिस हे आशिया मायनर मधील बौद्धिक केंद्र होते. पौलाच्या भाकिताप्रमाणे (प्रे कृ २०:२८-३१) मंडळीतूनच खोटे शिक्षक उठत होते. तेव्हाच्या वाढत्या प्रचलित तत्त्वज्ञानाकडे झुकत होते. मंडळयांना खोट्या सिद्धांतांची लागण होत

होती. प्रेषितांच्या मूलभूत शिक्षणाला ते भ्रष्ट करत होते. खोट्या शिक्षकांच्या नवीन कल्पनांना कालांतराने "अज्ञेयवाद" म्हणून ओळखले जाऊ लागले. पौलाने नियम शास्त्रमुक्तीचा मोठा लढा दिल्यानंतर पहिल्या तीन शतकात आरंभीच्या मंडळीला अज्ञेयवादाच्या धोकादायक पाखंडाने मोठी दहशत घातली. मंडळीच्या मूलभूत विश्वासाला धमकी देणाऱ्या या जहाल पाखंडाशी प्रारंभीच योहान द्वंद्व युद्ध करतो.

प्लेटोचा या अज्ञेयवादावर प्रभाव पडला होता. त्याचा द्वैतवादाचा दावा असा होता की भौतिक गोष्टी मुळात पाप आहेत व आत्मा चांगला आहे. ही कल्पना गृहीत धरून परिणामी हे खोटे शिक्षक येशूचे देवत्वाचे काही गुण मान्य करीत असले तरी त्याचे मानवत्व निष्पाप राहू शकत असल्याचे मानत नव्हते. खोल गोष्टींच्या उच्च सत्यांचे आकलन होणाऱ्यांचेच ज्ञान वरचढ असते असा त्यांचा दावा होता. ते म्हणत की रहस्यमय सत्याचे ज्ञान देवाच्या वचनापेक्षाही उच्च आहे.

मानवी कल्पनांचा न्याय करायला देवाच्या वचनाला उभे राहू देण्याऐवजी मानवी ज्ञान देवाच्या प्रकटीकरणाचा न्याय करायला उभे राहात होते (२:१५-१७). त्यांचे एक मत होते की येशूचे शरीर खरे नसून ते वरवर तसे वाटत होते. म्हणून योहान ठामपणे त्याच्या शरीराचे खरेपण ठासून सांगताना आपल्या वाचकांना प्रत्यक्ष साक्षी म्हणून आपण त्याला पाहिले, ऐकले, न्याहाळले , स्वहस्ते चाचपले असल्याचे 'येशूख्रिस्त देह धरून आला ' असे सागतो. (१:१-४; ४:२,३). त्यांचे दुसरे मत होते की मानवी देहाच्या येशूवर बाप्तिस्म्याच्या वेळी पवित्र आत्मा उतरला पण तो वधस्तंभी जाण्यापूर्वी त्याला सोडून गेला. योहान त्याला प्रत्युत्तर देताना म्हणतो की सेवेच्या आरंभी बाप्तिस्मा घेताना येशू जशी व्यक्ती होता तशीच तो वधस्तंभी गेला तेव्हा होता (५:६).

असली पाखंडी मते येशूच्या खऱ्या मानवधारी होण्याच्या सत्याचा विध्वंस करतातच एवढेच नव्हे तर त्याचे बदलीच्या प्रायश्चित्ताच्या मरणाच्या सत्याचाही विध्वंस करतात. यासाठीच तर येशू खरा देव व शरीराने खरा मानव असणे अगत्याचे होते. म्हणूनच त्याने खरोखरचे दु:खसहन केले व आपल्या पापांबद्दल बदलीच्या मरणाने पित्याला मान्य होणारे असे आपल्या शरीराचे वधस्तंभावर अर्पण केले (इब्री २:१४-१७). बायबलचा दृष्टिकोन येशूचे पूर्ण मानवत्व व पूर्ण देवत्व ठामपणे मांडतो.

अज्ञेयवाद भौतिक गोष्टी वाईट व आत्मा चांगला आहे असे मांडत असल्याने लोकांची अशी कल्पना होऊ लागली की शरीराचे अनैतिक लाड करायला हरकत नाही. कारण शरीराने केलेल्या पापाचा आत्म्याशी काही संबंध नाही व त्यावर त्याचा काही परिणामही होत नाही. मग अनैतिक वर्तनाला आपल्याला परवानगी आहे. पाप अस्तित्वात नाही असे म्हणण्याची कल्पना रुजू लागली होती (१:८-१०). देवाच्या नियमांचा लोक अनादर करू लागले होते (३:४). देवाच्या नियमांचे पालन करण्याच्या योहान जोर देतो. कारण देवावरील प्रीतीची व्याख्या तो देवाचे आज्ञापालन करण्याशी करतो (५:३). विश्वासी बंधुजनांबद्दल प्रेम न वाटणे हे खोट्या शिक्षकाचे लक्षण आहे, विशेषत: त्यांची नवी विचारप्रणाली धिक्कारणाऱ्यांचा ते प्रतिकार करतात (३:१०-१८). जे प्रेषितीय शिक्षणाला धरून राहिले त्याच्या सहभागितेपासून फसलेल्या अनुयायांना त्यांनी वेगळे केले होते. त्याला उत्तर देताना योहान म्हणतो की, त्यांच्या या विभक्त होण्यातून हेच निर्देशित होते की ह्या खोट्या शिक्षकांमागे जाणाऱ्या अनुयायांचे खऱ्या अर्थाने तारणच झाले नव्हते (२:१९). त्यांच्या जाण्याने प्रेषितीय शिक्षणाशी विश्वासू राहिलेल्या विश्वासीयांना मोठा धक्का बसला होता. या परिस्थितीला प्रतिसाद देताना हा वृद्ध प्रेषित उरलेल्या विश्वासीयांना खात्री देतो व मंडळीला असलेल्या या गंभीर धाकाशी द्वंद्व करतो. या पाखंडाची तीव्रता भयानक धोक्याची होती आणि तो काळ मंडळीसाठी फारच महत्त्वाचा होता, कारण या खोट्या शिक्षणाने अतिशय जोर धरला होता. त्यामुळे योहान सौम्यतेने, प्रेमाने प्रश्न न करता प्रेषितीय

अधिकाराने मंडळ्यांना हे पत्र पाठवतो व मरीप्रमाणे फैलावत चाललेल्या या खोट्या शिक्षणावर आपला प्रभाव पाडतो.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानाचे विषय

पत्रामागची परिस्थिती विचारात घेता १ ले योहानचा सर्वसाधारण विषय "मूलभूत विश्वासाचे स्मरण" किंवा "ख्रिस्ती मूलभूत सिद्धांतांकडे परतणे" हा आहे. प्रेषित योहान मतप्रणाली किंवा तर्क नव्हे तर खात्री असण्यावर जोर देतो. अगदी सोप्या भाषेत तो शुद्ध ख्रिस्ती चारित्र्य स्पष्ट करतो. त्याची भाषा सुस्पष्ट, समजेल अशी अचूक व त्या सत्याच्या मूलभूत स्वरूपाविषयी शंका राहू देणार नाही अशी आहे. उबदार, संवादात्मक भाषेत हा मृदू बाप हळूवार व प्रेमळ स्वरात आपल्या मुलांशी घनिष्ठ संवाद साधत आहे असा अनुभव येतो.

आपल्या लोकांविषयीच्या हृदयपूर्वक काळजीतून एका पाळकाने आपल्या मंडळीला लिहिलेले हे पाळकीय पत्रही आहे. मेंढपाळ म्हणून योहान आपल्या कळपाला काही मूलभूत, पण अत्यावश्यक मूलभूत विश्वासाविषयीच्या सिद्धांतांची पुन्हा खात्री करून देतो. खोट्या शिक्षकांच्या शिकवणीमुळे, तसेच काही जण सोडून गेले म्हणून अस्वस्थ न होता त्यांच्या विश्वासाच्या खात्रीविषयी त्यांनी आनंद करावा अशी योहान इच्छा करतो (१:४).

पुस्तकाचा दृष्टिकोन पाळकीय तर आहेच पण सकारात्मक व नकारात्मक वादविवादाचाही आहे. जे सुशिक्षणाला सोडून गेले ते चुकले असल्याचे तो सिद्ध करतो, दैवी सत्याचा विपर्यास करणाऱ्यांचे खपवून घेतले जाणार नाही हे प्रदर्शित करतो. सत्यापासून बहकून जाणाऱ्यांना तो "खोटे संदेष्टे" (४:१); " बहकवणारे " (२:२६;३:७); “ख्रिस्तविरोधी” (२:१८) असे संबोधतो. सुशिक्षणापासून अशा बहकणाऱ्यांची ओळख करून देताना त्यांचा उगम सैतानात असल्याचे तो मार्मिकपणे सांगतो (४:१-७).

या प्रमुख विषयाला धरून तो तीन उपमुद्दे ख्रिस्ती विश्वासाचा मूलभूत पाया मजबूत करायला सांगतो – आनंद (१:४), पावित्र्य (२:१) व संरक्षण (५:१३). या मूलभूत विश्वासूपणामुळे त्याचे वाचक आपल्या जीवनात हे तीन परिणाम सातत्याने अनुभवणार होते.

या पत्रात खऱ्या आत्मिकतेच्या चक्राची किल्ली या तीन गोष्टी प्रकट करतात - येशू ख्रिस्तावरील योग्य विश्वास त्याच्या आज्ञांचे पालन करणे निपजवतो; आज्ञापालनातून देवावरील प्रीती व इतर विश्वासीयांशी सहभागिता ही व्यक्त होतात (३:२३,२४). जेव्हा सुशिक्षणावरील दृढ विश्वास, आज्ञापालन, प्रीती या तीन गोष्टी एकत्रितपणे कार्यरत असतात तेव्हा त्याचा परिणाम आनंद, पावित्र्य व खात्री हा असतो. खऱ्या ख्रिस्तीत्वाचा हाच पुरावा होय.

विचार करा

खोट्या संदेष्ट्यांची विचारप्रणाली न मांडता योहान ख्रिस्ती मूलभूत विश्वासाचे पुन्हा प्रतिपादन करून पाखंडी मतांचे खंडन करीत आपला वाद मांडतो. योहान फक्त २:१,२ मध्ये परिस्थिती उदाहरणादाखल घेऊन सिद्धांत मांडतो. बाकी संपूर्ण पत्रात काळ्या दगडावरील पांढऱ्या रेघेप्रमाणे सुस्पष्ट रीतीने सिद्धांत सांगतो. उदा. प्रकाश विरुद्ध अंधार (१:५-७;२:८-११); सत्य- असत्य (२:२१,२२;४:१); देवाची मुले व सैतानाची मुले (३:१०). जे ख्रिस्ती म्हणवतात त्यांनी

खरी ख्रिस्ती लक्षणे जीवनातून दर्शवलीच पाहिजेत. ती म्हणजे सिद्धांत शिक्षणाचे दृढ ज्ञान, प्रीती व आज्ञापालन. जे नव्याने जन्मले आहेत त्यांना देव नवीन स्वभावच देतो. स्वभावबदल हाच मोठा पुरावा होय. जे नवीन जीवनाची लक्षणे आपल्या जीवनात दर्शवीत नाहीत त्यांच्या ठायी तो नवीन स्वभाव नसतोच. म्हणजे त्यांचा खरोखर नवीन जन्मच झालेला नसतो. एखाद्या व्यक्तीचे खरोखर तारण झाले आहे की नाही हे निश्चित करण्यास मूलभूत कसोट्यांचे लागूकरण करायला हे पत्र सांगते. शुद्धतेचे वेगळेपण हे योहानाच्या शुभवर्तमानाचे देखील विशेष लक्षण आहे. योहान पुन्हा पुन्हा खऱ्या ख्रिस्ती जीवनाच्या मूलभूत सत्यांची पुनरावृत्ती करतो. प्रत्येक वेळी ते सत्य विस्ताराने मांडत जातो व मोठे क्षेत्र व्यापत राहातो. प्रत्येक वेळी ते सत्य अंतर्यामाला खोलवर भोसकून जाते. अशाने तो या सत्यांना किती महत्त्व आहे हेच दाखवून देऊन आपल्या वाचकांना ती समजून घेऊन लक्षात ठेवायला मदत करतो.

रूपरेषा

(I) चक्राचा पहिला वेढा - खऱ्या सहभागितेच्या मूलभूत कसोट्या. १:१-२:१७

(अ) सिद्धांताची मूलभूत कसोटी (१:१-२:२). ख्रिस्ताविषयी व पापाविषयी बायबलचा दृष्टिकोन.

(ब) नैतिकतेच्या मूलभूत कसोट्या (२:३-१७). आज्ञापालनाचा व प्रीतीचा बायबलचा दृष्टिकोन; देवाला अपेक्षित असणारी प्रीती (२:१-७) व देवाला द्वेष्य वाटणारी प्रीती (२:१२-१७).

(II) चक्राचा दुसरा वेढा - खऱ्या सहभागितेच्या मूलभूत कसोट्या. २:१८-३:२४

(अ) सिद्धांतिक कसोट्या (२:१८-२७). ख्रिस्तविरोधी ख्रिस्ती सहभागिता सोडून देतात. (१८-२१). ख्रिस्ती विश्वास नाकारतात (२२-२५). विश्वासू ख्रिस्ती लोकांना फसवतात (२६,२७).

(ब) नैतिक कसोट्या (२:२८-३:२४). प्रभूच्या पुनरागमनाची आशा शुद्धीकरण करत राहाते.२:२८-३:३ ख्रिस्ती व्यक्तीची पापाशी स्पर्धा नाही (३:४-२४) . नीतिमत्त्वाची अपेक्षा (३:४-१०). प्रीतीची अपेक्षा ३:११-२४.

(III) चक्राचा तिसरा वेढा - खऱ्या सहभागितेच्या मूलभूत कसोट्या. ४:१-२१

(अ) सैद्धांतिक कसोटी (४:१-६). सैतानी खोट्या शिक्षणाचा उगम (४:१-३). सुशिक्षणाची गरज (४:४-६).

(ब) नैतिक कसोटी (४:७-२१). देवाचा प्रीतीचा गुणविशेष (४:७-१०) देवाची प्रीतीविषयी अपेक्षा (४:११-२१),

(IV) चक्राचा चौथा वेढा - खऱ्या सहभागितेच्या मूलभूत कसोट्या. ५:१-२१

(अ) ख्रिस्तामध्ये विजयी जीवन. ५:१-५

(ब) ख्रिस्ताविषयी देवाची साक्ष. ६-१२

(क) ख्रिस्तामुळे मिळणारी खात्री. १३-२१

सार्वकालिक जीवनाची खात्री. व.१३

प्रार्थनेचे उत्तर मिळाल्याची खात्री. १४-१७

पाप व सैतानावर विजय मिळाल्याची खात्री. १८-२१

प्रकरण २७

योहानाचे २ रे पत्र

लेखक व काळ

दुसरे व तिसरे पत्र एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीला लिहिलेली छोटी पत्रे असून त्यांचे स्वरूप त्या काळच्या ग्रीक - रोमन पद्धतीचे आहे. तो या पत्रात स्वत:ला वडील म्हणतो त्यावरून तो वृद्ध झाला होता याला पुष्टी मिळते. ख्रिस्तापासून त्याच्या सेवेत असल्यामुळे मंडळीच्या पायाभरणीच्या वेळी असलेला त्याचा प्रेषितीय अधिकार व प्रतिष्ठित दर्जा सूचित होतो. १ल्या पत्रापाठोपाठ त्याच्या आयुष्याच्या अखेरच्या काळात इ स ९०-९५ दरम्यान त्याने हे पत्र लिहिलेले दिसते.

पार्श्वभूमी

अज्ञेयवादाची नुकतीच सुरुवात होऊन मंडळीला खोट्या शिक्षकांपासून त्याचा धक्का बसत असतानाच हे पत्र १ योहान प्रमाणेच लिहिले आहे (व.७). फरक एवढाच की पहिल्या पत्रात कोणा व्यक्ती किंवा गटाचा उल्लेख नाही, तर हे पत्र एका स्थानिक भक्तीगटाला उद्देशून आहे. खोटे शिक्षक आदरातिथ्याचा गैरफायदा घेऊन योहानाच्या मंडळीतील लोकांमध्ये शिरून लोकांना आपल्या खोट्या शिक्षणाकडे वेधून घेत होते (व.१०,११; रोम १२:१३; इब्री १३:२; १ पेत्र ४:९). अशा फसवणूक करणाऱ्यांचे आदरातिथ्य करू नये असा गंभीर इशारा हा प्रेषित देत आहे. जरी त्याचा हा बोध वरवर कठोर व निर्दयतेचा वाटत असला तरी त्यांच्या शिक्षणाने तीव्र धोका पोचवणाऱ्यांसाठी हीच कृती न्याय्य होती, कारण ते तर मूलभूत विश्वासाच्या पायाचाच नाश करत होते (व.९).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

हे पत्रही १ योहान प्रमाणे मूलभूत विश्वासाकडे वळण्याचे पाचारण करते. ख्रिस्तित्वाच्या पायाकडे परत आणते (व. ४-६).

सारांशाने सत्य, प्रीती व आज्ञापालनावर आपली निष्ठा एकवटायला सांगते. आदरातिथ्याविषयी बायबल आधारित शिक्षण या पत्रात आहे. मूलभूत सत्यावर निष्ठा ठेवत असतानाच रोम १२:१३ प्रमाणे आदरातिथ्यही करायचे आहे. बायबलची प्रेषितीय शिक्षणाची सत्ये अनुसरणाऱ्यांमध्ये विश्वासीयांचे प्रीतीने आदरातिथ्य करणे असले पाहिजे. आपण विश्वासी असल्याचा दावा करणाऱ्या कोणाचेही आदरातिथ्य करायचे नाही.आत्म्यांची पारख करून प्रीती करायची. मूलभूत सत्यांवर निष्ठा ठेवणाऱ्यांनाच आदरातिथ्य व चांगुलपणाची कृत्ये करायची. नाहीतर मूलभूत विश्वासाचा नाश करणाऱ्यांनाच ख्रिस्ती लोक मदत करत राहातील. सुशिक्षण ही सहभागितेची कसोटी असावी. जे खरोखर ख्रिस्ती विश्वासी आहेत व जे केवळ ख्रिस्ती असल्याचा दावा करणारे आहेत याच्यात भेद असला पाहिजे (रोम १६:१७; गलती १:८,९; २ थेस्स ३:६,१४; तीत३:१०).

सर्वधर्मसमभावासाठीची ओरड व ख्रिस्ती विश्वासीयांमधील ऐक्य ही दोन भिन्न टोके असल्याबद्दल योहान ठाम भूमिका घेतो. प्रीती व सत्य या ख्रिस्तीत्वाच्या अतूट गोष्टी आहेत (इफिस ४:१५). सत्याच्या कसोटीत प्रीती उत्तीर्ण झाली पाहिजे.या पुस्तकाचा प्रमुख विषय आहे की प्रीतीच्या सीमा सत्य ठरवते व त्याचा परिणाम ऐक्यात होतो.

म्हणून प्रीतीने ऐक्य घडवून आणण्यापूर्वी सत्य अस्तित्वात असले पाहिजे, कारण सत्यच प्रीतीची उत्पत्ती करते (१ पेत्र २:२२). जेव्हा कोणी सत्याशी तडजोड करतो तेव्हा ख्रिस्ती प्रीती व ऐक्य नाश पावते. जेव्हा ऐक्याचा सत्य हा पाया नसतो तेव्हा केवळ उथळ भावनिकता अस्तित्वात असते. हे पत्र त्या स्त्रीला व तिच्या मुलांना लिहिले आहे हेच लक्षात ठेवावे.

रूपरेषा

(१) ख्रिस्ती आदरातिथ्याचा मूलाधार. व १-३

(२) ख्रिस्ती आदरातिथ्यातील आचरण. व ४-६

(३) ख्रिस्ती आदरातिथ्याच्या सीमा. व ७-११

(४) ख्रिस्ती आदरातिथ्याचे आशीर्वाद. व १२,१३

प्रकरण २८

योहानाचे ३ रे पत्र

लेखक व काळ

लेखक स्वत:ला वडील संबोधतो. यावरून तो वयोवृद्ध झाल्याचे सूचित होते. तसेच त्याचा अधिकार व ख्रिस्ताचा प्रत्यक्ष साक्षी असल्याने मंडळीत त्याला असलेला उच्च दर्जा लक्षात येतो. इ स ९०-९५ दरम्यान २ऱ्या पत्रा पाठोपाठ हे पत्र पाठवले असे दिसते. आयुष्याच्या अखेरच्या काळात इफिसात सेवा करत असतानाच हे पत्र लिहिले.

पार्श्वभूमी

१ ले पत्र आशिया मायनरमध्ये पांगलेल्या मंडळयांना लिहिले. २ रे पत्र एका स्त्रीला व तिच्या परिवाराला लिहिले तर ३ रे पत्र 'प्रिय गायसला' लिहिले. फिलेमोनप्रमाणेच हे पत्र फक्त गायसला लिहिले. गायस हे नाव पहिल्या शतकात फार प्रचलित होते. पण या अभिवादनाखेरीज या व्यक्तीविषयी फारशी माहिती नाही. योहानाचा ज्या मंडळयांशी संबंध होता व आध्यात्मिक देखरेख होती त्या मंडळयांपैकी हा सदस्य होता असे दिसते. ३ रे पत्र आदरातिथ्याच्या मूलभूत समस्येवर बोलते. तर २ रे पत्र खोट्या शिक्षकांचे आदरातिथ्य न करण्यासाठी इशारा देते. वचनाची प्रामाणिकपणे सेवा करणाऱ्यांचे नीट आदरातिथ्य करण्यात कमी पडल्याबद्दल दोष देते (व ९,१०). प्रेषिताकडे असे अहवाल गेले की त्याने शिफारस केलेले व त्याच्या परिचयाचे शिक्षक एका मंडळीत गेले असता त्यांनी त्यांचे आदरातिथ्य करण्यास, त्यांचे राहणे खाणेपिणे पाहण्यास नकार दिला. दियत्रफेसने मडळीत आपलेच म्हणणे लावून धरले (व १०) व एवढ्यावरच न थांबता प्रेषित योहानालाही अपशब्द वापरले व मंडळीतील कोणीही मदत करू नये म्हणून दहशत घातली.

याउलट प्रेषित योहानाचा प्रिय मित्र व सत्यावर निष्ठा असणाऱ्या गायसने योग्य दर्जाची त्यांना ख्रिस्ती सेवा दिली. सुवार्तेच्या योग्य प्रतिनिधींना गायसने ज्या प्रतीची सेवा पुरवली, त्याबद्दल योहान त्याची प्रशंसा करतो (व ६-८) तर दियत्रफेसच्या कृतीचे खंडन करतो आणि हे पत्र बंधुजनांमध्ये उत्तम साक्ष असलेल्या देमेत्रियच्या हस्ते हे पत्र पाठवून व्यक्तिश: ही परिस्थिती सुरळीत करण्याचे वचन देतो (व. १०-१२).

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे मुद्दे

योग्य दर्जाचे ख्रिस्ती आदरातिथ्य केल्याबद्दल प्रशंसा व न केल्याबद्दल कानउघाडणी करणारे हे पत्र आहे. दियत्रफेसची समस्या उद्धटपणा व अवज्ञा ही होती. खोट्या शिक्षकांची व कर्मठांची ही समस्या असते.

रूपरेषा

(I) ख्रिस्ती आदरातिथ्याबद्दल प्रशंसा. व १-८

(II) ख्रिस्ती आदरातिथ्यात बिघाड आणल्याबद्दल दोष. व ९-११

(III) ख्रिस्ती आदरातिथ्याविषयी समारोपाचे शब्द. व १२-१४

प्रकरण २९

यहूदाचे पत्र

लेखक आणि काळ

यहूदाने लिहिलेल्या पत्राच्या नावातच त्याचा लेखक म्हणून उल्लेख आहे.
हा यहूदा व त्याचे इतर ३ भाऊ येशूचे अर्धे भाऊ आहेत कारण हे चारही भाऊ मरिया व योसेफाद्वारे विज्ञानाच्या मानवी नियमाप्रमाणे जन्मले होते, तर येशू केवळ मरीयेद्वारे पवित्र आत्म्याने जन्मला होता (लूक ६:१६. प्रे.कृ.१:१३).
याकोबाचे पत्र लिहिणारा व यहूदा हे दोघे भाऊ आहेत.
ह्या निष्कर्षाचे कारण (१) प्रे. कृ. १५ नुसार यहूदा स्वत:ला ज्या याकोबाचा भाऊ संबोधतो, तो याकोब हा यरुशलेमेच्या मंडळीचा व धर्मसभेचा पुढारी होता (यहूदा वचन १ व गलती १:१९.).
(२) यहूदाच्या व याकोबाच्या पत्रातील पहिल्या वचनाच्या अभिवादनात साम्य आहे.
(३) वचन १ व १७ वरून यहूदा स्वत:ची प्रेषित म्हणून ओळख करून न देता त्यांच्याहून स्वत:ला भिन्न सादर करतो.
यहूदा सिद्धान्तांच्या व नैतिकतेच्या धर्मत्यागाबद्दल चर्चा करतो (वचने ४-१८), ती २ पेत्रामधील २:१-३:४ शी मिळती जुळती वाटते. पण अनेक कारणांस्तव पेत्राच्या पत्राचा काळ त्याच्या पूर्वीचा आहे.

(१) २ पेत्र खोट्या शिक्षकांचे उद्भवणे गृहीत धरतो (२ पेत्र २:१-२; ३:३). तर यहूदा त्यांच्या आगमनाचा समाचार घेतो (४;११;१२;१७,१८).
(२) आणि यहूदा थेट २ पेत्र ३:३ चा संदर्भ घेऊन तो प्रेषितांकडून घेतल्याचे स्पष्ट करतो (व १७,१८). यहूदाने ७० साली झालेल्या यरुशलेमेच्या नाशाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे जरी २ पेत्र इ स ६८-७० च्या कालावधीत लिहिलेले असले तरी यहूदाचे पत्र यरुशलेमाच्या विनाशाआधीच लिहिले गेल्याचे स्पष्ट होते. १करिंथ ९:५ नुसार यहूदा इतर बंधुजनांसोबत व त्यांच्या स्त्रियांसोबत मिशनरी फेऱ्यावर जात असला तरी त्याने बहुधा हे पत्र यरुशलेमातूनच लिहिल्यासारखे वाटते. नेमक्या कोणत्या श्रोतृवर्गाशी तो पत्रव्यवहार करीत आहे ते नक्की सांगता येत नाही. पण यहूदा जी उदाहरणे देतो त्यावरून तो यहूदी वर्ग असावा असे वाटते. ज्या प्रांतांना नुकतीच खोट्या शिक्षकांकडून खोट्या शिक्षणाच्या महामारीच्या रोगाची लागण झाली आहे अशांना तो लिहीत आहे यात शंकाच नाही. जरी यहूदाने यापूर्वी योहान ७:१-९ नुसार येशूचा मशीहा म्हणून धिक्कार केला होता, तरी आपल्या इतर अर्ध्या भावांबरोबर त्याचेही प्रे.कृ. १:१४ नुसार ख्रिस्ताच्या पुनरुत्थानानंतर परिवर्तन झाले होते. येशूशी असलेले त्याचे नातेसंबंध, पुनरुत्थित ख्रिस्ताला पाहिल्याचा तो प्रत्यक्ष साक्षी असल्याने, आणि या पत्रातील मजकूर यावरून हे पत्र ईश्वरप्रेरित असल्याचे मान्य होऊन पवित्र शास्त्राच्या पुस्तकांमध्ये त्याचा समावेश करण्यात आला. अनेकांचा कल त्याने हे पत्र २ पेत्रानंतर लिहिल्याकडे होता. पण पेत्राने जर यहूदाच्या लिखाणाचा उल्लेख केला असता तर पेत्राच्या शिफारसीमुळे कालावधीचा प्रश्नच उद्भवला नसता.

पार्श्वभूमी

यहूदा अशा काळात राहात होता, जेव्हा ख्रिस्ती विश्वासावर रोमी साम्राज्याकडून गंभीर राजकीय हल्ले होत होते. हल्लेखोर अज्ञेयवादी विरोधक व उदारमतवादी खोट्या सिद्धांतांचे विपुल बी पेरून चुकीच्या शिक्षणाचे प्रचंड पीक

काढत होते. पुढे २५ वर्षांनी प्रेषित योहान याच अग्रेसर अज्ञेयावादाचा त्याच्या पत्रांमधून समाचार घेताना दिसतो. प्रेषित योहानच पहिल्या शतकाच्या अंतापर्यंत जिवंत होता, बाकी सर्व प्रेषित तोपर्यंत रक्तसाक्षी झाले होते. आणि ख्रिस्ती विश्वास अत्यंत परिणामकारक समजला जात होता.

सत्यासाठी असा तीव्र आत्मिक लढा चालू असता यहूदा मंडळीला हा लढा देण्यास पाचारण करीत आहे.

ऐतिहासिक व ईश्वर विज्ञानाचे मुद्दे यहूदाचे हे एकच नव्या कराराचे पुस्तक फक्त 'धर्मत्याग' म्हणजे बायबल आधारित विश्वासाच्या खऱ्या सत्यापासून बहकणे, याविषयी समाचार घेण्यास समर्पित केलेले आहे असे आढळते. धर्मत्यागाचे इतरत्र वर्णन २ थेस्स. २:१०; इब्री १०:२९; २ पेत्र २:१-२; १ योहान २:१८-२३; मध्ये आहे. तो लिहितो; धर्मत्यागाला निंद्य लेखा आणि विश्वासीयांना विश्वासासाठी लढा द्यायला गळ घाला.

तो मंडळीला आत्म्यांची पारख करायला आणि कडा पहारा देऊन बायबल आधारित सत्यांचे रक्षण करायला पाचारण करतो. तो यापूर्वीच्या लोकांचे कित्ते अनुसरतो (१) ख्रिस्त - मत्तय ७:१५; १६:६-१२; २४:११; प्रकटी २:३. (२) पौल - प्रे.कृ. २०:२९-३०; १ तीम. ४:१; २ तीम. ३:१-५; ४:३-४. (३) पेत्र - २पेत्र २:१-२; ३:३-४. (४) योहान - १ योहान ४:१-६; २ योहान ६-११.

यहूदाचे पत्र ऐतिहासिक उदाहरणांनी पूर्ण भरलेले आहे. त्यात पुढील संदर्भांचा समावेश आहे
(१) निर्गम - वचन ५; (२) सैतानाचे बंड - वचन ६ (३) सदोम गमोरा - वचन ७ (४) मोशेचा मृत्यू - वचन ९
(५) काईन - वचन ११ (६) बलाम - वचन ११ (७) कोरह - वचन ११ (८) हनोख - वचन १४-१५ (९) आदाम - वचन १४.

धर्मत्याग करणाऱ्याच्या शीलाचे तो असंवेदनशील कृत्ये करणारे अशा परखड शब्दात वर्णन करतो (वचने ४, ८, १०, १६, १८, १९). याखेरीज तो निसर्गातून काही उदाहरणे वापरून त्यांच्या निष्फळ शिकवणीचे वर्णन करतो (वचने १२-१३). त्यांच्या खोट्या शिक्षणाच्या विशिष्ट मुद्द्यांवर तो काहीच टिप्पणी करत नाही. त्यांची वैयक्तिक जीवने कशी खंगत जाणारी आहेत आणि त्यांची सेवा कशी शुष्क व निष्फळ आहे आणि त्यांचे चुकीचे शिक्षण खरे म्हणून शिकवणे हे त्यांचाच कसे विश्वासघात करणारे आहे हे प्रदर्शित करणे त्याला पुरेसे वाटले. त्यांच्या चारित्र्यावर जोर देऊन केलेल्या या वर्णनाने परत त्यांचे खोटे शिक्षण व वैयक्तिक भ्रष्टाचार हा विषय पुन्हा अधोरेखित केला आहे. त्यांचे शिक्षण म्हणजे कपटी, चतुर, फसवणूक करणारे, मोहजालात अडकवणारे, अशा अनेक स्वरूपांचे आहे. ते ओळखण्याचा सर्वसामान्य मार्ग म्हणजे त्यांच्या बाह्य खोट्या आत्मिकतेमागे काय आहे याचा शोध घेऊन त्यांचे दुष्ट भ्रष्ट जीवन समजून घ्यायचे (२ पेत्र २: १०, १२, १८, १९).

अर्थ समजण्यातील आव्हाने

या पुस्तकात कोणतेच सैद्धांतिक विषय हाताळलेले नाहीत. त्यामुळे अध्यायातील योग्य अर्थ नेहमीच्या प्रक्रियेने शोधून काढणे हे आव्हान राहते. तो २ तीम.३:१६; २ पेत्र १:२०-२१ नुसार पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लिहीत असल्याने हनोख वचन १४ व मोशे वचन ९ हे लिखाणही अचूक, सत्य, विश्वसनीय आहे. तो पौलापेक्षा निराळे असे काहीही करत नाही.

रूपरेषा

१- यहूदाची इच्छा. व १-२

२- धर्मत्याग करणाऱ्याविरुद्ध जाहीर लढा. व ३-४

३- धर्मत्यागाचा निंद्य परिणाम वचने. व ५-७

४- धर्मत्याग करणाऱ्यांवर उघड दोषारोप. व ८-१६

५. धर्मत्यागापासून बचाव. वचने १७-२३

६. यहूदाचे स्तुतिगीत. वचने २४-२५

प्रकरण ३० # प्रकटीकरण

लेखक व काळ

प्रकटीकरण म्हणजे "उलगडा" "अच्छादन काढणे" "उकल करणे" ‘‘उघडणे." नव्या करारात याचा अर्थ आत्मिक सत्यांचे अच्छादन काढणे (रोम १६:२५; गलती १:१२; इफिस १:१७;३:३). काय उलगडले? देवाच्या पुत्रांचा उलगडा (रोम ८:१९); ख्रिस्ताचे मानवधारी होणे (लूक २:३२); ख्रिस्ताचे गौरवी द्वितायागमन (२ थेस्स १:७, १ पेत्र १:७). जेथे कोठे प्रकटीकरण या शब्दाचा वापर होईल तेव्हा त्याचा अर्थ काहीतरी किंवा कोणीतरी लपलेले होते ते आता उघड झाले आहे. हे पुस्तक गौरवी ख्रिस्ताचे प्रकटीकरण करते. त्याच्याविषयीचे व त्याच्या अंतिम गौरवाच्या सत्यांचे प्रकटीकरण करते. देव पित्याने योहानाला हे प्रकटीकरण केले व आपल्या दूताला पाठवून योहानाला ते कळवले (१:१). आपणच लेखक असल्याचे योहान चार वेळा सांगतो (१:१; ४,९; २२:८). योहानकृत शुभवर्मान, तीन पत्रे व प्रकटीकरण ही प्रेषित योहानाचे लिखाण म्हणून पहिल्या मंडळीने स्वीकारली होती व त्या मंडळयांचे वाचक पुढे पहिल्या इतिहासकाराने पुष्टी देत असता जिवंत होते. त्याच्या लिखाणात काही ठळक साम्ये आढळतात. येशूचा "शब्द" म्हणून उल्लेख केला आहे (१:१; योहान १:१). प्रकटी १:७ व योहान १९:३७ मध्ये जखऱ्या १२:१० चे भाषांतर केले आहे. येशूचे कोकरा म्हणून वर्णन केले आहे (५:६,८; योहान १:२९). ख्रिस्ताचे साक्षी म्हणून वर्णन केले आहे (१:५; योहान ५:३१,३२).

प्रकटीकरण इ स ९४-९६ दरम्यान सम्राट दोमितियनच्या राजवटीच्या अखेरच्या काळात (इ.स.८१-९६) लिहिले. त्याला इतिहासकारही पुष्टी देतात.२ व ३ अध्यायात सात मंडळयांच्या झालेल्या अधोगतीचे वर्णनही त्याला पुष्टी देते. पौल जेव्हा आशिया मायनर मध्ये सेवा करत होता तेव्हा ६० सालापर्यंत या मंडळया आत्मिक दृष्ट्या बलवान व निरोगी होत्या. निकलाइतांचे पाखंडी शिक्षण नंतर जोर धरत गेले (२:६,१५). पौलाच्या पत्रात त्या शिक्षणाचा उल्लेख नाही.

पार्श्वभूमी

शेवटी वृद्ध झालेला येशूचा हा एकच प्रेषित उरलेला आहे. त्याला पात्म नावाच्या निर्जन बेटावर बंदीवासात ठेवले आहे. हे बेट इफिसच्या दक्षिणेला एजियन समुद्रात आहे. रोमच्या अधिकाऱ्यांनी त्याला तेथे हद्दपार केले होते, कारण तो विश्वासूपणे शुभवर्तमान घोषित करत होता (१:९). पात्म बेटावर असताना योहानाला दृष्टांतांमागून दृष्टांत झाले, त्यात त्याच्यापुढे जगाचा संपूर्ण भावी इतिहास मांडण्यात आला. योहानाला अटक झाली तेव्हा तो इफिसच्या आणि आसपासच्या मंडळीत सेवा करत होता. त्या सभासदांना बळकटी देत होता.१:११ ची दैवी आज्ञा पूर्ण करण्यास तो स्वत: जाऊन आता सेवा करू शकणार नव्हता. त्यांना उद्देशून योहान हे प्रकटीकरण लिहितो (१:४). मंडळयांना छळाची झळ पोचू लागली होती. आतापर्यंत त्यांचा एक पाळक रक्तसाक्षी झाला होता (२:१३). योहानाला स्वत:ला हद्दपार केले होते. पण आता या प्रेषिताला अत्यंत प्रिय असलेल्या सात मंडळयांवर छळाचे हे वादळ क्रोधाने तुटून पडणार होते (२:१०). त्या मंडळयांना हे प्रकटीकरण आशा देणारे होते: मानवी इतिहासातील सर्व घटनांवर देवाचे नियंत्रण असते, नेहमीच अधर्माचा विजय होतो असे वाटत असले व दुर्जन ताकदवान वाटत असले तरी त्यांचा अखेर नाश ठरलेलाच असतो. ख्रिस्त गौरवाने न्याय करायला व राज्य करायला येणार आहे.

ऐतिहासिक व ईश्वरविज्ञानाचे विषय

प्रकटीकरण हे मुळात भविष्यात्मक विषयाचे असल्याने त्यात १-३ अध्यायांशिवाय फारसा इतिहास नाही. ज्या सात मंडळयांना पत्रे लिहिली त्या तेव्हा आशिया मायनर म्हणजेच सध्याच्या तुर्कस्थानमध्ये अस्तित्वात होत्या. त्या मंडळयांचा स्पष्ट उल्लेख आहे कारण योहानाने तेथे सेवा केली होती.

प्रकटीकरण हे ख्रिस्ताचे पहिले व प्रमुख प्रकटीकरण आहे (१:१). देवाच्या पुत्राचे मंडळयांमध्ये कार्य करत असलेले पुनरुत्थित व गौरवी स्वरूप या पुस्तकात वर्णन केले आहे (१:१). तो विश्वासू साक्षी, मेलेल्यातून पुनरुत्थित झालेल्यांचे प्रथमफळ व जगातील अधिपतींवर सत्ता गाजवणारा (१:५), जो अल्फा व ओमेगा, आरंभ व शेवट, (१:८), 'जो आहे, होता व येणार तो सर्वसत्ताधारी' (१:८), पहिला व शेवटला (१:११), मनुष्याचा पुत्र (१:१३), जो मरण पावला होता पण आता सदासर्वदा जिवंत आहे (१:१८), देवाचा पुत्र (२:१८), जो सत्य व पवित्र (३:७), 'जो आमेन, जो विश्वासू व खरा साक्षी, जो देवाच्या सृष्टीचे आदिकरण (३:१४), 'यहूदा वंशाचा सिंह' (५:५), स्वर्गातील कोकरा, शिक्के मारून बंद केलेली पुस्तकाची गुंडाळी उघडण्यास जो योग्य (६:१), राजासनावरील कोकरा (७:१७), सदासर्वकाळ राज्य करणारा मशीहा (११:१५), देवाचा शब्द (१९:१३), वैभवी असा देवांचा देव व प्रभुंचा प्रभू, आपल्या शत्रुंना जिंकायला गौरवाने व ऐश्वर्याने मंडित होऊन येणारा (१९:११), दाविदाचा अंकुर व संतान, पहाटेचा तेजस्वी तारा आहे (२२:१६).

याखेरीज ईश्वरविज्ञानाचे पुष्कळ स्पष्टीकरण आहे. पापाविषयी मंडळीला इशारा दिला असून पावित्र्यासाठी बोध केला आहे. स्वर्गातील उपासनेचे योहान जे स्पष्ट वर्णन करतो, त्यामुळे तो विश्वासी जनांना उत्तेजन देऊन बोध करतो. या पुस्तकात दुतांची सेवा प्रकर्षाने ठळकपणे दिली आहे. प्रकटीकरणाच्या पुस्तकात भावी काळच्या सिद्धांताचे म्हणजे शेवटच्या दिवसांचे वर्णन केले आहे. त्यात आपण जगाची अखेरच्या काळातील जीवनशैली, मानवी इतिहासातील अखेरची लढाई, ख्रिस्तविरोध्याची कार्यपद्धत व त्याचा अंतिम पराजय आणि दुर्जन व नीतिमानांची अंतिम अवस्था पाहातो. दानीएलाने सर्वाधिक वरचढपणे सांगितल्याप्रमाणे हे पुस्तक जाहीरपणे दाखवून देते की देव सर्व मानवी राज्यांवर नियंत्रण ठेवतो व मानवाकडून अगर अशुद्ध शक्तींकडून कितीही विरोध झाला तरी देव आपला सार्वभौम उद्देश सिद्धिस नेतोच.

विशेष विचार

या पुस्तकात बऱ्याच उपमा व सांकेतिक, चिन्हात्मक गोष्टी दिल्या असल्याने त्याचे चार प्रकारे अर्थ लावून स्पष्टीकरण केले जाते:

(१) भूतकालीन विचारसरणी - हे पुस्तक पहिल्या शतकातील रोमी साम्राज्यात घडलेल्या घटनांचे पुस्तक आहे. पण हे पुस्तक तर स्वत:च सातत्याने भावी काळी घडणाऱ्या घटना सांगत असल्याचा दावा करते (प्रकटी १:३; २२:७, १०, १८, १९). प्रकटीकरणातील सर्व घटना घडून गेल्या आहेत असे आपण म्हणूच शकत नाही. ख्रिस्ताचे द्वितीयागमन तर पहिल्या शतकात मुळीच झाले नाही.

(२) ऐतिहासिक विचारसरणी - प्रेषितांच्या काळापासून आजतागायतचा मंडळीचा इतिहास हे पुस्तक देते असे यांचे म्हणणे आहे. यातील चिन्हांकित घटना बर्बरांचे रोमवरील हल्ले, रोमन कॅथॉलिक मंडळीचा उदय व त्यांचे होऊन

गेलेले अनेक पोप, इस्लामचा उदय आणि फ्रेंच राज्यक्रांती पाहिल्यास ते जाणवते असे ते म्हणतात. ज्या लोकगटाला समोर ठेवून हे पुस्तक लिहिले आहे त्यांच्यासाठी ही विचारसरणी निरर्थक वाटते. घटना उलगडत असता जी कालमर्यादा घालून दिली आहे त्याकडे ही विचारसरणी पूर्ण दुर्लक्ष करते (११:२; १२:६,१४; १३:५). त्यांच्या स्पष्टीकरणाने प्रत्यक्ष घडलेल्या ऐतिहासिक घटना व प्रकटीकरणातील आशय यातील भेदामुळे अर्थात संघर्ष होतो.

(३) ध्येयवादी विचारसरणी - बऱ्या वाईट शक्तींमधील विश्वासासंबंधीच्या लढ्याचे सर्व युगांचे वर्णन प्रकटीकरणात आहे असे ते मानतात. या विचारसरणीनुसार या पुस्तकात असे ऐतिहासिक उल्लेख नाहीत की भाकितेही नाहीत. ही विचारसरणी प्रकटीकरणाची भविष्यात्मक लक्षणीय बाजू लक्षात घेत नाही असे दिसते. जर त्यांच्या पद्धतीने तर्कशुद्ध अनुमान काढण्याचा प्रयत्न केला तर कोणत्याही सध्याच्या घटनांशी या पुस्तकाचा संबंध लावता येत नाही. मग प्रकटीकरणाचे पुस्तक केवळ आध्यात्मिक सत्यांच्या शिकवणींचे संकलन करणारे पुस्तक बनते.

(४) भविष्यात्मक विचारसरणी - या विचारसरणीनुसार ६-२२ अध्याय भावी काळी घडायचे आहेत. जगाच्या पटलावर येणार असलेले प्रत्यक्ष लोक व घटना यांचे सांकेतिक भाषेतील वर्णन त्यात आहे. ख्रिस्ताच्या द्वितीयागमनाच्या आसपास घडणाऱ्या घटनांचे त्यात वर्णन आहे (६-१९ अध्याय). हजार वर्षांचे राज्य व अखेरचा न्याय (अध्याय २०), सार्वकालिक अवस्था (अध्याय २१,२२). केवळ ही मतप्रणाली प्रकटीकरणाच्या भाकितांना न्याय देते एवढेच नाही तर १-३ अध्यायांची जी पद्धत आहे तीच पद्धत उरलेल्या सर्व अध्यायांमध्ये सुसंगतपणे वापरलेली दिसते.

रूपरेषा

(I) तू पाहिलेल्या गोष्टी. १:१-२०

- (अ) प्रस्तावना. १:१-८
- (ब) गौरवी ख्रिस्ताचे दर्शन १:९-१८
- (क) प्रेषिताला लिहिण्याची आज्ञा. १:१९,२०

(II) सात मंडळ्यांना पत्रे. २:१-३:२२ आता ज्या गोष्टी चालू आहेत.

(III) यानंतर घडणाऱ्या गोष्टी. ४:१-२२:२१

- (अ) स्वर्गातील उपासना. ४:१-५:१४
- (ब) महासंकटाचा काळ. ६:१-१८:२४
- (क) राजाचे पुनरागमन. १९:१-२१
- (ड) हजार वर्षांचे राज्य. २०:१-१०
- (ई) पांढऱ्या न्यायासनाचा न्याय. २०:११-१५
- (फ) सार्वकालिक अवस्था. २१:१-२२:२१